
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि
RFBK-0008564

# शरत्चंद्र चट्टोपाध्याय



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना —खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

28 SEP 1976

[कु मा प]


## शरच्चंद्र चट्टोपाध्याय

डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय (१८७६-१९३८) या सर्वश्रेष्ठ बंगाली कादंबरीकाराचें नांव मराठी वाचकांना आतां अपरिचित नाहीं. ज्या ज्या भाषेंत शरच्चंद्रांच्या कथासाहित्याचा अनुवाद झाला आहे त्या त्या भाषेंतील वाचकांनीं त्याचें मनापासून कौतुक केलेलें दिसून येतें. बेदरकार वृत्तीचा पण कनवाळू मनाचा त्यांच्याएवढा कलाकार आपल्या देशात झाला नाहीं. डॉ. चट्टोपाध्याय यानीं अखंड भ्रमण करून भारतीय समाजाचें सहानुभूतीनें निरीक्षण केलें खालच्या जातीचे लोक त्यांनीं जवळून निरखून पाहिले आहेत. विचित्र अशा समाजव्यवस्थे-मुळें, आर्थिक विषमतेमुळें, चमत्कारिक कुटुंबव्यवस्थेमुळें, जमीनदारी पद्धतीमुळें, देवधर्माच्या भ्रामक कल्पनामुळें सर्व-सामान्य जनतेची केवढी कुचंबणा होत राहते याचें निरीक्षण शरच्चंद्रानीं तन्मयतेनें केलें, व त्याच आधारावर त्यानीं आपली कथासृष्टि उभी केली जे पीडित आहेत, वंचित आहेत, दलित आहेत, पतित आहेत अशाच्याबद्दल त्याच्या अंतःकरणांत अपार दया असे. मनुष्य सुखासुखी पापाचरणी होत नाहीं. पापाचा तिरस्कार करावा पण पापी माणसाम सहृदयतेनें वागवावें अशी त्याची वृत्ति होती. श्रीकांत, देवदास, काशीनाथ, चरित्रहीन, पथेरदावी, दत्ता, बडी दिदी, रामेर सुमति, गृहदाह इत्यादि अनेक छोट्या-मोठ्या कथांतून या दृष्टीनें त्यानीं केलेलें मानवी स्वभावाचें सूक्ष्म रेखाटन अव्वल दर्जाचें आहे.

* * *

व्हीनस प्रकाशन

४१० शनवार पेठ : पुणें २



डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय

व्हीनस पुरवणी वाचनमाला : क्र. ४

# शरच्चंद्र चट्टोपाध्याय

लेखक :
डॉ. प्रल्हाद नरहर जोशी
एम. ए., एम. एड., पीएच. डी.

अनुक्रम ९८६०८
विभाग क्र. चरित्र
क्र. ५८०६
दि. २५।८।५५

क्र. ८५४४

मूल्य १—८—०

RFLBK 0008564

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ति १ ली : १९५५

* * *

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

* * *

प्र का श क
**सदाशिव कृष्ण पाध्ये**
व्हीनस प्रकाशन
४१० शनिवार पेठ : पुणें २

* * *

मु द्र क
**दत्तात्रय गणेश गपचूप**
श्री शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार पुणें २

* * *

चित्रकार : श. धो. आफळे

## निवेदन

१९५४ मध्यें माध्यमिक शाळांच्या बदललेल्या अभ्यासक्रमास अनुसरून आम्ही ही नवीन पुरवणी वाचनमाला तयार करीत आहोंत. भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर जीवनांतील सर्व अंगांना परिपुष्ट करण्याचे सतत प्रयत्न सुरू झाले आहेत. या देशाच्या वैभवाचा सर्व डमला ज्यांच्या खांद्यावर आज ना उद्यां येणार आहे अशा आजच्या कोंवळ्या विद्यार्थ्यांच्या मनाच्या जोपासनेचें कार्य या दृष्टीनें फारच महत्त्वाचें आहे. या नव्या पिढीच्या शिक्षणाबद्दल सर्वत्र चर्चा होत आहे. जुनें बदलून टाकावें असें सर्वत्र बोललें जात आहे; पण नेमकें नवें काय आकारास आणावें याबद्दल मात्र अजून निश्चिति झालेली दिसून येत नाहीं. जीवनाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून शिक्षणाच्या कल्पना आज मोठ्या विस्तारानें वाढीस लागल्या आहेत. विद्यार्थ्यांचें अनुभवक्षेत्र विस्तृत व्हावें, नव्या नव्या प्रश्नांची त्यांना माहिती व्हावी व नव्या ज्ञानाची भूक त्यांच्यांत निर्माण व्हावी म्हणून सतत प्रयत्न चालू आहेत. शिक्षणाची व्यापकताहि दिवसेंदिवस वाढत आहे. या देशांतील बहुसंख्य जनता आतां शिक्षणाच्या मार्गावर वाटचाल करू लागलेली आहे. तेव्हां या संक्रमणाच्या काळांत विद्यार्थिवर्ग व सामान्य वाचक साधारणपणें काय वाचावें या प्रश्नांतच गोंधळून जाण्याची शक्यता आहे. मनाची व शरीराची झपाट्यानें वाढ ज्या वयांत होत असते त्याच वयांत विद्यार्थ्यांच्या मनाच्या विकासाच्या दृष्टीनें कांहीं सकस व सद्‌विचारसंपन्न वाङ्मय त्यांच्या हातीं देण्यासाठीं नव्या अभ्यासक्रमास अनुसरून आम्ही ही पुरवणी वाचनमाला तयार करीत आहोंत. लघुकथा, कादंबऱ्या, एकांकिका, प्रवासवृत्तें, चरित्रें इत्यादि विविध वाङ्मय-प्रकारांची निवड या मालेसाठीं जाणीवपूर्वक केलेली आहे. नामवंत लेखकांच्या व व्यासंगी शिक्षकांच्याच साह्यावर या मालेची उभारणी झालेली असल्याकारणानें विद्यार्थ्यांना ती अतिशय उपयुक्त होईल असें वाटतें. प्रस्तुतच्या मालेंतील पुस्तकें सर्व दृष्टींनीं परिपूर्ण व सर्वांगसुंदर बनविण्याचा प्रयत्न आम्हीं केलेला आहे.

— संपादक-मंडळ

— प्रकाशक

संपादक-मंडळ :

श्री. के. नारखेडे,
एस्. टी. सी.

डॉ. द. न. गोखले,
बी. ए. ( ऑनर्स ), बी. टी.,
पीएच्. डी.

डॉ. प्र न. जोशी,
एम्. ए , एम्. एड् ,
पीएच्. डी.

C458

## माझें मनोगत

बंगाली भाषेतील भारतांतील सर्वांत आवडते कादंबरीकार डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचें चरित्र पूर्ण करून आज वाचकांच्या हातीं देत आहें. शरच्चंद्रासारख्या थोर कलावंताचें चरित्र लिहिण्याचें काम अतिशय कठीण असें आहे. अगदीं आधुनिक काळातील या कादंबरीकाराचें जीवन प्राचीन कवींप्रमाणेंच रहस्यमय व अज्ञात असें आहे. खुद्द बंगाली भाषेंतहि या कथासम्राटाचें विश्वसनीय असें चरित्र उपलब्ध नाहीं. चरित्राचा स्थूल आराखडा सर्वत्र प्रसिद्ध असला तरी शरच्चंद्रांच्या जीवनांतील अनेक रहस्यमय भाग अजून प्रकाशांत आलेले नाहींत. त्याचे अनेक मित्र होते, अनेक चहाते होते. त्यांनीं त्याना कित्येक प्रश्न खोदून खोदून विचारले असतील, पण दर वेळीं स्वतः शरद्बाबूंनींहि उडवाउडवीचीं उत्तरें दिलेलीं दिसतात. जन्मभर भ्रमन्ती करणाऱ्या या कथाकाराच्या जीवनाविषयीं अधिकच जिज्ञासा त्याच्या अमर्याद संख्येच्या वाचकाना लागून राहिलेली दिसते.(पथेर दावी, श्रीकांत, देवदास, बडी दिदी, चरित्रहीन,) दत्ता इत्यादि सर्वांगसुंदर कथा लिहून मानवी स्वभावाचें सूक्ष्म रेखाटन करणाऱ्या कलावंताचें हृदय केवढें असावें ? त्याचा स्वभाव कसा होता ? त्याच्या आवडीनिवडी कशा होत्या ? त्याच्या जीवनात कोणकोणते उत्पात घडून आले ? कोणकोणतीं माणसें त्यास भेटलीं ? त्याचें प्रापंचिक जीवन कोणत्या प्रकारचें होतें ? — इत्यादि अनेक प्रश्नांचीं उत्तरें शरच्चंद्राच्या असंख्य वाचकाना हवीं असतात. जों जों रहस्यमयता अधिक वाढते तों तों त्यांच्या चाहत्यांच्या जिज्ञासेसहि पूर आल्यासारखा दिसतो. पण शरच्चंद्रांच्या संपूर्ण जीवनाचें कोडें अजूनहि कोणास उलगडलेलें नाहीं. अगदीं अलीकडे म्हणजे नोव्हेंबर १९५४ पासून 'भारतवर्षा'त (या मासिकांतच शरच्चंद्रांच्या महत्त्वाच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.) श्री. गोपालचंद्र रॉय यांची 'शरच्चंद्रांचे विवाह-प्रसंग' नांवाची लेखमाला सुरू झाली आहे. श्री. रॉय यांनीं शरच्चंद्रांच्या जीवनाचा अभ्यास पद्धतशीर रीतीनें चालविला आहे. शरद्बाबूंची पत्नी हिरण्मयी अजून हयात आहे. तिच्या मदतीनें काहीं प्रश्नाचा निर्णय देण्याचा विचार कदाचित् श्री. रॉय याचा असावा.

अशा अनिर्णीत परिस्थितींत मराठी भाषेंत शरच्चंद्राचें चरित्र माझ्यासारख्यानें लिहिण्यास धजावें हें एक मोठें धाष्टर्यच होय. शरद्बाबूंचा चरित्रकार

म्हणजे खरें पाहिलें असतां त्याच्या एवढाच मोठा कलावन्त किंवा थोर हृदयाचा असला पाहिजे, तरच त्याच्याकडून त्या महान् कलाकाराचें सम्यक् दर्शन होण्याची शक्यता आहे. परंतु असें विश्वसनीय चरित्र उपलब्ध होईपर्यंत आहे या माहितीच्या व शरद्बाबूंच्या वाङ्मयाच्या आधारें आपणहि जमल्यास एखादें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करावा, ही अगदी साधी व विनयाची भूमिका माझी आहे. मराठी भाषेंतील वाचकाची शरच्चंद्रावरील प्रीति अवर्णनीय आहे त्याचे शेंकडों वाचक आज त्याच्या चरित्रातील कांहीं भाग तरी समजावा म्हणून उत्कंठित झाले आहेत, त्याच्यासाठीं एका वाचकानेंच जिज्ञासाबुद्धीनें शरच्चंद्राच्या चरित्राविषयीं आहे या सामग्रीचें परिशीलन करून हें चरित्र लिहिलें आहे, एवढीच भूमिका यापाठीमागें आहे. त्या श्रेष्ठ कलाकाराच्या सर्व मानासिक अवस्थांचें परीक्षण करावें, त्याच्या जीवितातील रहस्यमय भागाचा तपास करून त्यांवर कांहीं प्रकाश टाकावा किंवा त्याच्या कलेंतील मर्म वाचकाना नेमकें समजावून द्यावें, अशा हिरीरीनें हें चरित्र लिहावयास घेतलें नाहीं. सर्व-सामान्य वाचकांस सर्वसामान्य वाचकानें हा एक त्याचा स्थूल परिचय करून दिला आहे इतकेंच. शरच्चंद्रांच्या सहवासाचा लाभ ज्याना मिळाला आहे असे अनेक लेखक मराठी भाषेंत व इतरहि भाषात आहेत. त्याच्याकडून किंवा बंगाली लेखकाकडून शरच्चंद्राचें समग्र चरित्र विश्वसनीय रीत्या प्रकट होईल तेव्हां अर्थात्च माझ्या या पुस्तकाचें मोल त्या मानानें कमी होईल.

तसें पाहिलें तर बंगाली भाषेंतील वाङ्मय मराठी भाषेला फार पूर्वीपासून परिचित असें आहे. बंकिमचंद्र चतर्जी, रवीन्द्रनाथ ठाकूर व शरच्चंद्र चट्टोपाध्याय यासारख्या श्रेष्ठ कथाकारांची साहित्यसृष्टि थोड्याफार प्रमाणात पूर्वीपासूनच मराठींत अवतीर्ण होत आली आहे. कै. काशिनाथ रघुनाथ मित्र, कै. प्र. श्री. भसे, कै वा. गो. आपटे वगैरे साहित्यसेवकांचे प्रयत्न या दृष्टीनें वाखाणण्यासारखे आहेत. आजहि श्री. भा. वि. वरेरकर, श्री. वि. सी. गुर्जर, श्री. शं. बा शास्त्री, श्री. तेंडुलकर, श्री. पु. बा. कुलकर्णी इत्यादि लेखक बंगाली भाषेंतील कथासाहित्य मराठींत आणून एक फार महत्त्वाचें काम पार पाडीत आहेत. शरत्साहित्याचा गौरव मराठी भाषिकानीं केवढा केला आहे याचें वर्णन या ठिकाणीं करावयास पाहिजे असें नाहीं. या सर्व वाचकांची चरित्रविषयक जिज्ञासा थोड्या अंशानें जरी पूर्ण झाली तरी या माझ्या अल्पशा प्रयत्नाचें

सार्थक झाल्यासारखें होईल. शरच्चद्रांच्या कथासाहित्यावर बेहद्द खूष होऊन गेलेल्या वाचकांना या चरित्राचा थोडा तरी उपयोग होईल असें वाटतें.

शरद्बाबूंच्याएवढा कथाकार मुन्शी प्रेमचंद यांच्याखेरीज आपल्या देशात दुसरा झाला नाहीं. जे दु:खित आहेत, पीडित आहेत, रजले-गांजलेले आहेत त्यांच्या वेदनाचें जवळून निरीक्षण शरच्चंद्रानीं केलें, त्यांच्या अपमानित जीविताची त्यांनीं आपुलकीनें चौकशी केली व आपल्या सामर्थ्यवान् पण हळु-वार लेखणीनें त्या पीडितांचें, पतितांचें दुःख त्यानीं तथाकथित प्रतिष्ठित लोकापुढें माडलें. बंकिमचंद्र आणि रवीन्द्रनाथ हे थोर कथाकार खरेच, पण दुर्लक्षित समाजाचें दुःख कथावाङ्मयात सहानुभूतीनें चित्रित करणारे एकमेव कथाकार म्हणजे शरच्चंद्र चट्टोपाध्याय. या ठिकाणीं बंकिमचंद्र, रवीन्द्रनाथ व शरच्चद्र यापैकीं श्रेष्ठ कोण हा प्रश्नच अनुचित आहे. प्रत्येक जण आपापल्या परीनें उच्च स्थानावर शोभून दिसेल असाच आहे. शरच्चंद्र व रवीन्द्रनाथ याचे संबध कसे होते, हा एक वादाचा प्रश्न आजकाल निर्माण होतो; आणि साहित्येतर प्रातांत ज्याप्रमाणें भक्तगणातच अधिक तीव्रता व कटुता एकमेका-बद्दल निर्माण होते त्याचप्रमाणें आज रवीन्द्र व शरद् याच्याबद्दल झालेली दिसते. त्या वादात मी मुद्दाम शिरलेलों नाहीं. रवीन्द्राचें ऋण शरच्चंद्रांनीं पदोपदीं मान्य केलें आहे व शरच्चद्राच्या साहित्याचें गुणग्रहण रवीन्द्रांनीं उदार अंतःकरणानें केलेलें दिसतें.

समाजाच्या विचित्र रचनेमुळें व जुन्यापुराण्या कौटुंबिक पद्धतीमुळें स्त्री-जातीची कशी अनुकपनीय अवस्था होते, याचें जिवंत चित्रण शरद्बाबूंच्या कथासाहित्यात आपणास पाहावयास मिळेल. मनुष्य काहीं सहजासहजीं, गंमत म्हणून, हौस म्हणून पापाचरणी होत नाहीं, स्त्री तर स्वतः होऊन कधींच पापकर्मी होणार नाहीं, तर प्रतिकूल परिस्थितीच्या थयथयाटात अगतिक होऊन एखादा पुरुष किंवा स्त्री जर पतित झाली तर समाजानें काय त्या व्यक्तीला महारोग्याप्रमाणें दूर लोटावयाचें ? तिच्या माणुसकीस व तिच्या सद्गुणांस काहींच किंमत द्यावयाची नाहीं ? समाजाचे घाव सहन करीत करीत व मन जाळीत जाळीत त्या व्यक्तीनें विरोधी परिस्थितीशीं टक्कर देऊनझुंज खेळण्यात आपलें आयुष्य खर्च केलेलें असतें; या त्यागास कांहींच मोल नाहीं ? लब्धप्रतिष्ठित व धनवान् लोकांच्या उघडउघड पापाचरणाकडे आपण सोयिस्कर रीत्या दुर्लक्ष

करतों आणि एखाद्या दरिद्री विधवा स्त्रीच्या हातून गुन्हा घडण्याचा प्रसंग दिसला कीं समाजात काहूर निर्माण होतें, ही विचित्र व दयनीय परिस्थिति शरच्चंद्रानीं उघड्या डोळ्यानीं पाहिली व या पतिताकडे कोणत्या भूमिकेवरून आपण पाहावें हेंहि त्यानीं समाजाला शिकविलें. पतित स्त्रिया या शापभ्रष्ट देवता आहेत, असें शरच्चंद्र मानीत असत. अशा कित्येक शापभ्रष्ट देवताचें पुण्यकारक दर्शन शरत्साहित्यांत आपणास घडतें. शरच्चंद्रांसारख्या थोर माणसाच्या अश्रु-जलानें पापी माणसाचें पापकर्म धुऊन निघालेलें दिसतें.

पतिताच्या मनोव्यापारांच्या चित्रणामुळें शरच्चंद्राविषयीं सर्व ठिकाणीं गैर-समज मात्र पसरत गेले. बाल्पणापासून सतत भटकेगिरी स्वीकारलेली असल्या-मुळें शरच्चंद्राना मानवी जीविताचे शेंकडों नमुने जवळून पाहावयास सांपडले. त्यांतील पतित व्यक्तींचें चित्रण शरच्चंद्रानीं विशेष तन्मयतेनें केल्यामुळें बंगाल-मधील कित्येक प्रतिष्ठित लोकानीं शरद्बाबूंविरुद्ध काहूर उठविलें — नाना प्रकार-च्या व्यसनांच्या तावडींत सांपडणारा हा बदफैली कथाकार लोकांना काय सागणार ? शरद्बाबूंची ' चरित्रहीन ' कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर तर लोकानीं प्रचारच सुरू केला कीं, स्वतः शरच्चंद्रच चरित्रहीन असून त्याचें जीवनहि अनेक व्यसनानीं बरबटलेलें आहे. अर्थात् ही टीका फार काळ टिकूं शकली नाहीं. शरच्चंद्रांचें खरें उदात्त दर्शन जवळून घेणारे लोक कांहीं कमी नव्हते. देशबंधु चित्तरंजन दास, सुभाषचंद्र बोस, प्रमथनाथ चौधरी, द्विजेन्द्रलाल रॉय, हरिदास शास्त्री, शरच्चंद्र बोस, दिलीपकुमार रॉय इत्यादि मित्रमंडळींनीं शरद्बाबूंच्या कलेची महती बरोबर ओळखली होती. वरवर भ्रमिष्ट आणि फटिंग दिसणाऱ्या या कलंदर कलावंताच्या अंतःकरणात दयेचा व श्रद्धेचा साठा किती होता हें त्यानीं हेरलें होतें. शरद्बाबूंची कला, त्याचें कथनकौशल्य, त्याचें संवादचातुर्य, त्यांचें सूक्ष्म स्वभावचित्रण व मानवजातींतील उपेक्षिताबद्दलची त्यांची प्रगाढ सहानुभूति याचा परिचय त्याच्या निकटवर्ती लोकांना असल्यामुळें शरच्चंद्राच्या टीकाकारांचें महत्त्व आपोआप कमी झालें. शरच्चंद्राच्या तात्विक विचाराची महतीहि लोकाच्या ध्यानांत येण्यास वेळ लागला नाहीं. कथानकाची कलात्मक रीत्या सुंदर अशी गुंफण करतांना जागजागी त्यांनीं तात्त्विक विचारांचा जो फुलोरा निर्माण केलेला आहे तो तर सदैव टवटवीत व सुगंधित राहील असाच आहे. महायोगी अरविंद घोष व त्यांचे प्रख्यात भक्त दिलीपकुमार रॉय

यानाहि शरद्बाबूंच्या साहित्यानें मोहिनी घातली ती ध्यानांत घेण्यासारखी आहे. शरच्चंद्र दिवंगत झाल्यानंतर पाच-सहा वर्षांनीं श्री. दिलीपकुमार रॉय यांनीं त्याच्या ' निष्कृति ' या दीर्घकथेचा इंग्रजी अनुवाद ' The Deliverance ' या नांवानें प्रसिद्ध केला. अर्थात् अनुवादाचें हें कार्य शरद्बाबू होते त्या वेळ-पासूनच सुरू होतें. खुद्द अरविंदबाबूंनींहि या अनुवादावर आपला हात फिर-विला होता. योगी अरविंदांना शरच्चंद्राबद्दल फार प्रेम वाटे. दिलीपकुमाराच्या या अनुवादास अरविंदांनीं दिलेला आशीर्वाद वाचण्यासारखा आहे. शर-च्चंद्राच्या मार्मिक निरीक्षणाचें व दुःखितांबद्दलच्या कळवळ्याचें अरविंदबाबूंनीं मनापासून कौतुक केलें आहे. याच अनुवादास प्रस्तावना लिहिताना रवीन्द्र-नाथांनीं म्हटलें आहे: "कादंबरीकारास मिळणारें सर्वोत्तम पारितोषिक शरच्चंद्रांनीं मिळविलें आहे. बंगाली वाचकांचीं हृदयें त्यांनीं पूर्णपणें जिंकलीं आहेत." शरच्चंद्रांचें चरित्र मराठींतील तरुण विद्यार्थ्यांनाहि कां वाचण्यासारखें आहे, हें आतां वेगळें सांगण्याची जरूरी नाहीं.

शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या चरित्राबरोबरच मी हिंदी भाषेंतील कथासम्राट् मुन्शी प्रेमचंद यांचेंहि चरित्र वाचकांपुढें ठेवीत आहें. या दोनहि चरित्रांच्या मागें आणखी एक हेतु आहे. आपल्या देशांतील सागराएवढ्या पसरलेल्या अथांग जनतेची सर्वांगीण सुधारणा व्हावयाची असेल तर ' माझें, माझ्या प्रांतापुरतें ' असें म्हणून चालणार नाहीं. आपला भारत देश खंडप्राय असला तरी व त्याच्यांत जगांतील सर्व विविधता एकवटलेली असली तरी सांस्कृतिक कल्पनांची समानता मात्र सर्वत्र दिसून येते. ही एकता टिकवून धरावयाची असेल तर एकमेकांचे आचारविचार, एकमेकांचीं श्रद्धास्थानें, एकमेकांचीं आदरस्थानें आपण सहानुभूतीनें समजावून घेतलीं पाहिजेत. भारत देशाच्या या आंतरिक ऐक्यासाठीं आज ' आंतरभारती ' किंवा मध्यवर्ती सरकारची ' साहित्य अकादमी ' या संस्था आपापल्यापरीनें प्रयत्न करीत आहेत. या ऐक्यासाठीं ज्याप्रमाणें निरनिराळ्या देशांतील संतांचें भक्तिसाहित्य उपयोगांत येण्यासारखें आहे त्याचप्रमाणें ललित साहित्याचा परिचयसुद्धां उपयुक्त होण्यासारखा आहे. म्हणूनच मुन्शी प्रेमचंद व शरच्चंद्र यांच्या चरित्रांचा व साहित्याचा परिचय करून देण्याचें काम मीं यथाशक्ति केलें आहे. येथें आणखी एका आक्षेपाचा खुलासा केला पाहिजे. हिंदी किंवा बंगाली भाषेंतील साहित्य

वाचून " मराठी वाङ्मयात कोठें आहेत अशा कलाकृति ? " यासारखे प्रश्न विचारण्यासाठीं हा प्रयत्न नाहीं.

या चरित्राचा नाममात्र लेखक मी आहें. चरित्र सामग्री जमा करताना मला अनेकांची मदत झाली आहे. 'शरच्चंद्र चतर्जी' (हुमायून कबीर) 'शरच्चंद्र चतर्जी–हिज माइंड ॲण्ड आर्ट' (इन्द्रनाथ मदान), 'शरच्चंद्र : एक अध्ययन' (मन्मथनाथ गुप्त), 'शरच्चंद्र : व्यक्ति और कलाकार' (इलाचंद्र जोशी) इत्यादि ग्रंथाचा मला फार उपयोग झाला आहे. या सर्व लेखकाचा मी अत्यंत ऋणी आहें. माझे मित्र श्री. श्रीपाद जोशी व श्री. रा. चिं. ढेरे यांनीं मला या चरित्रलेखनाच्या वेळीं अनेक प्रकारें मदत केली; तसेंच येथें येऊन स्थायिक झालेले बंगाली भाषेंतील प्रसिद्ध कथाकार श्री. शरदेन्दु बन्दोपाध्याय यांच्याशीं केलेल्या चर्चेचा मला पुष्कळ उपयोग झाला. त्यांनीं मोठ्या ममतेनें कांहीं चरित्राची सामग्रीहि मला दिली. या सुहृदाचे आभार मी कोठवर मानावेत ? शरच्चंद्रांचें चित्र, त्याचें साहित्य हिन्दींत प्रकाशित करणारे श्री. रघुनाथ दिपाजी देसाई यानीं दिल्यामुळें पुस्तकास शोभा आली आहे. या सर्वांच्या मदतीमुळेंच हें चरित्र मी पूर्ण करू शकलों. येथील व्हीनस प्रकाशनचे हौशी चालक श्री. स. कृ. पाध्ये यानीं तें मोठ्या आस्थेनें प्रकाशित केलें. या चरित्राचें स्वागत मराठी वाचक उत्साहानें करतील अशी आशा वाटते.

४३७ नारायण पेठ,
पुणें २

—प्र. न जोशी
२६–१–५५

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | उपद्व्यापी शरद् | १ |
| २ | संन्याशाची भ्रमती | १६ |
| ३ | ब्रह्मदेशचा भिक्षु | ३० |
| ४ | शरच्चंद्राचें प्रापंचिक जीवन | ४६ |
| ५. | शरच्चंद्राची साहित्यसृष्टि | ६० |
| ६. | अखेरचें परिभ्रमण | ९२ |
| ७. | नारीजातीचा परम मित्र | १०६ |
| ८. | शरच्चंद्रांचे बालनायक | १२२ |
| ९ | शरद्बाबूचें तत्त्वचिंतन | १३९ |


• • •

८५६४
९६५०६
२५/८/५५

# शरच्चंद्र चट्टोपाध्याय

## उपद्व्यापी शरद् : १

गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा या नद्यांनीं पुनीत झालेली बंगालची भूमि अत्यंत सकस व अनेक दृष्टींनीं समृद्ध अशी आहे. या सुपीक भूमीनें भारत-वर्षाला अनेक प्रकारचीं व विविध क्षेत्रांतील नररत्नें पुरविली आहेत. चंडिदास, चैतन्यप्रभु, रामकृष्ण परमहंस, विवेकानंद, अरविंद घोष इत्यादि संतपुरुषांच्या वास्तव्यानें व उपदेशानें ही भूमि पवित्र बनलेली आहे. सुरेन्द्रनाथ बानर्जी, बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास, सुभाषचंद्र बोस, श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्यासारखे देशसेवक व राजकारणी पुरुष याच संपन्न देशातून आधुनिक काळांत निर्माण झाले. कन्हय्यालाल दत्त, खुदिराम बोस, रासबिहारी बोस इत्यादि क्रान्तिकारकांच्या अतुल शौर्याचे निनाद बंगाल देशातून निघालेले होते. मदनलाल घोष, रामानंद चतर्जी यांसारखे कुशल संपादक व राजा राममोहन राय, देवेन्द्र-नाथ ठाकूर, ईश्वरचंद्र विद्यासागर यांसारखे समाजसुधारकहि बंगालच्या भूमीनें भारतवर्षास पुरविले आहेत. जगदीशचंद्र बोस व प्रफुल्ल-चंद्र रे यांची विज्ञानतपस्या कोण विसरूं शकेल? अध्यात्म, राजकारण, समाजकारण, क्रांतिकार्य, शास्त्रविज्ञान इत्यादि विविध क्षेत्रांत आपल्या अद्वितीय प्रकाशानें तळपत राहणारा बंगाल देश साहित्याच्या प्रांतांत तरी मागें कसा राहणार? तोरु दत्त, मायकेल मधुसूदन दत्त, बंकिमचंद्र, रवींद्रनाथ हीं नांवें कोणाच्या लक्षांत राहणार नाहींत? याच मालिकेंत शोभून दिसणारा पण प्रवृत्तीनें व परंपरेनें स्वभावतःच वेगळा असणारा कादंबरीकार म्हणजे शरच्चंद्र चट्टोपाध्याय.

लोकप्रियतेच्या बाबतींत विचार करावयाचा झाला तर असें म्हणतां येईल कीं, शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्याएवढा कथाकार बंगालमध्येंच काय उभ्या भारतातहि दुसरा कोणता झाला नाहीं. वीस वीस तीस-तीस आवृत्त्या एखाद्याच्या कादंबरीच्या निघत राहणें व त्याचे अनुवाद इतर कोणत्याहि भाषेंत तितकेच लोकप्रिय होत राहणें ही गोष्ट काय दर्शविते ? पुस्तकें किती खपतात हेंच एक कलावंताच्या श्रेष्ठतेचें गमक नाहीं ही गोष्ट तर खरीच, पण कलेच्या श्रेष्ठत्वाच्या अनेक कसोट्या टीकाकारांनीं ठरविल्या आहेत त्यात रसिक जनतेची पसती ही एक मुख्य कसोटी आहे. शरद्बाबूंचें साहित्य व त्याची कला याबद्दल भारतवासीय वाचकाना मनापासून आदर आहे. रवीन्द्रनाथ ठाकूर लोकोत्तर कवि तर खरेच, पण त्याच्या कथाविश्वात अमीर-उमरावाचें, सुशिक्षिताचे, पुढारलेल्या वर्गाचें चित्रण मिळतें, पण अथाग पसरलेला अडाणी जनसमूह साहित्याच्या प्रातात केव्हा येणार ? अज्ञानानें, दारिद्र्यानें, सदोष समाजरचनेमुळें, दुष्ट चालीरीतींमुळें, आर्थिक विषमतेमुळें, दास्यामुळें पिडलेल्या, व्यथित झालेल्या, कष्टी बनलेल्या, भारावलेल्या समाजाचें निरीक्षण विशाल अशा सहानुभूतीनें करणारा सर्वांत मोठा लेखक एक मुन्शी प्रेमचंद सोडून शरद्बाबूंखेरीज या देशात दुसरा झाला नाहीं. विचित्र समाजरचनेमुळें व सदोष कौटुंबिक पद्धतीमुळें एखादा पुरुष किंवा एखादी स्त्री पतित झाली तर त्याकडे फार कठोरपणें पाहिलें जात असे. पापाचा तिरस्कार केव्हाहि करावा, पण चुकून हातून पाप झालें असलें तर त्या पापी माणसाकडे कोणत्या बुद्धीनें पाहावें, हें शरच्चंद्रांच्या कथाकादंबऱ्यावरून व त्याच्या चारित्र्यावरून समजण्यासारखें आहे. जे धनवान् आहेत, संपत्तिवान् आहेत, त्यांच्या हरएक पुण्यकृत्यामागें पापराशी उभ्या असतात, पण धनाच्या झगझगाटात त्या सहसा कोणास दिसून येत नाहींत. या उलट अब्रूरक्षणासाठीं सतत धडपड करणाऱ्या साध्या भोळ्या गरिबाची अब्रू मात्र चव्हाट्या-

वर येत असते. नाइलाज म्हणून अगतिक होऊन जे पतित झाले, ज्यांच्या हातून दुराचरण घडलें, त्यांच्या अंगचे सर्व सद्गुण लुप्त होतात कीं काय? समाजाला अशा व्यक्तींचा काहींच उपयोग नाहीं! समाजाच्या या सडलेल्या व किडलेल्या भागाकडे दयार्द्र दृष्टीनें पाहून त्यांच्या जखमावर हळुवार हात फिरवण्याचें काम शरच्चंद्रांनीं केलें. दरिद्री जनतेच्या मूळ भावनांना वाचा फोडली व पश्चात्तापानें दग्ध झालेल्या पतितांचे अश्रु त्यांनीं कनवाळूपणानें पुसले. शतकानुशतकें समाजाच्या दडपणाखालीं गुदमरून गेलेल्या नारी-हृदयाच्या संवेदना शरद्बाबूंनीं आपल्या कथाविश्वात साकार करून दर्शविल्या.

अन्यायाच्या, दारिद्र्याच्या, दास्याच्या रोगातून शरच्चंद्रांनीं अनेकांना मुक्त केलें. समाजाच्या सर्व थरांतून त्यांनीं प्रवास केला व सर्व सुखदुःखादि भावनांचा अनुभव घेतला. सर्वसामान्य जनता कोणत्या पातळीवर आहे, याची यथायोग्य जाणीव शरद्बाबूंना जेवढी होती तेवढी इतर कोणत्याहि कथाकारास असेल असें वाटत नाहीं. याच सामान्य जनतेनें त्यांच्यावर अलोट प्रेम केलें यात आश्चर्य तें कसलें? सन १९३२ मध्यें शरच्चंद्रांच्या सत्तावन्नाव्या वाढदिवसानिमित्त बंगालमध्यें मोठ्या उत्साहानें शरद्गौरव करण्यात आला. बंगालच्या सर्व साहित्यसेवकांनीं आपापलीं स्तुतिसुमनें शरच्चंद्रांच्या चरणावर अर्पण केलीं. कोणत्याहि भारतीय लेखकाचा जनतेकडून एवढा सन्मान झाला नसेल. बंगालमधील नारीजगतानें तर शरद्बाबूंचें सहस्र मुखानीं गुणगान केलें. पशुकोटींतून मानवकोटींत स्त्रियांना प्रवेश करून देणारा एक थोर महात्मा म्हणूनच बंगालमधील स्त्रिया शरद्बाबूंकडे पाहतात. याच समारंभाच्या वेळीं बंगालमधील नारीसंघानें पुढील शब्दांत शरद्बाबूंना अभिवादन केलें होतें—

"पराधीन देशातील अधःपतित समाजामधील असहाय होऊन अंतःपुरांत वावरणाऱ्या हृदयाच्या मूक आनंद संवेदनांना आपण आपल्या

साहित्यात मूर्त स्थान प्राप्त करून दिलें. त्याच्या दुर्गतिपूर्ण जीवनांतील सुखदुःखाकडे तीव्र सहानुभूतीनें पाहून साहित्यांत त्याचें सत्यदर्शन तुम्हीं घडवून आणलें. आपल्या सर्वगामी दृष्टीनें, सूक्ष्म अवलोकनशक्तीनें, सुगंभीर पृथक्करणबुद्धीनें आणि विचित्र मानवचरित्राच्या अंतरंगाचा ठाव घेणाऱ्या आपल्या प्रज्ञेनें नारी-चित्तांतील गूढतम भावनांचाहि परामर्श घेतलेला आहे. नारी-चरित्राच्या हे परम रहस्यज्ञात्या, आम्ही सर्व जण आपणास वंदन करीत आहोंत...." नारीजगताकडून एवढी प्रशंसा दुसऱ्या कोणत्या साहित्यकाराची झाली असेल, असें वाटत नाहीं.

लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या शरच्चद्राच्या कथासाहित्याचा आस्वाद सामान्य जनता आत्मीयतेनें घेत होती. पण या कथासम्राटाच्या जीवनाची किंवा चरित्राची काहीं माहिती आपणास मिळावी अशी इच्छा कोणाच्याहि मनात निर्माण झाली असेल. शरद्बाबूंच्या कादंबऱ्यांतील रेखीव व सत्यसृष्टींत जणुं समोर घडत असणारीं वर्णनें वाचून त्याच्या जीवनचरित्राची ओळख आपण करून घ्यावी, अशी उत्कंठा अनेकाना असावी. पण शरद्बाबूंच्या जीवनचारित्राचा भाग पूर्णतया रहस्यमय असाच अजूनपावेतों आहे. त्याच्या अनेक मित्रानीं त्याना वारंवार विचारून काहीं माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे, पण त्यांत एवढी विसंगति दिसते कीं, प्रत्येकानें एकेक रहस्यमय कथा आपल्या कल्पनेनें बनवलेली असावी असें वाटतें. तरी त्यातूनहि शरच्चद्राच्या चरित्राचा स्थूल आराखडा तयार करण्यासारखा आहे.

बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील देवानंदपूर नावाच्या एका छोट्याशा गांवात सर्वसाधारण अशा मध्यमवर्गीय कुटुंबांत शरच्चंद्रांचा जन्म सन १८७६ च्या १६ सप्टेंबर रोजीं झाला. प्राप्त परिस्थितीशीं बंडखोर राहून लोकविलक्षण मार्गानें जीवन व्यतीत करण्याची चमत्कारिक परंपरा या घराण्यात दिसून येते. असें सांगतात कीं, शरच्चद्राचे आजोबा मोठे कट्टर पण विद्रोही असे होते. शेतकऱ्यांची बाजू घेऊन जमीनदारांशीं

लढा देण्यात त्यानीं पुढाकार घेतल्यामुळें जमीनदाराकडून त्यांची हत्या झाली. त्याना एकच मुलगा असून त्याचें नांव मोतीलाल असें होतें. मोतीलालला घेऊन त्याची विधवा आई लोकांचा कसाबसा आश्रय घेऊन रामधन गांगुली नावाच्या कोणा एका दूरच्या नातेवाइकाकडे राहू लागली. याच गृहस्थाकडे मोतीलालनें आपला प्रारंभिक दशेंतील विद्याभ्यास केला. मोतीलालच्या सद्वर्तनाकडे लक्ष देऊन रामधन गांगुली यानीं आपली नात भुवनमोहिनी हिच्याशीं त्याचें लग्न करून दिलें.

मोतीलाल व भुवनमोहिनी यांना एकूण नऊ मुलें झालीं. पहिली एक मुलगी होती, तिचें नाव अनिलादेवी. तिच्यानंतर जन्मास आलेला मुलगा म्हणजे शरच्चंद्र. यानंतरचे चारहि मुलगे लहानपणींच मरण पावले. यानंतर या जोडप्यास दोन मुलगे व एक मुलगी झाली. मोतीबाबू आपल्या मुलाच्यावर फार माया करीत असत. घरची सांपात्तिक परिस्थिति मात्र बेताचीच होती. देवानदपुरात एका तुरुंगामध्यें नोकरी करून मोतीलाल महिन्याकाठीं वीस-पंचवीस रुपये कसे तरी मिळवीत असत. तेवढे पैसे प्रपंचास कसे पुरणार ? आणि ते सुद्धा नियमानें मिळतीलच अशी खात्री नव्हती. कारण मोतीलालबाबू आपल्याच कल्पनासाम्राज्यात कित्येक वेळां तल्लीन झालेले असत. कविता व कथा लिहिण्याची त्यांना मनस्वी आवड होती. साहित्यचर्चा हा त्यांचा आवडता विषय असून आपल्या मनच्या कथा लोकाना सांगून ते बैठक रंगवीत असत. उच्च दर्जाची कल्पनाशक्ति या गृहस्थास अनुकूल असल्याकारणानें मोतीलालबाबू उत्तमपैकीं चित्रेंहि काढीत असत. कांहीं कादंबऱ्यांचीं कथानकेंहि त्यांच्या डोक्यात घोळत असत, पण या सर्व प्रकारच्या कलासेवेंत एक मोठें वैगुण्य असें होतें कीं, त्याच्या सर्व कथा व कादंबऱ्या अपुऱ्याच राहत. एक कथा अर्धवट लिहून झाली कीं मोतीलालबाबूंचें लक्ष दुसऱ्याच एखाद्या प्रश्नाकडे वळे

व मग लिहून झालेली गोष्ट तशीच पडे. अशा प्रकारच्या कथाचे व कादंबऱ्यांचे ढीगच्या ढीग त्याच्या घरात साठलेले असत. जन्मभर त्याची साधनाच सुरू होती; सिद्धावस्थेस पोंचण्याचें भाग्य त्यांना कधींच लाभलें नाहीं. नोकरींतहि त्याचें चित्त कधींच पूर्णतेनें नव्हतें, त्यामुळें प्रापंचिक दृष्ट्याहि त्याना कधीं यश लाभलें नाहीं.

देवानन्दपूरच्या प्राथमिक शाळेंत शरच्चद्रांचें शिक्षण सुरू झालें. या पोराचें तरी लक्ष शिक्षणात कोठून असणार ? उनाडपणें भटकत रहावें, लुटारूपणा करावा, गावात उगाच दंडेली करीत हिंडावें, हे शरच्चंद्राचे उद्योग बालपणींच सुरू होते. विद्येची आराधना त्याने कधींच केली नाहीं. शाळेंतील मास्तराना सतावून सोडण्याचा उद्योग तर शरदला मनापासून पसंत असे. 'देवदास' कादंबरीच्या प्रारभींच शरदूबाबूंनीं देवदासाच्या प्राथमिक शाळेचें एक सुंदर व सजीव वर्णन केलें आहे. खुद्द शरच्चद्राची शाळा व त्याचें त्या वेळचें जीवन तसेंच असावेंसें वाटतें. 'देवदास' कादंबरीची सुरवात पाहा "वैशाखाच्या एका दुपारचा दिवस होता. ऊन अगदीं रणरण करीत होतें व अगाची लाही लाही होत होती. याच वेळीं मुखर्जी घराण्यातील देवदास पाठशाळेंतील एका कोपऱ्यात सतरंजीच्या एका फाटक्या तुकड्यावर हातात स्लेटपाटी घेऊन शातपणें बसला होता. तो कधीं डोळे उघडी तर कधीं मिटून घेई. मधूनच पाय पसरून दीर्घ अशी एखादी जाभई तो देई. मध्येंच तो एकाएकीं गंभीर झाला. हातपाय नीट आवरून तो कसला तरी विचार करीत होता या अशा अतिशय रम्य वेळीं माळावर जाऊन पतग उडविण्याऐवजीं शाळेच्या चार भिंतींत कोंडून राहणें त्याच्या अगदीं जिवावर आलें होतें. त्याला तावडतोब एक उपाय सुचला. त्याच क्षणीं हातात पाटी घेऊन तो उभा राहिला.

या वेळीं शाळेला मधल्या फराळाची सुट्टी झाली होती. देवदासला

अशी सुट्टी कधींच मिळत नसे. कारण एकदां मधली सुट्टी होऊन शाळा सुटली कीं देवदास कधीं परतच येत नसे. ... '' इत्यादि. यापुढच्या भागात देवदासनें जो धुमाकूळ उडवून दिला आहे तो वाचला म्हणजे शरच्चद्राच्या बालपणाचें चित्र रेखाटावयास फारशी अडचण पडणार नाहीं. त्याचे या प्राथमिक शाळेंतील शिक्षक पियारी पंडित ' देवदास ' कादबरींत गोविंद पंडित झालेले दिसून येतात. याच शाळेंत एक मुलगी येत असे. शरच्चद्राच्या सर्व उपद्व्यापात तिचें साह्य असे. अनेक वेळां ती त्याच्याकडून काहीं चुकल्याबद्दल मारहि खाई, पण कोणत्याहि प्रसगीं शरच्चंद्राचें नाव तिनें कोणासहि सागितलें नाहीं. असें सागतात कीं, ' देवदास ' मधील पार्वती व ' श्रीकांत ' मधील राजलक्ष्मी याच्यांतील स्वभावछटा याच मुलींत शरच्चद्रानीं निरखून ठेवल्या होत्या.

शरच्चद्रांचे वडील कल्पनाविश्वात रममाण होणारे असल्याकारणानें या व्यावहारिक जगतात त्याचें फारसें जमलें नाहीं. अनेक वेळा त्याना नोकरी सोडावी लागली. पण मग प्रपचाचें कसें चालणार ? मोतीबाबूंना त्याची फिकीर नव्हती. आपल्या मेहुण्याकडे शरच्चंद्राच्या मामाकडे, भागलपुरास अनेक वेळां आपलें सर्व कुटुंबच्या कुटुंब नेऊन ठेवण्यात मोतीलालबाबूंना काहींच वाटत नसे. शरच्चंद्राचें बालपण यामुळें कधीं देवानन्दपूरला तर कधीं मामाच्या घरीं बिहारमध्यें भागलपूरला असें गेलें. शालेय शिक्षणात कधींही त्यांना रुचि वाटली नाहीं. भटकत राहणें हाच एक उद्योग बालपणापासून शरद्बाबूंनीं पत्करलेला होता. भुवनमोहिनीस पोराच्या उपद्व्यापी स्वभावामुळें फार चिंता वाटे. भावाच्याच घरीं तिला रहावें लागत असल्यानें कोणीहि पोराबद्दल वाटेल तसें बोललें तरी तें तिला सहन करावें लागे. आपल्या वयाची बरींच मुलें जमवून शरदनें एक बालचमूच निर्माण केली होती. गावभर भटकून लोकाच्या कुरापती काढणें व त्यांना त्रस्त करून सोडणें हाच

एक उद्योग या टोळीस उरला होता. कोणाच्या बागेंतील पेरू चोरावेत, कोणाच्या तळ्यातील मासे पकडावेत, कधीं साप पकडण्याचा खेळ करावा, हे उद्योग नित्य सुरू असल्यामुळें शरद् म्हणजे घराला व गावाला एक उपद्रवच होऊन बसला होता. शरदच्या मामानें एक कोकिळा पाळली होती, पण तिच्या मुखातून कसलाहि आवाज मात्र निघत नव्हता. मग काय करावयाचें त्या कोकिळेस? शरदला सर्व दवापाण्याची माहिती होती. त्यानें आज्ञा दिली कीं, आंब्याच्या पानाच्या रसांत मिरच्याची पूड मिसळून तिला पाजा. शरदच्या मित्रांनीं ही योजना अमलात आणली आणि तिला पिंजऱ्यात बंद करून टाकलें. दुसऱ्या दिवशीं कोकिळा 'कु ऽ कू ऽ करून गात आहे काय म्हणून पाहण्यासाठीं शरच्चंद्र आला तों काय – पिंजऱ्यात ती मरून पडलेली त्याच्या नजरेस आली. शरदच्या मनास आपल्या उपद्व्यापाचें वाईट वाटलें. शरच्चंद्राच्या या बालपणाच्या उद्योगात पुष्कळ वेळा परोपकाराचा भाग असे. कोणी अडलें कीं शरद् मदत करीत असे. इतरत्र मिळालेले पैसे तो अनाथांना व पिडलेल्या लोकांना देऊन टाकीत असे. साथीच्या रोगानें माणसें मरण पावलीं कीं त्याच्या अंत्यविधीस सहसा कोणी तयार होत नसे; पण शरच्चंद्राचें मित्रमंडळ मात्र याहि प्रसगास तत्पर असे.

तळ्यात किंवा नदींत जाऊन मासे पकडण्याची विलक्षण हौस शरच्चंद्राला लहानपणीं होती. कोणतेंहि संकट कोसळलें तरी चालेल, पण मासे धरावयास मिळावेत ही त्याची इच्छा होती वसतपूरला मासे पकडण्यासाठीं चागली सोय आहे असें त्यानें ऐकलें मात्र होतें. पण या दूरच्या गावास आपण जावें तरी कसें, या चिन्तेंत शरद् बरेच दिवस होता. एकदा त्याच्या ध्यानांत आलें कीं, शेजारचा नयन सरदार गाय आणण्यासाठीं वसंतपूरला निघाला आहे. शरच्चद्र त्याला न सागतांच त्याच्यापाठोपाठ निघाला. खूप दूरवर गेल्यानंतर सरदारजींच्या ध्यानांत आलें कीं, बालक शरद् आपल्या पाठीमागें आहे. मोठ्या कष्टानें

त्यानें या आठ-नऊ वर्षांच्या पोरास बरोबर घेतलें. गाय खरेदी करता करतां बराच वेळ झाला. रात्रीं परत घरीं येत असताना चोरानीं या दोघानाहि घेरलें, पण नयन सरदार चांगला बलिष्ठ होता. त्यानें आपल्या लाठीच्या साह्यानें चोराना पिटाळून लावलें व शरदचें रक्षण केलें.

मासे पकडण्याचें हें शरच्चंद्राचें वेड 'श्रीकांत कादंबरींत स्पष्टतेनें आकारास आलें आहे. मध्यरात्रीच्या समयास इंद्रनाथाबरोबर मासे धरण्याच्या मोहिमेवर निघालेला श्रीकात शरद्बाबूंच्या मनातील मासे पकडण्याच्या लालसेचें प्रतीक मानावयास हरकत नाहीं. त्यांतील भीषणता व सजीवता इतरत्र सांपडणें कठीण आहे. एका मध्यरात्रीच्या समयास मासे पकडण्याच्या नादात रममाण झालेल्या पोराचें वर्णन सक्षेपानें पाहण्यासारखें आहे.

" झोपेत चालणाऱ्या माणसाप्रमाणें मी इंद्रनाथाच्या मागोमाग गंगाकाठीं आलों. कांठावर दगडी घाट. डोक्यावर पिंपळाचें झाड सळसळ आवाज करीत होतें. काळोख मी म्हणत होता. त्या झाडाच्या सुमारें तीस एक हात खालीं पावसाच्या पुरानें घोंगावत नदीचा ओघ झपाट्यानें वाहत होता. तिथेंच इंद्राची होडी बांधलेली होती. वरून पाहतांना वाटलें, त्या बेफाम पुराच्या प्रवाहांत जसा कांहीं लहानसा पाण्याचा द्रोणच पाण्याच्या जोराबरोबर धडपडत होता. . वरून खालीं सोडलेली दोरी दाखवून इंद्र म्हणाला, ' ही होडीची दोरी धरून खालीं उतरून जा. अगदीं सावधपणें उतर. जर सरकून पडलास तर शोधून पत्तासुद्धा लागावयाचा नाहीं. ' तेव्हा मात्र माझ्या अंगाचा थरकाप झाला. वाटल कीं, हें आपल्याला झेपावययाचें नाहीं. मीं विचारलें, ' आणि तूं रे ? त्यावर तो म्हणाला, तूं खालीं जाऊन पोंचलास कीं मी दोरी सोडून खालीं येतों. भिऊं नकोस. लव्हाळ्याला धरून मी खालीं येईन. " मी कसा तरी होडींत उतरलों. तों दोरी सोडून इंद्रानें एकदम

झोंका घेतला. कशाला धरून तो खालीं उतरला हेंसुद्धा सांगता यावयाचें नाहीं भीतीनें माझ्या काळजात अशी धडकी भरली होती कीं, त्याच्याकडे पाहायची छातीच होईना माझी. दोन-तीन मिनिटांपर्यंत लाटांच्या भयंकर खळबळीखेरीज दुसरा कोठलाच आवाज ऐकूं येत नव्हता

" ... थोड्याच वेळात आमची होडी त्या काळोखात घुसली. उजव्या डाव्या बाजूला मोठ्या जोरान वाहणाऱ्या पाण्याचा झोत व त्या झोता-बरोबर घोंघावत जाणारी ती छोटी होडी व तींत बसलेलीं आम्हीं छोटीशीं दोन मुलें. वाऱ्याचा लवलेशहि नव्हता. त्या भयंकर रात्रीचें प्रचंड स्वरूप कालीमातेच्या मूर्तीसारखें भासत होतें. स्वर्ग व मृत्युलोकाला तिच्या काळ्या केशकलापानें जणुं काहीं व्यापून टाकलें होतें. त्या घनदाट अंधकाराला भेदून कराल दाढाप्रमाणें चोहोंकडे झगझगणाऱ्या पाण्याच्या धारामुळें, दाबलेल्या निर्दय हास्यासारखी एक प्रकारची निस्तब्ध शोभा चोहोंकडे विखुरली होती. इकडे तिकडे धक्के खाऊन बेफाम वाहणारा पाण्याचा प्रवाह वर उठून फुटत होता. पाण्याच्या ओघाची गति कुंठित झाल्यामुळें कुठें कुठें भोंवरे उत्पन्न झाले होते आणि कुठें कुठें पाण्याचा प्रवाह वेड्यासारखा मोकाट सुटून वाहत होता.

" सहा-सात कोस प्रवास या भयंकर प्रसंगातून त्यांना करावयाचा होता. मनात एकसारखी धडकी, केव्हां प्राणसंकट कोसळेल याचा नेम नाहीं. कोळ्यांना चुकवून मधल्याच वाटेनें निघण्याची युक्ति इंद्र-नाथाने काढली आणि प्रवासाचा शीण वाटूं नये म्हणून मौजेची गोष्ट श्रीकांताला सांगण्यास सुरुवात केली, ' अर्धी जळलेलीं मढीं पुरातून वाहत येतात त्याचीसुद्धा गंमत पाहावयास मिळेल. ' या इंद्रनाथला कसलीच भीति म्हणून वाटत नसे. रानडुक्कर असो, साप असो, त्याला भीति वाटत नसे. पाण्यातून वाहत येणाऱ्या व झाडांना अडकून राहणाऱ्या सापाच्याबद्दल तो सांगतो, ' पण चावायचे नाहींत ते. त्याच तेच भीतीनें

अर्धमेले झाले आहेत. दोन-तीन तर अगदीं माझें अंग घासून पळाले. एक तर एवढा मोठा होता, मला वाटतें अजगर असेल. अन् चावलें तरी काय होणार ? केव्हा तरी एक दिवस मरायचेंच आहे ना बाबा !''

असा हा इंद्रनाथ !

आणखी एक नमुना पाहा —

" .वाऱ्याच्या झुळकीबरोबर कसला तरी घाणीचा भपकारा आला मी अगदीं कासावीस झालों. नाक दाबून धरून मीं म्हटलें, 'इथं काहीं तरी सडलें आहे.' त्यावर इंद्र बोलला —

'होय. मढीं ! अलीकडे या बाजूला भयंकर कॉलरा सुरू आहे कीं नाहीं ? मढीं जाळायला सगळ्याकडेच काहीं पैसे नसतात, तेव्हां तोंडाला अग्नीचा स्पर्शच करून फेकून निघून जातात. कोल्हीं-कुत्रीं खातात आणि मग सडतात. त्याचीच एवढी घाण...ही सारी मसण-वटच आहे कीं नाहीं...'

माझ्या काळजाचा थरकाप होत होता. आता चंद्राचा क्षीण प्रकाश घाट उजळवूं लागला होता. घाटाच्या दगडाला होडी आपटूं नये म्हणून इंद्र तोंडासमोर सरकून उतरला. जमिनीला पाय लागतात न लागतात, तोंच घाबरून शी शी म्हणून ओरडत तो बाजूला सरला मी त्याच्यामागेंच होतों. त्या वस्तूवर दोघांची नजर जातांच... ..अकाल मृत्यूचा परिणाम इतक्या करुणाजनक स्वरूपात यापूर्वी मीं कधींच पाहिला नव्हता. काळजाला घरें पाडणारें तें दृश्य कसें असतें तें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कुणाला कळायचें नाहीं. घनघोर रात्र– चोहोंकडे अगदीं सामसूम – फक्त मधून मधून झाडाझुडपांतून पळणाऱ्या मसण-वटींतल्या कोल्ह्यांची भुकाळू भांडणातील कोल्हेकुई–मधून मधून झाडां-वर अर्धवट झोपेंत असलेल्या भल्या मोठ्या पक्ष्याच्या पंखाची फडफड-खूप दूर अंतरावर ऐकूं येणारा पाण्याचा एकसारखा धो धो शब्द– आणि या सर्व वातावरणांत गुपचुप उभे राहिलेले आम्ही दोघे ! तें

स्वीकार ९८६०८ दि. भारि ६०४ २५/८/५४

काळीज फाडून टाकणारें दृश्य दोघेच पाहत होतों. पांच-सात वर्षांचें गोरेंगोरेंपान गुटगुटीत बालक — त्याच्या अंगावरून सारखें पाणी वाहत होतें. डोकें तेवढें घाटावर होतें वाटल, कोल्ह्यांनीं नुकतेंच त्याला पाण्यातून ओढून काढलेलें असावें...मरून बहुधा तीन-चार तासापेक्षा अधिक वेळ झाला नसावा. महामारीच्या भयंकर यातना भोगून बिचारें जसें कांहीं आई गंगेच्या कुशींत स्वस्थ झोप घेत होतें. त्याचा सुकुमार देह आई गंगा जसा कांहीं नुकताच शेजारच्या बिछान्या-वर निजवीत होती. जळांत आणि स्थळात अशा रीतीनें एकाच वेळीं पडलेल्या त्या कोंवळ्या मुलाचा देह आमच्या नजरेस पडला. इंद्रनाथ त्याला उचलून दूर झाडावर कुठेंतरी सुरक्षितपणें ठेवण्याचा प्रयत्न करूं लागला, तों श्रीकांतनें विचारलें, 'तू शिवणार ? त्याची जात कोण ?' ताबडतोब इंद्रनाथानें उत्तर दिलें, 'मढयाला कधीं जात असते का रे ? बिचाऱ्याला कोल्हीं-कुत्रीं फाडफाडून खातील. पहा अजून तोंडाला औषधाचा वाससुद्धा येत आहे रे !' "—

अशी ही इंद्रनाथ व श्रीकांत यांची मध्यरात्रीची भयानक सफर ! या सफरीचें वर्णन शरद्बाबूंनीं केवळ कल्पनेच्या साह्यानें केलें आहे, असें नाहीं. लहानपणीं त्यांना वेडरपणें अशाच प्रकारें मासे धरीत राह-ण्याचें विलक्षण वेड होतें. भागलपूरच्या वास्तव्यात त्यांना राजेंद्र नावाचा एक धाडसी मित्र लाभलेला होता. हा राजू संगीताचा शोकी होता तो बांसरीहि उत्तमपैकीं वाजवीत असे. नाव चालवणें व भरल्या धारेंत मासे पकडणें या गोष्टी तर त्याच्या हातच्या होत्या. शरद्बाबूंनीं या मित्राकडून या सर्व कला शिकून घेतल्या. तबला आणि हार्मोनियम शरच्चंद्र उत्कृष्ट वाजवीत असत. याच राजेन्द्राला श्रीकांतमध्यें त्यांनीं इंद्रनाथ म्हणून चित्रित केलें असावें. शरच्चंद्राच्या सर्व उपद्व्यापी व्यापारात राजेन्द्र त्यांच्या मदतीस असे. दोघांच्याहि मनांत भीति म्हणून वास करीत नव्हती.

भागलपूरला असताना मामाच्या घरीं 'संसार-कोश' नावाचें एक अद्भुत पुस्तक शरच्चंद्राच्या हातात आलें. सर्व काहीं विपत्तींवर व आपत्तींवर त्यांत उपाय सांगितले होते व जेथें तेथें कल्पनांचीं उड्डाणें पण भरपूर होतीं. लहानग्या शरदला वाटलें, 'संसार-कोश' मधील वाक्यन् वाक्य खरें असावें. कोठल्याहि विपत्तींतून सुटण्यासाठीं त्यात एक मंत्र दिला होता तो शरद्‌बाबूंनीं केव्हांच पाठ करून टाकला. 'संसार-कोशां'त लिहिलें होतें कीं, हातात बेलाचीं मुळें घेऊन कोणत्याहि सापास पकडावयास निघा. तो कितीहि विषारी असला तरी हातांत आपसुखें येईल. या गोष्टीची सत्यता पडताळून पाहण्यासाठीं शरच्चंद्रांनीं बेलाचीं मुळें तर जमा केलीं. पण साप कोठें मिळणार ? शरच्चंद्र निघाले साप शोधण्याच्या दौऱ्यावर ! एके दिवशीं सापाचें एक पिलू त्यांना सापडलें. हातात बेलाचीं मुळें घेऊन शरद्‌बाबू त्याच्याजवळ गेले. पोरांचा अत्याचार पाहून त्या काळ्या नागानें फणा उभारला व त्याच्या अंगावर झेप टाकली. याच वेळीं शरदनें हातांतील वस्तु त्याच्यावर टाकली, पण त्यामुळें तो सर्पराज शांत न होता उलट त्या मुळांनाच कडकडून डसूं लागला. त्यांच्याच एका दोस्तानें सापाचा लाठीनें निकाल लावला व शरद्‌बाबूंना तो नाद सोडावा लागला. साप पकडण्याचा मंत्र आपणांस मिळावा, ही शरच्चंद्राची मनीषा 'श्रीकांत' कादंबरींतहि चांगलीच व्यक्त झाली आहे. मुसलमान झालेला शहाजी गारुडी व त्याची बायको अन्नदा अक्का यांची ओळख करून घेणारा व त्याच्याकडून सापाचा मंत्र शिकण्याचा आग्रह धरणारा श्रीकांत म्हणजे जणु शरद्‌बाबूच. यासंबंधींचा थोडा जिवंत नमुना येथें देण्यास हरकत नाहीं. शहाजीच्या मृत्यूची हकीगत अन्नदा अक्का श्रीकांत व इंद्रनाथ यांना सांगत आहे. या प्रसंगाचा हा उल्लेख आहे —

"...एका केरोसीनच्या दिव्याजवळ अक्का बसली होती. तिच्या मांडीवर शहाजींचें डोकें होतें. त्याच्या पायाजवळ एक भला मोठा नाग

पडला होता. त्या दिवशीं दुपारीं कुणाच्या तरी घरीं जाऊन त्यानें साप पकडला होता. त्यावर जी बक्षिसी मिळाली, तिची ताडी घेऊन शहाजी झिंगूनच घरीं आला आणि सापास खेळवूं लागला. खेळ संपल्यावर त्याची शेपटी धरून त्याला मडक्यात ठेवायच्या वेळीं दारूच्या नशेंत त्या सापाच्या तोंडाजवळ आपलें तोंड नेऊन त्याचा मुका घ्यायला शहाजी जाऊं लागला– एवढयांत त्या सापानेंहि खुशींत येऊन त्याच्या नरडीचा चांगलाच मुका घेतला. थोड्या वेळांत तो शुद्धीवर आला, पण आपली घडी आता भरली हें समजून 'चल, आपण दोघेहि बरोबरच जाऊं' असें म्हणत शहाजीनें सापाच्या डोक्यावर पाय देऊन दोन्ही हातांनीं त्याची शेपटी धरून त्याला असा काहीं ताणला...तो हा असा होऊन पडला आहे. दोघाचाहि खेळ एकदमच संपला–" या वर्णनातील रेखीवपणा व भयानकता शरद्बाबूंनीं केवळ आपल्या कल्पनेनेंच केली होती, असें म्हणवत नाहीं. त्याना या असल्या विलक्षण प्रकाराचा नित्य ध्यासच लागून राहिलेला असे.

इकडे तिकडे भटकंती करण्यात शरच्चंद्राना मनापासून सुख होई. कधीं कधीं घरातून बेपत्ता होण्यात वा कधीं एकान्त स्थळीं जाऊन बसण्यातहि त्याना गोडी वाटे. त्यांची 'तपोवन' म्हणून एक जागा होती. त्या ठिकाणीं ते तासन् तास जाऊन स्वस्थपणें बसत असत. कोणाहि मित्राला हें स्थान माहीत नव्हतें. सुरेन्द्रनाथ गंगोपाध्याय हे शरच्चंद्रांचे मित्र व दूरचे मामा. मोठ्या कष्टानें त्यानीं या एकान्त स्थानाचा शोध लावला ते एके ठिकाणीं लिहितात, " घोष घराण्याच्या पडक्या घराच्या उत्तरेस गंगेच्या काठीं कांहीं झाडेंझुडपाची एक कुटी बनून गेली होती. आत अगदीं अंधार होता. वेली त्या ठिकाणीं गर्दी करून राहिल्या असल्यामुळें आंत शिरणें मोठें कठीण होतें. मोठ्या शिताफीनें शरच्चंद्र लतांना दूर सारून आत गेले. आंत थोडी जागा होती, ती मात्र स्वच्छ होती. हिरव्यागार लताकुंजांत एखाद दुसरा सूर्यकिरण आल्याबरोबर चित्त बहरून

निघे, मन शांत होऊन जाई." या एकान्त स्थानात निसर्गाशीं रममाण होऊन शरद्‌बाबू तासन् तास बसत असत. त्यांनीं आपल्या 'देवदास' कादंबरींत या तपोवनाचा उल्लेख केला आहे. शाळेंतील मुलांना चुन्याच्या बुकटींत ढकलून देऊन देवदास कोठें गडप झाला, हें कोणासहि माहीत नव्हतें. फक्त पार्वतीला मात्र हें ठिकाण माहित होतें. पदर खोचून जमीनदाराच्या एका बागेंत तिनें प्रवेश केला. तिच्याच पलीकडे एक कळकीचें बेट होतें. याच बेटात थोडी जागा साफसूफ करून देवदास लपून राहत असे, हें पार्वतीला माहित होतें.

शरच्चंद्राच्या बालपणींच्या या सर्व उपद्व्यापामागें एक प्रकारचें तत्त्व असे. गोरगरिबांना मदत करण्यास शरद्‌बाबू लहानपणापासून तयार असत. कोणी मनुष्य गरिबीमुळें औषधाशिवाय मरत असेल तर शरद्‌बाबू आपल्या टोळीसहित त्याच्या मदतीला धांवून जात. मग या सर्व बावपळींत त्यांना विद्याभ्यास करावयास सवड कोठून सापडणार? त्याचा अभ्यास केव्हा व कोठें होत असे, हें कोणासच माहित नव्हतें. आणखी एक त्याचा उद्योग सांगावयाचा राहिला आहे. त्यांच्या वडिलांच्या अर्धवट राहिलेल्या कथा शरच्चंद्रांना फारच उपयोगी पडल्या. त्या काळांत मुलांनीं कथा-कादंबऱ्या वाचणें हें भयंकर समजलें जाई. तेव्हां चोरून, कोणी नसलें म्हणजे रात्रीच्या वेळीं शरद्‌बाबू या सर्व कथा वाचीत व त्या पूर्ण कशा करावयाच्या हा एकच विचार त्यांच्या मनात थैमान घालून उठे. ललितकलाची आवड व कल्पना करण्याची हौस ही देणगी मोतीलालबाबूंकडून शरद्‌बाबूंना मिळाली. राजेन्द्रासारख्या मित्राची मदत होतीच, पण याहिपेक्षा अधिक जोरदार संस्कार शरद्‌बाबूंच्या मनावर होत राहिला तो रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या साहित्याचा.

• • •

विद्याभ्यासाकडे शरद्‌बाबूंनीं जाणूनबुजून लक्ष दिलें नव्हतें, तरी ते जात्याच बुद्धिमान् असल्यामुळें सन १८९४ मध्यें वयाच्या अठराव्या वर्षी प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झाले. वडिलांच्या विक्षिप्त स्वभावामुळें कधीं भागलपूर तर कधीं देवानंदपूर अशा ठिकाणीं त्याचें शिक्षण चालू होतें. हायस्कूलमध्यें असतानाच त्यांनीं लिहिण्यास प्रारंभ केला होता. साहित्यचर्चा हाहि त्यांच्या आवडीचा विषय होता. एकसारखी भ्रमंती सुरू असल्यामुळें समाजाचें जवळून निरीक्षण करण्याची संधि त्याना सतत मिळत राहिली. प्रवेशपरीक्षा पास झाल्यानतर ते भागलपूरच्या तेजनारायण ज्युबिली कॉलेजात जाऊं लागले. बंकिमचंद्र व रवीन्द्रनाथ यांच्याबरोबरच थॅकरे, डिकन्स, मिसेस हेन्री वुड इत्यादि इंग्रजी कथाकारांचें साहित्यहि त्यानीं वाचून काढलें. हेन्री वुडच्या प्रसिद्ध 'ईस्टलीन नांवाच्या कादबरीवरून 'अभिमान' नावाची एक छोटी कादंबरी त्यानीं लिहिली. मेरी कॅरेलीच्या 'मायटी ॲटम' या पुस्तकाचा बंगाली भाषेंत अनुवाद करण्याचेंहि कार्य त्यांनीं चालू केलें होतें. शरच्चंद्राचें लक्ष आता विद्याभ्यासाकडे लागलें होतें, तरी त्याचें भटकें जीवन मात्र संपलेलें नव्हतें.

रवीन्द्रनाथाना सत्तर वर्षें पूर्ण झाल्याबद्दलच्या सत्कार-समारंभांत भाषण करताना शरद्‌बाबूंनीं आपल्या विद्याभ्यासाची माहिती मोठ्या गमतीदार पद्धतीनें निवेदन केली आहे. स्वतःस साहित्यसेवेची प्रेरणा कोठून मिळाली, याचेंहि स्पष्टपणें विवरण त्या भाषणात त्यांनीं केलें आहे : "बालपणची आठवण आहे. एका लहानशा गांवात मासे पकडणें, होड्या चालवणें, इत्यादि प्रकारातच दिवस चालले होते. वैचित्र्याची हौस मुळांतच असल्यामुळें कोणत्याहि यात्रादलात शिरून शागिर्दीसुद्धां पत्करली. त्यांतील आनंद व आराम पूर्णतेनें भोगल्यानतर

खांद्यावर पंचा टाकून निरुद्देश अशा यात्रेसाठीं भटकन्ती सुरू झाली. ही विश्वकवींच्या काव्याप्रमाणें निरुद्देश यात्रा नव्हती; त्याहून काहीं वेगळा प्रकार होता. याला पूर्ण झाल्यानंतर एके दिवशीं दुखावलेले पाय व निर्जीव शिथिल देह घेऊन घरीं आलों. घरातून योग्य ती हजेरी झाल्यानंतर पुनः पाठशाळेंत भरती झाली. पुनः 'बोधोदय' व 'पद्यपाठ' याचें अध्ययन सुरू झालें. सर्व प्रतिज्ञा पुनः एकदा विसरली गेली. दुष्ट सरस्वती पुनः डोक्यावर बसली, पुनः शागिर्दी सुरू होऊन निरुद्देश यात्रेस आरंभ झाला. पुनः घरीं येणें, पुनः घरच्या लोकांकडून स्वागत ... याप्रमाणें बोधोदय, पद्यपाठ आणि बंगाली जीवनाचा एक अध्याय समाप्त झाला. त्यानंतर शहरांत आगमन झालें. 'बोधोदय' संपूर्ण झालें आहेसें पाहून गुरुजनानीं छात्रवृत्ति-क्लासमध्यें सामील करून घेतलें, त्या वेळीं पाठ्यपुस्तकें होतीं सीता-वनवास, चारुपाठ, सद्भावशतक व एक मोठी व्याकरणाची पोथी. यांचें केवळ वाचनच नव्हतें तें, किंवा मासिक-साप्ताहिकांत समा-लोचना लिहिणेंहि तें नव्हतें, तर पंडितजींच्या समोर उभें राहून दररोज परीक्षा देण्याचें काम होतें तें. तेव्हा सकोचाच्या साह्यानें सांगावेंसें वाटतें कीं, साहित्याशीं माझा पहिला परिचय डोळ्यातील अश्रूंच्या बरोबरच झाला. त्यानंतर एके दिवशी ही दुःखद अवस्थाहि समाप्त झाली. मनुष्याला दुःख देण्याखेरीज साहित्याचा आणखी दुसरा हेतु असूं शकेल अशी त्या वेळेस कल्पनाहि नव्हती -- "

रवींद्रनाथ ठाकुराच्या वाङ्मयाचा परिचय शरद्‌बाबूंना प्रारंभापासूनच झालेला होता. ठाकुराच्या वाङ्मयानें तेव्हां सबंध बंगाल भारावून गेला. होता. शरद्‌बाबूंच्या मित्र-परिवारांत बंकिम, ठाकूर इत्यादींच्या वाङ्मया-वर नेहमीं चर्चा होत असे. स्वतः शरद्‌बाबूहि कथा लिहिण्याच्या प्रयत्नांत होते, पण रवींद्रनाथांच्या कथेइतपत तरी प्रगति व्हावी अशी त्याची इच्छा असल्याकारणानें कोठलीहि कथा प्रसिद्ध होऊं नये यासाठीं त्यांनीं

फारच खबरदारी घेतली. त्याच्या मित्रमंडळींचें ' छाया ' नावाचें एक हस्तलिखित निघत असे, त्यांत मात्र शरच्चंद्राचें कांहीं लिखाण प्रसिद्ध झालें होतें या काळांत शरद्‌बाबू आपली सही ' सेंट क्लेअर लॅरा ' अशी करीत असल्यानें ' लॅरा म्हणूनच त्याची मित्रमंडळींत प्रसिद्धि होत होती. सन १८९४ मध्यें भागलपूर येथें त्याच्या मित्रमंडळींनीं साहित्य-सभेची स्थापना केली व तिचें अध्यक्षस्थान शरद्‌बाबूंना समर्पण केलें.

साहित्याची साधना या प्रकारें सुरू असताना शरच्चंद्रांचें आपल्या अभ्यासाकडेहि लक्ष होतेंच. आपल्या आवडीच्या उद्योगात ते किती गर्क होऊन गेलेले असत, हें श्री. सुरेंद्रनाथ गंगोपाध्याय यांच्या पुढील उद्‌गारांवरून ध्यानात येण्यासारखें आहे, " कॉलेजमध्यें असताना ' विज्ञाना च्या परीक्षेच्या आधींच्या रात्रीं शरद्‌बाबूंनीं आपल्या मित्राना सांगितलें, ' आज रात्रीं माझ्याकडे कोणीहि येऊ नका. कांहीं विचारावयाचें असेल तर उद्यां सकाळीं या ' आम्ही सर्वजण निघून गेलों आणि शरच्चंद्र अभ्यासास बसले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही त्यांच्याभोंवतीं जमा झालों तसे ते आम्हास रागावून म्हणाले, ' मी आत्ताच तुम्हास सांगितलें ना, कीं सकाळीं या म्हणून ? मी आज कांहीं सांगणार नाहीं; मग असें असताना तुम्हीं कां आलात ? मग आम्हीं सांगितलें कीं, सकाळ झालेली आहे महाशय! त्यानंतर त्यांनीं खिडकी उघडून पाहिलें तों खरोखरीच उजाडलें असल्याचें त्याच्या ध्यानात आलें. अभ्यासाच्या तन्मयतेंत सारी रात्र उडून गेल्याचाहि पत्ता शरद्‌बाबूंच्या चित्तास नव्हता. शरद्‌बाबूंचा स्वभावच असा बनत गेला कीं, ज्याच्यावर मन जडवावयाचें तेथें सर्वस्व अर्पण करावयाचें. "

शरच्चंद्रांचें अध्ययन कोणत्या पद्धतीनें सुरू होतें, कोणत्या समाजव्यवस्थेंत ते वावरत होते, रवीन्द्राचा परिणाम त्यांच्यावर कसा होत होता, हें त्यानींच केलेल्या निवेदनावरून स्पष्ट होण्यासारखें आहे —

" मी ज्या परिवारांत वाढत होतों त्या ठिकाणीं काव्य आणि कथा-

कादंबऱ्या हीं दुर्नीतीचींच दुसरीं नांवें होतीं, संगीत तर अस्पृश्या-प्रमाणें होतें. सर्व लोक परीक्षा पास होऊन वकिली करण्याची इच्छा धरीत. आणि अशा वातावरणात माझे दिवस चालले होते. पण एके दिवशीं याहि परिस्थितींत एकाएकीं बदल घडून आला. माझे एक नातेवाईक त्या काळात नुकतेच परदेशांतून घरीं आले होते. त्यांना संगीताविषयीं मोठी प्रीति होती; काव्याबद्दल आपुलकी होती; घरात कांहीं बायकाना जमवून त्यानीं रवीन्द्रनाथाचें 'प्रकृतीर प्रतिशोध' (निसर्गाचा सूड) नावाचें काव्य वाचण्यास आरंभ केला. किती मला समजत होतें, याचा अंदाज नव्हता पण तें वाचील असताना माझ्या डोळ्यात अश्रु जमा झाले. आपली दुर्बलता कोणासमोर बाहेर पडूं नये म्हणून मी झट्‌दिशीं बाहेर आलों पण याच वेळीं काव्याशीं खराखुरा परिचय झाला व आज हीच आठवण आहे कीं, काव्याचें सत्यदर्शन त्याच समयास मला झालें. यानतर परिवारातील कल्पनेप्रमाणें वकील बनण्याची इच्छा मला त्रस्त करीत नव्हती. पुन. मला माझ्या जुन्या गावास जावें लागलें. पण आता बोधोदय नव्हतें तर पिताजींच्या फुटक्या-मोडक्या मेजातून काहीं पुस्तकें बाहेर निघालीं. पहिलें 'हरिदासाची गुप्तकथा'. दुसरें निघालें 'भवानी पाठक . गुरुजनाना मी दोष देऊ शकत नाहीं- हीं काहीं शाळेंतील पाठ्यपुस्तकें नव्हतीं, तर विद्यार्थ्यांनें न वाचावींत अशीं हीं पुस्तकें होतीं. घराच्या गोठ्यांत बसून या पुस्तकांचें अध्ययन सुरू झालें. मी वाचीत असें व ते ऐकत असत. आतां वाचीत नसतों, लिहीत असतों. कोण वाचीत असतें काहीं माहीत नाहीं स्नेहवश होऊन एके दिवशीं मास्तरानीं सागितलें कीं, या शाळेंत फार दिवस आता विद्या यावयाची नाहीं. तेव्हा मला शहरात यावें लागलें. यानंतर मात्र शाळा बदलण्याचा प्रसंग आला नाहीं हें सागावेंसें वाटतें. बंकिम-ग्रंथावलीचा पत्ता मला लागला. कथासाहित्यांत याखेरीज आणखी काहीं असेल असें त्या वेळीं वाटलें नाहीं. वाचून वाचून बंकिम-ग्रथावली पाठ होत आली......

" ...... यानंतर 'बंगदर्शन' चें नवें युग सुरू झालें. त्यांत रवीन्द्रनाथांची चोखेर बाली ('डोळ्यातील शल्य') क्रमशः प्रसिद्ध होत होती. त्यातील भाषा व भावप्रदर्शनाची शैली पाहून एक नवा प्रकाश दृष्टीसमोर आल्यासारखें झालें. त्या दिवसातील ती सखोल व तीक्ष्ण अशी आनंदाची स्मृति मी कधींहि विसरणार नाहीं. .. "

शरद्बाबूंनीं लौकिक शिक्षणाबरोबरच याप्रमाणें रवीन्द्रांच्या प्रभावाखालीं त्यांच्या साहित्याची उपासनाहि चालू केली होती. पण घरची गरिबी त्यांना सतत त्रस्त करीत असे. वडिलाच्या नोकरीचें कधीं कायम नसे, त्यामुळें पोटाची चिंता या कुटुंबास सतत राही. पैशाचें पाठबळ मुळींच नसल्यामुळें शरद्बाबूंना कॉलेजचें शिक्षण अर्धवटच सोडावें लागलें. परीक्षेची फी देण्यास जवळ बीस रुपये नव्हते, वेळेवर जमा होऊं शकले नाहींत त्यामुळें त्याच्या शिक्षणाचा अध्याय येथेंच समाप्त झाला. मग दुसरा उद्योग कोठला ? भ्रमंती करीत राहणें हें तर बालपणापासून त्याना प्रिय होतें. आपल्या निवेदनात शरद्बाबू म्हणतात—

" यानंतर साहित्याचा संबंध माझा तुटून गेला. कधीं काहीं लिहिलें आहे हेंहि मी विसरून गेलों. पुष्कळ काळपर्यंत प्रवास केला. या काळात विश्वकवींच्यावर नजर ठेवून बंगाली साहित्यानें कोणत्या तेजस्वितेनें प्रगति केली हेंहि माहित नाहीं. विश्वकवींच्याजवळ जाऊन दाट मैत्री जुळवण्याचें सौभाग्य मला मिळालें नाहीं. त्यांच्याजवळ बसून साहित्याचें शिक्षण घेण्याची संधिहि मला लाभली नाहीं. मी एकदम निराळा झालों. पण हें बाह्य सत्य आहे; मनातील गोष्ट मात्र अगदीं उलटी आहे. विदेशात भटकत असताना कवींचीं कांहीं पुस्तकें सतत माझ्याजवळ असत. त्यांच्या काव्यावर, कथांवर माझी निन्तात श्रद्धा होती. हिंडता हिंडताच मीं हीं पुस्तकें अनेक वेळा वाचीत असें —" शरद्बाबूंचें जीवन जरी भटकें झालें तरी त्याची रवीन्द्रनाथावरील श्रद्धा मात्र अढळ होती.

घरच्या मंडळींशीं शरच्चंद्रांचें फारसें पटत नसे. किंबहुना स्वतःचें असें घर त्यांना नव्हतेंच. जुन्यानव्या पिढींचें भांडण त्या काळात विकोपास गेलेलें होतें. समाजातील सर्व अवस्थातून शरद्बाबू भटकून आलेले असल्यामुळें त्यांचें हृदय विशाल बनलें होतें. घरातील किंवा परिवारातील संकुचित आचारविचार त्यांना मानवणारा नव्हता. समाजाच्या मूढ व निष्ठुर आचरणाचा त्यांना अर्थच समजत नसे. त्यांना स्वतःलाच एकदा या बाबतींतील कटु अनुभव आला. भागलपुरास एक सुधारकाचें मंडळ असे. श्री. शिवचंद्र बंद्योपाध्याय हे सुधारकांचे पुढारी असून शरच्चंद्राचें जाणें-येणें त्यांच्याकडे असे. शिवचंद्र विलायतेहून आले असल्यामुळें त्यांची प्रतिष्ठाहि चांगली होती, पण जुन्या मंडळींनीं त्यांना बहिष्कृत केलें होतें. अनेक वेळां प्रायश्चित्त करूनहि त्यांचा बाटगेपणा संपलेला नव्हता पण त्यांचे विचार उदार व प्रगतिपर असल्यामुळें गांवातील तरुणांचें येणें-जाणें नेहमीं त्यांच्या घरीं असे. कलाकारांची वर्दळहि शिवचंद्रांच्या घरीं सतत राही. शरच्चंद्रानाहि अर्थात् त्यांचे विचार पसंत असत. त्यांच्या घरीं येणाऱ्या जाणाऱ्या लोकांत शरद्बाबू मुख्य बनून गेले. एके दिवशीं शरद्बाबूंच्या मामाच्या घरीं मोठ्या समारंभानें जगद्धात्री देवीची पूजा केली गेली. भागळपूरचे अनेक बंगाली गृहस्थ या समारंभास आले होते. भ्रष्ट झालेले शिवचंद्र बंद्योपाध्याय कसे येणार ? शरद्बाबू नेहमींप्रमाणें आल्यागेल्याचें स्वागत मनापासून करीत होते. पण येणाऱ्या कांहीं सभ्य गृहस्थांना शरच्चंद्रांना पाहतांच राग आला — 'या माणसाच्या हातचें आम्हीं कांहीं घेणार नाहीं कीं जेवणार नाहीं.' शरद्बाबूंच्या घरींच असा हा पेंचप्रसंग निर्माण झाला. एखाद्या अस्पृश्याप्रमाणें त्यांना बाहेर पडावें लागलें. शरद्बाबूंच्या भावनामय हृदयावर या गोष्टीचा अनेक दृष्टींनीं परिणाम झाला. शरद्बाबूंनीं पुनः एकदा गृहत्याग केला. दारिद्र्यामुळें शिक्षण संपलेंच होतें. आता शरद्बाबूंना एकाकी स्थितीत

भटकण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नव्हता. घरची अवस्था फार बिकट होती. नोकरीसाठीं तपास चालू असतांनाच शिवशंकर साहू यांच्या घरीं शरद्बाबूंनीं कारकुनाचें काम पत्करलें. याच ठिकाणीं शरच्चंद्राना शिकारीची चटक लागली. शरसधानांतहि त्यानीं नैपुण्य संपादन केलें. कारकुनाची नोकरी करून जो थोडाफार पैसा मिळे तो ते घरीं पाठवून देत. लहान भावंडाची चिंता त्याना होतीच. मन मारूनच खरें म्हणजे ही नोकरी त्यांना करावी लागत होती. सन १८९५ या वर्षी शरच्चंद्रांची आई मरण पावली. एक एक पाश कमी होत होते. भावंडांचें रक्षण करण्याची जबाबदारी मात्र त्यांना अस्वस्थ करी.

मोतीलालजींचें व शरच्चद्राचेंहि व्यावहारिक दृष्ट्या फारसें पटत नसे. हरतऱ्हेचे दगड जमविण्याचा नाद मोतीबाबूंना होता. एका मोठ्या पेटींत त्यांनीं नाना आकाराचे व नाना रंगाचे पत्थर जमविले होते. शरद्बाबूंना या प्रकारात कांहीं गम्य नव्हतें. एके दिवशीं ते घरीं आले आणि आपल्या एका श्रीमंत मित्रास त्यांनीं ते दगड देऊन टाकले. मोतीबाबूंना हें समजल्यावर त्यांचा संताप अनावर झाला. शरद्बाबू पुन: अस्वस्थ होऊन गेले. त्यांनीं पुनः एकदा गृहत्याग केला. नोकरी व गृहजीवन यांना बरोबरच रामराम ठोकण्याचा विचार त्यांनीं केला. या वेळीं संन्याशाच्या वेशात शरद्बाबू सर्वत्र हिंडले. समाजाच्या सर्व थराचा अभ्यास त्यांनीं मन लावून केला. संन्याशाचें भटकें जीवन शरच्चंद्रांना चागलेंच परिचयाचें होतें.

‘ श्रीकांत ’ कादंबरी शरद्बाबूंची आत्मकथा नव्हे ही गोष्ट खरीच, पण त्यातील कित्येक प्रसंग व कित्येक व्यक्ति त्याच्या जीवनांत येऊन गेल्या असाव्यात असें वाटतें. संन्याशाचीं दोन-तीन चित्रें त्यानीं या कादंबरींत वर्णन केलीं आहेत. या कादंबरीचा नायक ‘ श्रीकांत ’ या कादंबरीकाराप्रमाणेंच भटक्या वृत्तीचा आहे. भटक्या वृत्तीचें व संन्यास-धर्म स्वीकारण्याचें वर्णन करतांना श्रीकांत म्हणतो, “ रात्र उलटल्यावर

एकदम गाडीखालीं उडी टाकली. खिशात हात घालून पाहिलें—काहीं काळजी करायला नको. एक दुआणी व दहा पैसे शिल्लक होते. मोठ्या खुशींत स्टेशनच्या बाहेर पडून दुकानाचा तपास करूं लागलों. दुकान मिळालं. चिवडा, दहीं आणि साखर घेऊन जेवण उरकण्यात अर्धे पैसे संपून गेले! संपेनात का! आयुष्यात अशा कितीतरी गोष्टी संपतात. तेवढ्यासाठीं मनाला लावून घेणें म्हणजे भेकडपणा... गाव धुंडाळायला निघालों...जवळच्या एका आबराईतून धूर येत असलेला दिसला. मी तर्कशास्त्र शिकलों होतों ना! धूर आहे तेथें अग्नि असणारच...मी सरळ त्या जागेकडे जाण्यास निघालों. वा! जें हवें होतें तेंच हें ही एक संन्याशाची मठी होती. एका मोठ्या धुनीवर लोट्यात चहासाठीं पाणी चढवलें होतें. अर्धे डोळे मिटून बाबाजी समोर बसले होते. त्याच्या आजूबाजूला गाजाचा सरंजाम होता. बाबाजींचा एक बच्चा शेळीचें दूध काढीत होता. दोन उंट, दोन तट्टू आणि एक सवत्स गाय. पलीकडे एक छोटासा तंबू. डोकावून पाहिलें तों माझ्याच वयाचा एक चेला दोन पावलाच्यामध्यें दगडाची कुंडी धरून लिंबाच्या दांड्यानें भाग घोटीत बसला होता. पाहतांच मी भक्तिभावानें फुलून निघालों व एकदम जाऊन बाबाजींच्या पायावर डोकें ठेवून नमस्कार केला 'घर सोडून निघालेला एक दुर्दैवी मुमुक्षु आहें मी. कृपा करून आपल्या चरणांचा आश्रय मला द्यावा.'"

खोट्या संन्यासधर्मावरील ही टीका प्रखर तर खरीच पण या बाजारबुणग्या संन्याशांचें जीवन मात्र शरद्‌बाबूंनीं जवळून निरखून पाहिलें होतें यात शंका नाहीं. दुसऱ्या दिवशीं श्रीकांताच्या अंगावर संन्याशाचीं वस्त्रें चढलीं. एक भगवी कफनी; आठ-दहा लहानमोठ्या रुद्राक्षाच्या माळा आणि तोंडावर भस्माचे म्हणजे राखेचे पट्टे—हा श्रीकांताचा पोशाख ठरून गेला. आणि त्यांच्या 'अध्यात्म'—चर्चेस प्रारंभ झाला. शरच्चंद्रांनींहि स्वतःच्या अंगावर हा पेहराव कित्येक

दिवसपर्यंत चढविला होता. आणखी एके ठिकाणीं 'श्रीकांत' कादंबरींत संन्याशाचें वा बैराग्याचें वर्णन आलें आहे " सांईथिया स्टेशनवरची गोष्ट केळीच्या पानावर राजलक्ष्मी जिन्नस वाढीत होती. इतक्यात एक मूर्ति येऊन तेथें उभी राहिली व म्हणाली, 'नारायण!' एक बैरागी उभा होता. तो फार वयाचा नसावा. फार तर बावीस-तेवीस होईल. जितका नाजुक तेवढाच देखणा. चेहरा जरा बायल्या-सारखा. साधारणपणें लंबाचवडा पुरुष होता. रंग मात्र बावनकशी सोन्यासारखा. नाक, डोळे, भुंवई, कपाळ सारीं कांहीं अगदीं रेखीव दिसत होतीं. असलें सौंदर्य पुरुषाच्या जातींत क्वचितच दिसून येतें. अंगावरची भगवी कफनी ठिकठिकाणीं फाटलेली होती–गांठी मारलेली होती. वर घेतलेलें भगवें उपरणें देखील तसेंच जीर्ण झालें होतें. तीच स्थिति पायातल्या पंजाबी चढावाची! हरवले तरी काहीं बिघडलें नसतें. याचें नाव वज्रानंदस्वामी." असे कितीतरी स्वामी व बुवा शरच्चंद्रांच्या सहवासात आले असतील. तिऱ्हाईतपणें समाजाचें निरीक्षण करण्यास संन्याशाचीच भूमिका त्याना उपयोगी पडली असावी. एरवीं अध्यात्माची आवड शरद्बाबूंच्या मनात उपजण्यासारखी नव्हती. या ठिकाणीं एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. शरद्बाबूंचा मधला भाऊ प्रभासचंद्र मात्र खरोखरीचा सन्यासी बनलेला होता. इतकेंच नव्हे तर शरद्बाबूंच्या घराण्यात एक सन्याशाची परंपराच निर्माण झालेली होती. यासंबंधीं शरद्बाबूंच्या एका पत्राचा या ठिकाणीं उल्लेख करावासा वाटतो. आपल्या एका साहित्यिक मित्रास – श्री. पशुपति चट्टोपाध्याय यास– पत्र लिहिताना शरद्बाबू म्हणतात—

"एक मौजेची गोष्ट सांगतों. कांहीं जरुरीच्या कामासाठीं बँकेंत गेलों होतों. तेथील कॅशिअर बंगाली आहे. तो एक नामांकित ज्योतिषी आहे असें ऐकलें होतें. मोठ्या उत्सुकतेनें माझें काम करून झाल्यानंतर माझी जन्मकुंडली पाहण्यास त्यानें मागितली. मीं सांगितलें, कुंडली

नाहीं; राशिचक्र मात्र नोट-बुकांत आहे. त्यानें माझ्या हस्तरेषेचा ठसा घेतला. पंचांगात पाहून तो गणित करूं लागला. त्यानें काय सांगितलें असावें ? माहीत आहे ? तो म्हणाला, ' एका वर्षांत आपण दुसऱ्या मार्गास लागाल. ' मीं विचारलें, ' म्हणजे ? ' तर म्हणाला, ' आध्यात्मिक मार्ग ! ' मीं त्यास असें सांगितलें कीं, ' काशीच्या भृगुसंहितावाल्या पंडितानें पण हेंच भविष्य केलें होतें. माझा मात्र या गोष्टीवर कधींच विश्वास नव्हता. कारण कीं, आध्यात्मिकतेच्या ' आ ' पर्यंतहि माझी गति नाहीं. ' पण म्हणतो कसा कीं, ' एक वर्षानंतर भेटा, मग बोला. '

एक गोष्ट तुम्ही माझ्या तोंडून आज पहिल्यानेंच ऐकाल. माझ्या वंशाचा एक इतिहास आहे. या घराण्यांतील माझे मधले बंधु ( प्रभास ) स्वर्गीय स्वामी देवानन्दांपासून पूर्वीच्या आठ पिढ्यापर्यंत एक अखंड अशी संन्यासी लोकांची परंपरा माझ्या घराण्यात आहे. केवळ मीच एक घोर नास्तिक जन्मास आलों. वंशानुगत धर्म माझ्या रक्तातून उलटा वाहूं लागला. तेव्हां वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी कोणाचा शिष्य बनून रहावें, असें मनात येत नाहीं. पण खजांची ( खजिनदार ) महाशय सांगतात कीं, मी निश्चितपणें बैरागी होणार म्हणून. "

शरद्‌बाबू कधींहि खरे संन्यासधर्मी झाले नाहींत ही गोष्ट खरी; पण संन्याशाच्या वेशात मात्र अखंडपणें ते भटकत होते. कित्येक गोष्टींचा त्यानीं या काळांत अभ्यास केला. अनेक तिरस्कृत व बहिष्कृत माणसाच्या संगतींत ते राहिले. समाजानें क्षुल्लक कारणावरून दूर लोटलेल्या वर्गाच्या मनांत शरच्चंद्रानीं प्रवेश केला व त्याच्या वेदना कनवाळूपणानें जाणून घेतल्या. अपराध्यांची मनःस्थिति पाहिली. पतितांचें अंतःकरण निरखून बघितलें. उदार अशा सहानुभूतीनें या माणसाना वागविलें तर त्याच्या सद्‌गुणांचा उपयोग होण्यासारखा आहे, संभावित ढोंगी माणसाच्या लपून राहिलेल्या पापाचरणापेक्षां हीं माणसें शरद्‌बाबूंना दयनीय वाटलीं.

वडिलांचे गुण व दुर्गुण दोन्ही त्यानीं उचलले होते. दारिद्र्याने पोळलेल्या मन:स्थितींत त्यांचें भ्रमण उदासवाणें चाललें होतें. एके ठिकाणीं ते म्हणतात, "माझें बालपण व तारुण्य अत्यंत गरिबीच्या स्थितींत गेलें. पैसा अपुरा पडला म्हणून मला शिक्षण घेण्याचें भाग्य लाभलें नाहीं. मीं माझ्या पिताजींच्यापासून अस्थिर स्वभाव आणि साहित्याविषयीं निकट प्रीति याशिवाय कांहींहि घेतलें नाहीं. याच अस्थिर स्वभावापायीं लहान वयांतच मी जवळजवळ सर्व भारत हिंडून आलों होतों. पिताजींनीं दिलेल्या दुसऱ्या देणगीमुळें मी जीवनभर स्वप्नेंच पाहत राहिलों. माझ्या पिताजींचें पांडित्य अगाध होतें. कथा, कादंबरी, नाटक, कविता इत्यादि प्रत्येक प्रांतात त्यांनीं हस्तक्षेप केला होता, परंतु त्यांपैकीं एकहि कृति समाप्त झालेली नव्हती. त्यांची रचना आता माझ्याजवळ नाहीं, केव्हा माझ्या हातून ती निसटली तें नीटसें ध्यानात नाहीं, पण हें मात्र पक्कें स्मरतें कीं, त्यांच्या अर्धवट गोष्टी वाचता वाचता मी तासन् तास रमून जात असें. या गोष्टी त्यांनीं पूर्ण का केल्या नाहींत, याबद्दल मला फार दुःख होत असे. या गोष्टींचा शेवट कसा असावा?— या विचारात मी रात्रभर जागून राहत असें. आणि याच प्रवृत्तींतून मीं सतराव्या वर्षी कादंबरी-लेखनास प्रारंभ केला असावा. पण थोड्याच दिवसात हें आळशी माणसाचें काम आहे असें समजून मीं लिहिणें सोडलें." आणि कित्येक दिवसपर्यंत शरद्बाबूंचें परिभ्रमण चालू राहिलें. हें भ्रमण किती दिवस चाललें असतें कोणास माहित, पण एके दिवशीं त्याच्या सन्यासी जीवनाचाहि अंत झाला. मुझफरपूर येथें असताना सन १९०३ मध्यें त्याना वडिलांच्या मृत्यूची बातमी कळली. ताबडतोब शरच्चंद्र भागलपूर येथें येऊन पोंचले. शरद्बाबूंवर ही एक भयंकरच संकटपरंपरा होती. मामाच्या कुटुंबात त्यांना कोणीच आश्रय देणारें नव्हतें. श्राद्धासारख्या प्रसगींहि कोणी कवडीची मदत शरच्चद्राना केली नाहीं. त्यांच्या मालकीची एकच अशी वस्तु होती

ती म्हणजे त्यांची सायकल. ती विकून त्यांनीं हें सर्व क्रियाकर्म पार पाडलें. विस्कटून गेलेल्या प्रपचाचें काय करावयाचें ? छोट्या भावंडांचा भार त्याच्यावरच येऊन पडला. पुनः नोकरी करण्याचें त्यांनीं ठरविलें. छोट्या बहिणीची व्यवस्था मात्र नीटपणें त्याना लावतां आली. खंजरपूर येथें ज्या घरांत मोतीबाबू राहत असत त्या घरच्या मालकिणीस ही पोरगी फार पसंत पडली होती. तिनें या पोरीस साभाळण्याचें काम पत्करलें. असनसोल येथें एक नातेवाईक होता त्याच्या स्वाधीन एका भावास करण्यात आलें. शरदूबाबूंच्या कुटुंबातील माणसें याप्रमाणें विखुरलीं गेलीं. ज्या वयांत माणसास घराची आवश्यकता, कौटुंबिक प्रेमाची ओढ, त्याच वयांत शरदूबाबू गृहहीन बनले. लहानपणापासून घरची अशी माया त्याना दुर्दैवानें लाभली नाहीं आतां तर ते पुरतेच फकिरी वृत्तीचे बनले.

कलकत्ता येथें नोकरी करण्याच्या निमित्तानें शरदूबाबू प्रयत्न करू लागले. कोणा एका वकिलाच्या घरीं इंग्रजीचा हिन्दी अनुवाद करण्याच्या कामावर शरच्चंद्र रुजूं झाले. भागलपूरच्या शाळेंत असतांना शरदूबाबूंचा हिन्दी हा एक विषय होता. हिन्दी भाषेचें ज्ञान त्यानीं चांगलेंच मिळवलें असल्यामुळें त्यांना ही नोकरी मिळाली. भावडाना त्यानीं थोडें साह्य केलेंच आणि जें थोडें कर्ज झालें होतें तेंहि फेडून टाकलें. मधून मधून साहित्यचर्चेकडे त्याचें लक्ष होतेंच. कथा लिहीत असत, पण प्रसिद्ध करण्याचें मात्र धाडस त्यानीं केलें नव्हतें. कथा-कादंबऱ्या लिहून अर्थप्राप्ति व्हावी असा तो काळ नव्हता. बेकार माणसानें कथा लिहाव्यात असेंच साधारणपणें समजलें जात असे. शरच्चंद्रांच्याभोंवतीं पुनः मित्रमंडळ तयार झालें होतें. पुनः साहित्य-चर्चेला प्रारंभ झाला. पुनः कलेची उपासना सुरू झाली. या मित्र-मंडळींना एक हर्मोनियम हवा होता. पण पैसे कोणाजवळ होते ? तेव्हां विचार ठरला कीं, शरदूबाबूंनीं 'कुन्तलीन'–स्पर्धेसाठीं एक कथा

लिहावी. निश्चितपणें बक्षिस मिळणार असल्याची खात्री सर्वांना होती. पण शरद्बाबू या गोष्टीस तयार नव्हते. स्पर्धेमध्यें आपण स्वतः भाग घ्यावा असें शरच्चंद्रांना कधींच वाटलें नाहीं. तरीपण लोकांच्या आग्रहा-साठीं त्यानीं श्री. सुरेन्द्रनाथ गंगोपाध्याय याच्या नावावर 'मंदिर' नावाची एक कथा पाठविली. 'कुन्तलीन' नावाचा थोडा चमत्कारिक इतिहास आहे. तो काळ स्वदेशीच्या पुरस्काराचा होता. श्रीमंत लोक विदेशीं तेलाचा उपयोग आपल्या नित्याच्या व्यवहारात करीत असत. पण 'कुन्तलीन' नावाचें एक सुगंधित असें सुंदर स्वदेशी तेल बाजा-रांत येऊन त्याचा प्रचारहि बराच झाला. तेलाच्या प्रचारासाठीं त्याच्या मालकानें एक सूचिपत्र प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. सूचिपत्र निघत असतानाच तें लोकप्रिय होण्यासाठीं त्यानें त्याच्याबरोबर काहीं कथाहि प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. मोठमोठ्या स्पर्धा ठेवून नामांकित लेखकाचेंहि लिखाण 'कुन्तलीन' तर्फें प्रसिद्ध होऊं लागलें. रवींद्रनाथांचें एक नाटकहि या स्पर्धेत एकदां होतें. त्याबद्दल तीनशें रुपयाचा पुरस्कार त्यांना मिळाला होता. याच 'कुन्तलीन' स्पर्धेत शरद्बाबूंची 'मंदिर' कथा पाठविली गेली व तिला परीक्षकाच्या मतें पहिलें पारितोषिक द्यावें असें ठरलें. शरच्चंद्राचा हा मोठाच विजय होता. पण या काळातील त्यांची ही शेवटचीच कथा ठरली.

चार-दोन मित्रमंडळींनीं कौतुक केलें आणि मग गौरवाचा सर्व भार ओसरला. पोटाची चिंता शरच्चंद्रांना एकसारखी होतीच. भाषांतराचें नीरस काम त्याच्या मनाला रुचणारें नव्हतें. फिरून भ्रमन्ती दूर देशात करावी, असा विचार त्याच्या मनात घोळूं लागला. अफाट पसरलेला मानवसमाज पाहण्याचें, त्याचें सुखदुःख समजावून घेण्याचें काम त्यांच्याकडून अजून पूर्ण व्हावयाचें होतें. मानवी स्वभावाचें वैचित्र्य अजून त्याच्या अनुभवास यावयाचें होतें. दीड वितीच्या पोटासाठीं माणसांना काय उपद्व्याप करावे लागतात, हें त्याना स्पष्टपणें पाहा-

वयास लावण्याचा इरादा त्याच्या दैवाचा असावा. बंगाल-बिहारचा सारा समाज पाहिल्यावर त्यांच्या चित्तात आधींच काहूर माजून गेलें होतें. धर्म, रूढि, चालीरीती, समाजरचना, कुटुंबपद्धति, आर्थिक विषमता, देवधर्म, नीति-अनीति याच्या दडपणाखालीं गोरगरीब कसे पिचले जातात हें त्यांनीं ओळखलें होतें. समाजाच्या विचित्र घटनेमुळें बहुतेक सर्व दुःखें निर्माण झालेलीं त्याच्या ध्यानात स्पष्टतेनें दिसत होतीं. या विचित्र समाजरचनेपाठीमागें निर्दय राजसत्ता व आर्थिक विषमता आहे हेंहि त्यांच्या नजरेंतून सुटलें नाहीं. विशेषतः स्त्रियाची दयनीय अवस्था पाहून शरद्‌बाबू विव्हल झाले. ज्या हिंदु समाजानें स्त्रीचा गौरव ऐतिहासिक-पौराणिक काळात केला त्याच समाजांत स्त्रीजातीची कोण ही विटंबना! स्त्री विधवा झाली कीं संपलें सारें तिचें जिणें आणि सधवा असली कीं फुललें तिचें जीवन! हीं दोनहि टोकें खरीं नसल्याचें त्याच्या आढळांत आलें. आपल्या एका शिष्येला लिहिलेल्या पत्रात शरद्‌बाबू लिहितात, "विधवा होणें ही नारीजीवनाची सर्वांत मोठी हानि व सधवा राहणें ही सर्वांत मोठी सार्थकता या दोहोंत कोणतेंच सत्य नाहीं." या त्याच्या सिद्धान्तापाठीमागें फार मोठें निरीक्षण होतें, चिंतन होतें. आणखी एका पत्रांत ते लिहितात, "मी एकदा लहानपणींच सहाशें-सातशें कुलत्यागिनी बंगाली स्त्रियांच्या इतिहासाचा संग्रह केला होता. त्यासाठीं मला शिक्षा मात्र मिळाली. देशभर माझी बदनामी होत गेली. पण माझा निष्कर्ष असा निघाला कीं, गृहत्याग करणाऱ्या शंभर स्त्रियांपैकीं ऐंशी स्त्रिया सधवा आहेत. पति जिवंत असतानाहि त्याना कुलत्याग करावा लागला." कोणती परिस्थिति या सर्व घटनाना जबाबदार आहे? स्त्रियाची व पर्यायानें समाजाची एवढी मोठी खराबी कशामुळें झाली? वरवर आकर्षक दिसणाऱ्या हिंदु समाजाच्या अंतरंगात कोणत्या विषारी ज्वाला भडकल्या आहेत?— या सर्व प्रश्नाचीं उत्तरें दैवगतीस शरद्‌बाबूंकडून काढून

व्यावयाची होती. आणि म्हणूनच कीं काय, शरद्बाबूंची अन्नान्न-दशा झाली आणि एके दिवशीं शरच्चंद्र पोटासाठीं म्हणून ब्रह्म-देशास जाणाऱ्या बोटीवर आरूढ झाले. काळाच्या उदरांत काय काय होतें हें त्यांना तरी कोठें माहीत होतें !

● ● ●

## ब्रह्मदेशाचा भिक्षु : ३

पोटासाठीं शरच्चंद्र ब्रह्मदेशांत जाण्यास निघाले, या घटनेस फारच मोठा अर्थ होता. एक-दोन वर्षें नव्हे तर चागलीं चौदा वर्षें त्याचें ब्रह्मदेशात वास्तव्य होतें. नोकरीच्या शोधार्थ उभा ब्रह्मदेश त्यांनीं पायीं तुडविला. ब्रह्मदेशच्या संस्कृतीचें व समाजाचें स्वरूप मोठें विचित्र आहे. सामाजिक बंधनापासून मुक्त झालेले शेंकडों जातींचे, धर्मांचे शेंकडों लोक त्या देशांत नाना प्रकारच्या कामानिमित्तानें एकत्र झालेले असतात. चालीरीतींचीं, धर्मांचीं, समाजाचीं फारशीं बंधनें त्या ठिकाणीं पाळणारे लोक फारच थोडे. या विचित्र समाजाचें विराट् दर्शन शरद्बाबूंना घडावें असा जणु परमेश्वरी संकेत होता. ब्रह्मदेशच्या समाजाचें, तेथील परिस्थितीचें व एकंदर बोटीच्या प्रवासाचें जें अनुभवात्मक ज्ञान शरच्चंद्रानीं मिळविलें, त्याची साक्ष त्याच्या कादंबऱ्या-तून ठिकठिकाणीं पटते. 'पथेर दाबी' कादबरी राजकारणात्मक असली तरी तिच्यातील सर्व घटना ब्रह्मदेशातील मिश्र समाजाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या आहेत. 'चरित्रहीन' कादंबरींत दिवाकर-किरणमयी ही जोडी कादंबरीच्या उत्तरार्धांत ब्रह्मदेशांतच वास्तव्यास होती. तेथील समाज-रचनेचा नमुना आपणांस शरच्चंद्रांच्या सरस, सुरस व सजीव अशा वर्णनावरून पाहावयास मिळतो. शरद्बाबूंची निरीक्षणशक्ति विलक्षण

असल्यामुळें त्यानीं केलेलीं सर्व वर्णनें चैतन्यमय अशीं वठलेलीं आहेत. ' श्रीकात ' कादंबरींत त्यानीं अनुभवलेले कितीतरी प्रसंग जसेच्या तसे साकार केलेले दिसून येतील. श्रीकाताच्या भ्रमन्तींत ब्रह्मदेशातील फेरफटका नसल्याशिवाय कसें होणार? तटस्थ वृत्तीनें त्यानें ब्रह्मी समाजाचें मोठें मार्मिकपणें निरीक्षण केलें आहे. एवढीं सजीव व वास्तववादी वर्णनें इतरत्र क्वचितच सापडतील. शरच्चंद्र जर बंगाल-बिहारामध्यें राहते तर या सुंदर वर्णनाना वाचकवर्ग मुकला असता. शरच्चंद्राची दृष्टि अधिक विशाल झालीच, पण त्याच्या सहानुभूतीचा परिवाहि विस्तृत होण्यास या ब्रह्मदेशाच्या वास्तव्याचा फार उपयोग झाला. त्याचे या प्रवासातील अनुभव ' श्रीकांत कादंबरींत फार स्पष्टपणें उमटले आहेत. काहीं थोडे नमुने आपण पाहूं. श्रीकात म्हणजे शरद्बाबू हें समीकरण बरोबर नसलें तरी हीं वर्णनें त्यानीं एवढ्या आत्मीयतेनें केलेलीं आहेत कीं, दरएक ठिकाणीं शरच्चद्राची स्मृति झाल्याखेरीज राहत नाहीं. शरच्चद्राची निरीक्षणशक्ति, त्याची काव्यात्मकता, त्याची वर्णनशैली व त्यांची कल्पकता याचा उत्कृष्ट मिलाफ या वर्णनांतून झालेला असल्यानें त्यांचें चरित्र समजावून घेण्याच्या दृष्टीनेंहि तीं फार मोलाचीं आहेत

ब्रह्मदेशात कोणकोणत्या प्रकारचीं माणसें कसकशीं निघन असतात याचें वर्णन किती मार्मिकतेनें केलें आहे पाहा · " जेटी आणि मोठा रस्ता याच्या आतला सगळा भाग नाना प्रकारच्या पदार्थांच्या बोजानें भरून गेला होता. लाल, काळे, पांढरे, भगवे, मला वाटतें कांहीं वासरें-सुद्धा एका दोरखडानें बाधलेलीं असावींत. जवळ जाऊन पाहिलें तेव्हां वाटलें कीं हे बोजे नव्हते; वासरें नव्हतीं. माणसें होतीं तीं. माथ्यावर मोटल्या घेऊन बायकापोरांचे हात धरून सारी रात्र थडींत कुडकडींत पडलीं होतीं तीं...थोड्याच वेळांत ही पलटण जेव्हा सरसावून उभी राहिली तेव्हा असें दिसून आलें कीं, काबूलपासून कृष्णाकुमारीपर्यंत साऱ्या

प्रांतांनीं आपापले प्रतिनिधि या कोयला घाटावर पाठविण्याची खबरदारी घेतली होती. सारेच होते. काळींकुट्ट कुडतीं घातलेलीं चिनी माणसें-सुद्धां आपल्या मंडळात सिद्ध होतीं " ही सारी ब्रह्मदेशास निघालेली मिश्र प्रजा यानंतर डगदरी म्हणजे प्लेगच्या टोंचण्याचें वर्णनहि फारच रेखीवपणें शरच्चंद्रानीं केलेलें आहे. त्यानंतर बोटीवर चढण्याचें भयकर दिव्य " डेकपॅसेंजरची बोटीवर चढण्याची क्रिया कोणत्या प्रकारें निष्पन्न होते तें बाहेरच्या लोकांना कळणें अशक्य आहे. तरी पण दात्यात दातें अडकवलेलीं चाकें कारखान्यात ज्यानीं पाहिलीं असतील त्यांना थोडीशी कल्पना येईल. जो ज्या प्रकारें पुढल्या ओढीनें आणि मागल्या रेटारेटीनें पुढें होत होता तो आमचा काबुली, पंजाबी, मारवाडी, मद्रासी, महाराष्ट्रीय, बंगाली, चिनी, खोजा, उडिया वगैरे सगळे एका दोरीनें बांधल्यासारखे परस्परांच्या आकर्षणविकर्षणाच्या वेगानें धक्क्यावरून जहाजावरच्या डेकवर अगदीं न कळत जाऊन पोंचत होते. "

अशा प्रकारें सर्व देशातील माणसें एकत्र वाहून नेणारी बोट ती. तेथें कितीतरी गमती शरच्चंद्रांना पाहावयास मिळाल्या. प्रत्येक जण आपलें राष्ट्रीय संगीत सुरू करीत. शरदबाबूंनीं लिहिलें आहे : " काबूल ते ब्रह्मपुत्रा आणि कन्याकुमारी ते चीनच्या सीमा येथपर्यंत ज्या ज्या प्रकारचें सुरब्रह्म होतें तें सारें या बोटीच्या खालच्या गाभाऱ्यात वाद्ययंत्रासह गाजत असलेलें ऐकूं येत होतें. "

यानंतर त्याना भेटलेल्या माणसांचे विचित्र नमुने मुळातूनच वाचण्यासारखे आहेत. ब्रह्मदेशातील नंद मिस्त्री व त्याची तगर वैष्णवी यांचा जहाल सवाद वाचून श्रीकांत मनाशीं म्हणतो, " लगेच वाटलें कीं, ही एक सामान्य अशिक्षित बायको होती. पण खेड्यांत आणि शहरांत असे कित्येक शिक्षित आणि अर्धशिक्षित पुरुषसुद्धां अशाच प्रकारचे हास्यापद व्यवहार करीत असलेले आजहि आपल्या दृष्टीला

नाहीं का पडत ? खाणें व शिवताशिवत एवढया बाबतींत बंधनमुक्त पापाच्या तडाख्यांतून सुटण्याचा प्रयत्न करीत नसतात का ? पुरुषाच्या बाबतींत कोणी हंसत नाहीं. हास्यास्पद होते काय स्त्री ... असें होतेंय् खरें — "

समुद्रावर होणारें वादळ व त्यामुळें होणारे प्रवासाचे हाल यांचेंहि वर्णन शरद्बाबूंनीं विस्तारानें केलें आहे. श्रीकांत सांगतो, "आज संध्याकाळपासून आकाशांत थोडे थोडे ढग येत होते. रात्रीं एक वाजल्या-नंतर थोडेसे वादळी वारे वाहूं लागले आणि रात्रीं बोट बरीचशी हलूं लागली पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं पूर्ववत् स्थिरस्थावर झालें. ज्याला 'बोट लागणें' म्हणतात तसला उपसर्ग मला नव्हता. माझें बालपणच बरेंचसें होड्या चालवण्यांत गेलें होतें, त्यामुळें मला ओकारीपासून भीति नव्हती.

" ... संध्याकाळच्या अंधारांत ज्या वेळीं मी माझ्या जागेवर आलों तेव्हां वरच्या डेकवर चिटपाखरूंसुद्धा नव्हतें. डोलकाठीच्या बाजूनें डोकावून पाहिलें, समोरच म्हातारा कप्तान दुर्बिण हातीं घेऊन ब्रिजवर धावाधांव करीत होता .. तितक्यांत आगबोटीची शिट्टी झाली. माझ्या हृदयाचा थरकांप उडाला. .. या बेफाम वावटळीच्या शक्तीचें वर्णन करणें तर दूरच राहो, नुसत्या जाणिवेनें त्याचा अनुभव घेणेंसुद्धा माणसाच्या ताकतीबाहेरचें होतें सारी बुद्धिशुद्धि नाहींशी करून केवळ हीच एक अस्पष्ट पण निःसंदेह धारणा मनांत जागून उठली कीं, जगाचा प्रलय व्हायला आता अवधि उरला नाहीं. जवळच एक लोखंडी खुंटी होती. अंगावरचें उपरणें काढून मीं तिला बांधून घेतलें. प्रत्येक क्षणाला असें वाटत होतें कीं, केव्हां हें बांधलेलें सुटून मी समुद्राच्या तळाशीं जाऊन पडेन... आगबोटीच्या कठडयावर धडकणारें काळें पाणी धक्क्या-बरोबर बदबद करीत हळूहळू वर येऊं लागलें होतें. सहज नजर दूर गेली पण ती नजर तेथून परत फिरेनाच. एकदां असें वाटलें कीं, हा

जसा काहीं डोंगरच. पण दुसऱ्याच क्षणीं ज्या वेळीं तो भ्रम नाहींसा झाला तेव्हा हात जोडून म्हटलें, 'भगवंता, हे दोन डोळे जसे तूं दिलेस तसेंच तूं आज त्यांचें सार्थक केलेंस. इतके दिवस डोळे उघडून साऱ्या जगांत फिरत होतों, पण तुझी ही लीला अजून केव्हाच पाहिली नव्हती.' ... मधून मधून पाण्याचे लोटच्या लोट डेकवरून वाहून जाऊं लागले. माझ्या बैठकीखालच्या बदक-कोंबड्यानीं काहीं वेळ धडपड करून आणि मेंढयानीं कांहीं वेळ बॅं बॅं करून इहलोकचीं लीला संपविली. मी मात्र त्यांच्यावर बसून लोखंडी खुंटीला मोठ्या वेगानें कवटाळून अजून आयुष्याची दोरी बळकट धरून राहिलों होतों. परंतु आतां एक नवेंच संकट उभें राहिलें. लाटांच्या छाटीमुळें पाणी सुईसारखें अंगाला टोंचत होतें. एवढेंच नव्हे तर अंगावरच्या साऱ्या भिजलेल्या कपड्यावर प्रचंड वावटळीमुळें जी थंडी झोंबत होती, त्यामुळें माझी दातखिळी कडकड वाजत होती. — "

या अशा भयानक परिस्थितींतील रंगूनचा प्रवास. या प्रवासाच्या वर्णनाच्या शेवटीं श्रीकांत निष्कर्षवजा काहीं सांगतो तेंहि ऐकण्या-सारखें आहे : "ब्रह्मदेशाला जायचें तर तीन-चार दिवसाचा प्रवास असतो. तरीहि मीं पाहिलेंय् कीं, पंधरा आणे बंगाली लोक-विशेषतः त्यांपैकीं बहुतेक ब्राह्मणच असतात, कारण या युगांत त्याच्या लोभी स्वभावानें सर्वांवर मात केली आहे—बोटीच्या हॉटेलात स्वस्तांत स्वस्त मिळणारें अन्न खाऊन पोट भरून घेतात तेव्हां कुठें जमिनीवर स्वस्थ-पणानें पाय पसरतात...हॉटेलात जे एका रांगेनें पंक्तिभोजनास बसले होते ते काहीं उच्चवर्णीय नव्हते. ते सारे कारागीर लोक होते. वर्क-शॉपमध्यें काम करणारे होते. साडेदहा वाजण्याच्या रजेंत भात खाण्या-साठीं आलेले होते...या भागातील वस्ती खरोखरीच मोठी विचित्र होती. एका रागेनें एकमेकांस लागून जुन्या-पुराण्या काठ्यांच्या छोट्या छोट्या झोपड्या बांधण्यात आल्या होत्या. त्यांतून चिनी, ब्रह्मी, उडिया,

मद्रासी, चट्टग्रामी, मुसलमान, हिंदुहि राहत होते आणि आमचे बंगाली भाईहि त्यांच्यात राहत होते—''

अशा प्रकारच्या विचित्र समाजव्यवस्थेंत शरद्बाबूंचीं तेरा-चौदा वर्षें गेलीं. केवढा दीर्घ अनुभवाचा सांठा त्यांच्याजवळ जमा झाला असेल ! त्यांच्या कथासाहित्यातील सर्वोत्तम भाग, ब्रह्मदेशाच्या पार्श्व-भूमीवर जीं कथानकें रंगलीं आहेत त्यांतीलच आहे. आपण आपल्या सीमित व संकुचित विश्वात समाजाची कांहीं वेगळीच कल्पना करून बसलेलों असतों; पण दूरदूरवर जों जों आपण दृष्टि देत असतों तों तों आपल्या कल्पना बदलत राहतात. समाजपुरुषाचें एक अलौकिक दर्शन आपणास होत राहतें. शरद्बाबूंच्या या दीर्घ भ्रमंतीचाहि अर्थ असाच लावावयास पाहिजे. समाजातील अनेक बरेवाईट प्रकार कसे अगतिकपणें निर्माण झालेले असतात, नीतिधर्माच्या कल्पना सर्वत्र कशा वेगवेगळ्या असतात आणि समाजांत किती हरतऱ्हाचीं माणसें वावरत असतात, याचें ज्ञान शरच्चंद्रांइतकें इतर कोणास असेल असें वाटत नाहीं. शरदबाबूंच्या श्रीकांतला जशीं ब्रह्मदेशांत अनेक माणसें भेटलीं, त्याचप्रमाणें 'चरित्रहीन' मधील किरणमयी व दिवाकर यानाहि मोठा विचित्र माणसांचा सहवास लाभला. प्रवासाची हकीकत लिहिताना शरद्बाबू लिहितात, "नाना देशांतल्या नाना प्रकारच्या आणि जातींच्या उतारूंत मिसळून स्वतःला क्षणभर विसरण्याचा मार्ग शोधण्यासाठीं दिवाकर फिरूं लागला. या भारतवर्षांत किती वेगवेगळ्या जाती आहेत, किती विचित्र पोशाख, किती अपरिचित भाषा आहेत, त्याचा पुरावा पाहिल्यानेंच दिवाकर थक्क होऊन गेला. बोटीच्या खालच्या भागांत जो जनसमाज गोळा झाला होता, त्याच्या नाना प्रकारच्या भाषांमुळें जो एक विलक्षण आवाज ऐकूं येत होता तो अत्यंत विचित्र असा होता. ......थोडीशी बसण्या-पुरती जागा मिळविण्यासाठीं उतारू लोकात जी लोटालोटी, धक्का-

बुक्की आणि मारामारी सुरू होऊन भांडणतंटे यापूर्वीं झाले होते ते नुकतेच थांबले होते.—" याहि कादंबरींत सागरी वादळाचें वर्णन आहेच. आरकानमधील कामिनी घरवाली ही एक विलक्षण बाई या कादंबरींत शरद्बाबूंच्या लेखणींतून आकारास आलेली आहे. 'श्रीकांत'-मधील जशी तगर वैष्णवी तशी 'चरित्रहीन' मधील ही जहांबाज कामिनी घरवाली. अशीं कितीतरी पात्रें शरद्बाबूंना या दीर्घ काळात भेटलीं असतील. ब्रह्मदेश म्हणजे माणसाचा एक अजबखानाच होता आणि शरच्चंद्रासारखा निरीक्षक, मग काय पुसता! माणसाच्या स्वभावाचे विविध नमुने त्याच्या कथासाहित्यात न येतील तरच नवल!

शरद्बाबू रंगूनला पोंचले, पण आता पुढचा मार्ग कोणता? जवळ तर दोनच रुपये शिल्लक. रंगूनमध्यें अघोरनाथ चट्टोपाध्याय नावाचे त्याच्या मावशीचे यजमान होते. या धनवान् व विद्वान् माणसाच्या घरीं शरच्चंद्र उतरले. त्यानींहि मोठ्या ममतेनें व उत्सुकतेनें भाच्याचें स्वागत केलें. त्यानीं शरद्बाबूना मुळींच चिंता न करण्याबद्दल सांगितलें व नोकरी वगैरेची खटपट करतों, असें आश्वासनहि दिलें, पण शरद्बाबूचें दुर्दैव जिथें तिथें त्याचा पाठलाग करीत असे. थोडक्याच दिवसात या अघोर-बाबूंचें निधन झालें. अर्थात् त्यांची पत्नी परत हिंदुस्थानात येण्यास निघाली. आता शरच्चंद्राना कोणाचा आसरा? भ्रमण करीत राहणें हेंच एक त्याच्या नशिबात लिहिलें होतें. बौद्ध भिक्षूचा वेश धारण करून त्यानीं सर्व उत्तर ब्रह्मदेश पायीं तुडविला. लीलारानी गंगोपाध्याय या आपल्या एका शिष्येस शरद्बाबू लिहितात, "या दोन पायानीं तुडविला नाहीं, असा या देशातील कोणताहि भाग उरला नाहीं." या त्याच्या भटकंतींत कोणकोणत्या अनुभवाचा संचय त्यांनीं केला असावा, हें एक त्याचें त्यानाच माहित. सन १९०६ पर्यंत त्यांचें परिभ्रमण चालू होतें. त्यानंतर त्यानीं 'एक्झामिनर ऑफ पब्लिक वर्क्स अँड अकाउण्ट्स्' विभागात दरमहा तीस रुपयावर एक नोकरी पत्करली. याच वेळीं

श्री. मणीन्द्रकुमार मित्र नांवाच्या एका व्यासंगी मित्राच्या संगतींत शरद्‌बाबूंनीं पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. शास्त्राच्या अभ्यासाची हौस त्यानीं या ठिकाणीं पुरवून घेतली. हे दिवस काहींसे बऱ्यापैकीं चालले होते. पण अकस्मात् रंगूनला प्लेगची साथ निर्माण झाली. शरद्‌बाबूचे मित्र भराभरा रंगून सोडून निघून गेले. पण शरच्चंद्रासारखा सर्वसामान्य मनुष्य कोठें जाणार ? कचेरीच्या खाणावळींतच ते जेवण करूं लागले. येथें बंगचंद्र नावाचा कोणी एक चंगीभंगी मित्र त्यांना लाभला होता. हा मोठा विद्वान् असून असून इंग्रजी मासिकांत काव्य लिहीत असे, पण व्यसनी मात्र पक्का होता असें सांगतात कीं, ' चरित्रहीन ' कादबरींत जें खानावळीमधील वर्णन आहे व सावित्री नावाची जी सेविका आहे, तिचें उगमस्थान या विवक्षित परिस्थितींत आहे. प्लेगच्या साथींत बंगचद्र हा मित्र शरद्‌बाबूंच्या सान्निध्यातच मरण पावला. शरच्चंद्रानीं त्याची तत्परतेनें सेवा केली. याहि प्रसंगाचे चित्र ' श्रीकांत ' कादंबरींत सांपडतें. कोणी एक व्यक्ति प्लेगनें श्रीकान्च्या मांडीवर डोकें ठेवून प्राण सोडीत असल्याचें वर्णन शरद्‌बाबूंनीं स्वानुभवानेंच केलें आहे.

ब्रह्मदेशांत असताना शरद्‌बाबूंनीं अनेक उद्योग केले. अनेक प्रकारच्या नोकऱ्या त्यांना कराव्या लागल्या. शेवटीं रंगून येथें डेप्युटी अकाउटंट जनरलच्या कचेरींत, पब्लिक वर्क्स अकाउंट विभागांत त्याना कायमची नोकरी पत्करली; पण त्याचे इतर उद्योग चालूच होते होमिओपाथीचा अभ्यास करून लोकाना औषधें देणें, शिकारीचा खेळ खेळणें, संगीतसभांत भाग घेणें, बिलियर्ड खेळणें वगैरे त्याचे विविध व्यापार चालू असत. पण त्याच्या अध्ययनात मात्र खंड पडलेला नव्हता. मुझफरपूरच्या आपल्या प्रमथनाथ भट्टाचार्य नांवाच्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात ते लिहितात —

" माझ्याबद्दल तुला माहिती हवी आहे ती थोडक्यात अशी —

( १ ) शहराबाहेर नदीकांठीं माळावरील एका लहानशा घरात राहतों.

( २ ) नोकरी करतों. ९० रुपये पगार व १० रुपये भत्ता. एक छोटेंसें दुकानहि आहे. आला दिवस कसाबसा निभावतो एवढेंच. आधाराला शिल्लक काहींच नाहीं

( ३ ) हृदयाचा विकार आहे. कोणत्याहि क्षणीं...

( ४ ) खूप वाचलें आहे. लिहिलें मात्र कांहींच नाहीं. गेल्या दहा वर्षांत फिजिऑलजी, बायॉलजी, सायकॉलजी व थोडासा इतिहास यांचें अध्ययन केलें. शास्त्राचा अभ्यासहि थोडाबहुत आहे

( ५ ) ५ फेब्रुवारीस घराला आग लागून सारें भस्मसात् झालें. सर्व लायब्ररी, ' चरित्रहीन ' कादंबरीचें हस्तलिखित, नारीच्या इतिहासाचें चारशें पांचशें पानांचें हस्तलिखित—सर्व जळून गेलीं. त्यांपैकीं एक तरी या वर्षी प्रसिद्ध करावें अशी इच्छा होती. माझ्या हातून कांहीं घडावें असा ईश्वराचा संकेत दिसत नाहीं. म्हणूनच सारें जळून गेलेंसें वाटतें. आतां पुनः लेखन करण्याचा उत्साह उरलेला नाहीं. ' चरित्रहीन ' पाचशें पानांत जवळजवळ संपली होती. पण आता सारें गेलें.

आणखी एक सांगावयाचें राहिलें. तीन वर्षांपूर्वीं हृदयाच्या रोगाचीं लक्षणें दिसूं लागलीं, तेव्हा वाचन सोडून तैलचित्र काढण्यास आरंभ केला होता. गेल्या तीन वर्षांत कितीतरी तैलचित्रें जमविलीं होतीं. तींहि भस्मसात् झालीं ! फक्त चित्रें काढावयाचीं साधनें मात्र शिल्लक आहेत.

आतां मीं काय करणें उचित, तें सांगशील तर कांहीं दिवस तुझ्या सल्ल्याप्रमाणें प्रयत्न करून पाहीन. पुनः काय सुरू करूं ?—कादंबरीलेखन, इतिहासाचा अभ्यास, कीं पेंटिंग ? "

—तुझा स्नेही, शरत्

भागलपूरसारखी साहित्यचर्चा ब्रह्मदेशात कोठून असणार ? पैसे कमवण्यासाठींच नाना देशांतील माणसें येथें येणार. तरी सुद्धां बंगाली

लोकांचा एक क्लब रंगून येथें होता. कधीं कधीं साहित्याच्या प्रश्नावर तेथें वादविवाद होत असत. पण शरद्‌बाबूंनीं त्यांत कोणताच भाग घेतलेला दिसून येत नाहीं. तेथील साहित्यचर्चा त्यांच्या ध्यानातहि येत नसे. एकदां स्त्री-चरित्रावर झालेल्या चर्चेत भाग घेऊन शरच्चंद्रांनीं युरोपियन लेखकांचीं अनेक उदाहरणें दिलीं. लोक ऐकून दंग झाले पुढल्या खेपेस मात्र याच विषयावर शरद्‌बाबूंचें व्याख्यान ठरलें. पण सभेंत व्याख्यान देण्यास त्यांना धीटपणा वाटत नसे. 'नारीचा इतिहास' या त्यांच्या प्रदीर्घ निबंधाचें सभेंत दोन तासपर्यंत वाचन झालें.

शरद्‌बाबू ब्रह्मदेशांत तेरा चौदा वर्षें राहिले. सन १९१२ व १९१४ या वर्षीं कांहीं दिवसाची सुट्टी घेऊन ते कलकत्त्यास येऊन राहिले होते. तरुणपणीं कांहीं दिवसापूर्वी आपण उत्कृष्ट कथा लिहिल्या होत्या. हेंहि त्यांच्या लक्षांत राहिलें नाहीं. पण कलकत्त्याच्या मुक्कामात त्यांच्या मित्राचा आग्रह सुरू झाला. नवीन काढलेल्या 'यमुना' मासिकांत शरद्‌बाबूंनीं कांहीं कथालेखन करावें, अशी इच्छा अनेकांनीं व्यक्त केली. आपल्या प्रतिभेचें सामर्थ्य त्यांना पूर्वी एक-दोन वेळां कळून चुकलें होतें. ब्रह्मदेशास निघतांना आपल्या कांहीं जुन्या कथांचीं हस्तलिखितें शरद्‌बाबूंनीं मित्राच्या स्वाधीन केलीं होतीं 'भारती' नावाच्या मासिकाच्या संपादकाशीं श्री. सौरीन्द्रमोहन मुखोपाध्याय यांचा मित्रत्वाचा संबंध होता. शरच्चंद्रांची 'बडी दिदी' नांवाची एक कादंबरी 'भारती' मासिकांत त्यांना न कळवितांच सुरू झाली. सन १९०७ मध्यें या कादंबरीचा पहिला हिस्सा प्रसिद्ध झाला. या अंकावर लोकांच्या उड्या पडल्या. लेखनपद्धति इतकी अभिनव, कथानकाची गुंफण इतकी बांधेसूद व भाषा इतकी मनोहर कीं, लोकांना या कथेच्या लेखकासंबंधीं जिज्ञासा जागृत झाली. रवीन्द्रनाथाचीच ही गोष्ट असावी असा सर्वांचा तर्क झाला. या कथासम्राटाखेरीज एवढी सुंदर कथा दुसरा कोण लिहिणार ? याच सुमारास श्री. शैलेन्द्र मजुमदार यांच्या

नेतृत्वाखालीं 'बंगदर्शन' नांवाचें मासिक निघत होतें. श्री. मजुमदारांनीं रवीन्द्रनाथापाशीं तक्रार केली कीं, एवढी सुंदर कथा 'भारती' मासिकाला कां दिली? रवीन्द्रनाथ अर्थातच घोटाळ्यात पडले. 'भारती' मासिकाला त्यांनीं केव्हांच कथा दिलेली नव्हती. त्यांनीं स्वतः ती कथा वाचून काढली व त्या कथेची मोठीच प्रशंसा केली. सर्व रसिक वाचकांना कळून चुकलें कीं, बंगाली भाषेच्या साहित्याकाशांत एक नवीन तारा उदयास आला आहे!

'भारती'च्या अंकांत शेवटीं एकदां शरच्चंद्र चट्टोपाध्याय हें नांव प्रकट झालें व लोकांची खात्री झाली. यानंतर पांच वर्षांनीं या कादंबरीच्या प्रकाशनाचा वृत्तान्त शरद्बाबूंना समजला. खुद्द शरद्-बाबूंनाहि आपल्या सामर्थ्याची असावी तेवढी जाणीव नव्हती. या बाबतींत श्री. सौरीन्द्रमोहन यानीं लिहिलें आहे—

"पूजा अर्थात् दशहराच्या समयास अकस्मात् शरच्चंद्र कलकत्त्यास आले आणि म्हणाले, 'मला जरा 'बडी दिदी' वाचावयास दे पाहूं.' तो दिवस कालीपूजेचा होता. दुपारचे दोन वाजले होते. आमच्या घराबाहेरच्या खोलींत मी, उपेन्द्रनाथ व शरद्बाबू असे बसलों होतों. 'भारती'च्या बांधलेल्या पुस्तकांतून मी 'बडी दिदी' कथा वाचूं लागलों. शरच्चद्र आडवे होऊन ऐकत होते. मधून मधून ते उठून बसत. माझा हात दाबून म्हणत, 'थांबा जरा.' त्यांच्या डोळ्यांत अश्रु जमा झालेले दिसले; गळा सद्गदित होऊन गेलेला दिसला. विस्मयचकित दृष्टीनें शरद्बाबूंनीं मला विचारलें,

'काय? माझीच रचना आहे ही? मीं लिहिलें आहे हें?'

त्यांचा त्यांच्यावरच विश्वास नव्हता. लागलीच आम्हीं त्यांना बजावलें, 'लिहिण्याचें सोडून देऊन फार मोठा अपराध केला आहे तुम्हीं. जरा समजावून तर घ्या.' यानंतर बराच वेळ शरच्चद्र उदासीन होऊन स्वस्थ बसले होते. ते थोड्या वेळानें बोलले, 'अच्छा,

लिहीत राहीन. लिहिणें सोडून देऊन मीं बरें केलें नाहीं. फारच चांगली रचना आहे. माझें अंतःकरण भरून आलें आहे. '... थोडें थांबून त्यांनी उद्‌गार काढले, ' शंभर रुपये मिळनात . ..शरीर पण ठीक नाहीं. ... '

मीं लागलीच सांगितलें, ' सर्व सोडून तुम्ही या इकडे निघून. महिना शंभर रुपये देण्याची व्यवस्था आम्ही करूं. ' शरद्‌बाबू म्हणाले, पाहू. तीन महिन्यांनंतरच्या दौऱ्यांत यमुना मासिकाच्या संपादकांनीं—श्री. फणीन्द्रनाथ पाल यानीं—'यमुना' मासिकासाठीं लिहिण्याचा आग्रह केला. शरद्‌बाबूंनींहि लिहिण्याचें मनावर घेतलें. ' हरिचरण ' बाल्यस्मृति ' आणि ' काशिनाथ ' या कथा आधींच प्रसिद्ध झालेल्या होत्या. यमुना मासिकांत यानंतर त्यांची रामेर सुमति ' ही कथा प्रसिद्ध झाली. या मासिकाचे ग्राहक फार तर पन्नास-साठच होते, पण शरच्चंद्रांची कथा प्रसिद्ध झाली आणि ग्राहकांची संख्याहि पाचशेंपर्यंत एकदम वाढली. ' पथनिर्देश ' आणि ' बिंदूर छेले ', या कथा प्रसिद्ध झाल्यानंतर यमुना ' मासिकाचें साहित्यिक वैभव वाढलें.

याच वेळीं बंगाली भाषेंतील प्रसिद्ध नाटककार श्री. द्विजेन्द्रलाल राय 'भारतवर्ष' नांवाचें मासिक काढीत असत. त्यांच्याशींहि शरद्‌बाबूंचें संधान जुळलें. ' यमुना ' मासिकाचा दर्जा वाढावा म्हणून शरद्‌बाबू स्वतःहि कष्ट घेत असत. शरद्‌बाबूंच्या ' परिणीता ' ' चंद्रनाथ ', ' चरित्रहीन ' या कथा ' यमुना ' मासिकांतूनच प्रसिद्ध झाल्या. रंगूनला शरच्चंद्रांची प्रकृति बिघडत राहिली. ब्रह्मदेश सोडून देण्याचा सल्ला डॉक्टरांनीं त्यांना दिलेला होता. स्वतःच्या कर्तृत्वाचा अंदाज शरच्चंद्रांना चांगलाच आलेला होता. सुप्रसिद्ध प्रकाशक श्री. हरिदास चट्टोपाध्याय यांनीं दरमहा शंभर रुपये मिळवून देण्याची जबाबदारी स्वीकारल्यावर शरद्‌बाबूंनीं रंगून सोडलें. तेरा-चौदा वर्षांचा अज्ञातवास या प्रकारें समाप्त

झाला. पोटासाठीं म्हणून शरच्चंद्र ब्रह्मदेशात गेले व तेथून पर्वताएवढी कथासामग्री घेऊन परत हिंदुस्थानांत आले. बाजे शिवपूर येथें एक छोटें घर भाड्यानें घेऊन ते आपले बंधु प्रकाशचंद्र याना घेऊन राहूं लागले. त्यांचे आणखी एक भाऊ प्रभासचद्र यानीं संन्यास घेतल्याचें मागें आलेंच आहे. वृन्दावन येथील रामकृष्ण आश्रमात ते सेवाकार्यांत निमग्न झालेले होते. तरी कलकत्त्यास आल्यावर मात्र ते शरद्‌बाबूंच्या घरींच मुक्काम करीत. कधीं कधीं त्यांची थोरली बहीण अनिलादेवीहि आपल्या पतीसह येऊन शरचंद्रांबरोबर राहत असे.

शरद्‌बाबू कलकत्त्यास राहूं लागल्यानंतर त्यांचें खरें साहित्यिक जीवन सुरू झालें; त्याचें वर्णन स्वतंत्रपणें पुढें करण्यात येईलच ब्रह्मदेशचें वास्तव्य शरद्‌बाबूंनीं कसें संपविलें हें आपण पाहिलेंच. जीवनातील विविध अनुभवाचा संग्रह शरचंद्रानीं पहिल्यापासूनच केला होता ब्रह्मदेशच्या बारा-तेरा वर्षांच्या अवधींत त्यांच्या या अनुभव-संपत्तींत कितीतरी भर पडली असेल. कधीं प्रत्यक्षपणें विरागी होऊन तर कधीं वैराग्यवृत्ति धारण करून शरद्‌बाबूंनीं जें समाजनिरीक्षण केलें, त्याचे पडसाद त्यांच्या कथा-साहित्यात उमटलेले दिसून येतात पण एक तपावरच्या त्यांच्या या ब्रह्मदेशांतील वास्तव्यासंबंधीं तपशीलवार माहिती मिळाली तर किती उपकारक होईल! अनेक रहस्यमय प्रश्नांचीं उत्तरें मिळतील व शरद्‌बाबूंच्या जीवनावर नवा प्रकाश पडेल. पण जेथें सारेंच आयुष्य अजून अज्ञाताच्या गुहेंत असल्यासारखें आहे, तेथें त्यांच्या या परदेशांतील वास्तव्याची काय कथा? त्यांच्या कादबऱ्यावरून कांहीं अंदाज लावण्यासारखा आहे. पण ती माहिती चरित्राच्या दृष्टीनें विश्वसनीय अशी नाहीं. ' श्रीकांत ' ही कादंबरी, लोक समजतात त्याप्रमाणें, आपलें आत्मचरित्र नाहीं, असें ते वारंवार म्हणत असत. तेव्हा ब्रह्मदेशात असतांना शरद्‌बाबूंच्या मनाचें चलनवलन कसें चाललें होतें, कोणत्या व्यापांत ते असत, साहित्यसेवा कशी करीत, इत्यादि गोष्टीं-

संबधीं माहिती पाहिजे असेल तर ती प्राप्त करून घेण्याचें एकमेव साधन म्हणजे त्यांचा पत्रव्यवहार. रंगूनहून आपल्या मित्राना त्यांनीं जीं पत्रें लिहिलीं आहेत, त्यांवरून ब्रह्मदेशातील त्याच्या वास्तव्यासंबंधीं कांहीं माहिती मिळण्यासारखी आहे. या ठिकाणीं त्याच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणाऱ्या काहीं पत्रांचा उल्लेख करावयास पाहिजे.

शरद्बाबूंना आपल्या लेखनसामर्थ्याची यथार्थ जाणीव होती. प्रमथनाथ भट्टाचार्य नावाच्या आपल्या एका मित्रास ते ४ एप्रिल १९१३ रोजीं रंगूनहून लिहितात, ' माफ करशील तर लिहितों. माझ्यापेक्षां चागली कथा किंवा कादंबरी एक रविबाबू सोडून कोणीहि लिहूं शकणार नाहीं. " २४ मेच्या आणखी एका पत्रात ते लिहितात, ' मी माझ्या नावाबद्दल कधींच विचार करीत नाहीं. लोकाना जसें वाटेल तसें ते माझ्यासंबंधीं विचार करतील. जाऊं दे या गोष्टी...काळच माझा विचार करील. मनुष्य सुविचार-अविचार दोन्ही करील, पण त्याबद्दल चिन्ता करणें चूक आहे...मी केवळ पद्य लिहूं शकणार नाहीं, बाकी सर्व काहीं लिहीन. संपादकांकडून स्वतःच्या लेखांची परीक्षा करून घेणेंहि मला शक्य होणार नाहीं. ही मला असाध्य गोष्ट आहे. हा, रविबाबूखेरीज. " दिवसेंदिवस शरद्बाबूंची प्रकृति रंगून येथें बिघडत चालली फणींद्रनाथ पाल यांना ( ' यमुना ' मासिकाचे संपादक ) एका पत्रात ते लिहितात, " या वेळीं अंगात ज्वर १०२·५ आहे. येथील रंगूनच्या हवेचाच असेल असें नाहीं. कदाचित् माझ्या ज्वराचें कारण माझ्या हृदयविकाराचें असेल. या देशचें हवापाणी एकंदरींत बरें आहे पण मला मानवत नाहींसें दिसतें .." हरिदास चट्टोपाध्याय याना एका पत्रांत लिहिलें आहे, " येथें माझी फार कठीण अवस्था होत आहे. प्रकृति खराब झाली आहे. असें ऐकतों कीं, हो ब्रह्मदेशाची बिमारी आहे. देश सोडला नाहीं तर बरी होणें कठीण...मी काहींच जाणूं शकत नाहीं. एका परमेश्वरालाच काय तें ठाऊक ! भीति वाटतें कीं, सबंध आयुष्यभर असाच

पंगु होऊन राहीन कीं काय ! मानसिक चंचलतेमुळें कोणतेंहि काम करावेंसें वाटत नाहीं...कदाचित् असेंहि असेल कीं, पंगु होण्याचा हा परमेश्वराचा एक आशीर्वादहि असूं शकेल. स्थिर चित्तानें तो ग्रहण केला पाहिजे. माझ्या या काठीसारख्या शरिरात या प्रकारचें दुखणें निर्माण होईल असें वाटलें नव्हतें....लहानपणीं परमेश्वरावर फार श्रद्धा होती. मध्यंतरीं मात्र त्याला पूर्णपणें विसरून गेलों. पण आतां अंतिम काळात जर तो दर्शन देणार असेल तर फार चांगली गोष्ट आहे." (२२-२-१९१६)

पुढल्याच महिन्यातील एका पत्रात पुनः शरच्चंद्र लिहितात, "मी पीडित आहें. येथें सुधारण्याची आशा नाही. शरीर व अवयव अशा-प्रमाणें पंगु करून जगदीश्वरानें मला ही शिक्षा दिली आहे, ती ठीकच आहे. मधून मधून असें वाटतें की, माझ्या हिंडण्याफिरण्याची इतिश्री झाली आहेच, तर केवळ आता हातानींच काम करण्याचा संदेश असावा." परदेशांत या पोरक्या प्राण्याची कोण काळजी वाहणार ? कोण चिंता करणार ? भटक्या जीवनाचा कंटाळा आला होता, पण दोन हात पसरून उदार अंतःकरणानें कवटाळून घेण्यास कोण तयार होतें ? तेव्हां कोणीं दुरून पत्रानें जरी चौकशी केली तरी शरद्‌बाबूंना धन्यता वाटे. फणीन्द्राच्या आईनें शरद्‌बाबूंची एकदा चौकशी केली, हें वृत्त कळताच शरद्‌बाबूंना गहिंवरून आलें. पत्राचें उत्तर लिहि-ताना अतिशय करुणापूर्ण वाणीनें त्यानीं लिहिलें, "प्रियवर, आपल्या मातुश्रीनें माझी विचारपूस केली ही माझी मोठी सौभाग्यवर्धक गोष्ट आहे. त्याना सांगा कीं, मी खुशाल आहें. या जगतांत माझ्यासंबंधीं ममतेनें चौकशी करणारें एक प्रकारें कोणीहि नाहीं. यासाठीं कोणी माझ्याबद्दल काहीं बरेंवाईट समजण्याची इच्छा करीत असेल तर तें ऐकून हृदय कृतज्ञतेनें भरून येतें. माझ्यासारखा हतभागी या जगतांत कोणीहि नसेल. ...... उपकार करीत आहें, यश, मान, स्वार्थत्याग

करीत आहें, इत्यादि मोठमोठे भाव माझ्या मनांत कधींच येत नाहीत, कधींहि नव्हते, आजहि नाहींत. यशाचा भुकेला असतों तर कदाचित् पूर्वीच खटपट केली असती. इतके दिवस चुप राहिलोंच नसतों..." (१४-९-१९१३).

खरोखरीच शरद्बाबू हतभागी होते? घरचें सुख बाळपणीं त्याना कितपत लाभलें हें आपण पाहिलें. पण त्यानीं कधींच स्वतःचें 'घर' केलें नाहीं का? ब्रह्मदेशचा अज्ञातवास संपवून ते पुन: कलकत्त्यास राहू लागल्याचें आपण पाहिलें पण एवढ्या अवधींत त्याना प्रपंच करावासा वाटला नाहीं? आपल्या धर्मांत गृहस्थाची व्याख्या फार व्यापक अशी आहे. नुसतें घरात राहून जीवन घालविणारा तो गृहस्थ, असा अर्थ आपल्याकडे कधींच कोणीं स्वीकारलेला नाही बायकामुलांचा जो धनी आहे, मग तो झाडाखालीं राहत असला तरी, त्यास गृहस्थ म्हणावें अशी आपली परंपरा आहे. या दृष्टीनें शरद्बाबू कधीं 'गृहस्थ' बनले होते का? कलकत्ता वा रंगून येथील त्यांच्या वास्तव्यात त्यांची खरी जपणूक करणारी पत्नी त्याना कधीं होती काय? त्यांचें कौटुंबिक आयुष्य कसें होतें? — या सर्व प्रश्नाचीं उत्तरें देणें मोठें कठीण आहे. शरदबाबू एकप्रकारें वैराग्याचें जीवन ब्रह्मदेशात जगत होते, हें आपण पाहिलेंच. भटक्या वृत्तीनें राहणाऱ्या या भिक्षूच्या जीवनात कधीं प्रापंचिक ओलावा निर्माण झाला होता काय? पायीं वणवण करून राहणाऱ्या ब्रह्मदेशच्या या विरागी माणसास कधी विवाह करण्याची इच्छा झाली काय?— पुढल्या प्रकरणात शरद्बाबूंच्या आयुष्यातील या रोमांचकारी, अद्भुत व रहस्यमय भागाचा विचार करूं.

• • •

# शरच्चंद्रांचें प्रापंचिक जीवन : ४

शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचें जीवन अगदीं आधुनिक काळातील असलें तरी त्यातील रहस्यमयता मात्र प्राचीन कवींच्या जीवनाप्रमाणें आहे. त्यांच्या जीवनांतील अनेक रहस्यमय प्रश्नांचा नीटसा उलगडा अजूनहि झालेला नाहीं. स्वतः शरद्बाबू कित्येक प्रसंगीं आपल्या मित्रमंडळींशींहि मुग्ध राहत असत. ब्रह्मदेशातील एक तपावरील त्याचें जीवन अज्ञात आहे, त्याचप्रमाणें त्याचें प्रारंभींचें जीवनहि तितकेंच अज्ञात व गूढरम्य असें आहे. मौजेची गोष्ट अशी कीं, खुद्द बंगाली भाषेंतहि शरद्बाबूंचें अजूनहि विश्वसनीय असें चरित्र उपलब्ध नाहीं. त्याच्या चरित्रांतील सर्वांत रोमांचकारी पण तितकाच गूढरम्य भाग म्हणजे त्याच्या प्रापंचिक जीवनाचा. शरद्बाबूंनीं लग्न केव्हा, कसें व कोणाबरोबर केलें, या गोष्टीचा निश्चितपणें उलगडा अजूनहि झालेला नाहीं. शरद्बाबूंच्या नावावर अनेक रसपूर्ण कथा त्याच्या विवाहांबद्दल निर्माण झालेल्या आहेत. त्यांनीं लग्नें एक, दोन कीं अनेक केलीं किंवा अजिबातच केलें नाहीं, याबद्दलहि एकवाक्यता नाहीं. शरद्बाबूंच्या चारित्र्याबद्दलहि शंका घेणारे त्यांच्या समकालीन लोक होतेच; पण त्याच्या हयातीनंतरहि या बाबतींत नाहीं नाहीं ते आरोप करणारे लोक आहेतच. शरच्चंद्राच्या कादंबरी-विश्वांत अनेक प्रकारच्या व अनेक दर्जाच्या स्त्रिया वाचकाना भेटतात. समाजाच्या विलक्षण रचनेमुळें वा विचित्र अशा गृहपरिस्थितीमुळें स्त्रियाना पापमार्गाकडे वळावें लागलें, तरी त्यांच्याकडे सहानुभूतीनें पाहावें, अशी शिकवण त्यांच्या कादंबऱ्यातून मिळते. नाना तऱ्हाच्या अडचणींत सापडलेल्या व विलक्षण परिस्थितींत दिवस कंठणाऱ्या स्त्रियाचीं अतिशय मनोरम चित्रें त्यानीं रंगविलीं आहेत. अन्नदा, राजलक्ष्मी, किरणमयी, सावित्री, माधवी, चंद्रमुखी इत्यादि विविध प्रकारच्या स्त्रिया शरच्चंद्राच्या कथाविश्वांत

वाचकांना भेटतात. तेव्हां या त्यांच्या मानसकन्यांवरून कोणताहि चरित्रविषयक निष्कर्ष काढणें धोक्याचें आहे. खुद्द त्यांच्या जीवनांत कोणकोणत्या स्त्रिया त्यांना भेटल्या, त्यांच्याशीं शरद्बाबूंनीं कोणत्या प्रकारची वागणूक ठेवली, विवाहधर्मानें बद्ध झालेल्या किती स्त्रिया होत्या, याबद्दल आज एकवाक्यता नाहीं.

अगदीं नुकतेंच म्हणजे १९५४ च्या नोव्हेंबर महिन्यांत 'भारतवर्ष' या मासिकांत श्री. गोपालचंद्र रॉय याची 'शरच्चद्राचे विवाह-प्रसंग' या नावाची एक लेखमाला सुरू झाली आहे. श्री. रॉय यांनीं शरद्-बाबूंच्या चरित्राचा अभ्यास फार बारकाईनें चालविलेला आहे. प्रारंभींच्या लेखातून त्यांनीं स्वतःचा एतत्संबंधीं निर्णय दिला नसला तरी आजवर तयार झालेले सर्व वृत्तान्त असत्य गोष्टींनीं भरलेले आहेत, असें मात्र त्यांनीं दर्शविलें आहे. नरेन्द्र देव, गिरीन्द्रनाथ सरकार, कन्हय्यालाल घोष इत्यादि शरद्-चरित्रकाराच्या मतांचा विस्तृत परामर्श श्री. रॉय यांनीं घेतला आहे व त्याच्या मतातील त्रुटित असणारा भागाहि दर्शविला आहे. पण खुद्द बंगालमध्येंच हा प्रश्न अनिर्णीत असल्या-कारणानें आपणांसहि येथें निश्चयानें असें यासंबंधीं कांहीं सांगतां यावयाचें नाहीं.

शरच्चंद्रांच्या विवाहासंबंधीं रूढ असणाऱ्या कल्पनांचा आढावा मात्र घेणें आवश्यक आहे. त्यात संपूर्ण सत्य जरी नसलें तरी संपूर्ण असत्यानें त्या भरलेल्या आहेत असेंहि नाहीं. शरद्बाबूंच्या विवाहप्रश्नावर लिहिणारे पहिले लेखक आपण विचारांत घेणार आहोंत. ते श्री. इलाचंद्र जोशी हे होत. हिन्दी भाषेंतील श्रेष्ठ उपन्यासकार (कादंबरीकार) म्हणून श्री. जोशी याचा लौकिक मोठा असून शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्याशीं अनेक वेळा गप्पागोष्टी करण्याची संधि याना प्राप्त झालेली होती. खुद्द शरद्-बाबूशीं त्यांनीं ज्या विषयांवर बातचीत केली त्यांवरच आधारून त्यांनीं काहीं आठवणी प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांपैकीं एक विस्तृत आठवण

शरद्बाबूंच्या विवाहासंबंधीं आहे. 'महापुरुषों की प्रेमकथाएँ' (लहर प्रकाशन, इलाहाबाद) या पुस्तकात 'शरच्चंद्राचें प्रेम-जीवन' नावाचा जवळजवळ तीस चाळीस पृष्ठांचा एक लेख आहे. श्री. इलाचंद्र जोशी यांचें 'शरच्चंद्र व्यक्ति आणि कला' (अशोक प्रेस, पटना, ६ एप्रिल १९५४) हें एक स्वतंत्र पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्यातहि हा लेख समाविष्ट करण्यात आलेला आहे. श्री. इलाचंद्र जोशी यांच्या या लेखात दोन कथा एकत्रित झालेल्या दिसतात. शरद्बाबू वयाच्या सतरा-अठराव्या वर्षी घरातून भटकण्यास जे बाहेर पडले ते जगन्नाथपुरीच्या रस्त्याला लागले. या ठिकाणीं त्यांच्या जीवनात आलेल्या एका अभागी स्त्रीची कथा मोठ्या मनोरंजक पद्धतीनें श्री. जोशी यांनी निवेदन केलेली आहे. श्री. जोशी यांचें व शरद्बाबूंचें अनेकवार बोलणें होत असल्यानें या निवेदनास अगदींच अर्थ नाहीं असें नाहीं.

पुरीच्या यात्रेस शरच्चंद्र निघाले, परंतु एकदोन मैल जातांच भूक व श्रम यांनीं हैराण होऊन ते एका झाडाखालीं अर्धवट बेशुद्ध अवस्थेंत पडले. याच सुमारास एक विधवा स्त्री पाणी आणण्यासाठीं त्याच रस्त्यानें चालली होती. शरच्चंद्राची शोचनीय अवस्था पाहून तिला दया आली व तिनें तशा भयंकर अवस्थेंत त्यांना मदत केली. ती त्यांना आपल्या घरीं घेऊन आली. ही स्त्री अभागिनी असून एकटीच होती. सासर-माहेरचें असें कोणीहि तिला सांभाळणारें नव्हतें. दूरचे दोन नातेवाईक मात्र मधून मधून येऊन तिच्यावर स्वामित्व दाखवीत, एकमेकांशीं भांडत व दारूच्या नशेंत लठ्ठालठ्ठी करून निघून जात. त्या युवतीनें शरच्चंद्राच्या स्नानाची व भोजनाची उत्कृष्ट प्रकारें व्यवस्था केली. दीर्घ परिश्रमानें शरद्बाबू याच घरीं तीन-चार दिवस तापानें आजारी झाले. या वेळींहि तिनें त्यांची चांगली सेवाशुश्रूषा केली. या दुर्भाग्य-वती स्त्रीची करुण कहाणी ऐकून शरच्चंद्र अतिशय दुःखी झाले. शक्य

असेल तेवढी मदत करण्याचें त्यांनीं ठरविलें. तिचे दोन नातेवाईक येऊन तिच्याबद्दल कसे एकमेकांत भांडतात हेंहि त्यांनीं एके दिवशीं पाहिलें. याहि संकटातून या दुःखी व क्षीण विधवा स्त्रीला सोडवणें हें शरच्चंद्रांना एक आपलें कर्तव्य वाटूं लागलें. तिच्या आग्रहामुळें व स्वतः त्यांना तिला मदत करण्याची इच्छा होती त्यामुळें त्यांनीं तिला आपल्याबरोबर पुरीच्या यात्रेला नेण्याचें ठरविलें. रस्त्यात एके ठिकाणीं तीं दोघें एका झाडाखालीं विश्रांति घेत असतांना हातांत लाठ्या घेऊन कांहीं लोक तेथें येऊन पोंचले. शरद्बाबूंना त्यांनीं घेरलें व थोडाफार माराहि दिला. तिचे ते दोन शराबी नातेवाईकच कांहीं लोकांना घेऊन या अभागिनीची 'मुक्तता' करण्यासाठीं आले होते. अशा प्रसंगीं शरद्बाबूंचें एकट्याचें काय चालणार? त्या नरपशूंच्या हातून त्या असहाय नारीला सोडवणें त्यांना अशक्य झाल्यामुळें ते अस्वस्थ झाले. पाहतां पाहतां त्या गुंडांनीं त्या दुर्दैवी स्त्रीला फरफटत ओढीत नेलें.

शरद्बाबूंच्या जीवनांत ही अशी पहिली अभागिनी स्त्री निकटत्वानें आली. स्वतःच्या अंगावरील वळ कांहीं दिवसांनीं नाहींसे झाले, पण त्यांच्या मनावर जो आघात झाला, त्यामुळें मात्र शरच्चंद्र विव्हळ होऊन गेले. भारतीय नारीच्या दुःखपूर्ण चरित्राचें जें एवढें सुंदर चित्र शरत्साहित्यांत दिसून येतें, त्याच्या बुडाशीं शरद्बाबूंच्या हृदयांतील अपार करुणा हीच होती. श्री. इलाचंद्र जोशी यांनीं ही कथा सांग तांना शरद्बाबू परकीय नारीशीं किती संयमानें वागत व त्यांच्या दुःखानें कसे विरघळून जात, याचें उत्कृष्ट विवेचन केलें आहे. स्त्रीच्या असहाय परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांनीं अनेक ठिकाणीं आपले प्रेमसंबंध स्थापित केले होते, या मताचा श्री. जोशी यांनीं अनेक ठिकाणीं इन्कार केलेला आहे. शरद्बाबूंनीं पतित वा पीडित स्त्रियांचें चरित्र निरखून पाहिलें हें खरें, पण त्यांच्याशीं त्यांचा आलेला संबंध मात्र शुद्ध व सात्त्विक स्वरूपाचा होता.

यानंतरच्या भागात श्री. इलाचंद्र जोशी यांनीं शरच्चंद्राच्या विवाहाबद्दलची अशीच रोमांचकारी कथा निवेदन केली आहे. ब्रह्मदेशात असतांना शरद्‌बाबू रंगून येथील एका हॉटेलमध्यें राहत असत. एके दिवशीं जेवणखाण करून शरच्चंद्र कचेरींत जाण्याच्या तयारींत असताना त्याना दाराशीं एक अठरा-एकोणीस वर्षांची मुलगी घाबरलेल्या स्थितींत दृष्टीस पडली. ही मुलगी त्याच्या माहितींतील होती, पण चटकन् ओळख पटेना. तिनें काहीं खूण सांगितल्यावर त्याच्या ध्यानात आलें कीं, कलकत्त्यास असताना सौरीन्द्रनाथ ठाकुर याच्या घरीं संगीताच्या बैठकीच्या वेळीं ही मुलगी अनेक वेळा येत असे. पण आज मात्र ती शरच्चंद्राच्या आश्रयास आली होती. कचेरीस जाण्यास उशीर होत असल्यामुळें त्यानीं तिला आपल्या खोलीची किल्ली दिली व घरात बसून राहण्यास सांगितलें. पण शरच्चंद्राचें लक्ष कचेरींतील कामात कोठून लागणार? तिचे ते शब्द त्याच्या कानात घुमत होते "मला वाचवा हो दादा! माझे वडील मला गुंडाच्या हातांत विकू पाहतात." शरद्‌बाबूंना कचेरींत चैन पडलें नाहीं. ते ताबडतोब घरीं आले. तों त्याच्या ध्यानांत आलें कीं, घराभोंवतीं कांहीं लोक जमलेच होते. ती मुलगी मात्र ओरडून सांगत होती: "आतां या प्रसंगात माझें होणार तरी काय? आठ वर्षांची असतानाच मी विधवा झालें. थोडी मोठी झाल्यानंतर माझ्या सासूनें मला एका माणसापाशीं विकून टाकलें. त्या माणसानें मला कलकत्त्यास आणलें. सौरीन्द्रनाथ ठाकुरांच्या घरीं त्यानें मला सोडून दिलें. त्यानंतर मी माझ्या निर्दय पित्याकडे आलें. त्यानें या ब्रह्मदेशात आल्यानंतर या मुसलमान गुंडाना मला विकण्याचा प्रयत्न चालविला आहे. सात दिवस मी त्यांच्या पहाऱ्यात होतें. एके दिवशीं त्याना चुकवून मी येथें रंगूनला आलें आहें. आतां मीं या प्रसंगात काय करावें? कोणी माझा बचाव करणारा आहे काय?" शरद्‌बाबूंना या दुर्दैवी स्त्रीची दया आली. त्यानीं व त्यांच्या मित्रानीं दोनशें रुपये जमा केले व ते

ग्रं. क्र. C ५५२४

तिच्या बापाच्या—निवारण चक्रवर्तीच्या—हातात दिले. आता पोरगी विकण्याचें काम त्याला नव्हतें. तोहि रुपये पाहून संतुष्ट झाला व निघून गेला. समाजांत या माणसारखे पिताजी असूं शकतात हें शरद्‌बाबूंच्या चित्तास एकदम पटेना. दुसऱ्या दिवशीं निवारण चक्रवर्तीचीहि धुंदी उतरली. पोरीला सांत्वनपर शब्द ऐकविण्यासाठीं तो परत शरच्चंद्रांच्या घरीं आला, " मी आता तुला निरोप देण्यासाठीं आलों आहें. तुला फार कष्ट दिले. आता यापुढें कोठेंहि सुखानें रहा. " डोळ्यातून अश्रु गाळून त्यानें शरच्चंद्रांना नमस्कार केला व तो निघून गेला. पण यानंतर या अनाथ पोरीला कोण सांभाळणार ? शरद्‌बाबूंनीं काहीं दिवस तिला आसरा दिला. तिचा सरळ, साधा व प्रेमळ स्वभाव शरच्चंद्रांना फार आवडला. याच स्त्रीला आपल्या जीवनांत कायमचें स्थान देण्याचा त्यांनीं निश्चय केला. एका अभागी स्त्रीच्या जीवनांत आपल्या सहवासानें नवचैतन्य निर्माण होत असेल, तर तेवढें धैर्य करावें असें शरच्चंद्रांनीं ठरविलें व एके दिवशीं त्यांनीं तिला आपला मनोदय कळविला. तिला प्रथम खरेंच वाटेना. एवढा उदार, एवढा स्नेहशील व एवढा थोर अंतःकरणाचा मनुष्य आपला स्वीकार करील, हेंच तिला खरें वाटेना. तेव्हा शरद्‌बाबूंनीं पुनः तिला समजावून सांगितलें, " नाहीं, तूं अभागिनी नाहींस. .. तूं तर लक्ष्मी आहेस. ... तूं सुवर्णमयी आहेस. आजपासून म्हणून मी आता तुला हिरण्मयी म्हणणार. हिरण्य म्हणजे सोनें—सोन्याप्रमाणें शुद्ध, पवित्र अशी तूं ... परिस्थितीच्या फेऱ्यातील अग्नीमुळें तुझ्यांतील सुवर्ण कसास पूर्णपणें उतरलें आहे. अस्सल, उज्ज्वल आणि चमकणारें सोनें म्हणजे तूं हिरण्मयी ! याच स्त्रीशीं शरच्चंद्रांनीं लग्न केलें. आणि त्यांच्या जीवनात ही खरोखरीच हिरण्मयी बनून गेली. या विवाहानंतरच शरद्‌बाबूंचें साहित्यिक व आर्थिक वैभव दिमाखानें वाढूं लागलें. ब्रह्मदेश सोडून हिरण्मयीच्या बरोबरच

शरद्‌बाबू कलकत्ता येथें आले व स्थायिक झाले. असें हें शरद्‌बाबूंच्या विवाहाचें श्री. इलाचंद्र जोशीकृत वर्तमान आहे.

श्री. मन्मथनाथ गुप्त या एका बंगाली विद्वान् लेखकानें 'शरच्चंद्र : एक अध्ययन' (किताब महल, अलाहाबाद, १९४६) नावाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. त्यातहि शरद्‌बाबूंच्या विवाहाची अशीच एक कथा दिलेली आहे. या कथेंत व वरील कथेंत साम्यविरोध मोठ्याच प्रमाणात असल्याकारणानें तीहि कथा संक्षेपानें देणें आवश्यक आहे.

शरच्चंद्र ज्या घरात राहत होते त्याच्याखालच्या मजल्यावर एक बंगाली मिस्त्री राहत होता. जातीनें ब्राह्मण असणारा हा मिस्त्री आपल्या-भोंवतीं अनेक लफंगे गोळा करून व्यसनांत रममाण होऊन राही. रात्रभर गांजा, शराब इत्यादींच्या अमलात येऊन ही मंडळी धिंगाणा घालीत. मिस्त्रीला एक विवाहास योग्य झालेली मुलगी होती. तिला या सर्वांच्या पुढें अत्यंत घृणास्पद पद्धतीनें वावरावें लागे. बापाकडून अनेक प्रकारचा होणारा छळ सोसता सोसता ती बिचारी खंगून गेली होती. शरच्चंद्र एके दिवशीं ऑफिसमधून जेव्हा रात्रींच्या वेळी घरीं आले तेव्हा त्यांना आढळून आलें कीं, खोलीचें दार आतून बंद! दरवाजा खटखटा हलवून त्यांनीं दार उघडलें तों घाबरून उठलेली, सुकून गेलेली व रडत असलेली शराबी मिस्त्रीची पोरगी! शरद्‌बाबूंनीं तिची स्नेहपूर्वक चौकशी केली. तिनें सांगितलें कीं, कांहीं पैसे मिळविण्याच्या उद्देशानें आपला बाप कोणा घोषाल बढऊ नावाच्या दारुड्याबरोबर आपलें लग्न ठरवीत आहे. आज तो दुष्ट घोषाल तिला त्रास देण्यास सिद्ध झाला होता. तेव्हा रक्षणासाठीं म्हणून तिनें शरद्‌बाबूंच्या खोलीचा आश्रय घेतला. आपली सर्व दु:खद कथा सांगून तिनें शरच्चंद्रांच्या पायावर 'मला वांचवा' म्हणून लोटांगण घातलें. शरद्‌बाबूंना तिच्या अनुकंपनीय अवस्थेबद्दल फारच खेद झाला. तिच्या रक्षणाचा भार त्यांनीं शिरावर घेतला.

दुसऱ्या दिवशीं शरच्चंद्र त्या पोरीच्या बापास समजावून सांगूं लागले, तों बाप उद्गारला, "तुला एवढी चिंता वाटते तर कर ना हिच्याशीं लग्न!" आणि शरद्‌बाबूंनीं हें आव्हान स्वीकारलें. त्या दुर्दैवी स्त्रीची संकटातून कायमची मुक्तता करण्यासाठीं त्यांनीं तिच्याशीं लग्न केलें. या विवाहापासून त्यांना सुख लाभलें. शरद्‌बाबूंना एक मुलगाहि झाला. पण पुढल्याच वर्षी रंगूनला जी प्लेगची साथ आली त्यांत ही स्त्री व तो मुलगा अशीं दोघेंहि मृत्युमुखीं पडलीं. शरद्‌बाबू पुनः पहिल्यासारखे एकाकी झाले. यानंतर शरच्चंद्रांनीं आणखी एका हिरण्मयी नांवाच्या गरीब ब्राह्मणकन्येशीं लग्न केलें. हा विवाह बंगालमध्यें झालेला होता.

श्री. इलाचंद्र जोशी व श्री. मन्मथनाथ गुप्त यांच्या निवेदनातील साम्यविरोध आतां स्पष्ट झाला असेल. शराबी पित्याच्या छळांतून एका मुलीस मुक्त करण्यासाठीं शरद्‌बाबूंनीं लग्न केलें, ही गोष्ट दोघांनाहि थोड्याफार प्रमाणात मान्य दिसते. पण शराबी पित्याची हीच मुलगी हिरण्मयी हें मात्र निश्चित झालेलें नाहीं. श्री. मन्मथनाथ गुप्त यांच्या मतें शराबी पित्याची मुलगी प्लेगमध्यें आपल्या मुलासहित स्वर्गवासी झाली व दुसरी एका बंगाली ब्राह्मणाची मुलगी शरद्‌बाबूंची नंतर पत्नी झाली ती हिरण्मयी. याउलट श्री. इलाचंद्र जोशी यांच्या मतें शराबी पित्याची मुलगीच हिरण्मयी, हीच शरच्चंद्राबरोबर कलकत्त्यास येऊन स्थायिक झाली.

शरच्चंद्राएवढ्या प्रसिद्ध कलावंताच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रश्नावर होत असलेली चर्चा अजून पूर्ण झालेली नाहीं. मागें उल्लेखिलेले श्री. गोपालचंद्र रॉय यांनीं या प्रश्नाचा अभ्यासपूर्वक निर्णय लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तो पूर्ण होईपर्यंत यासंबंधीं निश्चित असा कोणताहि निवाडा देता येण्यासारखा नाहीं. एवढें मात्र खरें कीं, शरच्चंद्र यांची स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टि अतिशय शुद्ध, उदार व विस्तृत सहानुभूतीची होती. बंगालमधील स्त्रियांची त्यांच्यावर विशेष प्रकारची श्रद्धा होती.

शरद्‌बाबूबद्दल आणखी गैरसमजूत पसरविणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या व्यसनासंबंधीं. शरद्‌बाबूंच्या कथा-साहित्यात अनेक नायक शराबी आहेत. तेव्हा शरच्चंद्रहि अट्टल दारूबाज असावेत असा सर्वांचा तर्क. शरद्‌बाबू हुक्का पीत असत, अफू किंवा गांजा यांचेंहि व्यसन त्यांना होतें. परतु बालपणींच्या भटकेगिरींत व ब्रह्मदेशातील वैराण जीवनात त्यांना दारूचेंहि व्यसन लागलें होतें, ही गोष्ट सत्य आहे. शरत्साहित्यातील अट्टल दारूबाज म्हणजे देवदास. तेव्हां टीकाकारांना वाटतें, शरद्‌बाबूहि देवदासप्रमाणें अट्टल दारुडे होते. पण याहि मताचा परामर्श येथें घ्यावयास पाहिजे. श्री. इलाचंद्र जोशी यानींहि यासंबधीं शरद्‌बाबूंना प्रश्न विचारला होता. त्यास उत्तर देतांना ते बोलले, “होय, कित्येक वेळा मीं दारू घेतली आहे.” “देवदास ज्याप्रमाणें दारूत बुडून गेला होता त्याप्रमाणें?” या प्रश्नास उत्तर देताना शरच्चंद्र म्हणाले, “छोट्या चुका मीं माझ्या जीवनांत पुष्कळशा केल्या आहेत, पण मूर्खतेची सीमा मात्र मीं कधींहि गांठली नाहीं. दारू नशेसाठीं मीं कधींच घेतली नाहीं. औषध म्हणून मी बऱ्याच वेळां दारू पीत असें... पण त्यापासून कधीं कोणाला त्रास झाल्याचेंहि मला आठवत नाहीं... लेखनस्फूर्तीसहि दारू आवश्यक आहे असेंहि मला वाटत नाहीं.” शरद्‌बाबूंच्या या व्यसनासंबंधीं आणखी काहीं विचार करणें अगत्याचें आहे. कारण याहि बाबतींत अनेक अद्‌भुत कथा शरद्‌बाबूंच्याभोंवतीं निर्माण झालेल्या आहेत.

शरद्‌बाबू कोणत्याहि व्यसनाच्या आहारीं गेले नव्हते ही एक फार महत्त्वाची गोष्ट ध्यानात घ्यावयास पाहिजे. त्यांची माणुसकी व विवेकबुद्धि सदैव जागृत असे. यासंबंधीं त्यांच्या एका मित्राची साक्ष देणें आवश्यक वाटतें. श्री. हरिदास शास्त्री हे शरद्‌बाबूंचे जवळचे मित्र. त्यांच्याजवळ एकदां शरद्‌बाबूंनीं आपणास दारूचें व्यसन कसें लागलें व आपण तें कसें सोडलें, यासंबंधीं निवेदन केलें होतें. शरच्चंद्रांचा दृढनिश्चय, त्यांची शीलसंपन्नता व त्यांचा उदार स्वभाव याची ओळख पटावी म्हणून ती आठवण संक्षेपानें येथें देण्यात येत आहे.

९८६४८ २४/८/५५

श्री. हरिदास शास्त्रींना शरद्बाबू म्हणतात, "एक काळ असा होता कीं, रात्र असो वा दिवस असो मी कधींच शुद्धीवर नसें — नेहमीं दारू पिऊन झिंगलेला. पण झिंगलेल्या स्थितींतहि मी कधीं कोणा स्त्रीची अमर्यादा केली नाहीं, हें मी छातीठोकपणें सांगतों... मी, चतर्जी व आणखी एक ब्राह्मी मित्र असे आम्ही एकत्र दारू पीत असू. आमच्या या ब्राह्मी मित्रास अचानकपणें हृदयाचा विकार जडला. त्यानें आपल्या आजारावर औषधपाणी चालू केलें. एके दिवशीं दारूचा नाद घेत चतर्जी माझ्याकडे आला व त्या ब्राह्मी माणसाकडे दारूसाठीं चलण्याचा आग्रह धरू लागला. नाइलाजानें मी त्याच्याबरोबर ब्राह्मी मित्राकडे गेलों. त्याच्या बायकोस हें आमचें येणें पसंत पडलें नाहीं. पण तिकडे दुर्लक्ष करून एका वेताच्या टेबलाभोंवतीं बसून आम्ही दारू पिऊं लागलों. बिचारी ती स्त्री हताश बुद्धीनें आमच्या लीलाकडे पाहत होती. दिवसभरच्या कामामुळें ती थकून गेली असल्यामुळें ती तशीच पेंगतां पेंगतां झोपीं गेली. ही संधि साधून चतर्जीच्या आग्रहानें त्या ब्राह्मी मित्रानें अमर्याद दारू घशात ओतली, आणि शेवटीं ऑ ऑ करून खुर्चीवरून तो खालीं कोसळला. त्याची बायकोमुलें जागीं झालीं व त्याच्या छातीवर पडून त्यानीं जो आक्रान्त सुरू केला तो ऐकताच आमची नशा खाडकन् उतरली. .. त्याच धुदींत त्या ब्राह्मी गृहस्थाचें निधन झालें. त्या दिवशीं माझ्या मनावर मोठाच परिणाम झाला. त्याच क्षणीं मीं दारूला न शिवण्याची प्रतिज्ञा केली. ... हरिदास, तूंच सांग, एक सद्गृहस्थ बायकोमुलांसह सुखानें झोपलेला, रात्रीं एक वाजतां आम्ही त्याचे दोन दारुडे मित्र त्याच्या घरीं गेलों, त्याला झोपेंतून उठवलें, दारूचा आग्रह केला आणि ती पिऊन तो मरून गेला !— या घटनेनेंहि दारुड्याला विवेक सुचणार नाहीं तर सुचणार तरी कशानें ?"

याप्रमाणें शरद्बाबूंचें दारूचें व्यसन सुटलें. दारूच्या नशेंतसुद्धां त्यांना केव्हांहि अविवेकाचा झटका आलेला नाहीं. त्यांचें वर्तन अत्यंत

संयमी अशा प्रकारचें होतें. हरिदास शास्त्री यानीं याच बाबतींत विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर देतांना शरद्बाबू म्हणतात, " हें पहा हरिदास, लोकाची समजूत खरोखरच खोटी आहे. म्हणजे स्त्रीजातीसंबंधीं माझें चरित्र केव्हाच उच्छृंखल नव्हतें, आजहि नाहीं. कळसाला पोंचेपर्यंत नशा केली आहे, अनेक अस्थानीं-कुस्थानीं गेलेलों आहें. पण त्या सर्वांना माझ्याबद्दल आदरच वाटेल याची त्या त्या ठिकाणीं जाऊन तुला खात्री करून घेता येईल त्याच्यापैकीं कुणी मला दादा ठाकूर ( थोर दादा ) म्हणत, तर कुणी बाबा ठाकूर म्हणत. कारण अत्यंत झिंगलेल्या अवस्थेंतहि त्याच्या देहाबद्दल मला कधींच लालसा वाटली नाहीं. मी अत्यंत संयमी, साधु, नीतिवान् आहें, हें मात्र त्याचें कारण नाहीं, तर स्त्रीशरीराची लालसा माझ्या अभिरुचीस कधींच शिवली नाहीं. ज्यावर प्रेम करता आलें नाहीं त्याचा उपभोग घेण्याची इच्छाच मनात उद्‌भवली नाहीं.--"

येणेंप्रमाणें स्त्री-जातीबद्दल शरद्बाबूंच्या मनात नेहमीं उदारतेची भावना असे. शरद्बाबू काहीं परिस्थितींत व्यसनात गुरफटलेले असले तरी त्यांच्या आचारावर त्यांचें हुकमी नियंत्रण होतें. त्यामुळें कोणत्याहि प्रकारचा अविवेक वा अत्याचार त्यांच्या हातून घडला नाहीं. आपल्या या वर्तनाबद्दल शरद्बाबूंना जाणीवपूर्वक अभिमान होता. लीलाराणी गंगोपाध्याय या आपल्या शिष्येला लिहिलेल्या एका पत्रात शरद्बाबू लिहितात--

" माझा परिचय हवा आहे ना ? राजलक्ष्मी कोण ? कोणी नाहीं ! श्रीकांत ? पुनः एकवार वाचून पहा. कदाचित् त्याच्याबद्दल घृणाच वाटेल ! पण सारी कल्पना. . सारेंच कल्पनेंतील. अजिबात मिथ्या ! शिवाय माझ्यापाशीं विद्याबिद्या काहीं नाहीं. अगदीं दरिद्री होतों-- २० रुपड्यांसाठीं परीक्षा देतां आली नाहीं. असेहि दिवस गेले आहेत कीं, जेव्हां ईश्वराला म्हणे, ' हे ईश्वरा, मला काहीं दिवस ताप येईल

असें कर. तो आला म्हणजे दोन वेळ खायची चिंता वहावी लागणार नाहीं. उपास करूनच दिवस जातील. अशी अवस्था फार दिवस नव्हती हें खरें.... आई वारल्यानतर बाबा वेड्यासारखे झाले आणि होतें-नव्हतें तें फुंकून नाहींसें करून कैलासवासी झाले ... त्यानंतर शिकायला सुरुवात केली १४ वर्षें चौदा-चौदा तास अभ्यास केला. परीक्षा देतां आली नाहीं ती याच रागामुळें... ब्रह्मदेशात रंगूनमध्यें कारकून होतों; एके दिवशीं वरिष्ठ साहेबाशीं मारामारी होऊन नोकरी सोडून दिली व हा लिहिण्याचा धंदा पत्करला. पण अकस्मात् असें नशीब उजाडलें कीं, रातोरात विख्यात पुरुष होऊन बसलों. अधून-मधून संन्याशाचा चेला होऊन दिवस घालवावयासहि कमी केलें नाहीं.... माझें हें जीवन अथपासून जणुं एक मस्त कादंबरी ! या कादंबरींत सारीं कामें केलीं, पण क्षुद्र कृत्य कधीं केलें नाहीं.... जेव्हा मरेन तेव्हा जीवनवही स्वच्छ ठेवूनच जाईन. त्यांत शाईचे काळे डाग एकाहि ठिकाणीं असावयाचे नाहींत." (दि. २४-८-१९१९)

शरद्बाबूंच्या घरगुती जीवनासंबधीं काहीं लिहिणें किती अवघड आहे, हें आता ध्यानात येण्यासारखें आहे. त्यांच्या प्रापंचिक जीवनाचें यथार्थ ज्ञान अजून अज्ञातातच आहे. शरद्बाबूंना मुलें नव्हतीं. घरगुती प्राणी पाळण्याचा मात्र त्याना विलक्षण छंद होता. होमिओपॅथी व बायोकेमिस्ट्री यासंबंधींचें त्याना विशेष ज्ञान असल्यामुळें ते इतराना औषधपाणीहि पुरवीत असत. किंमतवान् अशा गुळगुळीत कागदावर लिहिणें त्याना आवडत असे. लठ्ठ आणि लांबलचक अशा फाउंटन-पेननें ते लिहीत. त्याचें अक्षर अतिशय रेखीव व देखणें होतें. शरद्-बाबूंचा एक आवडता कुत्रा होता. त्याचें नांव त्यांनीं भेलू ठेवलें होतें. इलाचंद्र जोशी यानीं या भेलूसबधीं मनोरंजक आठवणी दिल्या आहेत. ते जेव्हा शरद्बाबूंना भेटावयास जात तेव्हां तेव्हां हा कुत्रा त्याच्या अंगावर ओरडे. त्या वेळीं शरच्चंद्र यांनीं आपलें भेलू-पुराण सुरू

केलें, " हा भेलू माझ्या फारच उपयोगी पडतो जे फालतू लोक विना-कारण येथें येऊन माझा वेळ घेतात त्याना तोंड देण्यासाठीं किंवा परस्पर घालविण्यासाठीं हा मला फार उपयोगी पडतो. कुत्रें ज्यानें पाळलें आहे त्यासच कुत्र्याच्या भुंकण्याचा अर्थ समजूं शकेल. भेलू तुमच्यावर रागवत नाहीं.. तुमच्याशीं केवळ खेळत होता. तुमच्या-सारख्या दुबळ्या, गोऱ्यागोमट्या, निरिच्छ नवयुवकावर तो का म्हणून रागवेल ? कुत्रा तर माणसास माणसापेक्षाहि अधिक ओळखतो. कुत्र्यांच्या मनाचें ज्ञान मला फार आहे. कारण कित्येक वर्षें मी त्याच्याच संगतींत वाढलों आहें, त्याच्यावर प्रेम केलें आहे, त्याचें प्रेम भोगलें आहे. कोणाच्याहि मनाचें रहस्य समजावून घेण्यास प्रेम हेंच एक साधन आहे. " शरद्बाबू ब्रह्मदेशातून आले तेव्हा भेलू लहान होता. पण त्यांच्या प्रेमळ छत्राखालींच तो मोठा झाला. या प्राण्यावर त्यानीं फार ममता केली. सन १९२५ मध्यें हा शहाणा व स्वामिभक्त कुत्रा मरण पावला, तेव्हा शरच्चंद्र अक्षरशः रडले. भेलूवाचून त्यांना अगदीं करमेना. समाचारास येणाऱ्या-जाणाऱ्याजवळ त्याच्या भेलूचें गुणकथा-वर्णन सुरू असे भेलूच्या मृत्यूनें त्याच्या हृदयास मोठीच इजा पोंचली होती. आपल्या एका संबंधित माणसाला पत्र लिहिताना शरद्बाबू लिहितात, " या जगात वस्तुनिष्ठ असें कांहीं नाहीं. जें काहीं आहे तें सर्व आत्मनिष्ठ आहे. नाहीं तर एका साध्या कुत्र्याच्या मरणानें माझ्या जीवनात एवढा बदल तरी का व्हावा ? राजा भरताची पौराणिक कथा खरी असल्याचा अनुभव मला आज येत आहे. एखाद्या छोट्या घटनेनें जगात एवढी मोठी इजा पोंचूं शकते, यावर आजपर्यंत माझा विश्वासच नव्हता. "

एकंदरींत कुत्र्याचें फारच वेड शरद्बाबूंना. रशियांत एक प्रसिद्ध शास्त्रज्ञ होऊन गेला. त्याचें नांव पॅव्हलॉव शरीरशास्त्रज्ञ व मानस-शास्त्रज्ञ म्हणून त्याचा मोठाच लौकिक आहे. त्यानें आपले प्रारंभींचे

प्रयोग कुत्र्यांवरच केले. त्याचें कुत्र्यावर पोटच्या पोराप्रमाणें प्रेम असे. त्यांच्या सुखदुःखाकडे तो जातीनें लक्ष देई. गावातील अनेक बेवारशी कुत्रीं त्यानें गोळा केलीं होतीं. स्वतःच्या रेशनमधील अन्न तो त्यांना देई. प्रयोगानंतर त्याच्या जखमा हळुवार हातानें तो धुऊन काढी. पॅव्हलॉव जातीचा शास्त्रज्ञ होता. त्यानें प्रयोग करून कांहीं शास्त्रीय सिद्धान्त तयार केले. पण शरद्बाबू प्राण्याचेहि मनोभाव चटकन् समजाऊन घेत असत. ब्रह्मदेशात असतांना बेवारशी कुत्र्याबरोबरच शरद्बाबू हिंडत. त्याना त्याचा फार लळा लागलेला असे. शरद्बाबूंपुढें किती तरी कुत्रीं कूं कूं करीत, शेपट्या हलवीत, त्यांच्या प्रेमाच्या हाताचा स्पर्श करून घेण्यासाठीं येत असत. कोणी कधीं कुत्र्याला मारूं लागला कीं शरद्बाबू त्याच्यावर संतापत व त्याच्यापुढें ते श्वानमाहात्म्यावर एक व्याख्यान देत. कलकत्त्यास असताना आपल्या ड्रायव्हरला ते सक्त हुकूम देत कीं, कुत्र्याना कोणतीहि इजा पोंचूं नये. देशात कुत्र्याची होत असलेली दुर्दशा पाहून त्यांना मनस्वी खेद होत असे. शरच्चंद्राच्या संग्रहीं याशिवाय कांहीं पक्षी, प्राणी, खारी यांचाहि साठा होता. हृदयानें अतिशय मृदु असणाऱ्या या माणसास प्राणिमात्रांबद्दल कमालीचें प्रेम वाटे. तेंच प्रेम मानवाबद्दल विस्तृत सहानुभूति होऊन वाङ्मयांत आविष्कृत होई.

शरद्बाबूंच्या पारिवारिक जीवनाचें स्वरूप हें असें आहे. कोणत्याहि थोर पुरुषाचें चरित्र त्याच्या श्रेष्ठ कृतीवरून समजतें, ही गोष्ट खरी असली तरी मोठीं माणसें आपल्या घरीं वागतात कशीं; पत्नीशीं, मुलाशीं, नोकरमाणसाशीं, मित्राशीं कोणत्या प्रकारें बोलतात, रागावतात, लोभावतात कशीं; त्यांच्या खाजगी स्वभावांतील विशेष गोष्टी कोणत्या; कोणत्या संबधी त्यांना होत्या वगैरे गोष्टींची जिज्ञासा सर्वसामान्य माणसास असतेच. आणि अशी जिज्ञासा असणें यांत गैर असें कांहीच नाहीं. याच बारकव्यासारख्या गोष्टींमधून माणसाच्या मोठमोठ्या कृत्यांवर

प्रकाश पडत असतो. शरच्चंद्रांच्या घरगुती जीवनावर आज तरी निश्चयानें असें कांहीं लिहिण्यासारखें नाहीं. एकदरींत रहस्यमय असणाऱ्या त्याच्या चरित्राचा रहस्यमय असा हा भाग आहे. नुकतीच कोठें त्यावर चर्चा सुरू झाली आहे. तिच्यांतून कांहीं निष्पन्न होईल अशा आशेवरच तूर्त लक्ष ठेवून राहणें उचित होणार आहे.

• • •

## शरच्चंद्रांची साहित्यसृष्टि : ५

कलकत्त्यास आल्यापासून शरच्चद्राची कीर्ति दिवसेंदिवस वाढतच राहिली. त्याच्या कथाकादंबऱ्यानीं सारा बंगाल वेडावून गेला. वास्तवतेचें एवढें यथार्थ चित्रण यापूर्वी कोणींहि केलें नव्हतें. सर्वसामान्य लोकांचीं सुखदु:खें एवढ्या तन्मयतेनें शरद्बाबूंनींच प्रथम रगविलीं होतीं. शरच्चंद्र चट्टोपाध्याय याच्या साहित्यक्षेत्राचा आढावा घेण्यापूर्वी बंगाली भाषेंतील कथापरपरा थोडक्यात समजावून घेतली तर उपकारक होणार आहे. शरच्चंद्रानीं नेमकें काय केलें, हें समजण्यास ही परंपरा उपयुक्त होईल. आधुनिक भारतीय साहित्यात कथा-वाङ्मयाचा प्रसार इंग्रजी साहित्याच्या परिचयानें अधिक झाला ही गोष्ट खरी असली तरी आपल्या देशातील कथा-परंपराहि फार उज्ज्वल अशी आहे.

ज्या वेळेस माणसास भाषा हें साधन विचार व्यक्त करण्यासाठीं सापडलें त्या वेळेपासून मनुष्य हा गोष्टीवेल्हाळ प्राणी म्हणून प्रसिद्धीस आला आहे. गोष्टी सांगणें आणि ऐकणें याची त्याला मनस्वी हौस आहे. आपल्या प्राचीन साहित्यात वेद, उपनिषदें, रामायण, महाभारत वगैरे ग्रंथातून कथा व उपकथा यांचाच विशेष भरणा आहे. एखादें अमूर्त तत्त्वज्ञान समजावून सागण्यास चरित्रकथेसारखें दुसरें साधन नाहीं.

कित्येक वेळा या कथा काल्पितांतून निर्माण झालेल्या असतात, तर कित्ये-काना थोडा ऐतिहासिक आधाराहि असतो. पंचतंत्र, हितोपदेश यासारखे संस्कृत ग्रंथ व बृहत्कथा यासारखे प्राकृत ग्रंथ कथासाहित्याचे नमुने म्हणून आताहि वाचण्यासारखे आहेत. याशिवाय नंतरच्या काळात बृहत्कथमंजरी, पुरुषपरीक्षा, भोजप्रबंध, वेताळपंचविशी, इत्यादि अद्‌भुत पण सुरस कथांचें लिखाण आपल्या देशात रूढ झालें. नीति व धर्मतत्त्व पटवून देऊन उपदेश करणें हाच अशा कथांचा एकमेव हेतु होता. प्राचीन कथावाङ्मयात पद्यास साहजिकच मोठें स्थान असे.

आधुनिक काळांत गद्याचा प्रसार होण्यास कारणीभूत झालेली परिस्थिति म्हणजे मुद्रणकलेचा शोध ही होय. छापण्याचीं यंत्रें निघाल्यामुळें पुस्तकें भराभर निघूं लागलीं. त्यामुळें मुखोद्‌गत करण्याची प्रवृत्ति संपत येऊन पाठान्तराचें महत्त्व कमी झालें. आणि पाठान्तराची आवश्यकता न उरल्यामुळें पद्याची मातब्बरीहि त्या प्रमाणात कमी झाली. सरळ ऐसपैस गद्यात माणसें लिहूं लागलीं. बाणाची कादंबरी आधुनिक गद्यातील कथा-वाङ्मयाची गंगोत्री म्हणावयास हरकत नाहीं. पण आपण वर पाहिलेंच आहे कीं, आधुनिक कालातील कथा आणि कादंबरी यांचें स्वरूप इंग्रजी कथा-साहित्यावरून ठरत गेलें आहे. गेल्या तीन-चार शतकांत इंग्रजी संस्कृतीशीं जो आपला परिचय दृढ होत राहिला त्यामुळें आपल्याहि कथासाहित्यास नवें रूप येऊं लागलें. कथासाहित्यातील वास्तवता म्हणजे जसें घडतें तसें लिहिण्याची प्रवृत्ति आणि पात्राच्या मनांतील विकाराचें चलनवलन मनोविज्ञानाच्या आधारानें वर्णन करण्याची पद्धति आपल्या कथासाहित्यात पाश्चात्याच्या सहवासानें निर्माण झालेली आहे. अतिरंजिताकडून वास्तवाकडे, अद्‌भुताकडून यथार्थाकडे आपण वळलों आहोंत, तें इंग्रजी साहित्याच्या परिचयामुळें.

असें सांगतात कीं, इंग्रजी संस्कृतीचा पहिला प्रभाव बंगाली वाङ्मयावर झाला. राजा राममोहन रॉय ( १७७२–१८३३ ) हे बंगाली भाषेचे

आद्य गद्यलेखक मानले जातात. पण त्याच्याहि पूर्वी रामवसु नावाच्या लेखकाचें 'प्रतापादित्य-चरित्र' बंगाली गद्यात सन १८०१ मध्यें प्रसिद्ध झालेलें होतें. त्यानंतर राममोहन रॉय याच्या गद्यलेखनास प्रारंभ झाला. त्यानीं कथासाहित्य जरी लिहिलेलें नाहीं तरी कथासाहित्य निर्माण होईल, अशा साहित्याची जोपासना मात्र केली. यानंतर पं ईश्वरचंद्र विद्यासागर (१८२०–१९०१) या समाजसुधारकानेंहि बंगाली गद्याच्या वाढीस चागलाच हातभार लावला. नाव घेण्यासारखा बंगाली भाषेंतील पहिला कथाकार म्हणजे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय (१८३८–१८९४) हे होत. यापूर्वी 'नवबाबू विलास' (१८२३), 'आलालेर घरेर दुलाल' (१८५७), 'हुतोम प्यॉंचार नक्शा' (१८६२) इत्यादि कथा निर्माण झाल्या होत्या; परंतु ना त्यांत चरित्रचित्रणाची मधुरता, ना वास्तवता. आधुनिक काळांत अखिल भारतीय कीर्ति संपादन करणारा पहिला भारतीय लेखक म्हणजे बंकिमचंद्र होत. मृणालिनी, दुर्गेशनंदिनी, चन्द्रशेखर, कपालकुंडला, आनंदमठ इत्यादि त्यांच्या कादंबऱ्या विशेष गाजल्या. स्वदेशाविषयींचा अभिमान त्याच्या कथासाहित्यात चागलाच प्रकट झालेला दिसतो. आपलें 'वंदे मातरम्' हें राष्ट्रगीत त्याच्याच 'आनंदमठ कादंबरींतून जन्मास आलें आहे. त्यांच्या सर्वच कादंबऱ्या ध्येयवादी असल्या तरी त्याची कलाकुसरहि कांहीं कमी प्रतीची नव्हती. यानंतरचे बंगाली भाषेचे प्रसिद्ध कथाकार म्हणजे विश्वकवि रवीन्द्रनाथ ठाकूर (१८६१–१९४१). रवीन्द्रनाथ नुसते कथाकारच नव्हते–कवि, नाटककार, समालोचक, अभिनेता, चित्रकार, संगीतकार, तत्त्वज्ञ इत्यादि विविध प्रकारें त्यांची प्रसिद्धि आहे. बंगाली भाषेस त्यानीं जें सौंदर्य प्राप्त करून दिलें त्याला दुसरी तोड नाहीं. 'चोखेर बालि', 'नौकाडुबी', 'गोरा' इत्यादि त्यांच्या प्रसिद्ध कादंबऱ्यानीं बंगाली भाषेंत एक नवीन युग निर्माण केलें. बंगाली भाषेचें कथावैभव यानंतरच्या काळात एवढें वाढलें

कीं, प्रारंभींच्या काळात हिंदी, मराठी, गुजराथी यासारख्या पूर्वपरंपरा-संपन्न अशा भाषांतहि बंगाली कथांच्या भाषांतराचा म्हणून त्या युगाचा एक विशेष बनून गेला. रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या अतुल प्रतिभेनें सारें विश्व धवळून निघालें होतें. नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर तर त्यांची तेजस्विता जगाच्या कानाकोपऱ्यातून पसरली गेली. याच प्रखर प्रकाशाच्या झगझगाटात बंगाली कथाप्रेमी दिपून गेले असतांनाच आणखी एक तारा या कथाविश्वात प्रकाशित झाला. पहिल्याच चमकेंत त्यानें सबंध बंगालला धक्का दिला. सर्व जण डोळे चोळीत जागे झाले. रवीन्द्राखेरीज हा कोण दुसरा, म्हणून सर्वांनीं आश्चर्यानें व कुतूहलानें माना वळविल्या तों त्यांना शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचें नाव दिसलें. आणि या नावानें बंगाली वाचकवर्ग पुन: एकदा मुग्ध होऊन गेला.

बंकिमचंद्र आणि रविबाबू यांच्या साहित्याचा प्रभाव शरच्चंद्रांच्या मनावर केवढा होता, हें आपण पाहिलेंच आहे. तरी पण शरद्‌बाबूंच्या कथासाहित्याचें वैशिष्ट्य कायमच राहिलें. पूर्वायुष्य सतत भटकण्यात गेल्यामुळें त्यांना समाजाच्या सर्व अवस्थांचा परिचय झालेला होता. संन्यस्त वृत्तीनें त्यांनीं दुःखितांचें, गरिबांचें, पीडितांचें, शोषितांचें जीवन पाहिलें होतें, भोगलें होतें. माणसाच्या हातून पापकर्म कां होतें, याचाहि सहानुभूतीनें त्यांनीं विचार केलेला होता. हृदय दयावंताचें व कलम कलावंताचें असा मधुर संगम त्यांच्यात असल्यामुळें त्यांच्या कथासाहित्यास एक वेगळीच चमक आली. रंगून सोडून शरच्चंद्र ज्या वेळीं कलकत्ता येथें येऊन स्थायिक झाले तेव्हांच त्यांच्या खऱ्या साहित्यिक जीवनास आरंभ झाला. यानंतर मात्र त्यांची भटकी वृत्ति स्थिरावली. त्यांची भ्रमंती थांबली. आर्थिक दृष्ट्या त्यांना सुस्थिति लाभली. शरच्चंद्रांचें महत्त्व अशासाठीं कीं, केवळ कथालेखनावर बंगला-मोटार खरेदी करणारा पहिला बंगाली लेखक म्हणजे शरच्चंद्र चट्टोपाध्याय. अर्थात् बंगला-मोटार असली कीं लेखक मोठा असा मुद्दा नाहीं. पण

शरच्चंद्रांच्या परिस्थितींत किती पालट पडत गेला व त्यांच्या यशाची कमान सदैव कशी चढतीच राहिली, हें दर्शविण्यासाठीं हा उल्लेख केला इतकेंच. त्यांची प्रतिभाशक्ति बहुप्रसवा होती. एकाच वेळीं अनेक मासिक पत्रांतून त्यांच्या वेगवेगळ्या कादंबऱ्या सुरू असत. 'बडी दिदी' प्रकाशित झाल्यानंतर शरच्चंद्र कांहीं दिवस स्थिर होते. पण पुढें मात्र 'पंडित मशाई' 'वैकुंठेर विल'; 'मेज दिदी'; 'दर्पचूर्ण', 'पल्लीसमाज' 'श्रीकांत' अरक्षणीया', 'निष्कृति', 'गृहदाह'; 'देना पाओना'; नवविधान', 'हरिलक्ष्मी' 'एकादशी बैरागी', विलासी', 'अभागीर स्वर्ग', 'अनुराधा', 'शेषप्रश्न' इत्यादि कथा व कादंबऱ्या एकामागून एक अशा प्रसिद्ध झाल्या. शरद्बाबूंच्या साहित्यिक वैभवाचा हा काळ होता 'श्रीकांत'; 'चरित्रहीन', 'बडी दिदी' 'देवदास', पथेरदावी', 'दत्ता' इत्यादि त्यांच्या कादंबऱ्या अतिशय गाजल्या.

देशबंधु चित्तरंजन दास यांच्या संपादकत्वाखालीं 'नारायण' नावाचें पत्र निघत असे. यांत शरच्चंद्रांची 'स्वामी' ही कथा प्रसिद्ध झाली. ही कथा संपादकांना इतकी पसंत पडली कीं, पुरस्कार काय द्यावा हेंच चित्तरंजन दासांना समजेना. तेव्हां त्यांनीं एक कोरा चेकच सही करून शरद्बाबूकडे पाठविला, आणि त्यावर वाटेल तेवढा आंकडा लिहिण्यास सांगण्यांत आलें. शरद्बाबूंनीं त्यावर शंभर रुपयांचा आंकडा लिहिला. शरच्चंद्रांच्या त्या काळच्या यशाचा विचार केला तर हा आंकडा त्या मानानें कमीच होता. शरद्बाबूंच्या कादंबऱ्यांना यानंतर मोठाच लौकिक प्राप्त झाला. 'बंगवाणी' पत्रिकेंत त्यांची सर्वांत गाजलेली अशी राजकारणात्मक कादंबरी 'पथेर दावी' क्रमशः प्रसिद्ध झाली. या कथेंतील सर्व घटना ब्रह्मदेशाच्या पार्श्वभूमीवर घडलेल्या असून क्रांतितत्त्वांवरहि शरद्बाबूंनीं या कादंबरींत विस्तृत चर्चा केलेली आहे. इंग्रज सरकारच्या विरुद्ध प्रचार करणारी शरद्बाबूंची एकमेव कादंबरी

म्हणूनहि हिचा लौकिक आहे. लेखकाच्या बंडखोर प्रवृत्तीमुळें व कादं-बरींतील क्रांतिकारक विचारामुळें कोणीहि हें पुस्तक स्वतंत्र रीतीनें छाप-ण्यास तयार होईना. पण कॉटन प्रेसनें छापण्याची जबाबदारी पत्करली. प्रत्येक प्रतीची किंमत तीन रुपये होती, तरी या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तीच्या तीन हजार प्रती एकाच महिन्यांत खपल्या. दुसरी आवृत्ति पाच हजार प्रतींची निघाली; तीहि तीन महिन्यातच खपून गेली. या-प्रमाणें कादबरीलेखनांतील शरद्‌बाबूंचें यश अपूर्व होतें. पुढें शर च्चद्रांची ही बंडखोर कादंबरी सरकारनें जप्त केली.

शरच्चद्र चट्टोपाध्याय याच्या काहीं प्रमुख कादंबऱ्याचा संक्षिप्त परिचय करून घेण्यापूर्वी त्यांच्या कथारचनेच्या स्वरूपाविषयीं काही माहिती सागणें आवश्यक आहे शरद्‌बाबूंच्या साहित्यांत ज्या ज्या व्यक्ति भेटतात त्या त्या त्याना कोठेंना कोठें तरी प्रत्यक्षांत भेटल्या असाव्यात. जें त्यानीं पाहिलें, अनुभवलें त्यातच थोडाफार बदल करून त्यानीं आपल्या कथामंदिराची उभारणी केली. शरद्‌बाबूंचे नायक या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत. स्वतः लेखक बराच काळपर्यंत भटकत राहिल्यामुळें त्याचे नायकहि थोडे-थोडेसे भटक्या स्वरूपाचेच आहेत. श्रीकांत, देवदास, सतीश, सुरेन्द्र, नरेन्द्र, डॉक्टर इत्यादि शरद्‌बाबूंनीं निर्माण केलेली पात्रसृष्टि लेखकाचे कांहीं गुण घेऊनच आकारास आलेली दिसते. त्याच्या नायकाचा आपण स्वतंत्र रीत्या परिचय करून घेणार आहोंतच. शरद्‌बाबूंनीं स्त्रीस्वभावाचेंहि मार्मिक निरीक्षण केलेलें होतें. नारी-हृदयाच्या सर्व भावना व भावनांच्या विविध छटा त्याना पूर्णपणें परिचित अशा होत्या. दलित, अपमानित, बहिष्कृत अशा नारी-जीवनाचे अनेक नमुने शरत्साहित्यांत आपणास पाहावयास मिळतील. शरच्चंद्रकृत नारी-जगताचें दर्शनहि आपण स्वतंत्रपणें घेणार आहोंत.

शरच्चद्रांची कथासृष्टिहि अति विस्तृत अशी आहे. हरतऱ्हेचे लोक

हरतऱ्हेच्या देशांतील त्याच्या कथासृष्टींत उपस्थित झाले आहेत. खेडे-गावांतील शेतकरी-मजूर त्यात आहेत, तसे शहरी राहणीस लोभावलेले कारखानदार व जमीनदारहि आहेत. साधु, बैरागी, संन्यासी याच्या-प्रमाणेंच पतित, शराबी, व्यसनी यांचेंहि यथायोग्य दर्शन शरत्साहि-त्यांत घडून येतें. जमीनदारी पद्धतीचा फार मोठा प्रभाव बंगाली समाजा-वर पडलेला आहे. शरद्‌बाबूंचे कित्येक नायक जमीनदार आहेत. पल्लीसमाज या कादंबरींत शरद्‌बाबूंनीं खेडेगावच्या राहणींच्या सर्व प्रश्नावर अति उद्‌बोधक अशी चर्चा केलेली आहे. शरच्चंद्रांच्या कथांचें सर्वांगीण परीक्षण येथें करणें अशक्य असलें तरी कांहीं प्रमुख कादं-बऱ्यांचा थोडक्यात परिचय मात्र करून देण्यासारखा आहे. शरद्‌बाबूंच्या कादंबऱ्यातून सामाजिक प्रश्नाची चर्चा प्रामुख्यानें असली तरी कांहीं कथा केवळ मानवाच्या परस्पर-संबंधावरहि आधारलेल्या आहेत. कांहीं एक विशिष्ट हेतूसाठीं नव्हे, प्रचारासाठीं नव्हे, तर मानवी मनाच्या अंतरंगातील विविध भावनातरंगाचा बहुरंगी परिचय अतिशय कलात्मक पद्धतीनें करून देण्यासाठींच शरद्‌बाबूंच्या या कादंबऱ्याचा जन्म झालेला असावा. परस्पराच्या संबंधातून जो प्रश्न निर्माण होईल तोच अशा कथांतून दिसतो दुसऱ्या प्रकारच्या कादंबऱ्यातून शरच्चंद्रानीं कांहीं प्रश्न उपस्थित केले असून त्याच्यावर उद्‌बोधक चर्चाहि केलेली आहे. पण या प्रश्नाना निश्चित अशीं उत्तरें मात्र देण्याचा अट्टाहास त्यांत नाहीं. यानंतरच्या त्याच्या कांहीं कादंबऱ्यातून मात्र प्रश्नाची चर्चा व ते प्रश्न सोडविण्याचे कांहीं उपायहि सांगितलेले दिसतात. कांहीं महत्त्वाच्या कादंबऱ्यांचा संक्षिप्त परिचय येथें करून घ्यावयाचा आहे.

**( १ ) बडी दिदी :—** शरद्‌बाबूंच्या प्रारंभींच्या काळातील ही एक सर्वोत्तम छोटी कादंबरी आहे. रायमहाशय यांचा मुलगा सुरेन्द्र हा कलकत्ता युनिव्हर्सिटीचा एक नामांकित विद्यार्थी. त्यानें परीक्षेंत अद्वितीय यश कमावलेलें असून परदेशात उच्च विद्या स्वीकारण्यासाठीं

जावें असें त्याच्या मनात असतें. पण त्याच्या सावत्र आईस मात्र पोरानें घर सोडून कोठेंच जाऊं नये असें वाटतें. त्यामुळें सुरेन्द्राचा कोंडमारा होतो. जीवनाच्या धकाधकींत सुरेन्द्रासारख्या बालस्वभावाच्या पोराचें कसें होणार, ही चिंता तिच्या मनास लागून होती. सुरेन्द्राच्या मनास या सर्व गोष्टी लागल्या. गुपचुपपणें त्यानें गृहत्याग केला व कालकत्याची वाट धरली. एवढ्या मोठ्या शहरात तो गोंधळूनच गेला. त्याला कोणीहि पुसेनासें झालें. पण त्याच्या दैवानें त्याला हात दिला. ब्रजनाथ लाहिरी नांवाच्या जमीनदाराच्या घरीं मुलांना शिकविण्याचें काम त्याला मिळालें. या घरात माधवी ही एक सुंदर पण विधवा होऊन घरीं आलेली त्यांची मुलगीच सर्व कारभार पाहत असे. धाकटया प्रमिलेस शिकविण्याचें काम सुरेन्द्रास मिळालें. नवीन शिक्षकाचा बालकासारखा निर्व्याज आणि सरळ पण दयनीय स्वभाव पाहून माधवीचें सुप्त मातृत्व जागृत झालें. या साध्या-भोळ्या बालक-सदृश सुरेन्द्राचें संगोपन ती जातीनें करूं लागली. त्याचें जेवणखाण, त्याचें स्नान, त्याचीं पुस्तकें, त्याचा चष्मा, इत्यादि गोष्टींत माधवीसच लक्ष द्यावें लागे. तिच्या दयेचा सर्व वर्षाव या साध्या-भोळ्या सुरेन्द्रावर होऊं लागला माधवीची मैत्रीण मनोरमा हिला या सर्व हकीगती समजल्यावर तिनें माधवीची पुरतीच थट्टा केली. विधवा स्त्रीनें एवढ्या सलगीनें परपुरुषाशीं वागूं नये म्हणून तिनें माधवीस गंभीरपणें सूचना दिली. माधवीच्या चित्तात थोडें काहूर माजून राहिलें. मनास झालेला हा त्रास दूर व्हावा म्हणून ती यात्रेस जाण्यास निघाली सुरेन्द्राला तिची घरातील अनुपस्थिति खूपच जाणवली. मातृत्वाच्या स्नेहानें आता या पोरक्या पोराकडे कोण पाहणार? त्याला फारच चुकल्या-चुकल्यासारखें होऊन गेलें. थोडक्याच दिवसात माधवी परत आली. सुरेन्द्रास भान न राहतां तो एकदम माधवीच्याच खोलींत शिरला, आणि ती नसल्यामुळें आपल्या झालेल्या अनुकंपनीय अवस्थेचें

तिच्यापुढें त्यानें निवेदन केलें! सुरेन्द्राचा हा धीटपणा माधवीस खपला नाहीं. तिनें त्याला बाहेर जाण्यास सांगून पुनः असें न करण्या-बद्दल बजावलें. सुरेन्द्र स्वत:च्याच अभ्यासात गढून गेला आहे, त्यानें प्रमिलेस काहींच शिकवलें नाहीं, याचाहि शोध माधवीस लागल्यावर ती दुसऱ्या एका शिक्षकाच्या शोधांत राहिली. आता सुरेन्द्रनाथाचें या घरांत काय काम? सुरेन्द्रानें त्या घराचा त्याग केला. माधवीनें दिलेल्या सर्व वस्तु – कंपास, चष्मा, वगैरे – जशाच्या तशा आपल्या खोलींत ठेवून सुरेन्द्र निघून गेला. विमनस्कपणें रस्त्यातून हिंडत असताना त्याला अपघात झाल्यामुळें त्याला इस्पितळांत पोंचविण्यात येतें. सुरेन्द्राचे वडील व माधवी याना हें वृत्त कळविण्यात येतें प्रकृति सुधारल्यानंतर सुरेन्द्र आपल्या स्वतःच्या घरीं जातो.

पाच वर्षें लोटलीं. आपल्या जमिनीच्या गावीं सुरेन्द्र आपल्या संसारांत दंग झालेला असतो. माधवीला विसरणें शक्य नव्हतें. त्याच्या बायकोला कधीं कधीं या गोष्टीचा हेवा वाटे. मध्यंतरीं माधवीच्या वडिलाचें निधन झाल्यावर ती आपल्या नवऱ्याच्या घरीं आश्रयार्थ म्हणून आली. सुरेन्द्राच्या ताब्यात जी जमीनदारी होती त्याच कक्षेंत माधवीचें गाव होतें. त्याचे दिवाणजी लोकांना फार निर्दयपणें वागवीत, थोडक्या कारणासाठीं कोणाचीहि जमीन गिळकृत करीत. सुरेन्द्र एकदा असाच कचेरीचें काम पाहत बसला होता. आपल्याकडून घडत असणाऱ्या दडपशाहीस माधवी नावाची स्त्रीहि बळी पडत आहे, हें त्याच्या ध्यानांत आलें सुरेन्द्रापुढें माधवीची करुणापूर्ण व वत्सलमयी मूर्ति उभी राहिली. आपल्या अज्ञातवासात तिनें केलेल्या वात्सल्याचा वर्षाव सुरेन्द्र कसा विसरणार? चटकन् घोड्यावर स्वार होऊन सुरेन्द्र माधवीच्या गावीं निघाला. कलकत्ता येथें घडलेल्या अपघातापासून त्याची छाती अधू झालेली होती. आतां आपल्या हातून, आपल्यावरच उपकार करणाऱ्या विधवा बाईचें नुकसान होऊं लागलेलें पाहून त्याच्या हृदयास

धक्का बसला. बराच शोध केल्यानंतर माधवी व सुरेन्द्र याची गांठ पडूं शकते.

कथेचा शेवट करुणापूर्ण आहे. माधवीच्या मांडीवर डोकें टेकून सुरेन्द्र मरणाच्या पंथास लागलेला आहे. त्याची पत्नी शांता पायथ्याशीं बसून त्याच्या सेवेंत चूर होऊन गेलेली आहे. सुरेन्द्र माधवीला शांतपणें म्हणाला, " ताई, त्या दिवसाची आठवण आहे ? तूं मला घरांतून हाकून दिलेस. त्याचा बदलाच जणुं मीहि तुला हाकलून देऊन घेत होतों.— " यानंतर सुरेन्द्राचें निधन झालें. माधवीच्या वात्सल्यपूर्ण प्रेमानें टवटवीत झालेलें सुरेन्द्राचें प्राणपुष्प एकदम कोमेजून गेलें.

शरद्बाबूंची ही कलाकृति अत्यंत श्रेष्ठ दर्जाची आहे. सुरेन्द्राच्या बालिश स्वभावाचें व भावनाप्रधान प्रवृत्तीचें कोडें जरी उलगडलें जात नसले तरी त्यांतील गूढतेंतहि अपार सौंदर्य आहे. आणि माधवी ! शरच्चंद्राच्या कलात्मक लेखणींतील सर्व सौंदर्य या वत्सलमूर्तींत खर्च झालेलें दिसतें. लहानपणींच विधवा झालेली ही जमीनदाराची सुंदर मुलगी. तिच्या मनातील सहजसुलभ वात्सल्यभाव पोरक्या सुरेन्द्रास पाहून जागृत झाला, पण समाजानें या ' विलक्षण प्रकारास बंदी केली. स्त्रीच्या मूक वात्सल्यभावनेचें एवढें यथार्थ व रेखीव चित्र इतरत्र मिळणें कठीण आहे.

(२) **देवदास** :— शरद्बाबूंची ही एक अतिशय गाजलेली आणि लोकप्रिय अशी छोटी कादंबरी आहे. देवदास हा एका श्रीमंत पण साध्या जमीनदाराचा मुलगा. पार्वती नावाच्या एका गरिबाच्या प्रेमळ मुलीवर त्याचें बालपणापासूनचें प्रेम. पुढें घडणाऱ्या कोणत्याच घट-नांची जाणीव त्यांना नसल्यामुळें दोघांचीं चित्तें एकमेकांकडे पूर्णपणें वळलेलीं. देवदास शिकण्यासाठीं दूर गावीं गेला, तेव्हां पार्वतीनें एकान्तांत रडून रडून आकान्त केला. देवदासच्या घरच्या माणसानीं पार्वतीसारख्या गरीब मुलीचा लोभ स्वीकारला नाहीं. या बिचाऱ्या

पार्वतीचें लग्न, एका प्रौढ व मोठ्या मुलाबाळांचा धनी असलेल्या एका जमीनदाराशीं झालें. देवदासला या गोष्टी समजल्या, पण समाजाच्या विकृत वर्तनापुढें त्याचें काहींहि चाललें नाहीं. पार्वती आपल्या नव्या घरीं मूकपणें आपलें दु:ख गिळून बसली देवदास श्रीमंताचा मुलगा, पण जन्मभर दुःखीच राहिला त्याला वाईट लोकांची संगत लागली. नाना प्रकारच्या व्यसनात देवदास गुरफटून गेला. पार्वतीला देवदासाची ही अवस्था समजल्यावर ती फारच कष्टी झाली. त्यानें व्यसन सोडावें व नीटपणें प्रपंचास लागावें म्हणून तिनें पुष्कळ खटपट केली व्यसनाच्या कचाट्यातून देवदास सहसा सुटला नाहीं. त्याला हृदयाचा विकार जडला. या ठिकाणाहून त्या ठिकाणीं तो हिंडत राहिला मूक राहून अश्रु गाळण्याखेरीज बिचारी पार्वती दुसरें काहीं करू शकत नव्हती. वरवर आपल्या संसाराचा देखावा ती एखाद्या पतिव्रतेप्रमाणें करीत होती. तिचा आत्मा मरून गेला होता, हें फारच थोड्या लोकांना माहीत होतें.

पार्वतीच्या वराशेजारच्या पारावर एका अनोळखी माणसाचें प्रेत पाहून साऱ्या गावात गडबड निर्माण झाली. ठिकठिकाणीं हिंडत राहून अखेरच्या वेळीं पार्वतीस भेटण्यासाठीं दुर्दैवी देवदास या ठिकाणीं आलेला होता ! पार्वती एखाद्या तीराप्रमाणें देवदासकडे धावली. पण देवदास त्या वेळीं जगतांत नव्हता पार्वती हतबुद्ध होऊन गेली या करुण कहाणीचा शेवट हा असा आहे. या कथेप्रमाणेंच या कथेवरील चित्रपटाहि अतिशय गाजला. भग्नहृदयाच्या प्रेमी माणसाचें प्रतीक म्हणून देवदासचें नाव आजहि भारतीय कथासृष्टींत अजरामर झालें आहे. देवदासानें प्रेमाची जखम एवढ्या प्रमाणात आपल्या हृदयास लावून घ्यावी काय ? प्रेमभंगाचें पर्यवसान आत्महत्येंतच व्हावें काय ! याशिवाय माणसाच्या जीवनांत दुसरें उदात्त असें कांहीं असतच नाहीं काय ! प्राण अर्पण करण्यासाठीं प्रेमभंग झाल्यानंतर दुसरें

काहीं उरतच नाहीं काय ?—असे अनेक प्रश्न मनासमोर उभे राहतात व शरच्चंद्रांच्या दुर्बल नायकाबद्दल एक प्रकारची कींव वाटूं लागते. प्रेमापायीं जीवनाचा सत्यनाश करण्यांतील पुरुषार्थ ध्येयवादाच्या दृष्टीनें केव्हांहि स्पृहणीय नाहीं. पण देवदासच्या पक्तींत बसणाऱ्या ज्या व्यक्ति असतात त्यांचें मात्र यथार्थ चित्रण या कथेंत आहे. खुद्द कथा निर्माण करणाऱ्याला सुद्धा देवदासबद्दल कमालीची अनुकंपा वाटते. कादंबरी संपवीत असताना शरच्चंद्र लिहितात, " यानंतर पार्वतीचें काय झालें हें माहीत नाहीं. माहिती करून घेण्याची इच्छाहि नाहीं केवळ देवदासबद्दल मला फार दुःख होतें ही कथा जो वाचील त्यासहि असेंच दुःख होईल. तरीपण देवदासासारख्या हतभागी, असंयमी, पापी माणसाचा जर कधीं परिचय झाला तर त्याच्यासाठी देवाची आळवणी करा. अशी आळवणी करा कीं, इतर कांहींहि येवो, त्याला आलें तसें मरण कोणालाहि येऊ नये ! मरणाची पर्वा नाहीं, पण मरायाच्या वेळीं कुणाचा तरी स्नेहाचा, जिव्हाळ्याचा हात मस्तकावरून फिरावा, दयेनें ओथंबलेल्या कुणाच्या तरी स्नेहपूर्ण तोंडाकडे पाहत पाहत जीवनाचा शेवट व्हावा. देहांतून प्राण निघून जात असताना कुणाच्या तरी डोळ्यांतील आसवाचा एक थेंब पडलेला पाहून मृत्यु यावा. "

( ३ ) **काशीनाथ** — ही सुद्धा एक बालपणींच्या प्रेमाची कथा शरद्बाबूंनीं अत्यंत हळुवार हातानें चित्रित केली आहे. काशीनाथ हा बारा वर्षांचा, देखणा, बुद्धिमान् , पण उपद्व्यापी मुलगा. त्याची लहानपणींची मैत्रीण बिंदुवासिनी. लहान वयातच काशीनाथाचें दुर्दैव ओढवलें, त्याचे वडील मरण पावल्यानंतर हा गरीब ब्राह्मणाचा मुलगा रामायणाची एक पोथी व वडिलाचा अखेरचा उपदेश घेऊन पीतांबर चक्रवर्ती या श्रीमंत जमीनदाराच्या घरीं आश्रयासाठीं येतो. आपल्या एकुलत्या एक पण सुंदर मुलीस, गरिबाचा पण चुणचुणीत हुशार मुलगा फार उत्तम दिसतो, असे विचार चक्रवर्ती यांच्या मनात घोळत

असतात. काशीनाथ सर्व इस्टेटींची व्यवस्था पाहणारा घरजावई म्हणून बनला. अर्थातच बालमैत्रिणि बिंदु हिची व त्याची कायमची ताटातूट झाली. पण या नव्या भव्यतेंत व संपत्तीच्या झगझगाटांत काशीनाथाचें चित्त रमलें नाहीं. तो नित्य उदास व गभीर दिसे. त्याच्या व्यथित हृदयाची जाणीव, त्याची पत्नी कमला हीसाहि बरोबर आलेली होती. तिच्या चातुर्यानें व समंजसपणामुळेंच काशीनाथ कांहीं काळ प्रसन्न होत राहिला.

दरम्यानच्या काळांत बिंदूनें आपल्या कठीण परिस्थितीचें निवेदन पत्रानें काशीनाथास केलें. काशीनाथ तिच्या मदतीस निघाला, घरच्या लोकाना त्याच्या या विचित्र वर्तनाचा अर्थ नीटसा लागेना. बराच काळपर्यंत शोध केल्यानंतर, काशीनाथास त्याची बहीण – बिंदु – सांपडली. तिच्या आजारी पतीस व तिला सर्व प्रकारची मदत त्यानें केल्यानंतर बिंदूचा संसार पुनः हर्षानें फुलून गेला. आतां परत आपल्या घरीं जाण्याचा विचार काशीनाथानें केला. परंतु इकडे पीतांबर चक्रवर्ती- व थोडयाफार प्रमाणात कमलाहि – यांना काशीनाथाच्या वर्तनाचा भलताच संशय येऊन सर्व इस्टेट कमलेच्या नांवाची करण्याचा घाट

[illegible] पावल. पुढ स्वतःच्या इस्टेटीची व्यवस्था पाहण्यासाठीं कमलेनें एक नवा मॅनेजर नेमला. त्यानें आपल्या सुधारलेल्या कल्पनांनीं सारें ऑफिस इंग्रजी पद्धतीनें सजविलें व त्यानें काशीनाथाविरुद्ध कमलेच्या मनात भरविलें. बिंदूच्या मदतीचाहि भलता अर्थ कमलेनें घेतला. काशीनाथाच्या मनावर या गोष्टींचा फारच परिणाम होऊन त्याची प्रकृतिहि एकदम खालावली. शेवटीं बिंदु स्वतः येते व सर्व गोष्टींचा उलगडा होऊन कथेचें पर्यवसान आनंदात होतें.

'देवदास' पेक्षां या कथेंतील वातावरण स्वभावतःच वेगळें आहे. बालपणीं एकमेकांत निर्माण झालेलें निरुपद्रवी प्रेम, हा या कथेचा

मुख्य विषय आहे. पति-पत्नींत झालेले गैरसमजहि त्याचमुळें या ठिकाणीं चटकन् दूर झालेले आहेत. कोणता तरी सामाजिक प्रश्न घेऊन त्याची चर्चा करावी, हाहि अट्टाहास या सोज्वळ कथेंत दिसून येत नाहीं. शरद्बाबूंच्या लेखणींतून उतरलेली ही एक अतिशय रमणीय अशी प्रपंचकथा आहे. पतिपत्नींचा स्वभाव चांगला असूनहि केवळ गैरसमजुतीमुळें एकमेकांना कधीं कधीं ते सुखवूं शकत नाहींत. काशीनाथ निर्लोभी व उदास प्रवृत्तीचा, तर कमला धनवान् बापाची अभिमानी मुलगी. या दोघांच्या संघर्षाची चुणूक शरद्बाबूंनीं चांगलीच रंगवून दर्शविली आहे. या कथेवरील चित्रपटहि मूळ कथेइतकाच रमणीय असा निर्माण झाला होता.

( ४ ) श्रीकांत — शरद्बाबूंच्या मोठ्या कादंबऱ्यांपैकीं ही एक सर्वोत्कृष्ट कलाकृति आहे. जीविताकडे पाहण्याची त्यांची दृष्टि कशी विशाल होती हें या कादंबरीवरून चांगलेंच ध्यानांत येण्यासारखें आहे. शरद्बाबूंना आयुष्यांत भेटलेल्या किती तरी व्यक्ति या कादंबरींत साकार झालेल्या आहेत. स्वतःच्या जीवनांतील कित्येक प्रसंग अतिशय तत्पर-तेनें यांत रंगविले गेले असले तरी ही कादंबरी म्हणजे, शरच्चंद्राचें आत्मचरित्र खास नव्हे. या कादंबरीचें इंग्रजी व फ्रेंच भाषांतरहि लोक-प्रिय झालें होतें. प्रसिद्ध फ्रेंच ग्रंथकार रोमाँ रोलाँ यांनीं या कादंबरीस जगाच्या पहिल्या प्रतीच्या कादंबऱ्यांत स्थान दिलें आहे. श्रीकांत आपल्या या भटक्या आयुष्याचा वृत्तान्त आपल्या जीविताच्या अपरह्ण-कालीं सांगत आहे, अशा थाटांतच कादंबरीस प्रारंभ आहे. त्याचा बेडर व विलक्षण धैर्यवान् मित्र इन्द्रनाथ याच्याबरोबर श्रीकांत अंधाऱ्या रात्रीं नदींत मासे धरावयास जाई. श्रीकांत व इंद्रनाथ यांनीं केलेल्या अनेक उपद्व्यापांचें रम्य व सजीव दर्शन पहिल्या कांहीं पानांतून घडतें. शरद्बाबूंच्या बालपणाचे कित्येक प्रसंग या ठिकाणीं चित्रित झाल्या-सारखें वाटतें.

श्रीकांतास पहिली भेटणारी विचित्र स्त्री म्हणजे अन्नदा अक्का ! हिची करुण कहाणी फार चमत्कारिक असते. ही एका ब्राह्मणाची मुलगी. पण नवरा खुनी आणि व्यसनी निघालेला. स्वत:च्या मेव्हणीचा खून लपविण्यासाठीं तो मुसलमान गारुडी बनतो व अन्नदाअक्काच्या दाराशीं खेळ करण्यास येतो. अन्नदा त्याला बरोबर ओळखते व त्याच्याबरोबर पळून जाते. ओळख पटल्याचें दर्शविणें तिला शक्य नसतें नाहींतर पति खुनी म्हणून सापडला असता. तेव्हां जगाच्या दृष्टीनें मुसलमान गारुड्याबरोबर पळून गेलेली ही कुलटा अन्नदा अन्तर्यामीं पतिनिष्ठ असते. त्या व्यसनी शहाजी गारुड्याबरोबर तिनें जन्म काढला. गावा-बाहेरच्या जंगलांत राहणाऱ्या या साध्वीस श्रीकांत व इन्द्रनाथ अनेक प्रकारची मदत करीत असत. एके दिवशीं सापाला खेळवताना, गारुडी शहाजी नशेंत येऊन सापाचा मुका घेत असताना मरण पावतो. अन्नदाच्या सतीत्वाचा या ठिकाणीं शेवट होतो

त्यानंतर कोणा एका वर्गांतील श्रीमंत [illegible] आमंत्रणावरून श्रीकांत जातो एके रात्रीं गाण्याच्या बैठकींत प्यारी नांवाची पाटण्याची गाणारी बाई असते ती श्रीकांताला चांगलीच ओळखीत असते. मध्यरात्रीं भुताखेताच्या नादाला लागून स्मशानात भटकू नये व या युवराजाच्या संगतींतहि राहूं नये, असें ती त्यास वारंवार सांगते. बालपणींच श्रीकांतास ओळखून असणारी ही 'प्यारी' म्हणजे राजलक्ष्मी असते. शरद्बाबूंनीं राजलक्ष्मी हें एक विलक्षण पण तितकेंच ठसठशीत व जिवंत पात्र निर्माण केलें आहे. समाजाच्या दृष्टीनें पतित असणाऱ्या ह्या स्त्रीच्या सहजसुलभ प्रणयाची भावना व मातृत्वाची ओढ यांनीं तिच्या मनाचे होणारे हेलकावे शरच्चंद्रांनीं फार बारकाईनें रंगविले आहेत. आपल्या मुलांपासून प्यारी हें नाव लपवून ठेवणारी राजलक्ष्मी श्रीकांतला म्हणते, "पण माझीं मुलं आज उद्या बांकीपूरहून येतील. फार दिवस राहिलांत तर त्यांना चमत्कारिक

होईल.'' मातृत्वाच्या या सुंदर चित्राच्या दर्शनामुळें श्रीकांताला नवीन दृष्टि लाभली. आपण कसेंहि व कोठेंहि असलों तरी मुलांनीं आपल्याला आई या पदवीनेंच वागविलें पाहिजे, असा समज राजलक्ष्मीचा असतो.

दुसऱ्या भागात श्रीकांताचें ब्रह्मदेशच्या प्रवासाचें पर्व सुरू आहे. पैशाची अडचण म्हणून श्रीकांत परत येण्याचें वचन राजलक्ष्मीला देऊन ब्रह्मदेशला जाण्यास निघतो. प्रवासांतील हरतऱ्हेचीं दृश्यें शरद्‌बाबूंनीं स्वतःच अनुभवलीं असल्यामुळें मोठीं बहारदार वठलेलीं आहेत. नाना धर्मांचीं, जातींचीं देशाचीं माणसें त्या बोटीवर जमा झालीं होतीं. समाजबंधनांपासून मुक्त झालेल्या खालच्या वर्गांतील माणसांचें तें एक चमत्कारिक मिश्रण श्रीकांताला पाहावयास मिळालें. आपले धर्माभिमान, आपल्या रूढ समजुती, आपल्या विक्षिप्त चालीरीती; आपल्या समाजांतील स्त्रीची अवस्था यांसबंधींचें अति सुंदर दिग्दर्शन शरच्चंद्रांनीं या प्रसंगीं केलें आहे. रंगूनच्या नंद मिस्त्रीची व त्याच्या तगर नावाच्या बाईची वाचावाच या दृष्टीनें मुळात वाचून पाहण्यासारखी आहे. ब्रह्मदेशात येऊन बेपत्ता झालेल्या आपल्या पतीस शोधण्यासाठीं निघालेली अभया, ही श्रीकांतला भेटलेली तिसरी स्त्री. याहि दुर्दैवी स्त्रीची कहाणी प्रत्यक्षच वाचण्यासारखी आहे ब्रह्मदेशातील संमिश्र समाजाचें फार सुंदर वर्णन मोठ्या मार्मिक पद्धतीनें शरद्‌बाबूंनीं केलें आहे. प्लेगसारख्या साथींत होणारे लोकांचे हाल तर अंगावर शहारे आणणारे आहेत यानंतर श्रीकांत ब्रह्मदेश सोडून परत आपल्या देशात येतो.

यानंतरच्या भागांत श्रीकांत व राजलक्ष्मी यांचें वास्तव्य एका खेडेगावीं दाखविण्यात आलें आहे. ग्रामीण समाजाचें अगदीं हुबेहुब असें चित्र कथाकारानें या तिसऱ्या भागात रंगविलें आहे. खेडेगांवच्या चालीरीती, समजुती, लग्नप्रसंग, सुखदुःखें इत्यादींचें फार सुंदर वर्णन शरच्चंद्रांनीं केलेलें आहे. याच भागात कुशारी महाशयाची भावजय

सुनंदा हें एक अद्वितीय पात्र लेखकाच्या कल्पनाशक्तीतून अवतीर्ण झालें आहे. स्वतःच्या हक्काचें असलेलें पण पापाचें अन्न न स्वीकारता ही महाबुद्धिमान् स्त्री गृहत्याग करून आपल्या पतीबरोबर गरिबींत दिवस काढीत असते. वेदविद्येचें अध्ययन करणें व तीं दुसऱ्यांना शिकविणें हा तिचा एक आवडता उद्योग असतो काहीं दिवस राजलक्ष्मीच्या मनाची ओढ या सुनन्देच्या तपश्चर्येकडे लागलेली असते. यानंतरच्या चौथ्या भागांत, वैष्णवांच्या मेळाव्यात, श्रीकांत यास भेटलेली चौथी स्त्री म्हणजे कमललता याहि दुर्दैवी स्त्रीचें चित्र अति करुणापूर्ण व हळुवार अशा पद्धतीनें शरद्बाबूंनीं रंगविलें आहे. श्रीकांतास नाना प्रकारच्या व्यक्ति भेटतात त्याचें व त्यांच्याभोंवतीं असणाऱ्या परिस्थितीचें श्रीकांत तटस्थाच्या भूमिकेवरून निरीक्षण करतो.

श्रीकांत या कादंबरींत एकसूत्री असें कथानक नाहीं. नेहमींच्या साचेबंद तंत्रात बसणारी ही कादंबरी नाहीं. नायक-नायिका-खलनायक--प्रारंभ-निरगांठ-उकल-शेवट, अशी ठोकळेबाज मांडणीहि या कादंबरींत दिसणार नाहीं. बोलून चालून श्रीकांताच्या भ्रमणाची ही कथा ! जसे आठवतील तसे प्रसंग सांगण्यास निघालेला श्रीकांत, ही भूमिका मुळांत स्पष्ट झालेली असल्यामुळें या कादंबरीचें एक वेगळेंच पण वैशिष्टयपूर्ण असें तंत्र वाटतें. श्रीकांतबरोबरच वाचकानाहि जगातील किती तरी चमत्कारिक पण सत्यसृष्टींत वावरणाऱ्या गोष्टींचें दर्शन घडतें.

अनेक प्रश्नाची रमणीय अशी चर्चा या कादंबरींत लेखकानें आपल्या कलासंपन्न अशा लेखणीनें केली आहे. अन्नदा, राजलक्ष्मी, अभया व कमललता या पतित स्त्रिया व सुनंदा ही साध्वी स्त्री, यांच्याद्वारें सबंध बंगालीच नव्हे तर भारतीय स्त्रीसमाजाचें दर्शन शरच्चंद्रांनीं या कादंबरींत घडविलें आहे. स्त्रीचें चरित्र व चारित्र्य याविषयींचें त्याचें अवलोकन व मतप्रदर्शन हें अत्यंत महत्त्वाचें आहे. तिसऱ्या भागांतील ग्रामीण समाजाचें दर्शनहि विलोभनीय असें आहे. खेडेगांवचे सज्जन-

दुर्जन, ग्रामोद्धाराच्या विशिष्ट कल्पनांनीं भाराबून जाऊन कार्य करीत राहणारा वज्रानंद स्वामी, त्याच्याशीं झालेली श्रीकांताची चर्चा इत्यादि विषय पुनः पुनः वाचण्यासारखे आहेत. शहाजी गारुडी व श्रीकांतचा कविमित्र गोहर या मुसलमान पात्रांमुळें बंगालच्या मुसलमान समाजाचेंहि यथार्थ दर्शन या कादंबरींत मिळण्यासारखें आहे. वातावरण-निर्मिति, संवादकौशल्य, स्वभावचित्रण, कथनशैली, भाषासौंदर्य व विशाल दृष्टिकोन या दृष्टीनें शरच्चंद्राची ही कादंबरी पहिल्या प्रतीची ठरते. समाजाच्या विलक्षण दडपणाखालीं स्वाभाविक मनोवृत्ति व दैवी मनोवृत्ति यांचा एकसारखा झगडा कसा चालत असतो, हें या कादंबरीचें प्रधान सूत्र आहे

( ५ ) **चरित्रहीन** :— शरद्बाबूची ही आणखी एक गाजलेली कादंबरी. स्वभावचित्रणातील मार्मिकता व तात्त्विक विचाराची संपन्नता या दृष्टींनीं या कादंबरीची योग्यता फार मोठी आहे. मध्यमवर्गीतील विशिष्ट जिवंत पात्रें या कादंबरींत चित्रित झालेली आहेत. सावित्री आणि किरणमयी या दोन स्त्रियांच्या चरित्राभोंवतीं गुंफली गेलेली ही कादंबरी बंगाली समाजांत खळबळ उडवून देणारी ठरली. चारित्र्यानें शुद्ध असणारी सावित्री ही विधवा स्त्री एका वसतिगृहांत मोलकरीण म्हणून काम करीत असते. प्रेम, सेवा व त्याग यांची ही मूर्ति सतीशच्या व्यक्तिमत्त्वावर लुब्ध झालेली असते. तिची तत्परता, तिनें दर्शविलेली आपुलकी आणि तिचें चातुर्य पाहून सतीशहि तिच्याकडे आकर्षित झालेला असतो. दडपलेली मातृत्वाची भावना, अजाण माणसाचें रक्षण करण्याची भावना तिच्या अंतःकरणात उदयास आली होती. पण समाजाच्या दृष्टीनें ती पतित होती. कोठेंहि प्रेम व्यक्त करण्याचा किंवा लोभ जडविण्याचा अधिकार विधवा बाईस कसा असणार ? सतीशला ती स्वीकारूंहि शकत नव्हती व त्याचा त्याग करणेंहि तिला कठीण जात असे.

सतीश कोणत्या अडचणींत सापडला आहे, हें तिनें जाणलें. आपल्यासारख्या यःकश्चित् विधवा मोलकरणीवर त्याचें चित्त असावें हें त्याच्या घरच्या माणसांना कदाचित् आवडलें नसेल. चरित्रहीन असा बद्लौकिक केवळ आपल्यामुळेंच त्याचा झाला, असाहि ग्रह सावित्रीनें करून घेतला. सतीशवर त्यामुळें नाना प्रकारच्या आपत्ति येऊन कोसळल्या. दारूसारख्या व्यसनांतहि तो सापडला. त्याला या भयंकर व्यसनातून वाचविण्यासाठीं सावित्रीची कोण धडपड ! सतीशच्या जीवनास नीट मार्ग लाभावा म्हणून सावित्रीनें मोठाच त्याग केला. आपला संसर्ग कमी करीत आणून तिनें त्याच्या लग्नाची खटपट केली. सतीशचा भाऊ उपेन्द्रानेंहि सर्व परिस्थिति ओळखून सतीशचें दुसऱ्याच एका मुलीशीं लग्न लावून दिलें. सतीशच्या आयुष्याचें तारू योग्य मार्गाला लागावें म्हणून तळमळीनें व स्वार्थत्यागानें धडपडणारी अशी ही सावित्री, शेवटी सतीश व सरोजिनी यांचें आयुष्य सुखानें जावें म्हणून जबाबदारी पत्करते. स्वतःच्या मनाच्या मूक वेदना मात्र तिनें बाहेर पडूं दिल्या नाहींत. शरद्बाबू लिहितात, "आज सतीश परक्याचा झाला होता. त्याच्यावर आतां तिची एवढी सुद्धां सत्ता राहिली नव्हती. तिच्या भावना, तिच्या वासना, तिच्या सुखाची परमावधि, दुःखाचा अतिरेक आणि तिच्या दुःसह वेदना, यावर आज तिच्या डोळ्यादेखत समाधि उभारली गेली होती. तरीहि तिनें एक लहानसा सुस्कारासुद्धा बाहेर पडूं दिला नाही. वेदनांमुळें तिचें अंतःकरण पिळवटून निघत होतें, पण सर्व सहन करणारी धरित्री ज्याप्रमाणें धडधडणाऱ्या अग्नीचा उत्पात सुद्धा मुकाट्यानें सहन करते, त्याचप्रमाणें चेहऱ्यावरील एक रेषाहि न बदलूं देतां सावित्री सारें दुःख गिळून स्तब्ध बसून राहिली होती."

सावित्रीच्या या कथेस समांतर राहणारी अशी आणखी एक कथा या कादंबरींत आहे. महाबुद्धिवान् व कल्पक अशी किरणमयी एका वृद्ध

वेदान्ती व तर्कपंडिताची बायको असते. धर्मशास्त्राचा नीरस अभ्यास या विरागी पतीच्या सान्निध्यांत तिनें ऐन वयात केला. कोणत्याहि प्रकारचा उल्हास, आनंद, जिवंतपणा तिच्या जीवनात उरलेला नव्हता. दिवसेंदिवस क्षयाच्यानें वृद्ध होत जाणाऱ्या हाराणबाबूची मनापासून सेवा करणारी व ऐन तारुण्यात सुकून गेलेली ही करुणमूर्ति किरणमयी! तिच्या कोणत्याहि इच्छेकडे, आकांक्षेकडे वा सुखाकडे कोणींहि लक्ष न पुरविल्यामुळें ती नेहमीं उदास व गंभीर दिसत असे. तिचा पति हा पति नसून तिचा शिक्षक होता. आपली सर्व विद्या त्यानें किरणमयीस दिली व आपण एके दिवशीं या जगांतून निघून गेला. सर्व भावना मनातल्या मनात कोंडल्या गेलेली ही विधवा स्त्री आपल्या तर्कपूर्ण पांडित्यानें व तात्त्विक चर्चेनें सर्वांना थक्क करून सोडणारी असते. परंतु मनाच्या या अधुऱ्या अवस्थेंतच तिच्या हातून समाजाच्या दृष्टीनें कांहीं गुन्हे घडतात.

तिच्या घरीं शिक्षणासाठीं म्हणून राहिलेल्या दिवाकराबरोबर – उपेन्द्राच्या दूरच्या भावाबरोबर -- ती अनेक विषयावर पांडित्यपूर्ण वादविवाद करीत असते समाज, धर्म, नीति-अनीति, आचारविचार यांविषयींची तिनें केलेली चर्चा चिकित्सकांसहि विचार करावयास लावणारी आहे. दिवाकराला घेऊन ती ब्रह्मदेशात जावयास निघते. या पोराबरोबर प्रणयचाळे करणारी ही शरद्बाबूंची नायिका कितीहि बुद्धिमान् असली तरी समाजाच्या दृष्टीनें तिरस्कृतच आहे. पण पतिताच्याहि मनाचे सूक्ष्म व्यापार निरखून पाहणाऱ्या शरच्चंद्रांनीं, ही व्यक्तिरेखा अतिशय सजीव व ठसठशीत अशी निर्माण केली आहे. 'चरित्रहीन' या कादंबरीवर फार टीका झाली आहे. शुद्ध चारित्र्याचा पुरस्कार तर नाहींच पण पापी माणसाच्या अंतःकरणाचें एवढें विस्तारानें चित्रण करण्याचें काय कारण, असा टीकाकाराच्या विवेचनाचा मथितार्थ. पण शरद्बाबूंनीं या महाबुद्धिमान् आणि विवेचक स्त्रीच्या

चरित्राचा शेवट कसा केला आहे, तो मात्र पाहण्यासारखा आहे. पतितेचा शेवट असाच होतो, असा स्पष्टपणें आग्रहपूर्वक उपदेशवजा शेवट नसला तरी तिच्या जीवनाचें केवळ भावनेच्या भरांत वागणूक केल्यामुळें जें पर्यवसान झालेलें दर्शविलें आहे तें मात्र अतिशय करुणरसपूर्ण आहे.

शरद्बाबूंच्या सामर्थ्यमय लेखणीनें या किरणमयीचें शब्दचित्र पहा कसें रेखाटलें आहे तें "सहा महिन्यापूर्वी ज्या एका दिवशीं समाजाला आणि धर्माला लाथ मारून, माणुसकीला पायाखालीं तुडवून, एका भोळ्या, अदूरदर्शी तरुणाला आपल्या सौंदर्याची आणि प्रेमाची भुरळ घालून सर्व प्रकारच्या भविष्यकालीन विकासापासून तिनें तोडून टाकून आणलें होतें, त्या प्रतारणेची फासाची दोरी आतां किरणमयी-च्याच गळ्याभोंवतीं अडकून बसली होती. पापाच्याबरोबर निष्फळ क्रीडा करायला गेल्यावेळीं दिवाकराच्या हृदयातून वासनेचा जो राक्षस बाहेर पडला होता, त्याच्यापासून बचाव करण्यासाठीं अहर्निश लढाई खेळतांना किरणमयीला आज हजारों जखमा झाल्या होत्या. . .. तिच्या माथ्यावरचे केस रुक्ष झाले होते, अंगावरचें वस्त्र फाटकें आणि मळकें, चेहऱ्यावर दिसणारी हताशपणाच्या शेवटच्या मर्यादेला पोंच-लेली एक प्रकारच्या कोरड्या भुकेची छाया तिच्या सर्वांगाला वेढून गेल्यामुळें तिच्यावर अशी कांहीं अवकळा आली होती कीं, पाहतांच शिसारी यावी ..... दिवाकर दांतओठ खात पागल होऊन तणतणत गेला आणि मुकाट्यानें उभ्या राहिलेल्या किरणमयीला त्यानें जोराचा धक्का दिला. सारा दिवसभर भुकेतहानेनें व्याकुळ होऊन थकलेल्या किरणमयीला तो धक्का सावरता आला नाहीं. ती जी पडली ती एका रंगाच्या रिकाम्या बादलींत. तिथून जी उठली ती एका शेणाच्या टोप-लींत तोंड खुपसून पडली. —"

वादविवाद करून पांडित्याच्या प्रदर्शनांत सर्वांना जिंकणाऱ्या पण भावनाच्या आहारीं जाणाऱ्या किरणमयीची ही दुर्दशा. शरच्चंद्रांना

नेमकें काय सुचवावयाचें आहे तें आतां ध्यानांत येण्यास हरकत नसावी. या अभागी स्त्रीची शेवटची अवस्था याहून भयकर व अनुकपनीय अशी आहे. ती वेडी बनली. सतीशबरोबर ती स्वतःच्या देशात आली खरी, पण तिच्या आयुष्याचे शेवटचे दिवस मात्र विलक्षण परिस्थितीत गेले. " किरणमयीचे लाब सडक केस तिच्या तोंडावर, पाठीवर आणि कपाळा-वर विखुरले होते. नेसूंचें वस्त्र छिन्नभिन्न झालें होतें. तिच्या डोळ्या-तील चमक नाहींशी होऊन ते तारवटलेले होते — उन्मत्त झालेली ती मूर्तिमत शोकाची मूर्ति एकाएकीं त्या जागीं येऊन खडी झाली होती." हें या वेड्या स्त्रीचें विलक्षण चित्र शरच्चंद्रानीं चित्रित केलें आहे.

शरच्चंद्राच्या या कादंबरीवर टीका होणार, हें त्यांनाहि माहीत होतें. त्याचा पत्रसंग्रह नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. त्यातील काहीं पत्रातून त्यानीं या कादबरीच्या लेखनाची भूमिका समजावून सागण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपले मित्र उपेंद्रनाथ गंगोपाध्याय याना शरद्बाबू लिहितात, " हस्तलिखित वाचून बहुधा तो घाबरला असावा. सावित्री-कडे त्यानें ' वसतिगृहांतील मोलकरीण ' एवढ्याच नात्यानें पाहिलें. त्याला पाहावयास डोळे असते आणि कोणत्या कथेंतील कोणतें चरित्र कोठें कशा प्रकारें परिणत होतें, कोळशाच्या खाणींत एखाद्या बिनमोल हिऱ्याची कशी निपज होते, हें त्याला कळलें असतें, तर त्यानें पुस्तक इतक्या सहजासहजीं हातचें सोडलें नसतें. .. सदभिरुचीच्या दृष्टीनें वादविवाद माजेल असें कोणी म्हणतात. माजेना का ! लोकानीं वाटेल तेवढी निंदा करावी. जेवढी निंदा अधिक होईल तेवढें पुस्तक अधिक वाचलें जाईल. ... ज्यांना कळत नाहीं, ज्याना ' आई 'ची पर्वा नाहीं, ते कदाचित् निंदा करतील. पण ही कथा मानसशास्त्र व मनोविश्लेषण या बाबतींत चांगलीच आहे. ही एक पूर्णपणें नीतिशास्त्रावर आधारलेली शास्त्रीय कादबरी आहे. "

( ६ ) **अरक्षणीया :** — शरद्बाबूंची ही छोटी कादंबरी आपल्या

एका निराळ्याच वैशिष्ट्यानें चमकणारी आहे. कथाकादंबऱ्यांतील नायिका बहुधा रूपवान् असतात. पण या कादंबरीतील कमला एका गरीब बापाची काळी व तोंडावर देवीचे वण असणारी कुरूप अशी मुलगी आहे. तीस रुपये महिना मिळविणाऱ्या कारकुनाच्या या पोरीचें लग्न होणार तरी कसें ? सतत मनास पोखरीत असणाऱ्या दुर्दैवी चिंतेनें व दारिद्र्याच्या आघातानें एके दिवशीं त्याचा बळी घेतला. विधवा बाईवर यापुढें या कुरूप मुलीची सर्व जबाबदारी पडली. अतुल नावाच्या एका तरुणावर मरताना तिच्या बापानें सर्व जबाबदारी टाकली होतीच. अतुल आपल्या नोकरीच्या शोधात शहरांत भटकत होता. आणि गावीं आला तेव्हा तो या दुर्दैवी लोकाना विसरून गेला. विधवा आईचे व तिच्या कुरूप मुलीचे फारच हाल होतात. वारंवार त्याना स्थलांतर करावें लागतें. कमलेला पूर्णपणें विसरून अतुल आता एका सुदर व सुधारलेल्या मुलीशीं — माधुरीशीं — लग्न करण्यास तयार होतो. ज्या एका चुलत्याच्या आसऱ्यानें कमला आपल्या दुःखीकष्टी आईबरोबर राहत होती. त्यानें तिचें लग्न एका वयातीत असलेल्या विधुराबरोबर करण्याचा घाट घातलेला पाहून दोघेंहि परत आपल्या गांवीं येतात. अतुलच्या ठरत असलेल्या लग्नाची वार्ता ऐकून दुर्दैवी मातेच्या हृदयाचा स्फोट होऊन तिचें आयुष्य संपतें. कमला एकाकी राहते. लग्नाविना राहिलेल्या या पोरक्या मुलीस समाजांतील प्रतिष्ठित लोकानींहि खूप त्रास दिला. एका साठ वर्षांच्या म्हाताऱ्याशीं तिचें लग्न लावावें म्हणून खटपटी सुरू होतात. या सर्व त्रासातून मुक्त होण्यासाठीं आत्महत्या करणें हाच एक उपाय तिच्यासमोर उरलेला असतो. तिच्या या प्रयत्नाचा शोध अतुलला लागतो. तिच्या वडिलांना मरतांना आपण दिलेलें वचन त्याच्या ध्यानात येतें व तिला सुखी करण्याचा निश्चय तो करतो. अरक्षणीयेचें रक्षण करण्यांतच पुरुषार्थ मानणारा हा अतुल शरच्चंद्रांच्या या छोट्या कादंबरींत आपलें लक्ष वेधून घेणारा आहे.

( ७ ) पथेर दावी :—शरच्चंद्राची एकमेव अशी राजकारणात्मक कादंबरी. ब्रह्मदेशातील वातावरणांत वावरणारे क्रांतिकारक भारताच्या स्वातंत्र्यासाठीं कोणकोणत्या चळवळी करीत, याचें दिग्दर्शन या कादंबरींत आहे. सरकारविरुद्ध प्रचार या कादंबरींत जहाल भाषेंत असल्यामुळें ही कादंबरी प्रसिद्ध करण्यासहि कोणी तयार होईना. प्रसिद्ध झाल्यानंतर तिच्यातील स्फोटक विचारामुळें त्या वेळच्या सरकारनें ती जप्त केली. शरद्बाबूंचा पिंड साहित्यिकाचा, कलाकाराचा. राजकारण त्यांच्या प्रकृतीस मानवणारें नव्हतें;पण राजकीय विचाराशीं ते अगदींच फटकून होते असेंहि नव्हे. कलकत्त्यास असतांना हावडा जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणूनहि त्यांनीं कांहीं दिवस काम केलें होतें. पण कोणत्याहि एकाच राजकीय पंथाचा प्रचार किंवा पुरस्कार त्यांच्या हातून झाला नाहीं 'पथेर दावी या कादंबरींत देशप्रेमानें भरलेले विचार जागजागीं विखुरलेले आढळतील. क्रांतिकारकाची चळवळ कोणत्या मार्गानें जावयास पाहिजे, याविषयीं कांहीं मार्गदर्शनहि मिळेल. पण या कथेंतील पात्राचें स्वभावचित्रण व भिन्न भिन्न धर्मीयांच्यात निर्माण झालेल्या सलोख्याचें दर्शन, हेहि दोन या कादंबरीचे विशेष म्हणून सागता येतील.

एका सनातनी ब्राह्मणाच्या घरात वाढलेला पदवीधर तरुण अपूर्वबाबू हा नोकरीनिमित्त ब्रह्मदेशांत जातो. सर्व जातींचे व सर्व धर्मांचे लोक या देशात एकत्र झालेले असल्यामुळें अपूर्वबाबूशीं त्याचा झगडा अनेक वेळा झालेला आहे. कादंबरीच्या पूर्वार्धांत परंपरा व सामाजिक क्रांति यांच्या झगड्यांतून कथानक पुढें गेलें आहे. जन्मजात अशा संस्कारांपासून संमिश्र अशा समाजांत अपूर्व राहूं लागल्यापासून त्याच्या दृष्टींत विलक्षण फेरबदल होत राहिले आहेत. महिना चारशें रुपये पगार मिळाला तरी त्या म्लेंच्छाच्या देशांत जाऊं नये म्हणून त्याच्या आईनें त्याला विरोध केला होता. पण त्याच्याबरोबर स्वजातीय असा

आचारी देऊन, जाण्यास परवानगी देण्याइतपत तिनें आपल्या मनाची तयारी केली.

या अपूर्वच्या सगतींत कितीतरी विविध प्रकारचीं माणसें ब्रह्मदेशात आलीं. भारती ही हिंदी-ख्रिश्चन मुलगी. तिच्या वडिलांशीं अपूर्वचें चागलेंच भाडण झालें. भारतीची व्यक्तिरेखा शरच्चंद्रांनीं अतिशय सुंदरपणें रगाविली आहे. देवींच्या साथींत तिचे वडील मरण पावल्या-नंतर तिनें आपल्या स्नेहशील व सभ्य वर्तनानें अपूर्वचा आपल्या-बद्दल असलेला पूर्वग्रह दूर केला. तिवारी हा अपूर्वचा आचारी अतिशय कर्मठ, पण त्याच्या आजारपणीं भारतीनें त्याची जी दक्षता घेतली ती पाहून त्याच्याहि मताचें परिवर्तन झालें. ख्रिस्ती झालेली मुलगी आपण समजतों तितकी काहीं वाईट नाहीं, असें त्यालाहि वाटूं लागलें. आणि या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, सनातनी अपूर्वबाबू आणि ख्रिश्चन धर्म स्वीकारलेली भारती एकमेकाकडे आकर्षित झालीं. दोघात अनेक वेळा चकमक उडतच असे. त्यामुळें एकदा भारती विरक्त झाली व तिनें एका शाळेंत शिक्षकाचा पेशा पत्करला. धर्म व समाज याची सुधारणा होऊन सर्वांना सुलभ असा सोपा मार्ग निर्माण व्हावा, असाहि तिचा प्रयत्न चालू होता. पीडित व दलित अशा लोकाच्या उद्धारासाठीं तिनें जीवित अर्पण केलेलें पाहून अपूर्व पुन. तिच्याबद्दल मनात कौतुकाची भावना बाळगू लागला.

कादंबरीचा उत्तरार्ध राजकीय विचारांच्या वावटळीनें भरून गेला आहे. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं चळवळ करण्याच्या उद्देशानें सुमित्रा नावाच्या तेजस्वी स्त्रीच्या नेतृत्वाखालीं एक सघटना तयार झाली होती. अपूर्व व भारती दोघेंहि या क्रांतिकारकाच्या संघटनेंत सामील झालीं होतीं. डॉक्टर नावाची एक प्रभावी व्यक्ति या संघटनेची सूत्रधार असते. डॉक्टर, सुमित्रा, अपूर्व, भारती, यांचीं भाषणें व संभा-षणें म्हणजे क्रांतितत्त्वांवरील व्याख्यानेंच होत. अपूर्व आपल्या आईस

व आपल्या परंपरेस मात्र पूर्णपणें विसरूं शकत नव्हता. या विचित्र भावनेंत तो या संघटनेचें स्वरूप बाहेर स्पष्ट करतो, त्यामुळें त्याला मृत्युदंडाची शिक्षा फर्माविली जाते. पण डॉक्टरच्या कौशल्यपूर्ण मत-प्रतिपादनामुळें अपूर्वची शिक्षा स्थगित होते. अपूर्व व भारती यांचें एकमेकाकडील आकर्षण वाढत असतें. क्रांतीचा मार्ग दोघांनींहि सोडून द्यावा, असा डॉक्टरचा उपदेश असतो. स्वातंत्र्यप्रीतीची ज्योत देशात पसरविण्यासाठीं सव्यसाची डॉक्टर देशभर प्रचार करीत असतो. क्रांति-तत्त्वावर त्याची विलक्षण श्रद्धा असते. अपूर्व, भारती आणि डॉक्टर हे वेगवेगळ्या मार्गांचे दर्शन घडविणारे आहेत. व्यक्तिदर्शनासाठीं व क्रांति-तत्त्वाच्या विवेचनासाठीं ही कादंबरी विशेष वाचनीय आहे. कादंबरीं-तील डॉक्टर किंवा सव्यसाची हा लोहपुरुष आहे. थकणें, घाबरणें, भिणें, मागें हटणें या गोष्टीच त्याला माहीत नाहींत. या पुरुषाच्या क्रांतिकारक विचारामुळेंच या कादंबरीस राजकीय महत्त्व प्राप्त झालें. सरकारनें ती जप्त केल्यामुळें तर तिच्याबद्दल अधिकच प्रीति वाचकांना वाटूं लागली. हजारों प्रती थोडक्या अवधींतच खपून या कादंबरीनें विक्रम गाजविला. प्रेमाच्या बाबतींतील उदासीनता हा शरद्बाबूंच्या पात्रांत न आढळणारा विशेष या कादंबरींतील डॉक्टरच्या स्वभाव-चित्रणांत आहे.

शरच्चंद्राच्या कांहीं प्रमुख कादंबऱ्यांचा परिचय येथें संक्षेपानें करून दिलेला आहे. गृहदाह, शेषप्रश्न इत्यादि त्याच्या महत्त्वाच्या कादं-बऱ्याहि उल्लेखनीय अशाच आहेत. याशिवाय परिणीता, चंद्रनाथ, पंडित मशाई, मेजदिदी, दत्ता, पल्लीसमाज, बामुनेर मेये, बिराजबहू, बिंदूर छेले, इत्यादि रमणीय कादंबऱ्या वाचण्यासारख्या आहेत. काहींचा त्रोटक परिचय आपण पुढें दुसऱ्याच एका निमित्तानें करून देणार आहोंत

कादंबऱ्याप्रमाणें शरच्चंद्रांच्या छोट्या कथाहि विशेष लोकप्रिय आहेत.

कादंबरी, छोटी कादबरी, कथा किंवा लघुकथा असें ठोकळेबाज वर्गीकरण शरच्चंद्रांच्या कथांचें करता येणार नाहीं. आपण ज्या गोष्टीस लघुकथा म्हणतों अशी तंत्रशुद्ध कथा त्याच्या साहित्यात शोधणें, हें बरोबर होणार नाहीं. विस्तृत अशी सहानुभूति व समाजाचें मार्मिक निरीक्षण या दोन गुणामुळें शरच्चंद्रानीं जें लिहिलें तें वाचनीय ठरलें. त्यांच्या कथांचें व कादंबऱ्यांचें एक स्वतंत्र असें तंत्रच बनवावें लागेल. आणि मनाची पकड घेणारें स्वभावदर्शन व चित्ताकर्षक संभाषण-पद्धति हे दोन त्या तंत्राचे मुख्य विशेष म्हणून सांगता येतील. त्याच्या छोट्या कथांचाहि एक स्वतंत्र गट करता येण्यासारखा आहे. रामेर सुमति, पथनिर्देश, षोडशी, हरिचरण, हरिलक्ष्मी, महेश, मंदिर, अनुराधा, बिलासी, एकादशी बैरागी, बाल्यस्मृति, वैकुंठेर विल, स्वामी इत्यादि विविध कथा आजाहि लोकादरास पात्र होतील अशा आहेत. या छोटया कथावरील चित्रपट अतिशय यशस्वी म्हणून गाजले आहेत.

' रामेर सुमति ' या कथेंत वात्सल्याचें मूर्तिमंत चित्र शरद्बाबूंनीं उभें केलें आहे. या सर्वांगसुंदर व मनोहर कथेनें वाचकांचें मन वेडावून जातें. आपल्या मराठींत शं. बा. शास्त्री, तेंडुलकर, वरेरकर यानीं या कथेचे केलेले अनुवादहि सर्वांच्या पसतीस उतरले आहेत. अनेक उपद्व्याप करणारा रामलाल व त्याची लाडकी भावजय नारायणी याच्या निरागस प्रेमाची ही मधुर कथा मनाला चटका लावणारी आहे. एकाकी असणाऱ्या रामलालच्या सर्व चुकावर ममतेनें पांघरूण घालणारी त्याची भाभी (वहिनी) सर्वांच्या आदरास पात्र झाली आहे. या कथेवर आधारलेलें नाटक प्रथम १९४४ सालीं रंगभूमीवर आलें. त्यासहि लोकप्रियता खूपच मिळाली. या साध्यासुध्या व घरगुती वातावरणाच्या कथेंत शरच्चंद्रांची कला पूर्णपणें विकसित झालेली दिसून येते. या कथेवरील चित्रपट ' छोटा भाई ' किती लोकप्रिय झालेला होता, हें वाचकांच्या ध्यानात असेलच.

' महेश ' ही छोटी कथा शरद्बाबूंनीं फारच तन्मयतेनें रंगविली आहे. या

कथेवर कडाक्याची टीका झाली. या कथेंत गोहत्या झाल्यामुळें ती क्रमिक पुस्तकांतून काढून टाकावी म्हणून चळवळहि झाली. पण ' महेश '-इतकी रम्य कथा इतरत्र सापडणें कठीण आहे. कथेचा विषय व वातावरण वेगळ्या धर्तीचें असल्यामुळें निराळीच खुमारी कथेस प्राप्त झाली आहे. काशीपूर गांवचा एक मुसलमान गफूर दारिद्र्यानें व घरच्या कटकटींनें खंगून गेलेला आहे. त्याचा एक बैल एका झाडाखालीं फुटक्या-तुटक्या अशा दोरीनें बांधला आहे. पंडित तर्करत्नमहाशय या भयंकर परिस्थिती-मुळें घाबरून गेले. पाखंडी म्लेंच्छ गफूरनें हिंदूच्या, ब्राह्मणाच्या गावात एवढें धारिष्टय करावें ! तापानें फणफणलेल्या गफूरला महाशय नाहीं-नाहीं तें बोलले. आणि त्याचा लाडका बैल—महेश—उपाशी आहे. त्याला स्वत:लाच खावयास कांहीं नाहीं तर ' महेश ' ला तो कोठून घालणार ? महेशवर गफूरची विलक्षण प्रीति. त्या उपाशी प्राण्याची समजूत तापानें फणफणणाऱ्या गफूरनें काढली, " महेश, तूं माझा मुलगा. आठ वर्षे झालीं तूंच आम्हांस खायला-प्यायला घातलेंस. पण आज तूं थकलास तेव्हां मात्र मी तुला पोटभर खायला घालूं शकत नाहीं पण तू जाण-तोस, मी तुझ्यावर किती प्रेम करतों तें. " मुक्या जनावराची समति पाहून गफूरच्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या. गफूरची आठ-दहा वर्षांची मुलगी अमीनाच घरचा संसार चालवीत होती. तिला चिंता बापाची व बापास चिंता महेशची. या कुचकामी झालेल्या म्हाताऱ्या बैलास विकण्यास मात्र गफूर तयार नव्हता. पोटच्या पोरास का कधीं विकतात !

दरिद्री बिचारा गफूर कधीं उपाशी तर कधीं अर्धपोटीं असे दिवस काढीत होता. उन्हाळ्याच्या दिवसांत त्याला सुखासुखी पाणी तरी कोण देणार ? सार्वजनिक तळीं आटून गेलेलीं. एकदा त्याच्या महेशनें जमीनदाराच्या बागेंतील सारीं फुलें खुडून टाकलीं होतीं. गफूर थोड्या रागातच होता. मोठ्या कष्टानें अमीनानें कोठून तरी पाणी मिळ-वून आणलें, पण दाराशीं येतांच तहानेनें व्याकूळ झालेल्या महेशनें

त्या पोरीला धक्का दिला, अमीना पडली, तिच्या मातीच्या भांड्यातील पाणी महेश घटाघटा पिऊं लागला. गफूरचा संताप अनावर झाला. त्यानें तीक्ष्ण सुऱ्याचा वार महेशच्या मस्तकावर केला. शरीर थरकांपत असतांनाच महेशनें अंग धरणीवर टाकलें. मागचेपुढचे पाय लांबवून महेशनें शेवटचा श्वास घेतला. महेशच्या मरणानें गफूरला मरणाच्या वेदना झाल्या. गाव सोडताना तो दाराशीं थबकला व उद्गारला, " अल्लाह ! माझा महेश तहानेलाच मरण पावला — " शरद्बाबूंच्या कलेची व त्यांच्या सहानुभूतीची परिसीमा या मुक्या जनावराच्या कथेंत झालेली दिसून येते.

मान्त्रिकाच्या नादीं लागणें व त्यांच्यापासून सर्पाचे मंत्र शिकणें, हा एक उद्योग शरच्चंद्रांनीं लहानपणीं केल्याचें आपण पाहिलेंच आहे. श्रीकांत कादंबरींत त्यांच्या या उपद्व्यापाचा थोडाफार परिचय आपणास मिळतो. ' विलासी ' नांवाची त्यांची एक छोटी कथा याच कारणासाठीं प्रसिद्ध आहे. या कथेंतील नायक मृत्युंजय याची मैत्री एका बिलासी नांवाच्या मांत्रिकाच्या मुलीशीं होती. समाजानें तिरस्कृत म्हणून मानलेल्या जातींतील पोरीशीं संसार करण्याची इच्छा धरणाऱ्या मृत्युंजयावर समाजानें कठोर टीका केली. त्याना जगणें असह्य करून सोडलें. मृत्युंजय आजारामुळें अंथरुणावर खिळला आहे अशा प्रसंगीं त्याच्या काकांनीं चारपाच माणसासमवेत त्याच्या झोपडीवर हल्ला करून बिलासीला ओढून काढलें. गावाबाहेर हाकून देण्यासाठीं तिला लोक फरफटून नेऊं लागले. त्या वेळीं ती ओरडली, " बाबूसाहेब, जरा सोडा ना मला. भाकऱ्या घरांत ठेवून येते. बाहेर कोल्ही-कुत्रीं खाऊन टाकतील हो ! ते अशक्त झाले आहेत. त्याना रात्रभर उपाशी राहावें लागेल." याच मृत्युंजयाबरोबर सापास पकडण्यासाठीं म्हणून नायक गेला होता. सर्पाच्यासंबधीं अनेक गमतीदार समजुती व त्यांना पकडण्यासाठीं लागणारे मंत्र यांचा निर्देश या कथेंत शरच्चंद्रांनीं केलेला आहे. एके

दिवशीं साप पकडीत असतानाच साप डसल्यामुळें मृत्युंजय मरण पावतो व त्याची बिलासी विषारी मुळ्या खाऊन आत्महत्या करते. यावर समाजांतील प्रतिष्ठितांनीं उद्‌गार काढले ते असे, "त्याला अपघातानें मरण येणार नाहीं तर कोणाला येणार ! पुरुषानें एक सोडून दहा बायका कराव्यात, पण तिच्या हातचें अन्न खाऊन आपलें मरण कशाला ओढवून घ्यावें ? स्वतः तर दुर्गतीस गेलाच; पण आमच्याहि तोंडास काळें फासलें ना ! ना कोणी आग देणारा राहिला, ना पिंडपाणी देणारा. श्राद्धादि क्रियाकर्म राहून गेलें कीं नाहीं !" कथेंत शेवटीं शेवटीं नायकानें म्हणजे कथा निवेदन करणारानें म्हटलें आहे, "बिलासी नरकातच गेली असेल. ती कोठेंहि जावो. माझ्या जाण्याचा वेळ येईल तेव्हां मी पण तशाच प्रकारच्या नरकांत जाण्यास कचरणार नाहीं एवढें मात्र सांगून ठेवतों." यावरून शरद्‌बाबूंची दृष्टि समजण्यासारखी आहे. जे उपेक्षित आहेत, अभागी आहेत, दुःखीकष्टी झाले आहेत, त्यांकडे लक्ष द्यावयाचें व त्यांच्या अंतरींच्या व्यथा जाणून घ्यावयाच्या, त्यांच्या दुखाःवर हळुवार अशी फुंकर घालावयाची हें शरच्चंद्रांच्या कलेचें मर्म आहे.

या दृष्टीनें आणखी एका कथेचा उल्लेख करण्यासारखा आहे. 'अभागिनीचा स्वर्ग' या नावाची एक सुंदर कथा शरच्चंद्रानीं लिहिली आहे. या गोष्टींतील अभागिनी म्हणजे कंगालीची आई. ही जन्मास येताच तिची आई मरण पावली आणि त्यामुळेंच बापानें तिचें नाव ठेवलें अभागिनी. रसिक बाघ नावाच्या एका बदफैली माणसाबरोबर तिचें लग्न झालें. एक मुलगा होताच त्यानें अभागिनीला टाकून दिलें व तो दुसरा संसार करण्यासाठीं निघून गेला. एकटया पोराच्या आधारावर अभागिनीनें दिवस कसे तरी काढले. आता कंगाली पंधरा-सोळा वर्षांचा झाला होता. या अभागिनीच्या स्वर्गवासाची हकीगत अतिशय करुणापूर्ण वाणीनें लेखकानें निवेदन केली आहे. जे वरिष्ठ आहेत, धनवान्

आहेत, प्रतिष्ठित आहेत, त्याची दुनिया वेगळीच असते. गाद्यागिद्यांवर ते लोळत असतात, पण गरिबाला मात्र अंग चोरून कसें तरी उभें राहावयासहि जागा सांपडत नाहीं. अभागिनीची कथा अशी सुरू होते.

— सात दिवसाच्या तापाच्या आजारानंतर ठाकूरदास मुखर्जीच्या म्हाताऱ्या बायकोचें निधन झालें. तिचे चार मुलगे, तीन मुली व नातवंडें यानीं मोठ्या सत्कारानें व डौलानें तिचा अंत्यविधि पार पाडला. माथ्यावर शेन्दूर, कपाळावर चंदन, अंगावर बहुमोल वस्त्रें, पुष्प, पत्र, सुगन्ध, माळा – सर्व पदार्थांची रेलचेल होती. घरांत कोणी मृत झालें आहे असें वाटत नव्हतें. पन्नास वर्षांनंतर या मोठ्या घरची गृहिणी जणुं पुनः नव्यानें आपल्या पतिगृहीं निघाली आहे. गरुड नदीच्या किनाऱ्यावर तिला अग्निसंस्कार देण्यांत आला. लाकडांची रास, चंदनाचे तुकडे, तूप, मध, इत्यादींची गर्दी उसळून गेली होती. अग्नि भडकल्यानंतर ज्वाला व धूर गगनात पसरूं लागला. हा सर्व थाट कंगालीची आई दुरून पाहत होती. सद्‌गदित होऊन तिनें उद्‌गार काढले, " भाग्यवती मा, तूं स्वर्गांत जावयास निघाली आहेस. कंगालीच्या हातानें अग्नि मिळून मीहि अशीच स्वर्गास जाईन, असा मला आशीर्वाद दे. " काळ्या रंगाच्या वर जाणाऱ्या धुराकडे तिचें लक्ष होतें. छोटयाशा रथांत बसून ठाकुरीणबाई ऐटीनें स्वर्गांत निघाली आहे, हें स्पष्ट चित्र अभागिनीच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें.

ती घरीं आली तेव्हांपासून कंगालीला तिचें सांगणें – तूं मला अग्नि दे म्हणजे ठाकुरीणबाईसारखी मी स्वर्गांत जाईन. एवढीच एक आशा तिला उरली होती. तिच्या जातींत जाळण्याची चाल नव्हती. कोठें तरी नदीकांठीं खड्डा खणून त्यात पुरणें व वर माती लोटणें हाच प्रकार होता. पण त्यामुळें स्वर्ग कसा मिळणार ? पुत्राच्याच हातानें अग्नि मिळाला तरच स्वर्ग मिळण्याची आशा. आणि हा हट्ट ती कंगालीपाशीं वारंवार धरीत होती. आपण गरीब किंवा हलक्या

जातीच्या असलों म्हणून काय झालें? पोराच्या हाताचा अग्नि मिळाल्या-वर रथ आलाच पाहिजे, असें त्या भाबडया मातेला वाटत होतें. पण परमेश्वरहि कित्येक प्रसंगीं पक्षपात करीत असतो हें काय तिला माहीत? अभागिनीचा शेवटचा आजार सुरू होता. नवऱ्याच्या पायाची धूळ शेवटीं मस्तकीं लावावी ही तिची इच्छा. पतीचा शोध करण्यासाठीं ती कंगालीला आग्रहानें सांगते, "जा, जाऊन सांग, फक्त आपल्या पायाची धूळ पाहिजे मला. जा." कंगाली आपल्या बापास घेऊन आला. स्वर्गास निघालेल्या आपल्या उपेक्षित पत्नी-पुढें रसिक बाघ येऊन उभा राहिला. आपल्या पायाच्या धुळीला मोल आहे, हें आज त्यास प्रथमच ध्यानात येऊन तो शरमिंदा होऊन गेला होता. ज्या स्त्रीवर त्यानें कधींहि प्रेम केलें नाहीं, कधीं तिच्या अन्नवस्त्राची तरतूद केली नाहीं, कधीं विचारपूस केली नाहीं, तीच स्त्री त्याच्या चरणधूलीसाठीं प्राण राखून राहिली हें पाहून रसिकाचें हृदय विरघळलें. त्याच्या डोळ्यांतून अश्रु पाझरूं लागले. नवऱ्याच्या पायांवर हात ठेवून कंगालीची आई मरण पावली.

आतां तिला स्वर्गांत जावयाचें होतें. पण कंगाली कंगालच होता. लाकडापासून पंचाईत होती. गावचा एकहि उदार मनुष्य त्याला लांकडें देत नव्हता. सर्व जण म्हणत, "अरे, तुमच्या जातींत जाळण्याची काय आवश्यकता! नदीच्या काठीं गाडून टाकलें कीं संपलें!" पण पुत्राच्या हातून अग्नि मिळवून ठाकुरणीप्रमाणें रथांत बसून स्वर्गांत जाण्याची तर तिची अंतिम इच्छा होती. दोन तास भटकून कंगाली निराशेनें एकदम वृद्ध झाला. गरिबानें, हलक्या जातीनें का कधीं थोरांचें अनुकरण करावें? नदीकांठीं खड्डा खणून आपल्या आईस त्यानें त्यात ठेवलें. थोडासा विस्तव घेऊन त्यानें आपल्या आईच्या तोंडाशीं ठेवला आणि मग वर माती लोटून दिली. कोठलें चंदन, कोठल्या पुष्पमाला, कोठली चिता, कोठला थाटमाट? कंगालीच्या आईचा स्वर्ग त्या

खड्ड्यातच होता! श्रीमंताचा स्वर्ग निराळा, गरिबाचा स्वर्ग निराळा — अशी जगाची रीत शरच्चंद्रांना दाखवावयाची होती.

याप्रमाणें कितीतरी कथांचीं उदाहरणें घेता येतील. विविध प्रकारें आलेले चमत्कारिक अनुभव शरद्बाबूंनीं छोट्या कथांच्या स्वरूपात साकार केले आहेत. शरच्चंद्र कादंबरीकार कीं कथाकार या प्रश्नाचें उत्तर शोधणें बरोबर होणार नाहीं. आपल्या विशिष्ट शैलीनें कथानक सजीव करावयाचें, वाचकाचें चित्त ओढून घ्यावयाचें, एवढेंच त्यांना माहीत — मग ती छोटी गोष्ट असो वा मोठी कादंबरी असो.

● ● ●

## अखेरचें परिभ्रमण : ६

आयुष्यांत कधीं लाभली नव्हती एवढी स्वस्थता आता शरच्चंद्रांना प्राप्त झाली होती त्यांच्या भटक्या जीवनाचा शेवट होऊन कलकत्त्यास बाजे शिवपूर येथें शरद्बाबू घर बांधून स्थायिक झाले. त्यांची साहित्यिक कीर्ति वाढीस लागलेली असून त्यांच्या नावाचा बोलबाला सर्वत्र होत होता. प्रमुख मासिकांचे संपादक त्यांच्या कथा आपल्या मासिकांसाठीं मिळविण्यासाठीं धडपड करूं लागले होते. केवळ लेखनक्रियेवर धनवान् होणाऱ्या साहित्यिकांत शरच्चंद्रच क्रमानें व किमतीनें पहिले होते. चौदा-पंधरा हजार रुपयांपर्यंतची वार्षिक प्राप्ति त्यांना होऊं लागली होती. लहानपणीं केवळ परीक्षेची फी भरण्यासाठीं पैसे नाहींत म्हणून शरच्चंद्रांना कॉलेजचें शिक्षण सोडून द्यावें लागलें होतें. आज त्यांचे ग्रह पूर्णपणें पालटलेले होते. जीवनातील स्थैर्य व संपत्तीचा लाभ या दोनहि दुर्मिळ गोष्टी त्यांच्या पायांशीं चालून आल्या होत्या. त्यांच्या कथाकादंबऱ्यांच्या वीस-वीस आवृत्त्या निघण्याचें दुर्मिळ भाग्य त्यांना लाभलें होतें. मानसन्मान वाढीस लागला होता.

सर्व देशांत त्यांचा गौरव ज्याच्या-त्याच्या तोंडीं होता. कलकत्ता विद्यापीठानें त्यांना ' जगत्तारिणी ' हें बहुमानाचें सुवर्णपदक देऊन त्याच्या कलेचा सन्मान केला. डाक्का विद्यापीठानें त्याना डी. लिट्. ही सर्वोच्च पदवी देऊन त्याचा गौरव करून त्याच्या कथाकौशल्याचा व विद्वत्तेचा गौरव केला. डॉ. चट्टोपाध्याय आता पूर्वीसारखे भ्रमण करणारे कलंदर राहिले नव्हते. निरनिराळीं मासिकें ' शरद्-विशेषांक ' सजविण्यासाठीं खटपट करीत होतीं. जागजागीं शरद्-मंडळें निर्माण होऊन त्याच्या कथासाहित्याच्या विवेचक अभ्यासास प्रारंभ झाला होता.

' पथेर दाबी ' कादंबरीनें त्याचें नाव राजकीय गोटातहि उच्चारलें जाऊं लागलें. क्रांतिकारकाबद्दल डॉ. शरच्चंद्राना नेहमींच सहानुभूति वाटे. देशगौरव सुभाषचंद्र बोस व देशबंधु चित्तरंजन दास याच्या मित्रमंडळींत शरद्बाबूंना मानाचें स्थान होतें. सन १९२२ मध्यें हावडा कॉंग्रेस कमिटीचे सभापति म्हणून त्याची निवड झालेली होती. स्वतः नियमानें शरच्चंद्र चरख्यावर सूत काढीत असत. स्वतः तयार केलेल्या सुताची एक चादर त्यानीं आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय याना मोठ्या भक्तिभावानें अर्पण केली होती. तसें पाहिलें तर रॉयसारख्या शास्त्रज्ञास कथाकादंबऱ्याचें वेड कसें असणार ? पण प्रफुल्लचंद्र शरच्चंद्रांच्या कथा मात्र मोठ्या आवडीनें वाचीत असत. सुभाषचंद्रांचे बंधु शरच्चंद्र बोस यांच्याशींहि डॉ. चट्टोपाध्याय यांची गाढ मित्रता होती. क्रांतिकारकाना ते हरप्रकारचें साह्य देत असत. नॅशनल कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून सुभाषचंद्र बोस याची नियुक्ति झाली होती. शरच्चंद्रानीं आपल्या कॉलेजांत अध्यापनाचें कार्य करावें म्हणून सुभाषचंद्रानीं विनंती केली होती. ती डॉ. चटोपाध्यायानीं मान्यहि केली होती.

डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचा कीर्तिचंद्र दिवसेंदिवस याप्रमाणें वाढीस लागला असतांनाच त्यांच्या अंतर्मनास मात्र क्षीणता येत होती. सदैव भटकण्याची वृत्ति व कमालीचें दारिद्र्य यामुळें त्याच्या प्रकृतीची

पहिल्यापासूनच हेळसांड झालेली होती. या उपद्व्यापी व जगाच्या दृष्टीनें कामातून गेलेल्या पोराची काळजी कोण घेणार? ब्रह्मदेशात असतांना त्याची प्रकृति नेहमीं कशी बिघडत असे, हें आपण पाहिलेंच आहे. शरीर रोगांनीं पोखरलेलें असल्यामुळें त्याना नेहमींच चिंता वाटे. सन १९१३ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांत ते लिहितात, "कधीं कधीं असें वाटतें कीं, कांहीं दिवस सुटी घेऊन ब्रह्मदेशातच एखाद्या शांत ठिकाणीं जाऊन विश्रांति घ्यावी. कलकत्त्यास येऊंच नये. ... लिहिणें-वाचणें जवळजवळ सोडूनच दिलें आहे. तुम्ही लोक कलकत्त्यास या म्हणतां; पण मला तें कांहीं पसंत नाहीं. नोकरी चाकरी सोडून हें अस्वस्थ शरीर घेऊन नुसतें उदरंभरण करणें मला पसंत नाहीं. ... आणि कोणाच्या घरीं जाऊन राहणें, हें तर अगदींच असंभव आहे. फार झालें तर मी इस्पितळांत मरेन पण कोणत्याहि अवस्थेंत या पीडित शरिराला घेऊन कोणाच्या घरीं शेवट व्हावा, असें मला वाटत नाहीं. या गोष्टीबद्दल मला घृणा वाटते. माझे नातेवाईक व मित्र पुष्कळ आहेत हें मी जाणतों. कांहीं दिवस ते माझी निगा राखणार नाहींत असें नाहीं, पण उगाच कोणास कष्ट द्यावेत हें मला मान्य नाहीं. जर कदाचित् गेलोंच कोणाच्या घरी तर मी माझ्या बहिणीच्या घरीं जाईन. एक प्रकारें तें माझेंच घर आहे. तिचीहि परिस्थिति चांगली असून ती वारंवार मला आग्रह करीत असते. पण या रोगग्रस्त शरिराला घेऊन जावें असें वाटत नाहीं. मला वारंवार धास्ती वाटते कीं, माझ्या अचानक मरणानें कोणाला त्रास होईल कीं काय?..." अशी ही त्यांची नाजुक प्रकृति एकसारखी असे. या रोगपूर्ण शरिरांत बेडर मनाचा निवास असेल हें कोणास खरें वाटणें सुद्धां कठीण.

सन १९३६ मध्यें भयंकर उन्हात आपल्या गावापासून देउलटी स्टेशनपर्यंत पायीं चालत आल्यामुळें त्याना बराच त्रास झाला. त्याच्या डोक्यात चमका निघूं लागल्या. डॉक्टर-वैद्यांनीं चिकित्सा केली कीं

ह्या मेंदूविषयक रोग असावा. अल्ट्रा-व्हॉयोलेट किरणांचाहि उपचार करण्यात आला; पण कोणत्याहि उपायाचा फारसा फायदा झाला नाहीं. लिहिणें वाचणें यामुळें तर अधिकच वेदना होत असत. कोणी सांगत कीं, डोळे खराब झाले म्हणून हें दुखणें निर्माण झालें. म्हणून अनेक वेळा चष्मेहि बदलून पाहिले. पण दुःख कमी होईना. अंगातील ज्वर तसाच कायम होता. मलेरियाचा ताप समजून अनेक इंजेक्शनें व क्विनाइनचे डोस देण्यात आले. तरीहि उपयोग झाला नाहीं. शेवटीं 'बी कोलाई' नांवाच्या रोगाची चिकित्सा झाल्यावर त्यावर औषधोपचार चालू झाल्यानंतर मात्र रोग आटोक्यात आला. शरद्बाबूंची प्रकृति तात्पुरती का होईना पण सुधारली.

त्याच वर्षी पुनः ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें पुनः प्रकृति बिघडून गेली. आतां नेहमींप्रमाणें पोटात बिघाड झाला होता. खाल्लेलें अन्न बिलकुल पचत नसे. डिस्पेप्शिया रोगाचें निदान झाल्यानंतर उपचार सुरू झाले. पण रोग वाढत जाऊन पुनः यातना सुरू झाल्या. कलकत्त्यास आल्यानंतर डॉ बिधानचंद्र रॉयनीं नीट परीक्षा केली. क्ष-किरणानीं तपासणी केली तेव्हां आढळून आलें कीं, यकृतात कॅन्सर झालेला आहे. वाढत वाढत तो पाकस्थलीपर्यंत येऊन पोंचला आहे. यापूर्वीच उपाययोजना व्हावयास पाहिजे होती. आता ऑपरेशन करणें अगत्याचें असल्यामुळें नाहीं नाहीं म्हणत असतानाच ते तयार झाले. शरच्चंद्रांच्या प्रकृतींत दुर्बलता अधिक आली होती व ऑपरेशन तर फार कठीण व धोक्याचें होतें. एखाद्या चागल्या नर्सिंग होमची निवड करण्याचें काम चालू झालें. डॉक्टर मायच्या नर्सिंग होममध्यें शरद्बाबू दाखल झाले. पण तेथें त्याचें तंत्र न जमल्यामुळें परत आपले एक मित्र डॉक्टर चतर्जी याच्या शुश्रूषागृहांत येऊन ते दाखल झाले.

पण आतां कोणताहि उपाय चालण्यासारखा नव्हता. सर्व डॉक्टर-वैद्य निराश होऊन गेले होते. अन्नाचा कणहि पचनीं पडत नव्हता.

कृत्रिम तऱ्हेनें पोटात अन्न घालण्याचे उपाय सुरू झाले. रक्ताचा पुरवठा कमी पडल्यानंतर त्यांचे बंधु प्रकाशचंद्र स्वतःचें रक्त देण्यास तयार झाले. यानंतर एकदोन दिवस प्रकृति सुधारली होती, पण हा अखेरचाच तजेला होता. सन १९३८ सालीं जानेवारीच्या १६ तारखेस सकाळीं दहा वाजता बंगालच्या या महान् कथासम्राटानें या लोकचें वास्तव्य संपविलें. सबंध देशभर भ्रमंती करून थकलेल्या त्याच्या आत्म्यानें परलोकचें भ्रमण सुरू केलें. ११ वाजता त्यांचें शव त्यांच्या घरीं आणण्यात आलें. सायंकाळीं स्मशानयात्रा निघाली. आवडत्या कादंबरीकाराचें शेवटचें दर्शन घेण्यासाठीं अलोट गर्दी लोटली होती. केवडेतळीमधील स्थानावर त्यांच्या शवास पावणेसहा वाजतां अग्निसंस्कार देण्यात आला. शरच्चंद्रांचा पार्थिव देह नष्ट झाला व त्याची वाङ्मयीन कीर्ति मात्र मधुर सुगंधाप्रमाणें दरवळत राहिली.

शरद्बाबूंचें एकदर आयुष्य एकसष्ट वर्षें व काहीं महिने. मरणापूर्वी " मला द्या, मला द्या " असे उद्‌गार दोन-तीन वेळा त्यांनीं काढले होते. त्यांच्या मनांत कोणता अर्थ होता कोणास माहीत ? त्यांच्या मृत्यूनें साऱ्या बंगालमध्यें हाहाकार माजून राहिला. त्यांचे निंदकहि त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागले. विश्वकवि रवीन्द्रनाथ ठाकूर यानीं आपली श्रद्धांजलि पुढीलप्रमाणें अर्पण केली —

" जाहार अमर स्थान प्रेमेर आसने,
क्षति तार क्षति नय मृत्युर शासने।
देशेर माटिर थेके निलो जरि हरि,
देशेर हृदय तारे राखियाछे वरि ॥ "

( **भावार्थ** प्रेमाच्या आसनावर ज्याचें स्थान अमर आहे, त्याला मृत्यूच्या शासनाचें भय कसलें ? मातृभूमीच्या धुळीमध्यें ज्याचें अवसान झालें, त्याला देशाच्या हृदयांत मानाचें स्थान प्राप्त होतें ! )

शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचें वैयक्तिक चरित्र येथें संपलें. त्यांच्या आयुष्यक्रमाचा ओझरता परिचय आपण करून घेतला आहे. यानंतर त्यांच्या मित्रमंडळीशीं त्यांचीं जीं अनेक संभाषणें झालीं त्यावरून त्यांच्या स्वभावाच्या छटा कळण्यासारख्या आहेत, म्हणून काहींचा उल्लेख या ठिकाणीं करणें उचित होईल. त्यांच्या स्वभावाचे काहीं विशेष त्यामुळें सुस्पष्ट होण्यास मदत होईल. प्रत्यक्ष व्याख्यान देणें शरद्‌बाबूंना फारसें जमलें नाहीं. अनेक सभासमारंभांना ते जात असत, पण चारपांच मिनिटांत त्यांचें भाषण संपत असे. रवीन्द्रनाथ सव्यसाची कलावंत होते. नाटक, कथा, कादंबरी, काव्य, निबंध, तत्त्वज्ञान, टीका, चित्रकला इत्यादि विविध प्रांतांत रवीन्द्रांचें यश अतिशय उज्ज्वल असें होतें. त्या मानानें शरद्‌बाबूंचें कर्तृत्व मर्यादित स्वरूपाचें होतें. पण त्या मर्यादित क्षेत्रांत मात्र त्यांनीं यशाचें शिखर गाठलें होतें. रवीन्द्रनाथाप्रमाणें मधुर वाणी व्याख्यानासाठीं त्यांना लाभली नव्हती.

बंगालचे सुप्रसिद्ध कवि सत्येन्द्रनाथ दत्त यांचें निधन झाल्यानंतर ठिकठिकाणीं शोकसभा झाल्या. रवीन्द्रनाथानंतर नाव घेण्यासारखा एक बंगाली कवि म्हणजे सत्येन्द्रनाथ दत्त. एका सभेंत रवीन्द्रनाथानीं सत्येन्द्रांचा गौरव करून त्यांना आपली सुमनांजलि अर्पण केली एका कॉलेजमध्येंहि सभा झाली. शरद्‌बाबू बोलणार म्हणून जाहीर झालें होतें लोक या विलक्षण माणसाचें वक्तृत्व ऐकण्यास उत्सुक होते. पण शरच्चंद्रांना येण्यास उशीर लागला. कोणा दुसऱ्या एका माणसानें सभेचें कामकाज सुरू केलें. भीत भीत शरच्चंद्रांनीं सभास्थानीं प्रवेश केल्याबरोबर त्यांची खुर्ची आधींच्या माणसानें रिकामी केली. मोठ्या संकोचानें त्यांनीं त्या जागेचा स्वीकार केला. तीन-चार साहित्यिकांचीं भाषणें झालीं आणि शरच्चंद्र बोलावयास उठले. मेजावर हात ठेवून थोडें वाकून त्यांनीं तोंडावाटे अस्पष्टपणें बोलावयास आरंभ केला. कोणालाहि त्यांचें बोलणें नीटसें ऐकूं गेलें नाहीं. ज्यांनीं ऐकलें त्यांना समजलें

नाहीं. शेवटीं एकदा त्याचा सूर लागला. ते खड्या सुरांत म्हणाले, " हां, ठीक आहे. सत्येन्द्रनाथांच्या निधनानें बंगालमधील साहित्यिकांचा समाज शोकसागरात बुडून गेला आहे. आम्ही कांहीं काळ खूप मजेंत रडावें, बस. आपलें कर्तव्य संपलें. चला, आपापल्या घरीं निघून जा. " हें डॉ. चट्टोपाध्यायांचें वक्तृत्व ! पुनः त्यांनीं भाषणास आरंभ केला, " आज आपण वारंवार सांगितलें कीं, सत्येन्द्रनाथ केवढे मोठे कवि आहेत. त्याच्यासाठीं जागजागीं शोकसभा होत आहेत. पण ते जेव्हा जिवंत होते तेव्हां कोणत्याहि सभेच्या संयोजकास सुचलें नाहीं कीं, सत्येन्द्र साहित्यसभेचे अध्यक्ष होण्याच्या योग्यतेचे आहेत. त्या वेळीं मोठमोठे राजे महाराजे व मोठमोठे सरकारी अधिकारीच सभापति बनत असत. ' शरद्‌बाबूंची स्पष्टपणें बोलण्याची निर्भयवृत्ति या वेळीं सर्वांना दिसून आली.

* * *

गांधींच्या नेतृत्वाखालीं राजकारणाचा गाडा हाकणाऱ्या काँग्रेसच्या कार्यकर्त्यांत शरद्‌बाबू मिसळून होते तरी गांधींचें सर्वच्या सर्व तत्त्वज्ञान त्यांना पसंत नव्हतें एके दिवशीं त्यांच्या घरीं काहीं खादीधारी काँग्रेसभक्त आले व त्यांनीं शाळेंत मुलांना व कांहीं स्त्रियांना राष्ट्रीय झेंडा बरोबर घेऊन प्रभातफेरी काढल्याबद्दल पोलिसांनीं कसा त्रास दिला हें निवेदन केलें अहिंसात्मक प्रतिकाराची कल्पना उराशीं बाळगणारे हे काँग्रेसचे वीर स्वस्थपणें पाहत बसलेले पाहून शरत्चंद्रांचा क्रोध अनावर झाला. ते रागावून म्हणाले, " या प्रकारें महिलांच्यावर अमानुष अत्याचार होत असताना तुम्ही स्वस्थ राहिलात ? अहिंसा व संयम यांवर विश्वास ठेवून तुम्ही नुसतें पाहत राहिलांत ! अहिंसात्मक असहयोग, निष्क्रिय प्रतिरोध, सविनय अवज्ञा इत्यादि सिद्धान्तांना महिलांच्या इज्जतीपुढें वा त्यांच्या अब्रूपुढें मी कवडीचीहि किंमत देणार नाहीं अहिंसा तत्त्वज्ञान आम्हांस अशा प्रकारें नादान व भित्रें बनवणार काय ? आपल्या लेकी-

९८५४८ अ.-चरित्र ८०५ २५/८/५५

स्तुनांची मानप्रतिष्ठा, त्यांची इज्जत-अब्रू यांचें रक्षण न करतां अपमान मनांत गिळून चुपचाप बसणें यात का पुरुषार्थ मानावयाचा? व्यक्तिगत स्वरूपांत तर मला हें केव्हांच मान्य होणार नाहीं. माझ्या पूर्वीच्या भटक्या वृत्तीच्या काळांत बेशिस्त वर्तनाबद्दल इंग्रज लोकांना पिटून काढण्याचें सौभाग्य वा दुर्भाग्य मला पुष्कळ वेळां प्राप्त झालें होतें. ब्रह्मदेशांत जेथें मी नोकरी करीत होतों त्या कचेरींत अधिकाऱ्यानें भारतीय लोकांची बदनामी विनाकारण केलेली पाहून त्याची-माझी चांगलीच झकाझकी झाली. ... गांधींच्या तत्त्वज्ञानाला मी मानतों. माझी त्यांच्यावर श्रद्धा आहे. पण त्याच्या सिद्धान्तांवर अक्षरशः सहमत होण्याची प्रतिज्ञा मात्र मीं घेतलेली नाहीं मी मनुष्य आहें, मातीचा पुतळा नाहीं. स्वतंत्र विचार करण्याची शक्ति माझ्याजवळ आहे."

सशस्त्र क्रांतिकारकांना शरद्बाबू नेहमीं प्रेमानें आसरा देत व वेळ-प्रसगीं त्याना आर्थिक मदतहि करीत असत. यातील इंगित आता ध्यानात येण्यासारखें आहे. विख्यात क्रांतिकारक रासबिहारी बसू याना पोलिसांनीं घेरलें. यांतून सुटण्याचा मार्ग ते व त्यांचे सहकारी शोधीत होते. एके दिवशीं रात्रीं दहा वाजतां एक इसम शरच्चंद्राकडे आला व त्यानें सांगितलें कीं, आत्ताच्या आत्ता सात हजार रुपयांची व्यवस्था झाली तर रासबिहारी सुरक्षितपणें सीमापार होऊन जातील. शरच्चंद्रांना चिन्ता निर्माण झाली. त्याच्याजवळ इतकी मोठी रक्कम नव्हती. क्षणभर ते चिन्ताक्रान्त झालेसे दिसले. आणि मग काहीं निश्चय करून ते उठले व एका मारवाडयाकडून तात्काळ त्या रकमेचा चेक घेऊन आले. क्रांतिकारकाच्या कार्यावर 'पथेर दाबी' कादंबरी लिहि-णाऱ्या कलावंताची या प्रकारें श्रद्धा होती. त्यांना गांधींचें तत्त्वज्ञान जसेंच्या तसें कसें पटणार!

शरच्चंद्र कोणत्याहि एका धर्माचे वा पथाचे असे नव्हते. हिंदुसमाज असो, ब्राह्मसमाज असो, त्यांच्यातील गैरसमजुतींवर किंवा विक्षिप्त चाली-

रीतींवर शरच्चंद्र आपल्या कथासाहित्यांतून कडक टीका करीत असत. मुसलमान समाजाबद्दल त्यांना प्रीति वाटे. त्यांच्या अंतरंगांतील भावना त्यांनीं ममतेनें ओळखल्या होत्या. आपल्या कथांतहि त्यांनीं मुसलमान समाजांतील व्यक्तींचीं चित्रणें अनेक ठिकाणीं केलीं आहेत. एके दिवशीं सायंकाळीं त्यांच्या घरासमोरून दोन मुसलमान गृहस्थ चालले होते. नमाज पढण्याची वेळ झाल्याचें त्यांच्या ध्यानांत येतांच ते शरद्‌बाबूंच्या घराशेजारींच नमाज पढण्याची व्यवस्था करूं लागले. हातपाय धुण्यासाठीं पाण्याचा लोटा त्यांनीं शरच्चंद्रांपाशीं मागितला. शरच्चद्रांनीं मोठ्या प्रेमानें त्याना पाणी दिलें. हातपाय धुतल्यानंतर तेथेंच एका झाडाखालीं त्यांनीं नमाज पढण्यास प्रारंभ करण्याची तयारी केल्याचें पाहून शरद्‌बाबूंनी त्यांना आपल्या घरात बोलावलें. एका पडवींत त्यांनीं त्या मुसलमानाना गालिचा अंथरून दिला. त्यावर बसून त्या धार्मिक मुसलमानांनीं भक्तिभावानें नमाज पढण्याचें आपलें कार्य केलें. त्यानंतर शरच्चंद्रांनीं आतिथि लोकांप्रमाणें त्याचा सत्कार केला. त्याना जेवावयास घातलें. रात्रीं आपल्याच घरीं ठेवून घेतलें. मुसलमान समाजाबद्दल अशी प्रीति सर्वांच्या मनात उदयास आली तर हिंदु-मुसलमान ऐक्याचा प्रश्न आज वाटतो तितका अवघड वाटणार नाहीं. मुसलमान समाजाच्या अंतरंगाचें निरीक्षण करून एक सुंदर कादंबरी लिहिण्याची विनंती शरच्चंद्रांनीं रवीन्द्राना केली होती. स्वतःहि मुसलमान साहित्यकार काजी अब्दुल वदूद यांच्या साह्यानें त्यांनीं मुसलमानी रीतीभातींचें निरीक्षण चालू ठेवलें होतें. एक कादंबरी याच विषयावर लिहावी असें त्याच्याहि मनात होतें. पण बिघडत चाललेल्या प्रकृतीमुळें व अकाली झालेल्या निधनामुळें हें काम तसेंच राहिलें. आशुतोष कॉलेजमध्यें वंग साहित्य संमेलनाच्या द्वितीय वार्षिक संमेलनात शरच्चंद्रानीं ‘ मुस्लिम साहित्य-समाज ’ या विषयावर जें भाषण केलें तें या दृष्टीनें विचार करण्यासारखें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा क्र. ८५६४

१९२३ सालची गोष्ट. या वर्षीचें नोबेल पारितोषिक कोणा भारतीय लेखकास मिळणार असल्याचें वृत्त वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालें. यापूर्वी दहा वर्षांमागें रवीन्द्रनाथांना हें बक्षीस मिळालें होतें. आतां रवीन्द्रांच्यानंतर शरद्‌बाबूंखेरीज दुसरा मोठा भारतीय लेखक कोणी नव्हता. त्यामुळें सर्वांचें लक्ष शरच्चंद्राकडे वळलें. त्यांच्या 'श्रीकांत'-च्या इंग्रजी व फ्रेंच अनुवादानें फारच लोकप्रियता मिळवली होती. कदाचित् याच कलाकृतीस बक्षीस मिळावें असा लोकांचा तर्क. या प्रसंगीं श्री. इलाचंद्र जोशी शरद्‌बाबूंना जाऊन भेटले. त्यांचा झालेला संवाद मोठा मार्मिक असून शरच्चंद्राच्या स्वभावावर प्रकाश टाकणारा आहे —

शरच्चंद्र — हे पाहा, खरी गोष्ट अशी आहे कीं, वृत्तपत्रात वाचल्यापासून मनात थोडी खळबळ उडालेली आहेच. मी विचार करतों आहें कीं, बक्षीस मिळवणारा एवढा मोठा भारतीय लेखक आहे तरी कोण ?... डॉ. इकबालच्या कवितांची चर्चा आजकाल इंग्लंडमध्यें फार होत आहे. सरोजिनी नायडू यांनाहि नोबेल पारितोषिक मिळणें असंभवनीय नाहीं.

इलाचंद्र जोशी— मी व्यक्तिगत दृष्टीनें त्या पारितोषिकास फारसें महत्त्व देत नाहीं. उच्च कोटीच्या साहित्याचा नीट विचार त्या कमिटीनें केलेला असतोच असें नव्हे. असे किती तरी श्रेष्ठ कलाकार आहेत कीं, ज्यांना लोकप्रियतेचें भाग्य मिळालें नाहीं. मग त्यांच्या कलाकृतींना पारितोषिक तरी कसें मिळणार ? तेव्हा ज्याला नोबेल पारितोषिक मिळालें त्याचीच कृति त्या वर्षाची सर्वश्रेष्ठ असें आपणास कसें म्हणता येईल ? आपल्या 'श्रीकांत'चा पहिला भागच अनुवादित झाला आहे...दोनहि भागाचा अनुवाद इंग्रजींत झाला तर अजूनहि त्यातील मर्म इंग्रजी भाषिकांच्या ध्यानात स्पष्टतेनें येईल.

शरच्चंद्र— नाहीं. माझा असा विश्वास आहे कीं, पाश्चात्य जनता 'श्रीकांत'चा पहिला भागच मोठ्या आवडीनें वाचील. कारण अन्नदा

दिदी व इंद्रनाथ यांचीं दर्शनें त्याना एकदम नवीं व कुतूहलवर्धक अशीं वाटणारीं आहेत. त्याचें दर्शन फक्त भारतीय वाङ्मयांतच घडूं शकेल. दुसऱ्या भागातील विद्रोहिणी अभया, तिचा चरित्रहीन व अत्याचारी पति पाश्चात्य लोकांना नवीन वाटणार नाहीं . तुमच्या मनात मला नोबेल पारितोषिक मिळावें असें आहे. पण अजून कोठलाच निर्णय ठरावयाचा आहे. पुरस्कार मिळेल तर ठीकच. नाहीं तरी मला कांहीं खेद व्हावयाचा नाहीं......

इलाचंद्र जोशी— शिवाय नोबेल पारितोषिक न मिळतांहि दिगंत कीर्ति मिळविणारे लेखक आहेतच कीं. टॉल्सटॉयचें नांव कोणास माहीत नाहीं ? अनाटोल फ्रान्स याना वयाच्या ७६ व्या वर्षी नोबेल पारितोषिक मिळालें. त्याच्याअगोदरच त्यांचें नाव जगांत प्रसिद्ध झालें होतें. ..पण बिचाऱ्या भारतासारख्या देशाची कठीण परिस्थिति अशी आहे कीं, तेथील लेखकाचें नाव त्या त्या प्रांतातील लोकांना सुद्धां माहीत नसतें.

शरच्चंद्र— याचें कारणहि स्पष्ट आहे. या देशांत पसरून राहिलेलें अज्ञान, सुसंस्कृत साहित्याबद्दल अरुचि, सामाजिक व आर्थिक दुरवस्था इत्यादि अडचणींमुळें या देशांतील लोक उच्च दर्जाचीं पुस्तकें कशीं घेणार ? आणि वाचणार तरी केव्हा ! मग पाश्चात्य लोकांनीं तरी आपलें वाङ्मय कां वाचावें ? गुलामाच्या देशांत उच्च दर्जाचें साहित्य निर्माण होतें हें त्याना कसें पटावें ?... पण कांहीं जाणते असतातच. कांहीं दिवसापूर्वी एका इटालियन माणसाचें पत्र मला आलें होतें. मूळ बंगालीमधून त्यानें 'श्रीकांत' कादंबरी वाचली होती. विश्वसाहित्यातील फार वरच्या श्रेणीची कथा म्हणून त्यानें गौरव केला व इटालियन भाषेंत तिचा अनुवाद करण्याची आपली इच्छा त्यानें प्रदर्शित केली आहे. आपल्या देशांतील अवस्था फार कठीण आहे...आपल्याजवळ प्रचारसामग्री नाहीं, धनबल नाहीं, जनबल असून नसल्यासारखें आहे. संघटना तर मुळींच नाहीं.

यानतर त्यांची अनेक साहित्यिक प्रश्नावर चर्चा झाली.

* * *

देशबंधु चित्तरंजन दास याची व शरच्चंद्राची मैत्री अतिशय गाढ होती. देशबंधूंच्या मृत्यूमुळें शरद्बाबूंची मनःस्थिति विचलित झाली. ' वसुमति ' पत्रिकेंत त्यांनीं त्यांच्या आठवणींसंबंधीं एक लेख लिहिला आहे. शरद्बाबूंच्या मतावर व स्वभावावर प्रकाश टाकणारा त्यांतील थोडा भाग येथें देण्यासारखा आहे. प्रारंभींच शरच्चंद्र लिहितात, " पराधीन देशाचा सर्वांत मोठा अभिशाप हा आहे कीं, मुक्तिसंग्रामांत त्यास विदेशी लोकांपेक्षा स्वदेशी माणसांशींच अधिक लढावें लागतें या लढाईचें प्रयोजन ज्या दिवशीं समाप्त होईल त्या दिवशीं देशाच्या पायांतील शृंखला आपोआप नष्ट होतील. पण असें होण्यापूर्वीच देशबंधु परलोकास निघून गेले. .. त्या दिवशीं पाटण्यास जाण्यापूर्वी त्यांनीं मला बोलावलें. अस्वस्थ असल्याकारणानें ते पलंगावर पडून होते. मी जवळ जातांच क्षीण स्वरात देशबंधु बोलले, आतां अखेरी जवळ आली शरद्बाबू !

आपण तर म्हणत होता, ' याचि देहीं याचि डोळा ' स्वराज्य मिळालेलें पाहून मग जाईन ! ' शरच्चंद्रानीं सांगितलें.

क्षणभर गप्प राहून त्यांनीं उत्तर दिलें–' पण आतां समय उरला नाहीं.'

ज्या वेळीं ते जेलमध्यें असत तेव्हा कांहीं माणसें त्या तुरुंगाच्या भिंतींनाच नमस्कार करतांना मीं पाहिलें होतें. त्यांना कारण विचारलें कीं ते सांगत, आपले देशबंधु आंत आहेत ना. त्याना डोळ्यानीं पाहणें शक्य नसल्यामुळें ते भिंतीलाच प्रणाम करीत देशबंधूंनाहि ही गोष्ट माहीत होती. त्याची आठवण त्यांना देऊन मीं म्हटलें, ' हे लोक आपणास कसे सोडतील ! ' चित्तरंजन दास यांच्या डोळ्यातून अश्रु ओघळत होते. थोड्याच वेळात स्वतःस सांवरून त्यांनीं विषय सोडून दिला. .. ..

... एके दिवशींची आठवण येते. रात्रीं नऊ वाजून गेले होते. बाहेर पाऊस पडत होता व घरांत सुभाष (नेताजी), देशबंधु व मी असे काहीं वर्गणी जमविण्याच्या उद्देशानें बसलों होतों. मी एकदम चिडून म्हटलें, 'गरज काय आपल्यासच आहे? देशांतील लोकांनाच जर जरूरी नसेल तर राहूं द्या' त्याबरोबर मनावर आघात झाल्यासारखें होऊन शरद्‌बाबूंना देशबंधु म्हणाले, 'शरद्‌बाबू, हें ठीक नव्हे. आपलाहि यांत काहीं दोष आहे. आपणहि काम कसें करावें हें बरोबर जाणत नाहीं. ' शरच्चंद्र, देशबंधु चित्तरंजन दास व सुभाषचंद्र बोस यांच्या अनेक वेळां चर्चा होत असत. वर्तमानकाळची परिस्थिति, कॉंग्रेसचें राजकारण, देशांतील समाजस्थिति, स्वातंत्र्य, स्वराज्य, क्रांतिकारकाचें तत्त्वज्ञान या व यासारख्या कित्येक विषयांवर शरद्‌बाबूंचे विचार मननीय होते पुढल्या एका प्रकरणांत आपण या विषयासंबंधीं संपूर्ण विवेचन करणार आहोंतच.

* * *

शरच्चंद्र राजकीय विचाराबाबत कोणत्याहि एका पंथाचे वा संप्रदायाचे नव्हते, तरी साहित्यिकानें राजकारणांत कोणता पंथ धरावा याबद्दल मात्र त्यांचे विचार दृढ असे होते. देशांतील समाजपरिस्थितीचें मार्मिक निरीक्षण करणें व त्याच्या उद्धाराचा मार्ग दाखविणें हें कार्य कलावंत साहित्यिकास करणें शक्य आहे, असें त्यांना वाटे. यासंबंधीं प्रो हुमायून कबीर यांच्या शरच्चंद्रावरील पुस्तकास प्रस्तावना लिहितांना युसुफ मेहेरअल्लींनीं दिलेली आठवण येथें देण्यासारखी आहे. युसुफ मेहेरअल्ली लिहितात,

— शरच्चंद्र चतर्जींच्या मृत्यूपूर्वी काहीं दिवस मीं त्यांची भेट घेतली. हीच माझी शेवटची भेट, असें मला वाटलें नव्हतें. कलकत्त्यास एका परिषदेच्या निमित्तानें मी आलों होतों व तेथें शरच्चंद्र उपस्थित होते. परिषदेच्या कामकाजानंतर आम्ही गप्पा मारण्यासाठीं त्यांच्या घरीं गेलों.

शरद्बाबू प्रकृतीनें जर्जरच झालेले दिसले, अविरत कार्य करणें त्याना अशक्य झालें होतें. डॉक्टरांनीं संपूर्ण विश्रांति घेण्याबद्दल त्यांना बजावलें होतें. पण त्याना स्वस्थ पडून कसचें राहवतें ?

" आपणास सध्या कोणत्या विषयावरील पुस्तकें आवडतात ? " मीं विचारलें.

" प्रकृतिदौर्बल्यामुळें आता पहिल्यासारखें मला अखंडपणें वाचणे फार वेळ जमत नाहीं. .. तूर्त शास्त्रावरील पुस्तकें वाचण्यांत चित्त रगून जात असतें. " शरच्चद्राकडून उत्तर आलें.

" शास्त्रावरील ? मला वाटलें, कांहीं साहित्यासबंधीं तुम्ही सागाल. " मीं म्हटलें.

" खरें पाहिलें तर आहे हें असें. तुम्हांस आश्चर्य वाटेल कीं, आता मला कथाकादबऱ्या वाचणें कठीण जातें. "

" वाः, फारच छान ! ज्यानें शेंकडों उत्तमपैकीं कथा लिहिल्या व ज्या हजारों वाचकाकडून वाचल्या जातात त्याच कथाच्या लेखकास मात्र कादंबरी वाचणें जड जावें ना ! "

शरद्बाबू हंसूं लागले. त्यांनीं नतर राजकारणाचा विषय काढला. त्यांनीं सांगितलें, " कलावंतावर किती तरी मोठ्या प्रकारची जबाबदारी आहे. प्रत्येक देशाचें भवितव्य घडविणें, हें तेथील शिक्षणतज्ज्ञ व साहित्यिक यांचेंच कर्तव्य आहे. त्यांनींच जर या कामाकडे दुर्लक्ष केलें तर, देशाचें होणार तरी कसें ?-- "

शरच्चंद्राच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू वरील कांहीं आठवणींवरून ध्यानात येण्यास हरकत नसावी. एक मोठा कथाकार शेवटीं शास्त्रांच्या अभ्यासाकडे, तत्त्वचिंतनाकडे, राजकारणाकडे, देशोद्धाराकडे वळलो, या गोष्टीसहि मोठा अर्थ आहे. शरचंद्र चट्टोपाध्याय यांच्या मनातील अनंत विचारांचें व विकाराचें दर्शन आणखी विस्तारानें घ्यावयाचें असेल तर त्याच्या कथासृष्टीकडेच आपणास वळलें पाहिजे. मानवी जगाचें त्यांनीं

विविध प्रकारच्या भूमिकांवरून निरीक्षण केलें होतें. शेंकडों प्रकारच्या व्यक्ति त्यांच्या आयुष्यांत त्याना भेटल्या. शेंकडों लोकांचीं दुःखें त्यानीं स्वतःच्या डोळ्यानीं पाहिलीं, कांहीं निवारण केलीं. दुःखानें, दारिद्र्यानें, अज्ञानानें, अंधश्रद्धेनें, जातिभेदांच्या विकृत कल्पनेनें, संपत्तीच्या वृथा अभिमानानें व व्यसनानें पिडलेल्या-अधोगतीला गेलेल्या माणसाचीं चरित्रें त्यांनीं स्वतः पाहिलीं होती. त्यांखेरीज सज्जनाचा, उदार अंतःकरणांचा देशभक्तांचा, पतिव्रतांचा, साध्वींचा, स्वार्थत्यागी शूर वीराचाहि सहवास त्याना लाभला होता. मानवी जीवनाच्या या संमिश्र स्वरूपाचें चित्रण त्यानीं कसकसें केलें आहे, तें पुढल्या प्रकरणात आपण पाहूं.

● ● ●

## नारीजातीचा परम मित्र : ७

शरच्चंद्रांच्या मानसपुत्रांचा व मानसकन्यांचा थोडक्यांत परिचय आता करून घ्यावयाचा आहे. मागें त्यांच्या साहित्यसृष्टीचा विचार करीत असताना काहीं पात्राची त्रोटकपणें आपण ओळख करून घेतली आहेच, पण या ठिकाणीं त्यांच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांच्या मनाची हालचाल पाहावयाची आहे. कारण त्यांच्या मनोविकारांच्या परीक्षणावरून त्यांच्या निर्मात्याच्या मनाची व त्याच्या कलेची परीक्षाहि होण्यासारखी आहे. थोर कलावंत लेखक ज्या संस्कृतींत वावरतो, ज्या परंपरेंत वाढतो, ज्या विश्वात आपलें आयुष्य घालवीत असतो त्याच जगातून त्यानें आपल्या पात्राची निवड केलेली असते. त्याच्या आयुष्यांत जीं जीं विक्षिप्त, भोळीं, उदार, प्रामाणिक, चिक्कू, दुष्ट, पतित, चारित्र्यवान्, धनी, गरीब माणसें भेटलेलीं असतात तीं तीं एकेक खोल संस्कार लेखकाच्या मनावर उमटवून जातात. लागलीच

लेखक त्यांना कथांत गुतवून वाङ्मयीन रूप देतोच असें नव्हे. त्याच्या मनःकोषात नाना प्रकारच्या माणसांचे नमुने संस्काररूपानें साठलेले असतात. त्यांत थोडी कल्पना मिसळून लेखकाची पात्रसृष्टि तयार होते. स्वतःचे विचार, स्वतःच्या कल्पना, स्वतःच्या भावना यांचीं पुटें त्यावर अगदींच नसतात असें नाहीं.

डॉ. शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांची कथासृष्टि किती विविधतेनें नटलेली आहे हें आपण पाहिलें. त्यांच्या भ्रमंतींत त्यांना जीं बरींवाईट माणसें भेटलीं तींच त्यांच्या कथासृष्टींत थोड्याफार प्रमाणानें आकारास आलीं आहेत. शरच्चंद्राच्या बहुतेक कथा पात्रप्रधान आहेत. व्यक्ति त्या ठिकाणीं महत्त्वाची आहे. व्यक्तीच्या गुणावगुणावरून प्रसंगांची वा घटनांची निर्मिति होत राहिलेली दिसते. एक रसरशीत सजीव पात्र म्हणजे एक उत्कृष्ट कथानक आहे, असें टीकाकार म्हणतात, तें याच अर्थानें. दरिद्री, पापी, उपेक्षित घरंदाज, भटक्या, शेतकरी, वकील, डॉक्टर, शिक्षक, जमीनदार, राजकारणी, नोकरदार वगैरे विविध प्रकारचीं माणसें डॉ. चट्टोपाध्याय यांच्या साहित्यसृष्टींत भेटतात. एकंदर मानवी विश्वाच्या मानानें त्याची मर्यादा सीमित असली तरी, आहे या प्रान्तातील सखोलपणा आश्चर्यकारक आहे. शब्दाशब्दागणिक, वाक्यावाक्याबरोबर कथेंतील पात्राच्या स्वभावावर प्रकाश पडलेला दिसून येतो. तिऱ्हाईतपणें व्यक्तीचें वर्णन निवेदन करणें यांत कलेचा अंश फार थोडा असतो. पण संवाद, प्रसंग, हालचाल इत्यादि विविध प्रकारच्या कौशल्यानें उठावदार व्यक्तिरेखा निर्माण करण्याची कला शरच्चंद्रांना साधून गेली होती. शरच्चंद्र ज्या ज्या ठिकाणीं हिंडले तेथून त्यांनीं कथासामग्री व्यक्तिवैचित्र्याच्या दृष्टीनें जमा केलेली दिसून येते.

शरच्चंद्राच्या नायकाचा विचार करताना प्रथम मनांत भरतो तो श्रीकांत. या व्यक्तिचित्रात त्यांनीं आपलें सर्वस्व ओतलेलें दिसतें. स्वतःस आलेले कांहीं अनुभवाहि श्रीकांताच्या वाट्यास शरच्चंद्रांनीं दिले

आहेत ही गोष्ट खरी असली तरी श्रीकांताची भ्रमणकहाणी म्हणजे शरद्‌बाबूचें आत्मचरित्र नव्हे. श्री. हरिदास चट्टोपाध्याय यांना लिहिलेल्या एका पत्रांत शरच्चंद्र लिहितात, "तो कोण आहे? हो. श्रीकांताच्या आत्मकथेशीं संबंध आहेच; याशिवाय ती एक भ्रमणकहाणीहि आहे. पण त्यांतील 'मी' मी नाहीं." याच प्रश्नाचें उत्तर श्री. इलाचन्द्र जोशी यानाहि देताना शरच्चंद्र म्हणतात, "पुष्कळ लोकांनीं हाच प्रश्न अनेकदा मला विचारला आहे. पण लोकांची ही समजूत चुकीची आहे. हें ठीक आहे कीं, 'श्रीकांत' मध्यें माझ्या परिचयाचें जीवन वर्णन केलें आहे व ज्यांच्या निकट मी वावरलों त्याचींच चित्रें रंगविलीं आहेत. पण याचा अर्थ असा मुळींच नव्हे कीं, ती कथा माझें आत्मचरित्र आहे. तरी पण लोकाचा हा समज मला सुखदायक वाटतो. कारण यावरून माझी पात्रनिर्मिति लोकाना जिवंत वाटते हेंच सिद्ध होतें." श्रीकांतचा लहनपणींचा द्वाडपणा, बेफिकिरी, त्याचें इन्द्रनाथाच्या सहवासातील वास्तव्य वगैरेंचा परिचय आपणांस झालेला आहे. त्याचा देशभर झालेला प्रवास, शिकारी युवराजाच्या सहवासात त्यानें केलेलें साहस, त्याचा संन्याशाचा वेष, त्याचें ब्रह्मदेशांतील परिभ्रमण, गंगामाटी खेड्यांतील त्याचा निवास, वैष्णवांच्या मठातील त्याचें वास्तव्य वगैरे वेगवेगळ्या भूमिकांतील श्रीकांत आपल्याला जगाचीं विविध दर्शनें घडवीत असतो. आपण स्वतः स्थितप्रज्ञाप्रमाणें राहून या जगातील अनेक दुर्दैवी जीवाची विचारपूस करतो. नाना प्रश्नावर चर्चा करून अनीति, ढोंग, बडेजाव, दारिद्र्य यांनीं समाज कसा पीडित झाला आहे, याची चिंता त्यास लागलेली असते. श्रीकांत हें शरच्चंद्राचे एक अद्वितीय पात्र आहे.

'बडी दिदी'मधील सुरेन्द्रनाथ ही एक अविस्मरणीय व्यक्ति शरद्‌बाबूंनीं निर्माण केली आहे. त्याच्या स्वभावाचा परिचय पहिल्यानेंच किती मार्मिक रीतीनें करून दिलेला आहे पाहा, "या जगतात गवताच्या

अग्नीप्रमाणें काहीं माणसें आढळतात. झटकन् त्यांचा भडका होतो व तितक्याच झटादिशीं तीं शांतहि होतात. त्याच्यावर देखरेख ठेवण्यास सदोदित कोणी ना कोणी तरी जवळ पाहिजे. ज्याप्रमाणें गृहस्थाघरच्या मुली मातीच्या पणतींत तेल व वात घालून त्यांत एक काडीहि ठेवतात. दिव्याचा प्रकाश कमी होऊं लागला कीं वात पुढें सारण्यास त्या छोट्या काडीचा फार उपयोग होतो. जर अशी काडी नसेल तर तेल व वात असूनहि दिव्याचें जळणें अशक्य होऊन बसतें. सुरेन्द्रनाथाची प्रकृतीसुद्धा काहीं अशीं अशीच होती त्याच्यात बल, बुद्धि, आणि आत्मविश्वास असून सुद्धा स्वतःच्या हिंमतीवर कांहीं काम तो करूं शकत नव्हता. " काहीं एखादें काम तो स्वतःच्या जबाबदारीवर सुरू करी पण पुढें आपल्याच नादात गुंग झाल्यानंतर तें काम तसेंच अर्ध-वट पडून राही दरवेळीं त्याच्याजवळ कोणी तरी लागे. घरीं उदास होऊन तो कलकत्ता येथें आला व पूर्णपणें बावरून गेला. अंगावरचीं वस्त्रें मलीन व जीर्ण झालेलीं, पोटात भुकेनें काहूर माजविलेलें अशी अवस्था या सुरेन्द्रनाथाची. त्याच्या डोळ्यातून पाणी पाझरूं लागलें. घरीं पत्र लिहावें तरी चोरी. कोणी एका इसमानें या भावड्या तरुणास समोरच्या जमीनदाराचें घर दाखविलें. भीत भीत तो दारापर्यंत गेला व परत आला. परत गेला, परत माघारीं फिरला. तिसऱ्या दिवशीं नोकरानें सांगितलें, " बाबूसाहेब घरीं नाहींत. " वास्तविक भेटावयास आलेला सुरेन्द्र नाराज व्हावयास पाहिजे होता पण त्याचें चित्त आनन्दानें भरून आलें. आपली कर्मकहाणी सागणें वाचलें म्हणून त्यास समाधान वाटलें. असा हा सुरेन्द्रनाथ.

शेवटीं एकदा व्रजनाथ लाहिरी याची व त्याची गांठ पडून प्रमिलेला शिकविण्यासाठीं त्याची नेमणूक होते. या ठिकाणीं दिव्यातील वात सार-णारी गृहस्थाघरची मुलगी माधवी त्याला भेटते. वात्सल्याच्या दृष्टीनें ती या पोरक्या व भावड्या माणसाची सर्वतोपरी काळजी घेते. सदरा, धोतरें,

छत्री, पुस्तकें — सर्व जिनसा त्याला माधवीकडून मिळत असत. त्याच्या भोजनाकडेहि लक्ष द्यावें लागे. पानांत काय आहे, काय नको, याची चिंता दुसऱ्यानेंच करावी. रात्रीं एकटाच जागत किती वेळ वाचीत बसेल त्याचा नेम नाहीं. या अशा निरागस व्यक्तिचित्राची सर्व शोभा शरच्चंद्राच्या कल्पकतापूर्ण लेखणीनें टवटवीत झालेली आहे. हें सुंदर व्यक्तिचित्र मुळातूनच निरखून पाहण्यासारखें आहे.

यानंतर शरच्चंद्राचें महत्त्वाचें पुरुषपात्र म्हणजे ' पथेर दावी ' मधील अपूर्व. सुखवस्तु कुटुंबातील हा सर्वांत धाकटा व म्हणून सर्वांचा लाडका मुलगा. सनातनी वातावरणात वाढलेल्या या तरुणाच्या वर्तनात पुढें ब्रह्मदेशांत अनेक प्रकारचीं परिवर्तनें झालेलीं असलीं तरी घरीं मात्र गोब्राह्मणावर श्रद्धा असणाऱ्यांपैकीं तो एक आहे. एम्. एस्सी.-पर्यंतचें शिक्षण झालेलें असूनाहि त्याच्या डोक्यावर शेंडी आहे. एकादशी-पूर्णिमा याचें त्याला महत्त्व वाटतें आणि पूजापाठातहि त्याचें मन रममाण झालेलें असतें या माणसास ब्रह्मदेशांत पाठवून शरच्चंद्रानीं अनेक गोष्टी साधल्या आहेत. बाहेरच्या विस्तृत जगांत समाज किती विविधतनें भरलेला आहे, देश, जात, धर्म, पंथ यांचीं बंधनें कशीं शिथिल झालेलीं आहेत, हें त्यानें पाहिलें. त्याचा पाहिलाच झगडा झाला तो एका ख्रिस्ती कुटुंबाशीं. अपूर्व सुशिक्षित पण दुर्बळ असा तरुण आहे. आपल्या आईवर त्याची विलक्षण श्रद्धा आहे. मध्यमवर्गाचा हा प्रतिनिधि जरा काहीं झालें कीं पोलिसात वर्दी देऊन कायदेशीर इलाज करावयास निघतो. क्रांतिकारकांशीं त्याचा संबंध आला पण तेथील उग्रता त्याच्या स्वभावास मानवणारी नव्हती. अपूर्वच्या मानासिक अवस्थांचें चित्रण शरच्चंद्रांनीं अत्यंत कुशलेतेनें केलें आहे.

शरच्चंद्रांचे नायक बहुधा भावनाप्रधान, दुर्बल चित्ताचे, भटक्या वृत्तीचे व असह्य स्थितींत डगमगणारे असे दिसतात. वाऱ्यावरील पिसाटा-प्रमाणें त्यांची स्थिति असते. देवदासचा परिचय आपण करून घेतला

आहेच. ' चरित्रहीन ' मधील सतीश हा एक कॉलजविद्यार्थीच आहे. कलकत्ता येथील एका वसतिगृहात राहणारा हा एक मध्यमवर्गीय तरुण होमिओपाथीचा अभ्यास करीत असतो. सावित्री नावाची मोलकरीण त्याची सर्व व्यवस्था पाहत असते. पण सावित्री जरा दृष्टीआड झाली किंवा त्याची व्यवस्था ठेवण्यास ती असमर्थ झाली की देवदास-प्रमाणें तोहि व्यसनाच्या आधीन झालेला दिसतो. याप्रमाणें शरच्चंद्राच्या पुरुष-पात्राची निर्मिति आहे. चंद्रनाथ, नरेन्द्र ( स्वामी ), वृंदावन ( पंडितजी ), प्रियनाथ ( बामुनेर मेये ), गुणेन्द्र ( पथनिर्देश ), काशिनाथ, दिवाकर ( चरित्रहीन ), नरेन्द्र ( दत्ता ), विप्रदास वगैरे शरच्चंद्राचे मानसपुत्र त्यांच्या स्वभावचित्रणाचें कौशल्य दाखविण्यास समर्थ आहेत.

शरच्चंद्रांच्या कादंबऱ्या बहुधा स्त्रीपात्रप्रधान असतात. स्त्री-जीवनाचा त्यांचा अभ्यास अतिशय सखोल असा होता. स्त्रियांच्या दडपलेल्या भावनांचा आविष्कार त्यांच्या वाङ्मयात अतिशय मार्मिक रीतीनें झालेला दिसतो. स्त्र्यांच्या वासना, त्यांच्या इच्छा, त्यांच्यातील मत्सर, त्यांच्यांतील दयावृत्ति, वात्सल्य, प्रेम, इत्यादि विविध प्रकारच्या छटा त्यांच्या कथाविश्वात आपणास पाहावयास मिळतील. नारीहृदयाचें एवढें सूक्ष्म निरीक्षण भारतांतील कोणत्याहि लेखकानें केलें नसेल पापाची घृणा करा व पतितावर दया असूं द्या, हा शरच्चंद्राच्या जीवनातील एक संदेश होता. पतित झालेल्या स्त्रिया या शापभ्रष्ट देवता आहेत असें त्यांना वाटे. नारी-जीवनाचा आदर्शहि त्यांनीं विविध प्रकारचा दर्शविला आहे. त्यांच्या बऱ्याच नायिका विधवा असून त्या स्त्रियांचें अंतःकरण मातृत्वासाठीं भुकेलेलें आहे. वात्सल्याचा वर्षाव कोणावर तरी करावा व मनास समाधान प्राप्त करून घ्यावें हीच त्यांची अंतिम इच्छा असते नारी-जीवनाचें साफल्य पुत्रस्नेहात आहे, असें त्यांच्या नायिकांना वाटतें. समाजाच्या विचित्र रचनेमुळें नाइलाजानें ज्या स्त्रियांना मूकपणें रहावें

लागतें त्याच्या अंतरंगावर शरच्चंद्रांनीं आपल्या सहानुभूतीच्या साह्यानें उत्कृष्ट प्रकाश पाडलेला आहे.

'माधवी' हें एक शरच्चंद्रांनीं निर्माण केलेलें चिरस्मरणीय पात्र आहे. सोळाव्या वर्षीच या स्त्रीच्या पतीचा स्वर्गवास झाला. तिच्या श्रीमंत बापानें मोठ्या थाटानें तिचें लग्न करून दिलेलें असतें. स्नेह, प्रेम, संसाराची माधुरी चाखण्यापूर्वीच तिचा नवरा योगेन्द्रनाथ निधन पावला. मरतांना त्यानें माधवीस सांगितलें होतें, "माधवी, जें माझ्या सुखासाठीं जीवन अर्पण करीत होतीस तेंच यानंतर आता सर्वांच्या सुखासाठीं खर्च कर. ज्याचें मुख कष्टपूर्ण आहे, जो उदास आहे, त्याचें मुख प्रफुल्ल करीत रहा –" आणि पतीचा हा उपदेश माधवीनें बरोबर लक्षात ठेवला होता. पतीच्या मृत्यूनंतर माधवी पूर्णपणें बदलून गेली. क्रोध, हिंसा, द्वेष जें काहीं तिच्या स्वभावात होतें तें सर्व तिच्या पतीबरोबर जळून भस्म झालें. दीन-दु:खितावर प्रेम करणें, त्याचें दु:ख दूर करणें, हेंच एक कर्तव्य आता तिला उरलें होतें. आपल्या वडिलांच्या घरीं येऊन तिनें सर्व प्रपंच आपल्या शिरावर घेतला होता. गंगेप्रमाणें आपलें रूप, स्नेह, ममता घेऊन माधवी घरीं आली होती. तिची आई मरून गेल्यानंतर कित्येक दिवस घरांत औदासीन्य पसरलें होतें. पण माधवीच्या पावलांबरोबर वसंतऋतु नटून आला. सर्वांना या 'बडी दिदी' चा लोभ लागला. नोकरचाकर, नायकगुमास्ते, दासदासी, आणि भिकारी सुद्धा या स्नेह-मयी स्त्रीकडे पाहून संतुष्ट होत असत. शरच्चंद्रांनीं लिहिलें आहे, माधवी म्हणजे ब्रजराजबाबूंच्या घरचा कल्पवृक्ष. कोणीहि येऊन हात पसरावेत आणि इच्छा पूर्ण झाल्यानंतर हंसतमुखानें घरीं जावें माधवीच्या या शांत व प्रसन्न जीवनात सुरेन्द्रनाथाच्या आगमनानें खळबळ माजून गेली. या भाबड्या माणसाचें रक्षण ती निष्पापबुद्धीनें करी पण तिची मैत्रीण मनोरमा हिनें तिला डिवचलें. झालें, माधवीपुष्प कोमेजून गेलें. मनाची रुखरुख थांबविण्यासाठीं तिनें तीर्थयात्रा केल्या, आणि घरीं आल्यावर

कठोरतेनें सुरेन्द्रनाथास जा म्हणून सांगितलें. पण त्यास इस्पितळांत जाऊन पाहावें म्हणून तिच्या मनाची कोण धडपड! माधवी म्हणजे एक अभिमानी स्त्री पण दिसते. वडील वारल्यानंतर तिची घरची सत्ता कमी झाली भावाचीं लग्नें झाल्यामुळें भावजया सर्व काहीं पाहूं लागल्यावर ती तेथें राहिली नाहीं. आपल्या नवऱ्याच्या गावीं येऊन राहण्याचा विचार तिनें केला. माधवीच्या मनाच्या सर्व सूक्ष्म हालचाली शरद्बाबूंनीं अतिशय नाजुकपणें व हळुवारपणें चित्रित केल्या आहेत. या माधवी-पुष्पाचा सुगंध शरत्साहित्यात सदैव दरवळत राहण्यासारखा आहे.

अशीच दुसरी एक दुर्दैवी स्त्री म्हणजे पार्वती. लहानपणीं देवदासच्या संगतींत तिनें दिवस काढले. देवदासचे हुकूम मानावेत व त्याचा मार खावा, हें तिचें जीवन होतें. पण देवदासवर तिचा लोभ विलक्षण. तिचा बाप गरीब असल्यामुळें तिच्या जीवनाची फरफट झाली. एका म्हाताऱ्याबरोबर तिचें लग्न झाल्यामुळें ती मुग्धच राहिली. देवदासवर तिची मनापासून प्रीति असली तरी बाह्य दृष्टया ती सती-साध्वीप्रमाणें वागे, पण आंत मात्र इच्छा-आकांक्षाचे कोळसे झाले होते.

'श्रीकान्त' मधील अन्नदाअक्काची कथा तर याहून भयानक अशी आहे. लोकाच्या दृष्टीनें ही कुलटा पण अंतःकरणानें साध्वी स्त्री आहे. मुसलमान गारुड्याबरोबर राहणारी ही ब्राह्मणाची मुलगी. दिसावयास मोठेंच विचित्र. पण तिची कर्मकथा ऐकण्यासारखी आहे. श्रीकांतला लिहिलेल्या पत्रांत ती लिहिते,

"श्रीकांत, तुझ्या या हतभागी अक्काचें नाव अन्नदा. माझे वडील बडे गृहस्थ होते त्यांना मुलगा नव्हता. आम्ही दोघी बहिणी. म्हणून बाबांनीं गरिबाच्या घरचा मुलगा आणून त्याला शिक्षण दिलें. पण त्यास माणुसकी मात्र देता आली नाहीं. माझ्या वडील बहिणीचा खून करून माझा पति फरारी झाला. केवढी शरमेची गोष्ट ही! सात वर्षें त्याचा काहीं पत्ता नव्हता. पण एकदां एक गारुडी आमच्या घरा-

समोर आला. मीं त्यांना ओळखलें आणि एके दिवशीं भर मध्यान्ह रात्रीं मीं पतीसाठीं घर सोडलें. सर्वांनीं ऐकलं, सर्वांनीं म्हटलं, अन्नदा कुलटा निपजली पण हा डाग घेऊनच मला जन्मभर स्वस्थ राहिलं पाहिजे. त्याला कांहीं उपाय नव्हता. पति जिवंत आहे तोंपर्यंत ओळख दाखविणें शक्य नव्हतें. —" अशी ही दुःखानें भारावलेली अन्नदा!

या अन्नदानंतर श्रीकांतला भेटलेली दुसरी स्त्री म्हणजे राजलक्ष्मी. सबंध शरत्साहित्यात 'राजलक्ष्मी' प्रमाणें ठसठशीत व रेखीव व्यक्तिरेखा सांपडणार नाहीं. अनेक रसिक शरच्चंद्रांच्या या मानसकन्येवर लुब्ध होऊन गेलेले दिसतात. या पात्राबद्दल शरच्चंद्रानीं बरीच मुग्धता ठेवली आहे. जिज्ञासेनें चौकशी करणाराना त्यांनीं दिलेलें उत्तर पाहण्यासारखें आहे. आपल्या शिष्येस—श्री. लीलाराणी गंगोपाध्याय यांना—लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, "राजलक्ष्मी कोठें मिळाली? ती सर्व मनगढन्त कथा आहे. 'श्रीकांत' कादंबरीशिवाय दुसरें कांहींहि नाहीं. निराधार अफवांवर ध्यान देण्यात अर्थ नाहीं. ही कथा काय खरी आहे? कोणाची कथा? तू चिरंजीव रहा. दीर्घायुषी बन. वारंवार हाच आशीर्वाद मीं तुला देतों." शरच्चंद्रांनीं दिलेलें हें उडवाउडवीचें उत्तर चिंतनीय असें आहे. या राजलक्ष्मीनें कळत नव्हतें तेव्हाच रानफुलांची माळ श्रीकांतच्या गळ्यांत घालून त्याला पति मानलें होतें. पण अन्य कारणानें तिचा इतरत्र विवाह होऊन थोड्याच अवधींत ती विधवाहि झाली पुढें आपलें शील व पावित्र्य यांचें रक्षण करून ती गावयाला व नाचावयाला शिकली. आपल्या सावत्र मुलावरहि तिचें मनापासून प्रेम होतें. 'प्यारी' नाव धारण करून ती गाण्याचे कार्यक्रम करी, परंतु पैसा अमाप मिळाला तरी तिच्या मनाला सुख नव्हतें. शेवटीं एकदा एका गाण्याच्या बैठकींत तिला श्रीकांत भेटला हरपलेलें श्रेय हस्तगत झाल्यावर तिला समाधान वाटलें. तिनें त्याचा दरप्रसंगीं सांभाळ केला. त्याच्या आजारी-

पणात तिनें त्याची मनोभावें शुश्रूषा केली. समाजास झिडकारून तिनें श्रीकांतला पतिस्वरूप मानलें. पण या भटक्या व बैरागी वृत्तीच्या माणसाकडून तिला हवें होतें तें सुख मिळालें नाहीं.

पतिप्रेमाला व वात्सल्याला भुकेलेली आणखी एक शरच्चंद्राची नायिका म्हणजे सावित्री. चांगल्या वरिष्ठ घराण्यातील दुर्दैवाच्या फेऱ्यात सांपडलेली ही एक विधवा स्त्री वसतिगृहात मोलकरीण म्हणून काम करीत होती तिनें दासीधर्म स्वीकारला व सतीशसारख्या भाबड्या व निरागस वृत्तीच्या मुलावर आपलें चित्त केंद्रित केलें. कोणावर तरी जीव ओवाळून टाकावा, कोणाला तरी सर्वस्व अर्पण करावें, ही स्त्रीहृदयाची भूक असते. सावित्री याच वृत्तीमुळें हैराण झालेली होती. या सावित्रीचें अतःकरण फार थोर होतें. आपण ज्याच्यावर चित्त लावलें तो आदर्श असावा, निर्व्यसनी असावा म्हणून ती अपरंपार श्रम करी. सतीशनें व्यसनांत सांपडूं नये म्हणून तिनें आटोकाट प्रयत्न केले सतीशच्या उच्छृंखल वृत्तीलाहि तिनें वारंवार पायबंद घातला. सतीशची ती प्रेयसी असण्यापेक्षा जणुं माता होती. त्याची आईची उणीव भरून काढण्यासाठीं तिचा प्रयत्न असे. पण लोकांच्या प्रवादाला कंटाळून तिला अज्ञातवास पत्करावा लागला. तिचें शरीर काशीयात्रेंत पण मन मात्र सतीशभोंवतीं सदेव घुटमळत राही. व्यसनाच्या गर्तेत गाडल्या जाणाऱ्या सतीशला वांचविण्यासाठीं ती तीरासारखी—मातेसारखी धावत आली. त्याच्या जीवनाचें तारूं मार्गाला लागावें म्हणून सरोजिनीसारख्या प्रेमळ मुलीशीं त्याचें लग्न लावून देण्याची खटपटहि सावित्रीनेंच केली. समाजाला ती मान देत असे. सतीशबद्दल कोणीहि वेडेंवाकडें बोलूं नये म्हणून ती फार दक्षता घेई. त्यागवृत्तीनें भरलेली व ममतेनें परिपूर्ण असलेली सावित्री ही शरद्‌बाबूंची अत्यत करुणरम्य अशी कृति आहे. कोणतीहि कुरकूर न करतां, तक्रार न करता आपण स्वत: जळत राहणें व दुसऱ्यास प्रकाश देणें, हा भारतीय स्त्रीचा मनोधर्म सावित्रीच्या

चरित्रात व्यक्त झालेला दिसतो. इच्छा, अभिमान, क्रोध या सर्वांचा होम करून स्नेहरसानें ओथंबून निघालेली त्यागमयी प्रतिमा म्हणजे सावित्री !

शरद्‌बाबूंच्या नायिका दुःखानें भारावलेल्या आहेत. समाजानें त्याचा तिरस्कार केलेला दिसतो. मूकपणें जळत राहणें हेंच त्याच्या नशिबात आहे. विधवा स्त्रीच दु:खी असते असें नव्हे. पति जिवंत असताना-सुद्धा स्त्रियांना यातना भोगाव्या लागतात, हें शरद्‌बाबूंना माहीत होतें. 'श्रीकांत'मधील अभया ही या वर्गातील प्रतिनिधि आहे. या अभयेचें लग्न लहानपणींच झालें. पण देवब्राह्मणादेखत घेतलेली प्रतिज्ञा धुडकावून देऊन तिचा पति परागंदा झाला. तिचे यजमान काहीं दिवस ब्रह्म-देशातून पैसे वा पत्रें पाठवीत असत. पण शेवटीं तेंहि सर्व बंद झालें. तिची म्हातारी आई होती तीहि मरून गेल्यानंतर या दुर्दैवी अभयेनें आता जावें तरी कोठें ? गावचा कोणी एक रोहिणीबाबू नांवाचा मनुष्य ब्रह्मदेशात निघाला होता, त्याच्याबरोबर ती नवऱ्याच्या शोधास निघाली. पतिनिष्ठेमुळें हें साहस करावयास अभया निघाली होती. श्रीकांतबाबूंच्या मदतीमुळें तिनें नवऱ्याची गांठ घेतली, तों तिला आढळून आलें कीं, नवऱ्यानें दुसरें लग्न केलेलें. त्या ब्रह्मी सवती-बरोबर ती सुखानें नांदण्यास तयार झाली. पण तरीहि तिच्या जीवना-तील हाल संपले नाहींत तिचा नवरा तिला गुराप्रमाणें मारी, तिचा अतिशय छळ करी. अभ  ही एक शरच्चंद्राची तेजस्वी नायिका आहे. बदफैली नवरा जेव्हा पत्नीस साध्वीपणाचा जाब विचारूं लागला, तेव्हा तीहि खवळून गेली. रोहिणीबाबूशीं नातें जोडण्याचें 'पाप' तिनें केलें असलें तरी ती एक शापभ्रष्ट देवता आहे, असें शरच्चंद्राना वाटे.

'चरित्रहीन'मधील किरणमयीचा उल्लेख मागें एकदां आलेला आहेच. लहानपणींच हिचे आई-वडील मरण पावले. मामाच्या घरीं तिला कांहींसुद्धां सुख लाभलें नाहीं. दहाव्या वर्षींच तिचें लग्न एका वेदा-

-व्यासजड पंडिताबरोबर झालें. ज्ञान, विद्या व पुस्तकाचा भार याच्या दडपणाखालीं तिची नाजुक देहलता चिरडून गेली. दैन्य, दारिद्य, रोग यानीं ग्रस्त झालेल्या या व्यासंगी व रुक्ष वृत्तीच्या हाराणबाबूची सेवा करणें हाच एक धर्म तिनें वरवर तरी मानलेला होता. डॉक्टर, उपेन्द्र, दिवाकर इत्यादींच्या नादीं लागणाऱ्या या चंचल पण तर्कनिष्ठ व पंडिता स्त्रीचें शेवटचें दर्शन अतिशय करुणापूर्ण असेंच आहे.

आणि 'श्रीकांत'मध्यें वैष्णवाच्या मेळाव्यात राहणारी कमलत्ता! श्रीमंत आईबापाची एकुलती एक लाडकी मुलगी ही. बालपणींच विधवा झालेल्या या मुलीचा विवाह मुनीमजी मन्मथबाबू या वैष्णवाशीं तिच्या वडिलानीं करून दिलेला होता. पण हा एक विचित्र असा सौदा होता दहा हजार रुपये त्याला मिळणार होते. पण ऐन वेळीं त्यानें वीस हजार रुपयाचा आग्रह धरला. या अधमाशीं का हिचें लग्न होणार? पण तिच्या बापास एकदाचें मुक्त व्हावयाचें होतें. वीस हजार रुपये देऊन तिचा दीक्षाविवाह त्या माणसाशीं झाला. पण तिच्या जीवनाची दुःखद कथा येथूनच सुरू झाली बाबाचा, नवऱ्याचा व जगताचा त्याग करून तिनें वैष्णव धर्माची दीक्षा घेतली. गोहर नावाचा कोणी एक मुसलमान वैष्णव होता. सडाफटिंग वृत्तीचा हा मनुष्य तत्त्वज्ञानी व कवि होता. त्याच्या आजारीपणात कमलत्तेनें त्याची सेवा केली व त्यामुळें तिचा वैष्णवधर्म बाटला. सर्वांना उदार अंतःकरणानें कवटाळण्यास निघालेला वैष्णव धर्म इतका संकुचित झाला. पतितपावन भगवान् तिच्या दर्शनानेंहि पतित होऊं लागला. अशी या कमलत्तेची कर्मकथा. देवधर्माचा लोभ धरून तिनें जीवन सुखानें घालविण्याचें ठरविलें पण तेथेंहि कर्मठपणा व अज्ञान! तिथेंहि ढोंग व निर्दयता पाहून कमलत्ता जगाला विटून गेली.

स्त्रीजीवनाचीं विविध अंगें शरच्चंद्रानीं सहानुभूतीनें व बारकाईनें चित्रित केलीं आहेत. स्त्रीमनात जेवढया म्हणून भावनाच्या किंवा

विकाराच्या छटा असतील तेवढ्या शरत्साहित्यात आकारास आल्या आहेत. आपलें सर्वस्व अर्पण करणें हेंच स्त्रीच्या जीविताचें चरम साध्य सेविका वा दासी म्हणूनच स्त्रीनें रहावें असें शरच्चंद्र कधींच म्हणत नाहींत. उलट स्त्रीसहि संसारात नवऱ्याइतकेंच स्वतंत्र अस्तित्व आहे असा त्यांचा आग्रह आहे. नारी-जातीच्या इतिहासावर त्यांनीं एक मोठा ग्रंथ लिहिला होता. त्यात त्यांच्या सर्व मतप्रणालीचें दर्शन घडण्यासारखें होतें. शिवपुर इन्स्टिटयूटमध्यें शरच्चंद्रांनीं 'स्वराज्य-साधनेंत नारी' या विषयावर एक विचारप्रवर्तक भाषण केलें होतें. हें भाषण संपवितांना त्यांनीं उद्‌गार काढले, "आज तुमच्यापुढें आणखीहि काहीं गोष्टी मला सांगावयाच्या होत्या सर्व बाजूंनीं आज आपला देश जीर्णजर्जर होत चालला आहे. गृहस्थाघरचा परिवार जो देशाचा आधारस्तंभ आहे तोच आज हळूहळू लुप्त होत चालला आहे. आनंद संपला आहे. चैतन्य नष्ट झालें आहे. त्या ठिकाणीं धर्म ठरलेला नाहीं प्राचीन काळात सर्वत्र समृद्ध असणारीं गावें आज उजाड झालेलीं आहेत. मोठमोठ्या वाड्यांतून कोल्ह्याकुत्र्याचा निवास दिसतो. पीडित, निर्बोध, मरणाच्या पथास लागलेले लोक सर्वत्र पसरलेले दिसतात. अन्नपाण्यावाचून त्यांची दशा अगदीं वाईट बनली आहे या प्रकारच्या हजारों दुःखांची कथा तुमच्यापुढें उपस्थित करण्याची माझी इच्छा होती. पण तसा वेळ मला आज मिळाला नाहीं."

व्याख्यानाच्या वेळीं शरद्‌बाबूंना हीं दुःखें वर्णन करावयास समय सापडला नसला तरी अशा प्रकारचीं किती तरी चित्रें त्यांच्या कथासाहित्यात अमर होऊन राहिलीं आहेत. स्त्री ही पुरुषाची दासी, असें त्यांनीं कधींहि प्रतिपादन केलें नाहीं आपल्या एका शिष्येस लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, "नारीच्या जीवनात पति हा परमपूजनीय आहे, सर्वांत मोठा गुरु आहे. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, ती पुरुषाची म्हणजे पतीची दासी आहे. या संस्कारामुळें नारीजीवन तुच्छ व तिरस्करणीय बनून गेलें

आहे पतीच्याविरुद्ध कधींहि बडखोरपणा करता कामा नये. पण हेंहि खरें कीं, पति सुद्धा एक मनुष्य आहे मनुष्याची भगवान् समजून पूजा करणें केवळ निष्फळच नाहीं तर त्यायोगें पति व पत्नी याचीहि योग्यता कमी होते." पण पत्नी ही सेविका हा संस्कार आपल्या धर्मांत अगदीं मुरून गेलेला आहे 'सावित्री' या सेविकेचा परिचय आपण करून घेतलाच आहे तसें पाहिलें तर शरद्बाबूंच्या सर्वच नायिका सेवावृत्तीच्या आहेत. पण प्रत्यक्ष पतीपुढेंहि दासीशिवाय अन्य भूमिका धारण न करणाऱ्या आणखी एका करुणामयीचा उल्लेख येथें करावयास पाहिजे

चंद्रनाथ वडिलांचें श्राद्ध करण्यासाठीं काशीस हरिदयाळ घोषाल उपाध्याय यांच्याकडे उतरलेला असतो. नवद्वीपाची सुलोचना आपल्या मुलीसह-शरयूसह-त्यांच्याकडे कामधंदा करून आश्रयास असते. या शरयू-वर चंद्रनाथ मोहित होतो व तिच्याशीं लग्न लावतो. पण शरयूची कळी काहीं केल्या उमलत नाहीं. एवढ्या मोठ्या जमीनदाराशीं आपलें लग्न झालें हें तिला खरेंच वाटत नाहीं. आपण यःकश्चित् अशा स्वयंपाकीणबाईची मुलगी. आपल्या नशिबीं का एवढें भाग्य? अशा विचारानें ती खिन्न झालेली असते. या दीन स्त्रीचें दुर्दैव अजून पुढेंच आहे. तिची आई सुलोचना ही वाईट चालीची स्त्री आहे, असा सर्वत्र बोभाटा होतो. चंद्रनाथ अस्वस्थ होतो, पण आपल्या 'मालका'ला काहीं त्रास होऊं नये म्हणून शरयू चंद्रनाथाच्या संमतीनेंच घराबाहेर पडते. कैलासकाका नावाचा दयावान् वृद्ध तिचा सांभाळ करतो. तेथेंच तिला मुलगा होतो. पुढें चंद्रनाथास पश्चात्ताप होतो व तो शरयूला घरीं आणतो. शरच्चंद्राची हीहि नायिका दास्यभावनेनेंच जीवित कंठणारी आहे.

पतिताच्या जीवनाकडे नव्या दृष्टीनें पाहावें, असें शरद्बाबूंच्या कथाचें सार सांगता येईल. माणसाच्या हातून चुकून काहीं अपराध घडतो, पण त्यासाठीं भयंकर शासन व्हावयासच पाहिजे असें नाहीं. या पापा-चरणाचें कारणहि कित्येक वेळां त्या व्यक्तीच्या स्वभावांत नसतें. परि-

स्थितीला वश होऊन मनुष्य कित्येक वेळां अजाणतां पतित होतो. त्याचा धिक्कार करून कसें होणार? सहानुभूतीनें त्याला जवळ करण्यात, त्याला नीट मार्गावर लावण्यांतच खरा धर्म आहे असें, शरच्चंद्राना वाटे. चरित्र-हीन दिसणाऱ्या लोकांतहि चारित्र्य असतें असेंच त्यांना जणुं सुचवावयाचें आहे. शरद्‌बाबूंचे सर्वच नायक व सगळ्याच नायिका पतित आहेत असें नव्हे सतीसाध्वी स्त्रियांचीं चरित्रेंहि त्यांनीं तितक्याच तन्मयतेनें रंगविलीं आहेत. 'किरणमयी' ही पतिता ज्यामुळें सूड-बुद्धीची झाली त्या प्रेमाचा आदर्श असणारी उपेन्द्राची पत्नी सुरबाला हिची पतिनिष्ठा अलौकिक होती. तिच्या सतीत्वाचा सुगंध 'चरित्रहीन' कादंबरींत दरवळत असतांना दिसतो. व्यसनानें नादान बनलेल्या नवऱ्याची सेवा करण्यात गढून गेलेली शुभदा हीहि साध्वी स्त्रियांना आदर्शभूत वाटणारी स्त्री आहे.

'श्रीकांत'च्या तिसऱ्या पर्वांतील सुनन्दा ही एक तेजस्वी धर्मकन्या शरच्चंद्रानीं निर्माण केली आहे! कुशारीबाईची ही धाकटी जाऊ. हिची आई तिच्या बालपणींच मरण पावली. बापानें तिला आपल्या मुलाच्या हातीं सोपवून तो संन्यासी बनला. पण ही पोरगी मात्र धर्मपरायण निघाली. पापाच्या व अन्यायाच्या मार्गानें घरीं चालत आलेला पैसा तिला विषाप्रमाणें वाटतो. जाणूनबुजून ती दारिद्र्याचें व्रत स्वीकारते. आपल्या जाऊबाईस ती स्पष्टपणें सांगते, "नाहीं जाऊबाई, ही संपत्ति आमची नव्हे. हें सारें काहीं ज्याचें त्याला तुम्हीं परत केलें नाहीं तोंपर्यंत सैंपाकघरात मी पाऊल टाकणार नाहीं. त्या अज्ञान पोराच्या तोंडचा घास काढून मी तो माझ्या मुलानवऱ्याच्या तोंडीं घालणार नाहीं. त्याचा नैवेद्य देवाला दाखविणार नाहीं." सत्यधर्मास जागणारी ही प्रखर स्वभावाची मुलगी आपल्या बापासून वेदान्तशास्त्राचें अध्ययन करून घेण्यास विसरली नव्हती तिचा नवराहि तिच्याप्रमाणेंच धर्मनिष्ठ होता कुशारीबाई सुनंदेविरुद्ध गाऱ्हाणें घेऊन जेव्हा

त्याच्यापाशीं गेली तेव्हा तो म्हणाला, "वहिनी, तूच माझी आई. दादा देखील मला पित्यासारखे. तुम्ही दोघंहि मोठीं खरीं पण धर्म त्याहूनहि मोठा आहे. सुनंदेचा एक शब्द सुद्धा अयोग्य नाहीं. संन्यास घ्यावयाच्या दिवशीं माझ्या सासऱ्यानें तिला आशीर्वाद दिला होता, 'पोरी, जगात धर्मच सत्य आहे. धर्म दाखवील त्याच मार्गानें जा.' ती एवढीशी होती तेव्हापासून मी तिला ओळखातोंय्. ती कधीं सुद्धां अयोग्य वागली नाहीं.' नवऱ्याचें असें प्रशस्तिपत्र मिळवणारी ही धर्मपरायण सुनंदा ! आणि श्रीकांत सुद्धा काय म्हणतो तें पाहा, "मी सिंहावलोकन जेव्हा करून पाहतों तेव्हा मला असें दिसूं लागतें कीं, ज्या काहीं स्त्रियांच्यामुळें माझ्या जीवनावर गंभीर परिणाम झाला आहे, त्यांपैकीं एक ही कुशारीमहाशयाची बंडखोर भावजय ! एवढं वय झालं तरीहि मी अजून सुनदेला विसरलों नाहीं."

अध्यापक यदू तर्कालंकार याच्या घरातील सुनंदेचें दर्शनहि मोठें विलोभनीय असें आहे. एका भिकारड्या झोपडींत हें कुटुंब राहत असे या मोडक्या भिंतींच्या आत कुमार, रघु, शाकुंतल, मेघदूत शिकवलीं जात असत. धर्म व न्यायशास्त्र याचा अभ्यास या मोडक्या घरात सुनदा करीत असे, विद्यार्थ्यांना शिकवीत असे. एका कठोर अन्या याच्या प्रतिकारासाठीं भरलें घर टाकून बाहेर पडलेली ही सुनंदा शरद्बाबूंच्या वाङ्मयात आपल्या उदात्त व शुद्ध आचरणानें सदैव तळपत राहील

शरच्चंद्रांच्या बहुतेक सर्व कथा नारी-चरित्र प्रधान आहेत. त्याच्या नायिकांचा सक्षेपानें आपण परिचय करून घेतलेला आहे. स्त्री ही मुख्यतः मातृत्वाची भुकेली असते, या एका तत्त्वाभोंवतीं शरच्चंद्रांचें स्त्रीजगत् उभारलेलें आहे. माधवी, राजलक्ष्मी, सावित्री, सिद्धेश्वरी, विश्वेश्वरी, हेमांगिनी, नारायणी या सर्व स्त्रियांच्या मनात मातृत्वाच्या विविध छटा दिसून येतात. उपेक्षित, नारी-जातीस शरच्चंद्रांनीं गौरवा-

चें स्थान प्राप्त करून दिलें, म्हणूनच बंगालच्या स्त्रीजातीस शरद्-बाबूंविषयीं मोठा अभिमान वाटतो. त्यांच्या सत्तावन्नाव्या वाढदिवशीं नारीसवानें जें त्यांना अभिवादन केलें आहे, तें अपूर्व असेंच होतें. त्यांना अर्पण केलेल्या मानपत्राचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यात असें म्हटलें आहे, "सर्व प्रकारचा आत्मापमान आणि सर्व तऱ्हेची हीनता सहन करूनहि नारी आपल्या स्वाभाविक विशेषतांनीं सर्व देशातील सर्व समाजात प्रसिद्ध झाली आहे. पण तिला अकृत्रिम असें रूप देऊन तिच्यातील सत्य प्रवृत्तींचें आपण अध्ययन केलें आहे. हे सन्नारींचें अंतर्याम जाणणाऱ्या, आम्ही आपणास वन्दन करतों .आजच्या या विशेष दिवशीं आम्ही हें जाणून घेणार आहोंत कीं, आपल्या प्रतिभेचा सत्कार आम्हीं कसा करावा. आम्ही तुमच्यावर श्रद्धा व भक्ति करीत आहोंत. आपण जणुं आमचेच आहात. नारीजगताच्या हे परम मित्रा, आपण आम्हांस प्रिय वाटतां. आमचे आपण आत्मीय आहांत ..आम्ही आपणास वन्दन करतों. '

• • •

# शरच्चंद्रांचे बालनायक : ८

'रामेर सुमति ' नावाची एक वात्सल्यकथा शरच्चंद्रानीं लिहिली आहे. नारायणी नांवाच्या स्त्रीचा रामलाल हा सावत्र दीर. अतिशय उनाड व कट-कटी करणारा हा पोरगा घरांतील सर्वांना नकोसा झाला होता त्याच्या उपद्व्यापाना सर्व जण कंटाळले होते. पण एकट्या नारायणीनें त्याला कसें जपलें व शेवटीं त्याला सद्बुद्धि कशी झाली, याची ही एक अति-शय सोज्वळ अशी कौटुंबिक कथा आहे. शरच्चंद्राच्या कथातून नायिका कोणत्या प्रकारच्या आहेत याचा विचार करताना त्यांच्या मातृत्वाच्य

लालसेचें आपण थोडें वर्णन केलें होतें. शरद्बाबूंच्या कित्येक कथांतून मातृवात्सल्याचा आविष्कार अतिशय सुंदरपणें झालेला दिसून येतो. वात्सल्य ही एक स्त्रीहृदयाची नैसर्गिक भूक आहे. आई होण्याचें भाग्य ज्या स्त्रीस लाभलें नाहीं अशा स्त्रियांनाहि आपल्या प्रेमाचा वर्षाव कोणा तरी अजाण व दयनीय अशा लेकरावर करावा, असें वाटतें. शरद्बाबूंच्या कथातील मातृवात्सल्य व त्याचा विषय होऊन राहिलेली बालसृष्टि यांचा येथें थोडा परिचय करून घ्यावयाचा आहे.

'रामेर सुमति' मुळें शरच्चंद्र बंगाली वाचकांना चागल्याच परिचयाचे झाले. श्री. इलाचंद्र जोशी याच्याशीं बोलताना एकदा ते म्हणाले, 'यमुना' नावाच्या एका मामुली मासिकात माझी पाहिल्यानें 'रामेर सुमति' ही कथा प्रसिद्ध झाली. तें मासिक नवीनच निघालेलें असल्यामुळें त्याचे ग्राहक पन्नासच होते. माझी कथा लोकाना इतकी पसंत पडली कीं, दुसऱ्याच महिन्यात ग्राहकांची संख्या पाच शेंपर्यंत वाढली. . .. या प्रकारें बायनरप्रमाणें एका रात्रीं मी झोपून उठलों व पाहतों तों माझें नाव सर्वत्र प्रसिद्ध झालेलें दिसलें." लेखकाला प्रसिद्धि देणाऱ्या या भावमधुर कथेचा बालनायक रामलाल अतिशय खोडकर व उपद्व्यापी मुलगा आहे. त्याचें वय कमी होतें, पण दुष्ट बुद्धि मात्र कमी नव्हती. मोठा भाऊ श्यामलाल याचा हा धाकटा सावत्र भाऊ सर्व गांवाला दरारा बसवून होता. त्याच्या बायकोनें रामलालचें पालनपोषण त्याच्या अडीच वर्षांपासून आजपर्यंत तेरा वर्षें मनोभावें केलें होतें. पण रामलालच्या दुर्वर्तनापायीं सर्वच लोकाना एक प्रकारची धास्ती निर्माण झाली होती

शरद्बाबूंचें लहानपणीं एक मित्रमंडळ असे गावात त्याचे अनेक उद्योग कसे सुरू असत हें आपण पाहिलेंच आहे. त्याच मंडळाच सभासद वा प्रमुख रामलाल असावा. एकदां त्याची वहिनी—नारायणी-तापानें आजारी पडली. गावांतील नीलमणि सरकार या वैद्याचा भाव वाढला।

होता. गोरगरिबांना तो अडवूं लागला होता नारायणीचा ताप कांहीं उतरत नव्हता व मोलकरीण बोलावयास जाऊनहि तो कांहीं येत नाहींसें पाहून रामलाल रागानें लाल होऊन तसाच तडक नीलमणि सरकार यांच्याकडे गेला व म्हणाला, " वहिनीचा ताप अजून कसा नाहीं निघत ? औषध देता कीं मातीमसण देता ? सडक्या पिठान काय रोग बरा होतोय् ? " डॉक्टर एकदम रागावले. पण राम तेवढ्याच उंच स्वरात म्हणाला, " येतांना वहिनीनें गळ्याची शपथ घातली आहे म्हणून, नाहींतर तुझे सारे दात पाडून गेलों असतो घरीं, ऐकलंस ! चागल औषध घेऊन आत्तांच्या आत्तां ये. वेळ लावूं नकोस आज जर ताप निघाला नाहीं तर ही समोर आंब्याचीं कलमं दिसताहेत ना ! कुदळ घेऊन एका रात्रींत जमीनदोस्त करून टाकीन सारीं मी. उद्या सकाळीं तुझ्या सर्व बाटल्यांचाहि चुराडा झालेला दिसेल तुला. "

रामलालची ही धमकी ऐकून तो अधिकच भडकला. त्याला पोलीस ठाण्यावर नेण्याचें बोलूं लागला जमलेल्या रोग्यापैकीं कोणी साक्ष देण्यास तयार होईल का म्हणून त्यानें चौकशी केली तों एक जण बोलला, " साक्ष कोण देईल बाबू ? रोजरोज कोयनेल खाऊन कानाला बसलेत दडे. राम ठाकूर काय बोलला हें ऐकूंच नाहीं आलं आम्हाला. आणि दरोगा तरी काय करणार बाबू ? हा बामण दिसतोय् लहान, पण याच एक टोळकं आहे कुणब्याच्या मुलाच तें मात्र मोठ आहे. कुणाच्या घराला आग लागून घराची राखरांगोळी झाली तरी ठाण्यावर लोक चौकशीला यावयाचे नाहींत- " ठाण्यावरच्या पोलिसानासुद्धा रामलाल व त्याचें मंडळ याची भीति वाटे. डॉक्टरानीं चटकन् त्याच्या वहिनींना नीट तपासून औषध दिलें.

असा हा उपद्व्यापी राम. कोणाच्या काकड्याच चोर, कोणाचे वेलच कापून टाक, कोणाच्या पेरूवर चढ, असले हे उद्योग शरच्चंद्रांप्रमाणेंच त्याचेंहि नित्य चालू असत. त्यामुळें घरच्या लोकाना त्याला सांभाळणें

कठीण होऊन बसलें होतें. नारायणी नेहमीं त्याला कडक शिक्षा करी पण त्याच्यावर आईप्रमाणें ममता करून त्याला पोटाशीं धरणारीहि तीच होती. तिच्या लाडानें तो बिघडला आहे, असें सर्व जण म्हणत. घरांतील माणसाना मात्र त्याचा उपद्रव फार होत असे. तशात नारायणीची विधवा आई दिगंबरी आपल्या मुलीकडे रहावयास आली. या म्हातारीचें व रामलालचें भांडण सदोदित होत राही. अंगणांत पिंपळाची फांदी रामलाल लावीत असतांना या म्हातारीनें अकांडतांडव केलें व रामलालची ती फांदी तिनें मोडून तोडून टाकली. शाळेंतून आल्यावर रामलालनें हें सर्व पाहिल्यावर त्याचा संताप अनावर झाला. आता त्याला सावरणारें कोणीहि नव्हतें. पाटी-पुस्तक भिरकावून देऊन तो ओरडला, " माझं झाड काय झालं वहिनी ? "

" सांगतें, आधीं इकडे ये. "

" नाहीं. मी येत नाहीं. माझं झाड काय झालं सांग.... "

" इकडे ये म्हणतें ना ? "

रामलाल वहिनीजवळ गेला. तिनें त्याला प्रेमानें जवळ घेतलें. त्याच्या तोंडावरून हात फिरवीत ती म्हणाली, " मंगळवारीं कधीं कोणी पिंपळाचें झाड लावनातं का रे ? "

" का ? काय होतं लावलं तर ? "

" तसं झालं तर घरची मोठी सून मरते ना. "

" चल ! खोटं बोलतेस. "

" नाहीं रे, मुळींच खोटं बोलत नाहीं. पंचांगात लिहिलंय् ना तसं " आपल्या आईसारख्या मोठ्या वहिनीच्या गळ्याभोंवतीं आपले हात घालून रामलाल गंभीरपणें म्हणाला, " मला सुद्धा माहीत आहे तें. पण उपटून काढून तें फेकून दिले म्हणजे मग कांहीं दोष नाहीं ना ? होय ना वहिनी ? "

असा हा रामलाल व त्याची आईसारखी वहिनी. प्रेमानें जसें ती

त्याला जवळ घेई तसेंच त्याला भयंकर अशी शिक्षाहि देण्यास ती मागें-पुढें पाहत नसे. पण शेवटीं रामलालचे उपद्व्याप अगदीं विकोपास गेले श्यामलाल व रामलाल याच्यांत वाटण्या झाल्या पोरका, एकटा राम—या जगात त्याला कोण साभाळणार ? मायेनें कोण जेवूं घालणार ? एकदोन दिवस तो अर्धपोटीं राहिला. तिकडे नारायणीहि उपाशीच. शेवटीं तो घर सोडून निघाल्याचें तिला समजलें तेव्हा त्याला घेऊन येण्यासाठीं तिनें नोकर पाठविला. तिच्या आईला या गोष्टीचा राग आला. पण तिच्याकडे लक्ष न देता तिनें त्या पोरक्या पोराला कवटाळलें व उद्गार काढले, " तुम्हां सर्वांच्या डोळ्यासमोर माझें हें एवढें मोठें लेकरू अर्धमेलं होऊन गेलं आहे. तो व्रात्य असो कीं कसाहि असो, माझ्या घरीं माझ्या नजरेसमोर त्याला कोणीहि शिक्षा केलेली मला खपावयाची नाहीं. आई, तूं आजच्या दिवस येथें रहा व उद्या आपल्या घरीं जा. " सावत्र दिरासाठीं नारायणीनें आपल्या आईसहि जाण्यास सांगितलें. पण आता नारायणीच्या रामलाललाहि सद्बुद्धि आली होती. तो बोलला, " नको वहिनी. राहू दे त्याना. आता मी सज्जन झालोंय्. मला सुबुद्धि आलीय्. आणखी एकदा पहा तर खर ! " असा हा परिवर्तित झालेला रामलालचा स्वभाव. त्याचे व दिगंबरीचे उडालेले मोठ्या गंमतीचे खटके शरद्बाबूंनीं रगविले आहेत. नारायणीनें त्याच्यावर केलेली मायाहि अतुलनीय अशीच आहे. आपल्या मराठी भाषेंत ही कथा ' सीमा ' ' रामलाल , छोटा भाई ' इत्यादि नावानीं अवतीर्ण झाली असून तिला लोकप्रियताहि बरीच लाभली आहे याच कथेवर आधारलेला ' छोटा भाई ' हा चित्रपटहि तुमच्या स्मरणांत असेलच.

शरच्चंद्रांचे बहुतेक बालनायक बडखोर आहेत त्याना शिस्त लावणें मोठें कठीण काम असलें तरी त्याचें अंतःकरण मात्र विशाल असतें. कित्येक प्रसंगीं खुद्द शरद्बाबूच त्या त्या व्यक्तीमध्यें चित्रित झालेले दिसतात. ' श्रीकांत 'मधील इंद्रनाथ व श्रीकांत ही जोडी आता

आपल्या परिचयाची आहे. त्यांची मैत्री कशी जमली हें पाहण्यासारखें आहे. शाळेच्या क्रीडांगणावर बंगाली आणि मुसलमान विद्यार्थ्यांची फुटबॉलची मॅच होती. संध्याकाळच्या वेळीं मोठ्या खुषींत येऊन श्रीकांत मॅच पाहत होता. तों तेथें एकदम भयंकर दंगल माजून राहिली. 'धरा धरा! मारा मारा!' अशा आरोळ्या सुटल्या. पांच सहा मुसलमान मुलांनीं श्रीकांतला घेरून मारावयास सुरुवात केली होती. पण गर्दीची फळी फोडून तीरासारखा इन्द्रनाथ घुसला त्यानें त्याला त्या संकटांतून सोडविलें हा इंद्रनाथ दिसायला काळा, चाफेकळी-सारखें नाक, विशाल भालप्रदेश, चेहऱ्यावर देवीचे वण–असा होता. याच्याच संगतींत श्रीकांतनें आपल्या बालपणच्या आयुष्यांत अनंत उद्योग केले. त्यांचीं सरस व जिवंत वर्णनें श्रीकांतच्या पहिल्या पर्वांत आपणास पाहावयास मिळतील. गोसावी बागेंतून रात्रीं–मध्यरात्रीं सापाची किंवा वाघलांडग्याची भीति न बाळगणारा हा इंद्रनाथ अलगूज वाजवीत भटकत असे. त्या सुरामुळें श्रीकांतचें चित्त हरपून जाई. 'श्रीकांत कादंबरींत त्या दोघांच्या बालपणचे मनोवेधक उद्योग शरच्चद्रानीं चित्रित केले आहेत. एका श्रावणांतील संध्याकाळीं श्रीकांतच्या घरांतील मुलें अभ्यासास गुंगलेलीं असतांना श्रीनाथ बहुरूप्यानं उडविलेला गोंधळ मुळांतूनच वाचण्यासारखा आहे. श्रीकांत व इन्द्रनाथ मध्यरात्रीला स्मशानांतून मासे धरण्यासाठीं भटकत असतानाच्या रम्यभीषण वर्णनांचा उल्लेख मागें आलेलाच आहे.

रामलाल, श्रीकांत याच्याच पंगतींत शोभणारा आणखी एक उनाड पोरगा म्हणजे देवदास देवदास मुखर्जीचें शाळेंत कधींहि लक्ष नसावयाचें. वर्गांतल्या पोरांच्या खोड्या काढावयाच्या व मास्तरांची टिंगल करावयाची हेच त्याचे उद्योग सुरू असत. देवदासचे उपद्व्याप कांहीं कमी नव्हते. सरदारपुत्र भूल्यास त्यानें चुन्याच्या ढिगांत ढकलून दिलें आणि आपल्या कळकीच्या बेटांत आश्रयास पळून गेला.

पण या विलक्षण प्रकाराबद्दल त्याला चांगलीच शिक्षा मिळाली. सारा दिवस तो खोलींत कोंडून राहिला होता. पार्वती नावाची मुलगी त्याच्या बाजूनें नेहमीं असे. कधीं कधीं तिला त्याच्याकडून सडकून मारहि मिळे; पण तिनें यासंबंधींची तक्रार घरीं कधींहि केली नव्हती. एके दिवशीं देवदासनें मासे मारताना जवळचे तीन रुपये हरवूं नयेत म्हणून पार्वतीजवळ ठेवावयास दिले होते. ते तीन रुपये घेऊन पार्वती आपल्या एका मैत्रिणीकडे–मनोरमेकडे–खेळावयास म्हणून गेली असताना रस्त्यातून तीन वैष्णवी हातात खंजिरी घेऊन भिक्षेला निघालेल्या तिनें पाहिल्या. तिनें त्या वैष्णवींकडून गाणें म्हणून घेतलें व जवळचे रुपये त्याना तिनें देऊन टाकले. पार्वतीला त्याच्याकडून मोठा आशीर्वाद मिळाला. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं देवदासची गाठ पडली तेव्हा !......

"पैसे कोठें आहेत पारू ?"

"रुपये नाहींत."

"काय झाले ?"

"वैष्णवींना देऊन टाकले त्यानीं गाणं गाऊन दाखविलं."

"सारे देऊन टाकलेस ?"

"हो सारे. तीनच तर होते."

"हत्–गाढवे, असे सर्वच कसे दिलेस ?"

"वाः ! त्या तिघी होत्या ना. तीन रुपये दिले नसते तर वांटून कसे घेतले असते त्यांनीं ?"

"मी असतों तर दोन दिले असते...मग त्याना प्रत्येकीस दहा आणे आठ पै इतकी रक्कम मिळाली असती .."

"त्याना काय तुझ्यासारखा हिशेब करतां येतोय् !"

या दोघांच्या बोलण्यात तर्कशास्त्र आणि समजूत याचा मनोहर मिलाफ झालेला दिसून येतो. याच निरागस व मोकळ्या आनंदात

देवदास व पार्वती यांचें स्वच्छंदी आयुष्य चाललें होतें. दोघांच्याहि कपाळीं निष्ठुर समाजानें काय लिहिलें होतें हें त्यांना अगोदरच कसें समजणार ?

रामलालप्रमाणें अगदीं पोरका असणारा आणखी एक बालनायक या ठिकाणीं उल्लेखनीय आहे. 'मेज दिदी' (मधली बहीण) या कथेंतील किशन किंवा कृष्णा याच्यावर कोसळलेली विपत्ति करुणास्पद होती. चणेकुरमुरे भाजून पोट भरीत मोठ्या कष्टानें दिवस काढून आईनें किशनला चौदा वर्षांपर्यंत वाढविलें व ती त्याला सोडून मरून गेली. बिचाऱ्याला डोकें टेकायला साऱ्या गावांत जागा उरली नाही. त्याची एक सावत्र बहीण कादंबिनी म्हणून होती तिच्या घरची स्थिति चांगली असल्यामुळें तिकडे जाण्याचा त्यानें विचार केला. आईच्या मृत्यूमुळें रडून रडून दिवस घालविल्यामुळें किशनला ताप आला होता. बरा झाला तेंव्हा त्यानें भिक्षा मागून श्राद्ध केलें व नंतर उघड्या डोक्यानें एक छोटें बोचकें हातीं घेऊन राजहाट गांवीं तो आपल्या सावत्र बहिणीच्या गांवीं येऊन दाखल झाला. या नव्या आपत्तीला पाहून कादंबिनी एकदम भडकली, पण तिला समजावून साग-णारा त्याच्याबरोबरच आलेला एक म्हातारा होता. तो म्हणाला, "अक्का-साहेब, तुमच्या घरीं लक्ष्मीचें भांडार आहे. किती दासदासी, गोसावी, बैरागी, कुत्रीं-मांजरें तुमच्या घरचं अन्न खाऊन वाढली आहेत. एवढंसं हें पोर दोन घास खाऊन पडलं तर कोणास कळावयाचं सुद्धा नाहीं. मुलगा अगदीं भोळाभाबडा आहे बरं का अक्का. भाऊ म्हणून नव्हे तर संकटात पडलेलं एक ब्राह्मणाचं मूल म्हणून घराच्या एका कोपऱ्यात त्याला आसरा द्या."

याच विनवणीमुळें किशन कादंबिनीच्या घरीं कसाबसा टिकून राहिला. पण रोज त्या पोराला नाहीं नाहीं तें ऐकावें लागे. नवऱ्याच्या सांगण्यावरून त्याच्या पानात कादंबिनी भात ओती

व म्हणे, " हें हत्तीचें पिलूं पोसतां पोसता आमचं दुकान खालीं होणार असं दिसतय्. आता दुकानीं गेलात कीं एक मण जाडे तांदूळ पाठवून द्या. नाहीं तर दिवाळं वाजायची पाळी येईल." किशनला हें बोलणें ऐकून नको तें जेवण नको असें होऊन जाई त्याला आईची आठवण होई. कितीहि पोरगा जेवला तरी तिला वाटे, पोर उपाशीच आहे पण येथें बहिणीच्या घरीं मात्र डोळ्यांतील आंसवांच्याबरोबरच त्याला भात गिळावा लागे या गरीब पोराची दया कोणाला येणार? कादंबिनी-चीच एक धाकटी जाऊ हेमांगिनी नांवाची होती राबराब राबणाऱ्या व नेहमीं वहिणीचें बोलणें ऐकणाऱ्या या पोरक्या पोराची तिला दया येई तिचा एक मुलगा ललित किशनच्या बरोबरीचाच होता तिला किशनचाहि लळा लागला होता. त्याला ती खायला देई, जेवायला घाली, ममतेनें विचारपूस करी. पण हें सर्व कादंबिनीला कोठून सहन होणार? हेमांगिनी आजारी असेल तर किशा आपल्या ताईची नजर चुकवून भीत भीत, बिचकत बिचकत या मधल्या बहिणीची चौकशी करून जायचा हेमांगिनीला मग थोडें बरें वाटत असे. आजारपणात ती एकदां आपल्या नवऱ्याजवळ म्हणाली, " आजवर मीं तुमच्यापाशीं काहीं मागितलं नाहीं.—ही अशी बिछान्यावर पडलें आहें. एक मागणें आहे, द्याल?...हा कृष्णा एवढा मला द्या. दीनवाणा झाला आहे बिचारा आईबाप नाहींत – माणसें त्याला बडवून मारताहेत. तें माझ्याच्यानें पाहवत नाहीं. शपथेवर सांगतें. तो मला पोटच्या गोळ्याप्रमाणें वाटतो. मला द्या तो. त्याला खायला-प्यायला घालीन – लहानाचा मोठा करीन " पण हा विचार त्या कादंबिनीला पटायला पाहिजे ना! ती मुलखाचा भाडकुदळ होती. किशनवरूनच भांडण झालें तेव्हां एकदा हेमांगिनीनेंहि तिला चांगलेंच खडसावलें —

" मांगवेडाच्या जातीसारखं तुम्ही बोलतां आहां .. या पोराला आपला भाऊ म्हणून सांगायला सुद्धां लाज वाटली पाहिजे होती

तुम्हाला. जनावर पोसलं तरी देखील मनुष्य त्याला पोटभर खायला घालतं. पण या माणसासारख्या माणसाला जनावराच्या पंक्तीला नेऊन बसविलं तुम्ही आजवर कधीं पोटभर खायला घातल नाहीं याला. मी इथं नसतें तर एवढ्यात उपासपोटीं मेला असता तो. माझ्याकडे येतो तें पोटाच्या आगीमुळें – लाडिकपणा करायला नव्हे .. ''

आणि खरेंच या कृष्णाचे हाल कांहीं विचारू नयेत अशांपैकीं होत असत. पैसे चोरल्याच्या आरोपावरून एकदा त्याचा धनी त्याला निर्दयपणें मारीत होता. फटके खात असताना कृष्णा रडत नव्हता कीं त्याच्या तोंडून एक शब्दहि बाहेर निघत नव्हता. या बाजूला मारलें तर तो त्या बाजूनें तोंड पुढें करी आणि त्या बाजूनें मारलें तर या बाजूचें तोंड पुढें करी. गाडीसकट चिखलांत रुतलेला बैल जसा मार खातो तसाच तो बिनतक्रार मार खात होता – पण या सर्व प्रकारानें हेमागिनीला मात्र कमालीचें दुःख होत होतें. कृष्णाला आसरा दिल्याखेरीज तिचा ताप बरा होणारा नव्हता. उद्याच ती त्याला घरीं आणणार होती ' आजवर दोन मुलें होतीं मला. उद्यापासून तीं तीन होतील. यापुढें मी कृष्णाची आई. '' पण नवऱ्यानें या तिच्या विचित्र हट्टाकडे दुर्लक्ष केल्याबरोबर तिचें वात्सल्य सर्व परिस्थितीवर मात करणारें बनलें. एका गाडींत किशनला घालून ती घरातून निघाली. कृष्णाच्या गावीं तिला जावयाचें होतें. नवऱ्यानें विचारलें, " कुठें निघालीस ? '' त्यावर तिनें उत्तर दिलें, " याच्या गावीं.... याची कधीं कुठें सोय लागेल– कधीं कुठं त्याला आसरा मिळेल– तेव्हांच मी स्वतः फिरून परत घरीं येईन. नाहीं तर याच्याच संगतींत राहिलं पाहिजे मला. ' घराचा व नवऱ्याचा त्याग करून पोरक्या पोराची चिंता बाळगणाऱ्या हेमागिनीच्या अंतःकरणाची ओळख तिच्या नवऱ्याला होती. त्यानें किशनचे हात धरले व उद्‌गार काढले, " बाळ, तुझ्या ताईला घेऊन आता तूंच घरीं ये भाई. आज मी शपथ घेतों. या जिवात जीव आहे तोंपर्यंत

तुम्हां दोघां बहीणभावांत मी अंतराय करणार नाहीं. — ये भाई, तुझ्या ताईला घेऊन ये ना. ”

शरत्साहित्यात अशीं वात्सल्याचीं चित्रें किती तरी सापडतात. मातृत्वाच्या विविध छटा सुखदुःखांनीं भारावलेल्या अशा स्वरूपांत त्याच्या लेखणींतून उतरलेल्या दिसतात. ‘ बिन्दूर छेले ’ ही त्यांची अशीच एक करुणरम्य कथा आहे. यादव मुखर्जी व माधव मुखर्जी हे दोघे सहोदर बंधु नसले तरी त्यांचें एकमेकावरील प्रेम मात्र विलक्षण होतें. त्याच्या-पैकीं धाकटा माधव मुखर्जी याची पत्नी एका श्रीमंत जमीनदाराची अभिमानी मुलगी बिंदुवासिनी भली मोठी संपत्ति व कमालीचें रूप-सौंदर्य घेऊनच ती मुखर्जींच्या घरीं आली होती. तिला वळण लावणेंहि अशक्य होऊन बसलें होतें. कारण मधून मधून तिला फिट्स् येत असत. घरचीं माणसें घाबरून जात. वैद्य-डॉक्टरांना बोलावताना पुरेवाट होऊन जात असे. पण तिच्या या चमत्कारिक रोगावर तिच्या जावेला—अन्नपूर्णेला म्हणजे यादवाच्या बायकोला-एक चांगलाच उपाय सुचला. एके दिवशीं ही नवी सूनबाई गोरामोरा चेहरा करून अंग ताठरून चमत्कारिक रीतीनें बसली. अन्नपूर्णा प्रथम घाबरली पण त्याच क्षणीं तिला एक युक्ति सुचली. स्वतःचा दीड वर्षाचा मुलगा अमूल्य तिनें उचलून आणला व बिंदुवासिनीच्या मांडीवर ठेवला. अवेळीं झोंप मोडल्यामुळें त्यानें भोकांड पसरलें. बिंदूची मूर्च्छा त्याच क्षणीं सांवरली गेली व पोराला उराशीं कवटाळून बिंदुवासिनी आपल्या खोलींत गेली. बिंदूच्या फिट्सवरील हें औषध मोठें सूचक व निर्णायक असें होतें.

तुम्हीं कधीं टेनिसन् कवीची ‘ होम दे ब्रॉट हर् वॉरिअर डेड ’ ही कविता वाचली असेल. लहान मुलाच्या स्पर्शांतील जादू केवढी असते हें त्यात उत्तम रीतीनें प्रकट झालेलें आहे. रणांगणावर मृत झालेल्या नवऱ्याचें वर्तमान येतांच त्याची पत्नी जणूं शोकानें थिजून गेली. हलेना, बोलेना कीं डोळेसुद्धां उघडेना. पण एका म्हाताऱ्या बाईनें

तिचें तान्हें मूल तिच्या मांडीवर ठेवल्याबरोबर ती जागी झाली. भानावर आलेल्या त्या आईच्या मनांत आलें कीं, याच अर्भकासाठीं आपणांस आतां जगावयाचें आहे. बिंदुवासिनीचें जगणेंहि आतां याच अमूल्यासाठीं होतें – ती त्याचें सर्व कांहीं करूं लागली बिंदूच्या या बाळाचें वर्णन शरच्चंद्रांनीं तपशीलवार परंतु रसपूर्ण पद्धतीनें केलें आहे. त्याची आंघोळ-पांघोळ, त्याचें जेवणखाण, त्याचे कपडे, त्याचें शिकणें वगैरे हरएक बाबतींत बिंदुवासिनीच लक्ष देत होती. या पोरास कोणताहि त्रास होऊं नये म्हणून ती दूर असणारी शाळाच आपल्या कोठारात आणण्याचा प्रयत्न करते अमूल्याच्या डोळ्यांत कोणी टाकच खुपशील अशी भीति या भाबड्या ' आई 'स वाटते. या अमूल्यास कोणतीहि वाईट संगति लागूं म्हणून बिंदु फार जपत असे. तिची नणन्द, यादवाची आतेबहीण एलोकेशी नावाची होती. घरची परिस्थिति बरी नसल्यामुळें तिचा मुलगा नरेन्द्र याच्याच घरीं शिकण्यासाठीं म्हणून होता. चवड्या काठाचें धोतर नेसणारा व दिवसांतून चार वेळा भांग पाडणारा हा पोरगा अमूल्यला बिघडवून टाकणार, हें बिंदुवासिनीला दिसत होतें.

अमूल्य व नरेन्द्र या जोडीच्या बालक्रीडा शरच्चंद्रांनीं मोठ्या तन्मयतेनें रंगविल्या आहेत. नरेंद्रबाबूसारखे बारा आणे, तीन आणे, दोन आणे, एक आणा, अशा क्रमांत केस कापण्याचा हट्ट अमूल्यनें घेतला आहे. तो मुळा-तूनच वाचण्यासारखा आहे. नरेन्द्राच्या सोबतींत अमूल्य पार बिघडून चालला आहे हें तिला नीटपणें समजत असल्यामुळें ती व्याकूळ होऊन गेली. घरच्या इतर कटकटी वाढीस लागल्या होत्या. बिन्दुवासिनीला स्वतंत्र घरांत रहावें लागलें. पोरगा बिघडत चालला व आतां तर वरचेवर दृष्टीसहि पडत नसे म्हणून बिंदु उदास झाली होती. आता तिच्या मूर्च्छेवरील औषध कोणतें ! पण तरीहि तिला थोडी समाधानाची जागा होती. अमूल्याची आपल्यावरील श्रद्धा कमी झालेली नाहीं हें तिला समजलें. एके दिवशीं स्वयंपाकीणबाईनें सांगितलें, " त्या रात्रीं तुम्हांला

मूर्च्छा आली होती तेव्हा काय झालें हें तुम्हांला समजलें नाहीं. अमूल्य कुठूनसा धावत आला त्या वेळीं अन् तुमच्या अंगावर पडून रडूं लागला. त्यानें कांहीं ही असली मूर्च्छा पूर्वी कधीं पाहिली नव्हती. तो म्हणूं लागला कीं, माझी आई मेली. म्हणून तुमच्या तोंडात पाणी घालू देईना कीं कुणाला वारा घालूं देईना मी उचलायला गेलें तर मला चावला.'' बिंदुवासिनीला अजूनहि जगून राहण्यास अवसर होता

अमूल्य शाळेंत निघाला कीं गच्चीआड उभी राहून बिंदु त्याला मनमुराद पाहून घेत असे. मध्यें बिंदूचे वडील अजारी असल्यामुळें तिला माहेरीं जाणें भाग पडलें. जाताना अमूल्य भेटला नाहीं म्हणून तिचें अंतःकरण फारच कळवळलें. बिंदुवासिनीला आता यापुढें जगण्यात राम वाटत नव्हता. उपासपोटीं राहून ती आपली प्रकृति मुद्दामच बिघडवून घेत होती. माहेरीं आल्यानंतर तिची प्रकृति अधिकच बिघडली तिच्या अंगांत सतत ताप राहूं लागला. वारंवार तिला मूर्च्छा येत असत. कधीं कधीं तिला सावध होतांनाहि कष्ट पडत असत. अमूल्यभोंवतीं तिचा जीव घुटमळत होता तो कांहीं दृष्टीस पडणार नाहीं म्हणून तिला वेदना होत होत्या पण तिची थोरली जाऊ अन्नपूर्णा अमूल्यला घेऊनच पोरीच्या समाचारासाठीं आली. यादव मुखर्जीहि धावत आला व सर्वांनीं तिला जगविण्याचा प्रयत्न केला. शेवटीं बिन्दुवासिनीलाहि हायसें वाटलें. ती म्हणाली, " दे. काय खायला द्यायचें असेल तें दे. अन् अमूल्यला आणून इथ माझ्या कुशीला निजव. अन् तुम्ही सारीं बाहेर जाऊन आरामांत असा. अगदीं भिऊ नका.—मी आतां मरत नाहीं.'' अमूल्यसाठीं यापुढें बिंदुवासिनी जगणार होती. तसें पाहिलें तर तो कांहीं तिचा मुलगा नव्हे. पण कोणास तरी आपलें प्रेमसर्वस्व अर्पण करावें ही स्त्रीमनाची भूक बिंदुवासिनींत होती. शरद्बाबूंच्या लेखणींतून या चित्रास अति मनोहर असें रूप प्राप्त झालें आहे.

रवीन्द्रनाथ ठाकुरांनीं बालस्वभावाचीं उत्कृष्ट अशीं शब्दचित्रें आपल्या कवितातून व कादंबऱ्यातून रंगविलीं आहेत. लहान मुलांच्या आवडीनिवडीचें त्याना अतिशय बारकाईनें ज्ञान होतें. त्याचे मनोविकार फार बारकाव्यानें त्यानीं रेखाटले आहेत. या बाबतींत शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांचेंहि ज्ञान कांहीं कमी नव्हतें. बालस्वभावाचीं व त्याच्या क्रीडामाधुर्याचीं किती तरी चित्रें आपणास शरत्साहित्यात सांपडतील. शरच्चंद्राचे बालनायक बंडखोर, उनाडक्या करणारे आणि थोडे उच्छृंखल वृत्तीचे दिसतात. शरद्बाबू जसे लहानपणीं होते तसेच त्याचे बाल नायक बनले यात कांहीं आश्चर्य नाहीं. त्यांनीं निर्माण केलेल्या एका गांभीर्यपूर्ण व्यक्तीचा परिचय आपण थोडक्यात करून घेणार आहोंत. बालस्वभावाचें एवढें मुग्धमनोहर शब्दचित्र इतरत्र मिळणें कठीण आहे.

काशीनाथ बंदोपाध्याय हा शरच्चंद्रांचा बालनायक त्यांच्या इतर नायकांपेक्षां पुष्कळच वेगळा आहे. अभ्यासांत त्याचें फार लक्ष आहे. वृत्ति अंतर्मुख आहे. कथेच्या आरंभींच या तत्त्वज्ञानी व गूढताप्रिय काशीनाथाची ओळख करून देण्यात आली आहे " पहाटे चार वाजण्याच्या सुमारास उठून स्नान, संध्या वगैरे करून रोजचा कार्यक्रम संपल्यावर शेंडीला भली उंच गाठ मारून काशीनाथ जेव्हा धनजय भट्टाचार्यांच्या पाठशाळेबाहेरच्या व्हराड्यांत येऊन बसत असे व दर्शनग्रंथातील सूत्रें व त्यावरील भाष्य गुणगुणत असे, तेव्हा बाह्य जगातील कोणत्याहि गोष्टीचें भान त्याला उरत नसे. काशीनाथाचें ललाट चांगलें लांबरुंद होतें, तसाच त्याच्या देहाचा बांधाहि प्रशस्त होता. दर्शनशास्त्राच्या अंतरंगात प्रवेश करतांना तो खरोखरच स्वतःस विसरून जात असे. तशा अवस्थेत त्याला बघून लोक नाना प्रकारचे तर्क बांधीत. कोणी म्हणत, तो आपल्या बापाप्रमाणेंच महापंडित होणार आहे. कोणी म्हणत कीं, विद्येच्या अतिरिक्त हव्यासानें बापाप्रमाणेंच हा वेडा बनून जाईल." असा हा अकालीं

प्रौढ बनलेला व पांडित्याचा प्रकाश पाडणारा काशीनाथ मोठा तेजस्वी मुलगा होता. त्याची ही प्रगति त्याच्या मामाला सहन होत नसे. तो म्हणे, "बाबारे! तूं गरिबाचा मुलगा. काय करायचं तुला एवढं शिकून? सध्यां जेवढं शिकला आहेस तेवढ्यावर रोज लागणारे मूठभर डाळतांदूळ तसेंच एखादी पैरण व ताटवाटी तुला सहज मिळूं शकेल. काय करायचं अधिक शिकून! स्वर्गवासी पित्याप्रमाणें, घराच्या एका कोपऱ्यात बसून, मान खालीं घालून तंद्रींत तर नाहीं ना रहावयाचं!"

सर्वसामान्य लोकाना विद्येची चाड असतेच असें नाहीं. कित्येक जण काशीनाथाच्या व्याकरणज्ञानाची थट्टाच करीत. कोणाच्याहि म्हणण्याकडे तो लक्ष न देतां आपल्याच उद्योगात रंगून गेलेला असे. त्याच्या संवयीहि मोठ्या चमत्कारिक होत्या बालपणींच या मुलाच्या मनानें फार मोठी प्रगति केली होती. संध्याकाळ झाली म्हणजे शेतांरानांतून तो मनास येईल त्याप्रमाणें भटकत असे. कधीं नदीच्या तीरावर असणाऱ्या एका जुन्यापुराण्या पिंपळाच्या झाडाच्या फांदीवर बसून मावळणाऱ्या सूर्यनारायणाची लाल पिवळसर प्रभा आकाशांत आस्ते आस्ते कशी पसरत जाते, याचें निरीक्षण तो करीत असे. कधीं गावातील शिवमंदिरात आरती चालू असता अर्धवट मिटल्या डोळ्यानीं तो जागच्या जागींच स्तब्ध होऊन जात असे. तर कधीं मामाच्या देव-घरात घोंगडी अंथरून तीवर तासचे तास गुपचुप बसून राही. त्याला कोणतीहि इच्छा नव्हती, आकांक्षा नव्हती. वयाच्या बाराव्या वर्षीच त्याचे वडील वारले त्यानंतर सहा वर्षें लोटलीं, पण काशीनाथाचा स्वभाव दिवसेंदिवस जास्तच गंभीर होत राहिला या अशा गंभीर प्रवृत्तीच्या मुलाचें लग्न त्याच गावच्या प्रियनाथ मुखोपाध्याय यांच्या मुलीबरोबर ठरलें. एखादा गरिबाचा साधासुधा मुलगा त्यांना घरजांवई म्हणून हवा होता. लग्नाच्या आधीं त्यांची व काशीनाथाची मुलाखत झाली तीहि ऐकण्यासारखी आहे —

" कुठं गेला होतास ? "

" भट्टाचार्य महाशयांच्या पाठशाळेंत अभ्यास करीत होतों. "

" व्याकरण शिकून झाल ? "

" होय झालं. "

" साहित्य शिकला आहेस ? "

" साधारणपणें माहीत आहे. "

" सध्या काय शिकतो आहेस ? "

" सांख्य दर्शन. "

आणि काशीनाथाचें लग्न होऊन तो प्रियनाथबाबूंच्या श्रीमंतींत वावरूं लागला. पण त्याचें मन मात्र नेहमीं उदासच राहिलें. सोन्याच्या पिंजऱ्यांत त्याचें मन एकसारखें तडफड करूं लागलें. पूर्वीप्रमाणें काट्याकुट्यात भटकणें, वाटेल तेथें जाणें, मन मानेल तसें वागणें आतां बंद झाल्यामुळें काशीनाथ खिन्न होऊन गेला. त्याच्या पूर्वीच्या व आतांच्या परिस्थितींत फारच अंतर पडलें होतें येथून पुढच्या त्याच्या जीवनांत काय काय स्थित्यंतरें घडून आलीं हें आपण मागें पाहिलें आहे. शरच्चंद्रांचा एकमेव असा वैशिष्ट्यपूर्ण स्वभावाचा धीरगंभीर काशीनाथ सर्वांचें चित्त वेधून घेणारा असाच आहे.

शरत्साहित्यांतील बालनायकाचा परिचय आपण विस्तारानें करून घेतला आहे. त्यांच्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या स्त्रियांच्या हृदयांतील हळुवार भावनांचा परिपोष शरच्चंद्रांनीं फारच नाजुकपणें केलेला पाहिला आहे. शेवटीं एका पोरक्या दुर्दैवी पोराची ओळख करून देऊन हें प्रकरण संपवावयाचें आहे. दुर्गादास बंद्योपाध्याय यांच्या घरीं नोकर म्हणून राहिलेला एक कायस्थाचा अनाथ मुलगा हरिचरण याची कथा मनास चटका लावणारी अशी आहे. कोणनीहि तक्रार न करता पडेल तें काम हा पोरगा मान खालीं घालून निमूटपणें करीत असे. दुर्गादासबाबूंची सेवा तो उत्तमपैकीं करी. त्यांच्या आंघोळीचें पाणी

काढून देणें, पानाचा डबा हजर करणें, गुडगुडी भरून देणें, इत्यादि कामांत हरिचरण तरबेज झाला होता. पण एके दिवशीं तो आजारी पडला व त्याच्या हातून दुर्गादासबाबूंचें अथरुण घालण्याचें राहून गेलें होतें. हरिचरण न जेवता तसाच तापल्या अंगानें झोपीं गेला. दुर्गादास कोठून तरी मेजवानी झोडून रात्रीं अकरा वाजता घरीं आले तों अंथरुणाचा पत्ता नाहीं. त्यांच्या मनात फार संताप निर्माण झाला. ते त्याच्या खोलींत गेले. रागाच्या भरात झिंज्या धरून त्यांनीं त्याला उठविलें व त्याच्या कमरेंत एक बुटाची लाथ ठेवून दिली. बिचारा हरि-चरण कळवळून गेला कसाबसा तो उठला. दुर्गादासबाबूंचे पाय चेपीत असताना बाबूंच्या पायावर एक कढत कढत अश्रुबिंदु येऊन पडला.

दुर्गादासांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला त्यांना रात्रभर झोप कशी ती आली नाहीं. दुसऱ्या दिवशीं विलक्षण घटना घडली. दुर्गादासबाबूंची पत्नी आजारी असल्याची तार आली. त्याच दिवशीं त्यांना कलकत्त्यास जाणें आवश्यक होतें. गाडींत चढता चढता दुर्गादासबाबू स्वतःशीं म्हणाले, "देवा, प्रायश्चित्त तर देत नाहींस ना?" कालची गोष्ट त्याच्या मनास लागून राहिली होती. दुर्गा-दासाची बायको मरतां मरता वांचली. पण त्याचा सेवक हरिचरण?— दहा दिवसांच्या तापानें तो मरण पावला. मरणापूर्वी त्यानें दुर्गादास-बाबूंना भेटण्याची फार इच्छा केली होती.

असा हा पोरका, दुर्दैवी व कष्टी सेवक हरिचरण! शरत्साहित्यात याप्रमाणें दुर्लक्षित, उपेक्षित असलेल्या किती तरी कष्टी माणसांचीं करुणरम्य चित्रें आपणास पाहावयास मिळतील.

• • •

## शरद्बाबूंचें तत्त्वचिंतन : ९

शरच्चंद्रांच्या चरित्राचें व साहित्याचें संक्षिप्त वर्णन आपण केलें. यानंतर मनांत प्रश्न उभा राहतो, शरद्बाबू कोण होते? शरच्चंद्रांच्या मनाचा विकास कसकसा होत गेला? — त्यांच्या श्रेष्ठ कलेची परिणति कशांत झाली? त्यांच्या जीवनाचें सार कोणतें? — या प्रश्नांचें उत्तर या प्रकरणांत आपण मिळवण्याचा प्रयत्न करूं. त्यांच्या जीवनांतील आणखी कांहीं गोष्टींचा उल्लेख यासाठीं आवश्यक आहे.

शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्या कथासाहित्यानें सारा हिंदुस्थान वेडावून गेला आहे. असें सांगतात कीं, त्यांच्या 'श्रीकांत' कादंबरीचे फ्रेंच व इंग्रजी भाषेंत झालेले अनुवादहि अतिशय लोकप्रिय झालेले आहेत. मानवी स्वभावाचें विराट् दर्शन शरद्बाबूंनीं आपल्या कथासाहित्यांत केलेलें पाहून, एरवीं भावनाविवश सहसा न होणारा आपला मराठी वाचकवर्गहि शरच्चंद्रांवर बेहद्द खूष होऊन गेलेला आहे. आज महाराष्ट्रीय वाचकवर्ग शरद्बाबूंना श्रेष्ठ कथाकार म्हणून ओळखतो. लहानपणापासून शरच्चंद्र भ्रमण करीत राहिले, उच्च शिक्षणाचा कोणताहि लौकिक संस्कार त्यांना लाभला नाहीं, पोटासाठीं त्यांना ब्रह्मदेशांत तेरा-चौदा वर्षें कारकून म्हणून राहावें लागलें वगैरे गोष्टीहि आतां आपल्या परिचयाच्या आहेत. शरद्बाबूंच्या चरित्राचें सार ध्यानांत घेऊन व त्यांच्या कथासाहित्याची चाळणा करून कित्येक टीकाकार त्यांतून कांहीं निष्कर्ष काढीत असतात. त्यांतील एक निष्कर्ष असा कीं, शरद्बाबू हे उच्छृंखल वृत्तीचे असावेत, जीवनांत कोणत्याहि प्रकारचें बंधन म्हणून त्यांनीं स्वीकारलें नव्हतें; सर्व तऱ्हांच्या व्यसनांच्या कचाटींत सांपडून त्या विशिष्ट कैफांत त्यांनीं आपल्या साहित्याची उभारणी केली, त्यांच्या 'चरित्रहीन' मधील नायकाप्रमाणेंच तेहि स्वतः चरित्रहीन असावेत. पण ही वरवरची विचारसरणी बरोबर नाहीं.

पतितांचा कैवार शरद्बाबू जेव्हा घेत तेव्हा चारित्र्यवान् लोकाची हेटाळणी त्यांनी केव्हांहि केली नाहीं. नैतिकतेच्या आदर्शास त्यानीं केव्हांहि धक्का लावला नाहीं. समाजाच्या चमत्कारिक धोरणामुळें, आपल्या वाईट चालीरीतींमुळें अगतिक होऊन एखाद्दुसरी व्यक्ति पापाकडे वळली तर त्या व्यक्तीकडे कसें पाहावें, हें शरच्चंद्रांनीं दर्शविलें आहे शरद्बाबू स्वतः श्रेष्ठ प्रकारचे चारित्र्यवान् होतेच; पण आपल्या कथाकादंबऱ्यातून त्यानीं पापपुण्य, स्वर्ग-नरक यांसंबंधीं जी तात्त्विक चर्चा केली आहे तीहि अतिशय उद्बोधक अशी आहे.

शरद्बाबू चट्टोपाध्याय हे एक अव्वल दर्जाचे तत्त्वचिंतक होते. बालपणींच विद्याभ्यास सोडून देऊन त्यांनीं अवेळींच भ्रमंती केली ही गोष्ट खरी. परंपरागत अशा कौटुंबिक संस्कारांचा किंवा शालेय विद्येचा लाभ त्यांना झाला नाहीं हेंहि खरें, पण शरद्बाबूंनीं आपल्या पर्यटनात मानवसमुदायाचें जें निरिक्षण केलें तें फार महत्त्वाचें होतें. निरीक्षणाच्या जोडीला त्यानीं चिंतनहि भरपूर केलेलें दिसतें. पुस्तकी विद्येचा लाभ त्यांना प्रारंभींच्या आयुष्यांत घेतां आला नाहीं. रवीन्द्रनाथाच्या वयाला सत्तर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल शरद्बाबूंनीं भाषण करतांना जें आत्मनिवेदन केलें त्यात त्याना विद्यादेवी कशी अनुकूल नव्हती, याचें मनोहर चित्र रेखाटलें आहे तें आपण पाहिलें.

स्वतःवर विद्येचा कोणताहि संस्कार नाहीं याची जाणीव कधीं खऱ्या अर्थानें तर कधीं विनयानें शरच्चंद्र यांना सतत होती. आपल्या एका साहित्यिक मित्राला लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, " मी किती सामान्य व तुच्छ लेखक आहें हें मी जाणतों. ना विद्या, ना पांडित्य. केवळ मनुष्य. जें मनास येतें तें लिहून टाकतों. त्यामुळें आजच्या जमान्यातील पंडित-प्रोफेसर लोक जेव्हां माझ्यावर शिव्याचा वर्षाव करतात, तेव्हां मी त्या गप्प राहून सहन करतों. " ज्या मासिकात शरद्बाबूंच्या प्रारंभिक कथा-कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या त्या ' यमुना '

मासिकाच्या संपादकास — फणीन्द्रनाथ पाल याना — शरच्चंद्र लिहितात,
"मीं स्वतःस मूर्ख म्हटलें यांत खोटें काय? आहे ! ..होय, कांहीं कथा-कादंबऱ्या लिहितों. पण त्यांमध्यें पांडित्य कोठलें? बी. ए., एम्. ए., बी. एल्. या पदव्यांवर माझी श्रद्धा आहे... म्हणून तसें लिहिलें .." पण आतां विद्वत्त्व किंवा पांडित्य हें विद्यापीठांच्या पदव्यांवर अवलंबून नसतें, हें समजण्याइतपत लोकांच्या मनाची प्रगति झालेली आहे. त्यांच्यासाठीं सांगणें उपयुक्त वाटतें कीं, ज्या शरद्‌बाबूंना प्रारंभींच्या आयुष्यात अभ्यासास वेळ मिळाला नाहीं, त्या शरद्‌बाबूंनीं ब्रह्मदेशात नोकरी करीत असतांना धर्मशास्त्र, वेदान्तशास्त्र, समाजशास्त्र यांचा मनापासून अभ्यास केला. याच देशात असताना कोणा मणींद्रकुमार मित्र नावाच्या व्यासंगी गृहस्थाचा परिचय शरद्‌बाबूंनीं करून घेतला. त्यांच्याबरोबर पाश्चात्त्य तत्त्वज्ञांपैकीं मिल्, कांट, हेगेल, शोपेनहार इत्यादींच्या तात्त्विक विचारांचें अध्ययनहि त्यांनीं मोठ्या आवडीनें केलें. मित्र यांच्या ग्रंथालयातील सर्व ग्रंथकार शरच्चंद्र यांनीं जवळजवळ आत्मसात् करून टाकले. समाजशास्त्र व दर्शनशास्त्र यांचा जवळून परिचय करून घेण्यात त्यांना मनस्वी आनंद होई. यामुळें त्यांनीं प्रारंभीं केलेल्या समाजनिरीक्षणास तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त झाली. रोज पांचपांच सहासहा तास अध्ययन किंवा तात्त्विक चर्चा केल्याखेरीज शरच्चंद्र राहत नसत.

या त्यांच्या अध्ययनाचा परिणाम असा झाला कीं, त्यांच्या कथा-साहित्यात अत्यंत मनोरंजक अशी तात्त्विक चर्चा तर आली आहेच, पण शरद्‌बाबूंचे तात्त्विक निबंधहि श्रेष्ठ ठरले आहेत. निबंधकार शरद्-बाबू लोकांच्या फारसे परिचयाचे नाहींत. पण आपले विचार नीट मांडावयास निबंध हेंहि उत्कृष्ट माध्यम आहे असें शरद्‌बाबू मानीत असत. 'यमुना' मासिकाचा दर्जा वाढावा म्हणून ज्या योजना शरद्-बाबू सुचवीत त्यांत निबंधलेखनास महत्त्व द्यावें ही एक असे.

संपादकांना लिहिलेल्या एका पत्रात ते स्वतः लिहितात, "कथा लिहिण्याच्या परिश्रमातून तुम्ही मला मुक्त कराल तर मी कथेच्या शैलीनें सुबोध आणि सरळ असे निबंध लिहीन." निबंधलेखनास आवश्यक अशी वैचारिक भूमिका त्यानीं मोठ्या प्रयत्नानें तयार केली होती. आपल्या एका रसिक मित्राला लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, "मीं खूप वाचलें आहे, गेल्या दहा वर्षांत शरीरविज्ञान, जीवविज्ञान, मनोविज्ञान आणि इतिहास हीं शास्त्रें वाचून काढलीं."

शरद्बाबूंचें हें नुसतेंच वाचणें नव्हतें, तर त्याच्यापाठीमागें दीर्घ समाजनिरीक्षण व तत्त्वचिंतन होतें या सर्वांचा परिपाक म्हणजे त्यानीं नारीधर्माबद्दल केलेली तात्त्विक विवेचना. 'नारीजातीचा इतिहास' म्हणून त्यानीं चारपांचशें पृष्ठांचा एक ग्रंथ लिहिला होता. तो पुढें इतर लिखाणाबरोबर जळून गेला, तरी आज त्यांचा 'नारीचें मूल्य' हा छोटा निबंध उपलब्ध आहे. या निबंधाची बरीच ख्याति झाली. जगातील सर्व पुढारलेल्या समाजात नारीजीवनाची पूर्वी काय परिस्थिति होती व आज कोणत्या अवस्थेंत नारीजीवन आहे, याची तात्त्विक चर्चा शरद्बाबूंनीं केली आहे. मानवी भावनांना हलवून सोडणारा हा श्रेष्ठ कलाकार या वेळीं एक अव्वल दर्जाचा तत्वचिंतक व महापंडित बनलेला दिसतो. सुप्रसिद्ध बंगाली नाटककार द्विजेन्द्रलाल रॉय यांनीं या निबंधावर अभिप्राय देतांना असें म्हटलें कीं, बंगाली भाषेंत एवढा तत्त्वविवेचक मूलगामी विचार करणारा लेख पूर्वी कोणींहि लिहिलेला नव्हता.

शरच्चंद्र चट्टोपाध्याय 'नारीचें मूल्य' लिहूनच थांबणार नव्हते. त्यांच्या अध्ययनाचा परिघ एवढा विस्तृत होता व त्यांच्या चिंतनाची झेप एवढी पल्लेदार होती कीं, अशा प्रकारें चौदा मूल्यांवर चौदा निबंध लिहिण्याची त्यांची मनीषा होती. प्रेमाचें मूल्य, धर्माचें मूल्य, समाजाचें मूल्य, आत्म्याचें मूल्य, सत्याचें मूल्य, साहित्याचें मूल्य, वेदान्ताचें मूल्य,

इत्यादि विषयाची यादी पाहिली म्हणजे कथा-कादंबऱ्यात एकजीव होणारी शरद्‌बाबूंची लेखणी पांडित्याचाहि आविष्कार कसा करू शकते हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. भगवानाचें मूल्यहि ठरवावें असा त्यांचा विचार होता. 'समाजधर्माचें मूल्य' नावाचा निबंध त्यानीं लिहून तयारहि केला होता. दुसऱ्या देशांतील सामाजिक नियमाशीं आपल्या येथील समाजनियमांची तुलना करून एक विस्तृत आलोचना उपसंहारांत करावी, असें त्याना वाटत होतें.

सर्व शास्त्राचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास शरद्‌बाबू रात्रीं जागरण करून करीत. नवे नवे विचार आपण समजावून घ्यावेत व ते आपल्या वाचकाना सोप्या भाषेंत समजावून सांगावेत ही त्यांची मनीषा होती. फणीबाबूंना लिहिलेल्या एका पत्रात ते लिहितात, "कित्येक दिवस मनात घोळत आहे कीं, हर्बर्ट स्पेन्सरचें समन्वयात्मक दर्शन (Synthetic Philosophy) आपल्या भाषेंत तयार करून युरोपमधील इतर तत्त्वज्ञाशीं त्याबरोबर तुलना करावी व एक लेखमाला लिहावी. आपल्या देशांतील मासिकपत्रांत केवळ आपल्याकडील सांख्य, वेदान्त, द्वैत आणि अद्वैत याखेरीज इतर चर्चाच येत नाहीं."

आधुनिक काळातील नव्या तत्त्वज्ञानाशींहि शरच्चंद्र अपरिचित नव्हते. एका पत्रांत ते लिहितात, "एके दिवशीं बर्ट्रांड रसेलचें 'On Outline of Philosophy' हें पुस्तक वाचलें विषय फारच कठीण आहे. गणितादिकाचें ज्ञान मला पुरेसें नसल्याकारणानें सर्व गोष्टी स्पष्टपणें मला समजल्या असें नव्हे, पण या गृहस्थाच्या लिहिण्यातील सरलता व अनभिज्ञ माणसासहि विषय समजावून देण्याचें सामर्थ्य पाहून मी मुग्ध होऊन गेलों. अज्ञाणी लोकाबद्दल त्याच्या मनांत विशेष करुणा दिसते ....."

शरच्चंद्र चट्टोपाध्याय याच्या व्यासंगाची ही अशी पार्श्वभूमि आहे. समाज, धर्म, देव, संस्कृति, देशकारण या विषयांवरील त्यांचें चिंतन

त्यांच्या कथा-कादंबऱ्यांतून तर प्रकट झालेंच आहे, पण निरनिराळ्या विषयांवर त्यांचे जे छोटे छोटे निबंध आहेत त्यांची महती विशेष आहे. साहित्यातील अनेक वादग्रस्त प्रश्नांवर त्यांनीं आपलीं मतें तात्त्विक भूमिकेवरून विशद केलेलीं आहेत. 'साहित्य आणि नीति', 'साहित्याची रीति व नीति', 'भाग्यविडंबित लेखक', 'साहित्यातील आर्ट व दुर्नीति' इत्यादि त्यांचे निबंध त्यांच्या तत्त्वचिंतनाची साक्ष देणारे आहेत. समाजातील ढोंगी आचारविचारांची कठोरपणें त्यांनीं जी समालोचना केली आहे, तिच्या पाठीमागें त्यांच्या शास्त्रीय अध्ययनाची तात्त्विक भूमिका आहे. 'चरित्रहीन' नावाची कादंबरी लिहून खळबळ उडवून देणारा लेखक नीतिशास्त्राचा व्यासंगी अभ्यासक आहे हें फार थोड्या लोकांना माहीत असेल. प्रमथनाथ भट्टाचार्य नावाच्या आपल्या एका मित्रास लिहिलेल्या पत्रात शरच्चंद्र लिहितात, "मी नीतिशास्त्राचा एक खराखुरा विद्यार्थी आहें. नीतिशास्त्र त्यातील दर्दी लोकाना जेवढें समजतें तेवढेंच मलाहि कळलें." आणि म्हणूनच आपल्या 'चरित्रहीन' कादंबरीस शरद्बाबू 'Scientific Ethical Novel' असें उपशीर्षक देऊन तिचा गौरव करीत. या कादंबरींत शरद्बाबूंच्या चिंतनाचा परिपाक कसा उतरलेला आहे हें आपण थोडक्यात पाहणार आहोंत.

आपल्या कथाकादंबऱ्यात कलेचें रूप न बिघडविता शरच्चंद्र अनेक प्रश्नांवर रसाळपणें चर्चा करीत असताना दिसतात. 'श्रीकान्त'च्या भूमिकेवरून तटस्थपणें जगाचें जें निरीक्षण शरद्बाबूंनीं केलें आहे तें अत्यंत रमणीय असें आहे. धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, समाजशास्त्र, इत्यादिकांचा व्यासंग त्यांचा होताच, पण भारतीय तत्त्वज्ञानातील अनेक रहस्यमय प्रश्नांवर ते अतिशय सोप्या पद्धतीनें चर्चा करीत. त्यात थोडासा फटकळपणा असला तरी कोणत्याहि प्रश्नाची उलटसुलट बाजू समान भूमिकेवरून मांडण्यांत त्यांचा हातखंडा असे. आपल्याकडे तत्त्वज्ञानात मुख्यतः ब्रह्मचिंतनाचा भाग येतो. जगाची उत्पत्ति,

त्याचें स्वरूप, त्याचें मूळकारण, पुनर्जन्म, पापपुण्य, स्वर्गनरक, सुख-दुःख इत्यादि अनेक प्रश्नांचा विचार आपल्याकडे तत्त्वज्ञानाच्या रूपानें मांडला जातो. शरद्बाबूंचें दीर्घकालचें चिंतन या प्रश्नांवरील त्याचें विवेचन वाचून पटण्यासारखें आहे.

शरद्बाबूंची सर्वांत गाजलेली व टीकाकारांच्या रोषाला कारणीभूत झालेली कादंबरी म्हणजे 'चरित्रहीन'. यातील नायिका किरणमयी ही एक विलक्षण व्यक्तिरेखा आहे. एका महापंडिताच्या व रुक्ष वेदान्ती माणसाच्या या पत्नीनें अनेक विषयांचा अभ्यास केला आहे, अनेक धर्मग्रंथांचें अध्ययन केलें आहे ही किरणमयी चरित्रहीन दाखविली असली तरी तिची ज्ञानधारणा मात्र तीव्र स्वरूपाची आहे. तिच्या मुखातून शरद्बाबू तत्त्वज्ञानांतील अनेक विचार सोप्या व सरळ भाषेंत अगदीं सहजासहजीं मांडून दाखवितात. ते वाचीत असताना मति गुग होऊन जाते.

परमेश्वराच्या सगुणनिर्गुण स्वरूपावरील चर्चा उदाहरणादाखल पाहावी : " जें बुद्धीच्या पलीकडचें आहे, अगम्य आहे, तें सोडून द्यावं. तोंडानं म्हणावयाचं अगम्य, अव्यक्त, अबोध्य, अज्ञेय आणि त्याच्याच-बद्दलची चर्चा करावयाची ........ नुसत्या बड्या बड्या शब्दांचेच मारपेच. निर्गुण, निराकार, निर्लिप्त, निर्विकार हीं नुसत्या शब्दांचीं अवडंबरं. या शब्दांना कांहींहि अर्थ नाहीं. ज्या माणसानं आयुष्यांत कधीं तांबडा रंग पाहिला नाहीं त्यानें तोंडच्या भाषेंत तांबड्या रंगाचं वर्णन तरी कसं करावयाचं ? " पापपुण्याचा विचार करताना एके ठिकाणीं किरणमयी सांगते, " जें निर्मळ आहे, सूर्यप्रकाशासारखं उज्ज्वल आहे, त्यालाच अग्रस्थान कसं देतां येईल ? माणसाच्या रक्तांतच पापाची वृत्ति जर नसती तर हें विधान खरं ठरलं असतं; पुण्या-खेरीज दुसरं काहींच उरलं नसतं. दया, माया, क्षमा प्रभृति शब्दांचं नांव देखील कोणाला माहीत झालं नसतं. तुम्हीं सूर्यप्रकाशाच्या पांढरे-

पणाबरोबर न्यायाची तुलना केली. पण पांढरा रंग म्हणजे साऱ्याच रंगाचं मिश्रण नव्हे काय? हा पांढरा प्रकाश तिरप्या काचेच्या गोलका-तून पाहिला कीं तो नाना रंगांचा दिसतो. न्यायाचं तसंच आहे. अन्याय, अधर्म, पापतापाच्या वावड्या या मार्गांतून पाहिल्यावर दया, माया, क्षमा याचें स्वरूप विचित्र झालेलं दिसतं. अन्यायाची क्षमा केली तर अधर्माला आश्रय दिल्यासारखं होत. मला तें कबूल, पण क्षमा ही ज्या प्रेमांतून जन्मास येते त्या प्रेमाचं मर्म जर तुम्हांला कधीं काळीं कळलं तरच पटेल कीं, अन्याय, अधर्म आणि अक्षमा वगैरे प्रकारांना क्षमा करून आश्रय देणें हें सुद्धा धर्माचच अनुशासन आहे."

या व अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांवरील विवेचन थक्क करून सोडणारें आहे. श्रेष्ठ दर्जाच्या कलावंताची दृष्टि या तात्त्विक चर्चांपाठी-मागें आहेच, पण शरद्बाबू हे नुसतेच कलाकार नव्हते. कित्येक शास्त्राचा गाढा व्यासंग त्यानीं केला होता. प्रखर बुद्धिमत्ता, मार्मिक पृथक्करणबुद्धि, वाचनाची दांडगी हौस आणि या सर्वांनाहि एका विचारसरणींत गुंफणारें तत्त्वचिन्तन शरद्बाबूंच्या कथाकादंबऱ्यातून ठिकठिकाणीं दृष्टीस पडतें शरच्चंद्र चट्टोपाध्याय नुसतेच हृदयाचे कला-कार नाहींत तर बुद्धि गुंग करून सोडण्याची अद्‌भुत किमयाहि त्याच्या तत्त्वचिंतनास लाभली आहे

त्यांच्या सामाजिक व राजकीय मताची चर्चा मागें अनेक वेळा आलेली आहे. कोणतेंहि राजकीय तत्त्वज्ञान त्यानीं स्वत:चें म्हणून मान्य केलेलें नव्हतें, तरी हावडा कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षीय पदा वरून आपल्या राजिनाम्याची भूमिका स्पष्ट करून सागतांना त्यानीं लोकांना कर्तव्य व हक्क याची जाणीव करून दिली आहे ती आजहि मननीय अशी आहे 'पथेर दाबी' ही त्यांची एकमेव अशी नांव घेण्या सारखी राजकीय कादंबरी. भारती, डॉक्टर व सुमित्रादेवी यांचे त्यातील संवाद म्हणजे क्रान्तीच्या तत्त्वज्ञानावरील स्वतंत्र व्याख्यानेंच होत. त्यातील

कलात्मकता किंचितहि कमी नाहीं हेंहि ध्यानात ठेवलें पाहिजे. नायिका भारती एके ठिकाणीं म्हणते, "युरोपियन असो वा भारतीय असो, ते सर्व मनुष्यच आहेत ना? माणसाबरोबर माणसास मित्रता स्थापन करता येऊं नये? मी ख्रिश्चन आहें. इंग्रज लोकाचीं अनेक ऋणें माझ्या शिरावर आहेत. त्याचे अनेक सद्‌गुण मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिले आहेत. त्याना भयंकर समजण्यात माझ्या मनाला दुःख होतें.—पण मी या भारताचीच एकनिष्ठ कन्या आहें, तुमचीच बहीण आहें मी. भारताची भूमि व भारताचे लोक याच्यावर विलक्षण प्रेम आहे माझें—" भारतीचे हे उद्‌गार आजच्याहि परिस्थितींत राहणाऱ्या इतर जमातींनीं ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.

या भारतीला उत्तर देणारे सव्यसाची डॉक्टर ही एक अद्‌भुत व्यक्ति शरच्चंद्राच्या प्रतिभेंतून अवतीर्ण झाली आहे. त्यानीं तिला विचारलें, "तूं म्हणतेस तें खरें आहे. पण तुमच्या लोकाची विश्वग्रासी भूक मोठी विलक्षण आहे. या देशाचे मालक तुम्ही. पण तुमच्या स्वामित्वामुळें या देशावर काय काय आपत्ति कोसळल्या आहेत हें माहीत आहे तुला? ब्रिटिश संपत्तीशीं आज कोणाची तुलनाच होणार नाहीं. किती जहाजें, किती यंत्रें, किती कारखाने, केवढाल्या इमारती आणि माणसें मारण्याचीं साधनें तरी किती भयंकर व मुबलक! हें सर्व विराट् ऐश्वर्य कोठून निर्माण झालें माहीत आहे तुला? भारताची कन्या तूं म्हणवतेस ना? पाहा हा भारत. हिंदुस्थानांत दरसाल लाखों माणसें मलेरियासारख्या रोगामुळें औषधपाण्याविना मरतात. एका जहाजाच्या किमतींत या मरणाऱ्या लाखों डोळ्यांतील अश्रु पुसतां येतील. काय उरलें आहे या देशात? या मातृभूमीची मूर्ति तूं कधीं निरखून पाहिली आहेस? शिल्प गेलें, व्यापार संपला, धर्म गेला, ज्ञान विराम पावलें. वाहणाऱ्या नद्याचें पाणी आटून तेथें वाळवंट निर्माण झालें, किसानांना पोटभर खावयासहि मिळत नाहीं, शिल्पकार विदेशांत जाऊन मोलमजुरी करूं

लागले आहेत. या देशांत अन्न नाहीं, पाणी नाहीं. गृहस्थाघरची सर्वोत्तम शोभा गोधन ही होती, पण आज तान्ह्या पोरास देखील दूध मिळणें कठिण झालें आहे."

शरद्बाबूंच्या लेखणींतील धार या ठिकाणीं समजावून घेण्यासारखी आहे. पारतंत्र्यात देश असतांना हे प्रक्षोभक विचार काढणारा कलावन्त केवढया योग्यतेचा असेल? देशाला स्वातंत्र्य मिळावें म्हणून अनेक मार्ग अनेकांनीं सुचविले होते, त्यात क्रांतिकारकाच्या मार्गास इतिहासांत फार महत्त्व दिलें जाईल. पण याहि मार्गावरील चर्चा मोठ्या विलक्षण पद्धतीनें शरच्चंद्रानीं केली आहे. या कादंबरींतील नायिका भारती आणखी एके ठिकाणीं म्हणते, "भारताला स्वातंत्र्य हवें आहे. पण कोणत्याहि कपटा-शिवाय, सकोचाशिवाय तें हवें. दुर्बल, पीडित, क्षुधित भारतवासीयासाठीं अन्नवस्त्र पाहिजे. अंतिम सत्याकडे जाण्याचा मार्ग या निष्ठुरतेखेरीज दुसरा परमेश्वरानें निर्माण केला नसेल हें मला पटत नाहीं. –" सर्वांनीं प्रेमानें, बंधुभावानें रहावें, या विश्वमानवाच्या शुभंकारी बुद्धीची तारीफ करून शरच्चंद्रानीं एका कल्याणकारी जगताचें रूप भारतीच्या मुखातून साकार केलें आहे.

देशाला स्वातंत्र्य कसें मिळवयाचें हा प्रश्न आता सुटला आहे. पण याहिपुढले महत्त्वाचे प्रश्न आपणापुढें आहेत. समतेच्या तत्त्वावर आधारलेली लोकशाही यशस्वी करावयाची असेल तर सामान्यातील सामान्य माणसासहि आज स्वत्वाची तीव्र जाणीव निर्माण झाली पाहिजे. शिक्षणाचा फैलाव समाजाच्या सर्व थरापर्यंत प्रामाणिकपणें केला पाहिजे. शरच्चंद्राच्यापुढें हाहि प्रश्न निःसंशय होता त्याची 'पंडित मशाई' कादंबरी या दृष्टीनें वाचण्यासारखी आहे. गौरदास अधिकारी याचा मुलगा वृन्दावनबाबू ही एक मोठी विलक्षण व्यक्ति आहे. हा कांहीं फारसा शिकलेला नव्हता; पण त्यानें आपल्याच गावात स्वतः सर्वांना शिक्षण देण्यासाठीं एक शाळा उघडली होती. त्याच्या या शाळेंत

कोणालाहि फी नव्हती. त्यानें इंग्रजी विद्येचेंहि शिक्षण घेतलें. गांवांतल्या मुलाना शिकविण्यांत त्याला परमावधीचा आनंद होई. या वृन्दावनाचा बालमित्र केशव त्याला भेटावयाला आला. हाहि एम्. ए. होऊन एका कॉलेजात प्रोफेसर होता. पण समाजांत मिसळून समरसतेनें शिकविण्याचें त्याला कांहीं जमलें नव्हतें. वृन्दावनाचें यश पाहून त्याला कौतुक वाटलें. या दोघांचीं भाषणें म्हणजे आजच्या समाजशिक्षणावरची उद्बोधक अशी चर्चाच आहे.

पंडित महाशय म्हणतात, “ आम्ही सारे तेली, तांबोळी, कुंभार, चांभार, गवळी, कुणबी, शिंपी, कोष्टी—आम्ही माग चालवितों, नांगर हाकतों, गुरं बाळगतों—कोटबूट आमच्या ओळखीचे नाहींत. सरकारी कचेरीच्या दाराची भेट आम्हां लोकांना होणं दुर्मिळ म्हणूनच, तुम्ही लोक आम्हाला हलके समजता—शुभकार्यालासुद्धा आमच्या घरात पाऊल टाकणें म्हणजे तुमच्यासारख्या उच्च दर्जाचें शिक्षण घेतलेल्या लोकाची इज्जत खराब होते. ... पण सात पिढ्यापासून या हलक्या लोकातच आम्ही मिसळलों आहोंत. मी कुणबटच आहें, शेतकरी आहें. मीसुद्धां स्वतःच्या हातांत नांगर धरतों. तुझ्या शाळेंत मुलं आलीं नाहींत केशव, त्याचें कारण हेंच. केशव, आधीं या लोकात ये. त्याच्यांत ऊठ-बैस. आम्ही हलक्या जातींतील लोक सुशिक्षित सभ्य माणसाना भितों. त्यांना मोठे मानतों, त्याची सेवा करतों, पण विश्वास ठेवीत नाहीं त्यांच्यावर. त्यांचं सांगणं ऐकणार नाहीं आम्ही. तुमचं कल्याण नि त्याचं कल्याण एक नव्हे, त्यात तफावत आहे, हा संशय आम्हां लोकांच्या मनांतून कांहीं केल्या निघावयाचा नाहीं. ... माझ्या शाळेंतील एक विद्यार्थी जरी माणसासारखी माणुसकी शिकला तर या आमच्या तीस कोटी लोकांचा सहज उद्धार होऊन जाईल. न्यूटन, फॅराडे, राममोहन, विद्यासागर यांसारखीं माणसं काहीं रोज तयार होत नाहींत. या छोट्या पाठशाळेंतील एक तरी विद्यार्थी माणसासारखा माणूस झाल्याचं भाग्य मरायच्यापूर्वी मला लाभो, एवढाच एक आशीर्वाद दे केशव-- ”

हलक्या जातीशीं समरस होऊन त्यांना मनुष्यत्वाच्या मार्गावर आण-ण्याची धीरे धीरे खटपट करणारा हा पंडितजी शरद्‌बाबूंच्या कथासृष्टींत सर्वांना आदरणीय वाटेल.कर्मठ ब्राह्मणाशीं यानें तत्त्वासाठीं द्रोह केला आहे. कॉलऱ्याच्या सांथींत गावच्या एकमेव पाणवठ्यावर घाण कपडे धुण्यास त्यानें बंदी केल्यामुळें समस्त ब्रह्मवृंद त्याच्यावर खवळून निघाला. पण वृंदावनमहाशय कशास भिणारा नव्हता. पोटच्या पोराचा मृत्यु केवळ त्याच्या निष्ठेमुळें घडला. गावातील वैद्य आडमुठेपणामुळें मदतीस आला नाहीं.

समाज, धर्म, राजकारण, शिक्षण इत्यादि विषयावर शरच्चंद्रानीं स्वतत्र अशीं थोडींच व्याख्यानें दिलीं किंवा मोजकेच निबंध लिहिले. पण त्यानीं जी प्रचंड अशी कथाकादंबऱ्याची निर्मिति केली आहे ती बहुजनाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाची आहे. दलिताचा, पीडिताचा एवढा कैवारी दुसरीकडे सापडणार नाहीं. नारीधर्माची तात्त्विक चिकित्सा तर त्यानीं केलीच पण अनुभूतीच्या विस्तृत पायावर त्यानीं जें भावविश्व निर्माण केलें आहे तें कलेच्या दृष्टीनें अजरामर असेंच आहे. आणि या कलावन्ताच्या कलाकृतींवर तत्त्वज्ञानाचे सुगधी तुषार जाग-जागीं उडालेले आहेत. शरच्चंद्रांच्या कथासाहित्यातील तत्त्वचिंतनाचा उगम त्याच्या अध्ययनांत तर आहेच पण त्याहिपेक्षां जगाकडे पाह-ण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनास फार महत्त्व द्यावयास पाहिजे. " मढ्याला कधीं जात असते का ? " या इन्द्रनाथाच्या उद्‌गारानंतर श्रीकान्तानें जें आत्मनिवेदन केलें आहे तें जणु शरच्चद्राचें आहे. शरच्चंद्राच्या तत्त्व-चिंतनाचें व जगाकडे पाहण्याच्या त्यांच्या दृष्टीचें मूळ कदाचित् त्या निवेदनात सांपडण्यासारखें आहे. तो भाग येथें देऊन ही चरित्रकथा संपवीत आहें—

" अरे हें तर मढें ! मेल्यावर कसली आली आहे जात ? आतां ही आपली होडी; हिला का जात आहे ! कसल्या तरी आंब्याच्या किंवा

जांबाच्या लांकडाची ही बनली आहे...... " इन्द्रनाथ बोलत होता. त्यावर श्रीकांत निवेदन करतो—

" मधून मधून असच एकदम तत्त्वज्ञान बोलण्याची इन्द्रनाथास संवय होती. कुणाकडे शिकला नाही, कुठें अभ्यास केला नाहीं; असला अशिक्षितपणा ओलांडून हें तत्त्वज्ञान कस निघतं त्याच्या तोंडून, असं मला पुनः पुनः वाटे. आता वय झालं, बुद्धि आली, त्या वेळीं या प्रश्नाचं उत्तर मिळाल्यासारखं वाटतं. इंद्राला लबाडी ठाऊक नव्हती. मूळ उद्देश लपवून तो कोणतींहि कामं करीत नसे. मला वाटतं, त्याचमुळें त्याच्या अंतःकरणांतील सत्याची स्फूर्ति कोणत्या तरी अज्ञात अशा सृष्टिनियमाला धरून त्रिकालाबाधित सत्याचे उद्गार अगदीं अनायासें, अगदीं सहजगत्या त्याच्या तोंडून वदवीत असे. पक्क्या वस्तादाची उमेदवारी न करताहि, त्याची शुद्ध आणि सरळ बुद्धि कोणत्याहि प्रसंगाची भूमिका सहज पाहू शके. निष्कपट व सरळ बुद्धि म्हणजे या जगातील शेवटचा देणगी.. "

हीच देणगी शरच्चंद्र चट्टोपाध्याय याच्या जीवनविषयक तत्त्वचिंतना-पाठीमागें होती काय ?

• • •

## तुमच्या अधिक अभ्यासासाठीं कांहीं प्रश्न :

(१) बंकिमचंद्र व रवीन्द्रनाथ यांच्याविषयीं पंधरा-पंधरा ओळींत माहिती लिहा. आपलीं कोणतीं राष्ट्रगीतें यांनीं लिहिलीं आहेत ?

(२) शरच्चंद्रांनीं बालपणीं कोणकोणते उपद्व्याप केले ? त्यांच्या गृह-स्थितीसंबंधीं तुम्हास काय माहिती आहे ?

(३) शरद्बाबूंना सदैव भ्रमंती कां करावी लागली ? या त्यांच्या भटक्या वृत्तीमुळें त्यांना कोणत्या गोष्टींचा लाभ झाला ?

(४) शरत्साहित्यांतून शरच्चंद्रांच्या चरित्राचें सार कितपत तयार करणें शक्य आहे ? कांहीं उदाहरणें द्या.

(५) शरच्चंद्रांना साहित्यसेवेची स्फूर्ति कोठून मिळाली ? मोतिलालबाबू व रवीन्द्रनाथ यांच्या वाङ्मयकृतींचा परिणाम त्यांच्या मनावर कसा झाला ?

(६) शरच्चंद्रांना प्रचलित समाजाचा कटु अनुभव कसकसा आला ? त्यामुळें त्यांच्या मनावर कोणता परिणाम झाला ?

(७) 'माझें बालपण' या विषयावर स्वतः शरद्बाबू निबंध लिहूं लागले तर कसा लिहितील ?

(८) शरच्चंद्रांना ब्रह्मदेशांत जाण्याची आवश्यकता कां वाटली ? तेथील त्यांच्या जीवनाचें स्वरूप थोडक्यात लिहा.

(९) ब्रह्मदेशाच्या प्रवासामुळें व तेथील वास्तव्यामुळें त्यांच्या साहित्यिक जीवनास कोणकोणते लाभ झाले ?

(१०) शरद्बाबूंच्या वाङ्मयीन जीवनास प्रारंभ कसा झाला हें सांगून त्यांना प्रसिद्धि कसकशी मिळत गेली तें लिहा.

(११) शरच्चंद्रांच्या मुख्य मुख्य कथांचा व कादंबऱ्यांचा थोडक्यांत परिचय करून द्या.

(१२) पतितांबद्दल, गरिबांबद्दल, पीडितांबद्दल शरद्बाबूंना तीव्र सहानुभूति

वाटत असे, याची प्रचीति त्याच्या साहित्यावरून कितपत पटते ?

(१३) नारीजीवनाकडे शरच्चंद्र कोणत्या विशिष्ट दृष्टीनें पाहत असत ? त्याच्या प्रमुख नायिकांचा परिचय करून द्या.

(१४) शरच्चंद्राच्या बालनायकाची संक्षित ओळख करून द्या. तुम्हास आवडलेल्या दोन बालनायकाचीं आत्मवृत्तें थोडक्यात लिहा.

(१५) शरच्चंद्रांच्या तात्त्विक विचाराचा परिचय थोडक्यात करून द्या.

(१६) शरद्‌बाबूंच्या स्वभावाचीं प्रमुख वैशिष्ट्यें कांहीं प्रसगांसहित द्या.

(१७) ‘ एक थोर कलावंत व व्यासगी अभ्यासक ’ असा शरच्चद्राचा गौरव कां केला जातो ?

(१८) मराठींत अनुवादित झालेल्या शरच्चद्रांच्या पुढील कथा मन लावून वाचा :— छोटा भाई, काशीनाथ, देवदास, माधवी, विप्रदास, विजया, श्रीकात ( भाग १ ते ४ ), बिंदूचें बाळ, हेमांगिनी, महेश, पंडित महाशय, अरक्षणीया.

(१९) पुढील पुस्तकें तुमच्या ग्रंथाल्यातून मिळवा व त्याचें वाचन लक्ष-पूर्वक करा :— चार मिनार ( यशवंत तेंडुलकर ), प्रपंचकथा— भाग १ व २ ( शं. बा. शास्त्री ), भारती ( पु. बा. कुलकर्णी ) किंवा सव्यसाची ( भा. वि. वरेरकर ).

(२०) शरच्चंद्रांचा एखादा चित्रपट तुम्हीं पाहिला आहे काय ? पाहिला असल्यास तो तुम्हास का आवडला तें लिहा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१५६४
अनुक्र. ९८७०
वि.
कालीक. २४/६/५४
ठाणे
ग्रंथालय

# शरत्साहित्य-दर्शन

**कथाकादंबऱ्या :—**

बडी दिदी,
पंडित मशाय,
अरक्षणीया,
वैकुंठेर विल,
मेज दिदी,
चंद्रनाथ,
परिणीता,
शुभदा,
पथेर दाबी,
विप्रदास,
देवदास,
काशीनाथ,

श्रीकांत (भाग १ ते ५),
चरित्रहीन,
गृहदाह,
पल्लीसमाज,
बामुनेर मेये,
देनापोना,
नवविधान,
बिंदूर छेले,
छबी,
शेषप्रश्न,
अनुराधा,

षोडशी,
बिराज बहू,
दत्ता,
स्वामी,
निष्कृति,
सुमति,
मंदिर,
महेश,
हरिचरण,
दर्पचूर्ण इत्यादि.

**वरील कथासाहित्यावर आधारलेली नाट्यसृष्टि :—**

षोडशी,
रमा,
विजया,
बिराज बहू,
बिंदूर छेले,

मेज दिदी,
काशीनाथ,
स्वामी,
हरिलक्ष्मी,

अनुराधा,
सती,
परेश,
सुमति इत्यादि.

**शरच्चंद्रांच्या कथांवर तयार झालेले कांहीं बोलपट :—**

लेनदेन अथवा पुजारीण,
गृहदाह अथवा मंझिल,
देवदास,

काशीनाथ,
अरक्षणीया अथवा इन्कार,
बडी दिदी,

छोटा भाई,
शोभा,
बिराज बहू,
परिणीता इत्यादि.

• • •

RT I BK 0008564